

# गोष्टीतली बाई

सावित्री जगदाळे

▶ गोष्टीतली बाई : सावित्री जगदाळे

▶ ©

सावित्री जगदाळे
C/o श्री. एच. के. जगदाळे (पो. अधिक्षक),
पवन डी. ५०५, डी. एस. के. विश्व,
सिंहगड रोड, धायटी पुणे- ४११ ०४१
मो. ९७६५९८८९९३

▶ प्रकाशक
गंधर्व पब्लिकेशन्स्
कोल्हापूर.
मोबा. ९६८९८९५३००

▶ अक्षरजुळणी
रावजी देसाई

▶ मुखपृष्ठ
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

▶ मुद्रक
ॐकार मुद्रणालय
शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर.
फोन : (०२३१) ३२०२५२६, २६५१८६४

▶ आवृत्ती
डिसेंबर, २००९

▶ किंमत
रुपये २००/-

---

(या कादंबरीचे रूपांतरण, भाषांतरण, टी.व्ही मालिका, नाट्य रूपांतर, चित्रपट आदी करण्यापूर्वी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.)

‘संथ वहाणाऱ्या, शालीन निरायायला’

– सावित्री जगदाळे

# कथानुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| ○ | फुलांचे वाळवंट | ... | ७ |
| ○ | मंदीत जग-मेंदूत वादळ | ... | ४७ |
| ○ | हत्ती आणि मुंगीचं मंथन | ... | ५९ |
| ○ | पराभूत मध्यस्थ | ... | ७१ |
| ○ | हिऱ्याच्या कुड्या | ... | ८० |
| ○ | खुलली कळी | ... | ९७ |
| ○ | विश्ववात्सल्य | ... | ११२ |
| ○ | ढळता सूर्य | ... | १२८ |
| ○ | पाणीरंग | ... | १५१ |
| ○ | उपयोग | ... | १७४ |
| ○ | पर्जन्यछाया | ... | १८४ |
| ○ | हिमनगाचं टोक | ... | १९६ |


✦ ✦ ✦

# फुलांचे वाळवंट

बाया आणि रमेश मायलेकरं. शेतमजुरी करून आपला प्रपंच चालविणारे. रमेशचे वडील माधवरावांच्या घरी सालगडी म्हणून होते. ते गेल्यानंतर बाया आणि रमेशला त्याच घराचा आधार मिळालेला. बारा महिने त्यांच्याकडेच कामं मिळत. त्यामुळे कायमस्वरुपाचे कामगार म्हटले तरी चालतील. फक्त पगारी रजा, पेन्शन, बोनस असं काही देण्याची पद्धत नसल्यामुळे मिळत नसे. माधवरावांची तीन मुलं, मंगलचं लग्न झालेलं, विष्णू हाही बायको, मुलं असणारा. रेवा ही शेंडेफळ, बिंनलग्नाची. गावातल्या हायस्कूलला दहावीपर्यंत शिकलेली, म्हणजे नॉनमॅट्रिक. गणित, इंग्रजी, सामान्य गेल्यामुळं शिक्षण सोडून घरीच असते. आई-वडिलांना पोरगी दहावीपर्यंत शिकली एवढ्यानेच

डोक्यावरून पाणी गेले. ती पास की नापास फारसा फरक पडत नाही. अशी लग्नाळू मुलगी घरात म्हणजे अब्रूचा विस्तव. अजून अठरा पूर्ण नाहीत तोवरच तिच्या लग्नाचं स्थळ बघण वगैरे सुरू झालेलं.

कमल ही माधवरावांची सून. तान्हं, अंगावर पिणारं मूल, त्यामुळं तिच्या कामाला, स्वयंपाकाला उशीर होत असे. रानात बायका रोजाने लावलेल्या. जायला उशीर झाला तर खुशाल बसतात गप्पा मारीत. रेवाची आई म्हणाली, 'रेवा, रात्रीची भाकरी मी खाऊन जाती. दुपारची ये घेऊन, स्वयंपाक झाल्यावर.''

''आताच ने की, मी कशाला येऊ आणखी.'' रेवा ''अगं अजून भाकरीला बसायचीय तुझी भावजय.''

''मी देऊ का लगीच चार भाकरी थापून'' रेवा तवा, काटवट घेत म्हणाली.

''भाकरी टाक पण मी जाती. बायका गेल्या असत्याला. ये आजच्या दिवस. न्हायतर दिवसभर घरातच बसून असतेस की.'' रेवाची आई रुक्मिणी म्हणाली.

''राजूला सांभाळत न्हाय वाटत?'' चुलीतल्या काटक्या एकसारख्या करीत रेवा म्हणाली.

''कधीमधी येत ज्जावं. तेवढीच शेतातली माहिती कळंल.'' रुक्मिणीने उथाण्या पाटावर तंबाखू ठेवून त्यावर विस्तव ठेवला. जरा इंगाळ हालवून तंबाखू भाजली. कोळसे बाजूला करून ती फुंकणीने वाटली. हात आणि तोंड सुरूच. उद्या शेतकरी नवरा मिळाला तर शेतात जावंच लागलं की, मग म्हनत्याली शेतकऱ्याची पोरगी असून कायच करू माहीत नाही. एवढी कशी उंडगी.'' रुक्मिणीनं मिश्री तळहातावर घेऊन दाताला लावू लागली. तेवढी शांतता. रेवा म्हणाली. ''बरं बया आणती भाकरी. पण ऊसात लय भ्या वाटतं. म्हणून नगं वाटतं.''

"बरं राहू दे. बायच्या रमाला देती लावून. पण काम सोडून अशी कामं करायची मजी कामाचा घोटाळा नाही का होत?"

"थांब म्हणतीया तरी थांबनास." रेवा.

"रमा ईल. त्याच्याजवळ दी पाटी." रुक्मिणीनं हातात खुरपं घेतलं न् डोक्यावर पाण्याची चरवी निघाली.

रेवानं कमलला विचारून भाकरी केल्या. काटवट धुऊन ठेवली. ज्याने भाकरी करायच्या त्यानेच काटवट धुवावी. न्हायतर धुईल त्यालाच पुण्य मिळतं, भाकरी केलेल्याचं. रेवानं चुलीजवळचा पसारा आवरून केरसुणी फिरवली. कमलला बरं वाटलं. शाळा बंद झाल्यापासून रेवाची खूप सारी मदत होते. राजू झोपलेला. तोवर जेवून घ्यावं न् मग घासावीत भांडी. अंगावर पीत असल्यामुळं कमलला भूक निघायची नाही. नणंदभावजया दोघी जेवल्या. रेवाने मग रानात नेण्यासाठी सात भाकरी घेतल्या.

"वैनी, एवढ्या भाकरी वो कशाला?"

"आवो रानात एकमेकाच्या नादानं चार घास चढ जात्यात. बिनभाकरीचं असतं कुणी, कुणी अचानक उपटतं. जास्ती असाव्यात. कुत्रं असतंच." रेवानं डब्यात कालवण भरलं, चुलीवरचं पापड अलगद ठेवलं. चार कांदं टाकलं. ताकाची तवळी ठेवली. सगळं भरून झालं तरी रमेशचा पत्ता नाही.

"वैनी जाऊ का, रमेश काय यायचा दिसत नाही."

"भ्या वाटतंय म्हणता..."

"असू द्या आता. सवय लावायची. जाती एकटीच." कमलने तिच्या डोक्यावर चुंबळ ठेवून त्यावर पाटी ठेवली. हातात पाण्याची किटली घेऊन रेवा निघाली. वाटेतच रमेश दिसला म्हणाला, "दे माझ्याकडं पाटी."

"असू दे एवढी किटलीच घे. बरं झालं तू आलास ऊसातनं लय भ्या वाटतं." रेवा म्हणाली. रमेश उन्हातनं आलेला. त्याला तहान लागलेली. तो म्हणाला, "हळूहळू जा मी पळत जाऊन पाणी पिऊन येतो."

"आर घी या किटलीतलं. आयनं पण नेलंय."

"तिथलं पाणी उबाळ लागतं, उनानं, हे नको संपवायला."

"डेरा न्हाय वाटतं."

"लांब खोपीत असतू. कुणी बी येऊन पिऊन जातं."

रमेशचं येणं-जाणं असलं तरी रेवाशी कामाशिवाय बोलणं नसायचं. आज पहिल्यांदाच दोघं एवढ्या जवळून, जवळकीने बोलत होती.

"पाटी घेयची सवं न्हाय ना कसंतरी होतंय."

"दे माझ्याकडं." रमेशने रेवाच्या डोक्यावरची पाटी घेतली. ओढा ओलांडला की शेतं सुरू झाली. मग बांधानं, पायवाटेनं दोघं निघाली. गाडीवाटेचा पल्ला लांबून म्हणून ह्या मधल्या वाटेनंच जायचे सगळे.

"शाळा व्हती तोवर बरं व्हतं. आता घरातली कामं करून रानातं बी जावा." रेवा वैतागलेली.

"पुन्हा का बसली नाहीस परीक्षेला?"

"काय करायचंय. आता कुठं पास होणारेय? फी वाया जाणार तेवढी."

"घरात असं बसण्यापेक्षा अभ्यास झाला असता."

"घरात कुठं बसती. सारखं काम असतं. त्यानं तर नापास झाली. अभ्यास कसला डोंबलाचा हुतूया... तुझा तर दहावीला पहिला नंबर आलेला ना आपल्या गावात."

"पहिला नंबर आला म्हणून सायन्स घेतलं. सगळंच इंग्रजीतून. अकरावी सुटलं कसंतरी. तेव्हाच साइड बदलायला पाहिजे होती. म्हटलं

आपण एवढं हुशार तर थोडी जास्त मेहनत करू. म्हणून विषय, साइड नाही बदलली. वाटलं होतं मेडिकल नाहीतर इंजिनिअरिंगला जाऊ. पण कशाचं काय गणित सायन्स गेलंच. बारावी पास व्हायची मारामार. तिथं डॉक्टर, इंजिनियर कसं होणार?''

''परत एकदा बसून तरी बघायचं न्हाय का?''

''जाऊ दे मनच उडालं? क्लास लावायला पैसे कुठून आणायचं? आईच्या रोजावर घर चालतं कसंतरी. एवढं शिकून तरी नोकरी नाही म्हटल्यावर घरात बसून राहावं लागलं असतं. ग्रॅज्युएट झाल्यावर मजुरी करावी वाटते होय?''

''कवा ना कवा लागलीच असती की.''

''वशिला लागतो, लाखानं पैसे भरावे लागतात. दुसरा एखादा कोर्स करावा लागतो. आपल्या नशिबातच मजुरीय.''

''पण तू एवढा हुशार नापास तरी कसा झालास?''

''अगंऽ कॉलेजात सगळंच वेगळं असतं. बारावीत सगळे खासगी शिकवण्या लावतात. मग कॉलेजात कुणी हजरच नसतंय. रिकाम्या वर्गात शिक्षक तरी काय शिकवणार. माझ्यासारख्या एखाद्या गरीब मुलासाठी कोण ताप घेणारेय? आमच्यासारख्यांचे हालच बघ. शिकवणी लावावी म्हटलं तरी हजारो रुपये कुठनं आणायचे?''

''गावानं, सरपंचानं नसती व्हय मदत केली?''

''ते कशाला करतात? सांगायचं ही सुचलंच नाही.''

''आमच्या दादाला तरी विचारायचंस.''

''किती दिवस त्यांच्याकडनं पैसे घ्यायचं. एवढा आधार दिला तो काय थोडा आहे का? जाऊ दे? कुठं तरी कष्टच करायचं न् हाड झिजवायची.'' बोलत बोलत दोघं ऊसाच्या शेतात कधी आली ते समजलंच नाही. रमेश एकदम थांबला.

“ते बघ.”

“आय गोऽऽ” रेवा तिकडे बघून ओरडली. ती धामण होती. सळसळत त्यांच्या पुढ्यातून निघून गेली. तिनं रमेशचा दंड गच्च धरला. घामेजली, थरथरत होती. तिचा चेहरा रमेशच्या जवळ आलेला. श्वास जलद चाललेला. तिला पहिल्यांदाच रमेश इतक्या जवळून पाहात होता. मालकाची मुलगी म्हणून कधी निरखूनसुद्धा पाहिलं नव्हतं. रेवा केवढी सुंदर दिसली त्याला. नुकत्याच उमललेल्या कळीसारखी. बालपणातला निरागसपणा, अल्लडपणा घेऊनच तारुण्यात पाऊल टाकलेलं. सावळ्या रंगाचं तेज सोळाव्या वर्षात विलक्षण झळाळत होतं. तिचं ते भित्रंपण... तिला घट्ट हृदयाशी कवटाळावं वाटत होतं...

“रेवाऽ” रमेशच्या नकळत पोटातून आवाज आला. त्या हाकेसरशी रेवा भानावर आली. तिनं धरलेला त्याचा दंड सोडला. ती खाली बघून चालू लागली. “तू नसता तर कसं झालं असतं?” साप दिसणं, घाबरणं, त्याचा दंड धरणं या सगळ्याचं तिच्यावर फारच दडपण आलेलं. न् ते पेलत नव्हतं तिला. ह्यातून सुटण्यासाठी भानावर येत बोलली. रमेश मात्र तंद्रीतच चालला होता. जमिनीच्या वर दोन बोटं त्याची पावलं अधांतरी तरंगत होती. तिची पाची बोटं दंडात रुतलेली. ते साकळलेलं रक्त गरम होऊन अंगभर, नसानसांत वेगानं पसरत होतं. हृदयाची धडधड वाढलेली. अंगांगातल्या पेशी ताठर झालेल्या. ते जनावर त्याच्या नकळत आत जाऊन बसलं. नि:शब्द चालताना शरीरातला रेणूरेणू उसळत होता. ऊसाचं शेत संपलं. खुरपणाऱ्या बायका दिसल्या. रेवा झपझपं तिकडे गेली. रमेश तिच्या भुरभुरणाऱ्या केसांकडे वाऱ्याबरोबर फडफडणाऱ्या परकराकडे भान हरपून पाहात तिच्यामागून चालत होता.

रेवाचा मोकळेपणा संपला. रमेश घरी यायचा तेव्हा चोरट्या नजरेने तिला शोधायचा. एकदाची ती कुठे दिसली की मग त्याचं भिरभिरणं थांबून वरचेवर चोरटेपणाने तिच्याकडे पाही. तिचं तिथं असणं त्याला सुखवित असे. त्याचा दिवस चांगला जाई. तो उत्साहाने कामं उरकायचा.

मंगल. रेवाची मोठी बहीण. मंगलच्या नणंदेचं लग्न म्हणून ती तिच्याकडे गेली. मंगलचा नवरा निमंत्रण पत्रिका घेऊन आला न् रेवाला घेऊन गेला. अचानकच. रमेशला सांगण्याचं काहीच कारण नव्हतं. रेवाच्या शेतातली खुरपाण संपल्यामुळे बाया पाटलाच्या शेतात जात होती. त्यामुळे त्यांच्या घरातला समाचार काही समजत नव्हता. कधी काही कारणाने घरी गेला तरी रेवा कुठेच दिसत नसे. तिचा आवाज येत नसे. रमेशचं कशात लक्ष लागेना. घुसमटल्यासारखं झालं होतं. कुणाला विचारायचं? काय न् कसं विचारायचं? जेवायला बसला तरी कितीतरी वेळ त्याला तोंडातला घास घालायचं भानच राहात नसे. तिचा तो घाबरलेला चेहरा, हरिणीसारखी व्याकूळ, भेदरलेली नजर अन् दंडात रुतलेली रेशमी बोटे आतून फिरत होती; कणाकणाला जागी करत. त्याला सुचेनासं होई. जेवण तसंच टाके.

''रमेश, आरं म्हाद्या केलाय. चांगला न्हाय का झाला?'' एवढं आवडीचं कालवण असून रमेशचं लक्षच नव्हतं.

''रमाऽ काय रं बरं वाटत न्हाय का तुला. गप गप आसतूस. नीट जेवत बी न्हाय.'' बायानं त्याच्या कपाळाला हात लावून पाहिला. तसाच केसांवरून मागे पाठीवर फिरला. तो स्पर्श आशीर्वादाचा होता. तसाच तुझ्याशिवाय मला कोणी नाही असंही सांगत होता. त्याला रडू येतंय की वाटू लागलं.

''जेव नीट.'' बायानं त्याच्या ताटात खरपूस भाजलेली उनउन भाकरी वाढली.

“आयं, चांगलं झालंय गं कालवण.” त्याला शरमल्यासारखं झालं.

“मागं रेवाच्या आईनं दिलेलं कालवण मुरलेलं चवदार लागत होतं. त्यांचा तेल-मसाला भरपूर चांगला. आपलं गरिबाचं कसलं रे चटणीमीठ टाकलं की झालं.”

“आई रेवा दिसत नाही गं?” रमेशची ठसठसणारी गाठ फुटली... निचरा झाला.

“ती गेलीय मंगलकडं. लगीन हाय ना तिच्या नंदचं.” रमेशला खूप हलकं वाटू लागलं ढग बाजूला झाल्यावर लख्ख ऊन पडतं, स्वच्छ तसं वाटलं. त्याच्या मनावरच दडपण गेल्यामुळे भूक जागी झाली. तो बकाबका खाऊ लागला.

“पाटलाचं खुरपान अजून कित्तीदी चालणारंय?” रमेश.

“आता पाटलाचं काम कधी संपतं का?” बायानं शेवटची भाकरी, चुलीला इंगळावर शेकत उभी केलेली मोडून घेतली ताटलीत. कालवण घेतलं. पोरानं आज एक भाकरी जास्तच खाल्ली त्यामुळे तिची काळजी कमी झाली. रमेशला ही चांगली संधी वाटली. मनातलं साधवून घेण्यासाठी तिला खुलवत ठेवून म्हणाला, “मग रेवाच्या घरी जाणारच न्हाय का?”

“कवा बोलवत्याली तवा जायचं. त्यान्ला न्हाय म्हणून कसं चालल?” तिनं त्याच्या ताटात कालवण वाढलं. तर रमेश म्हणाला, “आगं तुला रानात न्यायला राहू दी की. मीच संपवलं सगळं, मस्त झालंय, शेंगदाण्याचं पिठलं. ह्याला म्हादद्या का म्हणतात गं.”

“मला न्हाय बाबा माहीत. मी नेईन चटणी, भाकरीवर. जेव प्वाट भरून.” बाया म्हणाली.

“पाटलाचं काम मध्येच सोडणार होय?” रमेशला तो विषय संपवायचा नव्हता. आपल्या ताटातला म्हाद्या थोडा तिच्या ताटात वाढत म्हणाला.

"त्याच्याकडं मस्त बायका असत्यात्या. बारामहिनं आठराकाळ. माझ्या वाचून आडतंय व्हय त्यांचं?"

"आई मंगल आक्का केव्हा येणार गं?"

"आता तिच्या घरी लगीन म्हणल्यावर कशाला येतीया लवकर. पंचिमीलाच येयची."

रमेशनं हात धुतला. आता आपली पौर्णिमा पंचमीत दिसायची. रमेश पंचमीची वाट पाहू लागला.

रेवाच्या मळ्यातल्या ऊसाला तोड आली.

एक दिवस ऊसतोडणीचे कामगार येऊन ऊसतोडीला सुरुवात झाली. रमेशला उदास वाटू लागले. तो वरचेवर त्याच बांधावर जायचा. या ऊसामुळे आपल्यातला पुरुष जागा झाला... रेवाची ती स्पर्शकमळे इथेच, या ऊसाने फुलताना पाहिली. ती पाच कळ्यांची चैतन्यदायी कमळे... तुटतील? नाही... नाही... असं नाही होणार... ऊस तुटून गेला तरी पुन्हा तसाच, जोमाने खोडवा उगवतो...

रेवाला येत असेल आपली आठवण? ना जातीची, ना तोलामोलाची... ती आपली कशी होईल? तिला तर ह्यातलं काही कळत पण नसल. कळलं तरी ते वर येऊ देणारेय? दडपून टाकील न् विसरून जाईल मग... तिथं तिला कोणीतरी भेटल... त्याला स्वतःच्या परिस्थितीचा, जातीचा. खूप राग आला. परिस्थिती बदलता येईल, जातीसाठी माती खाणारी माणसं... रमेश तोडणीच्या शेतावर पाचट गोळा करायला जाऊ लागला. वाळकं, पांढरट पिवळ पाचरुट गोळा करून तो ढीग घालायचा. ढिगाच्या डोंगरापेक्षा त्याची उदासी मोठी होत होत जाऊन आभाळाला भिडायची अन् त्या डोंगरावर उंचच उंच शिखरावर रेवा उभा राहिलेली दिसायची. त्याला वाटायचं, 'गरिबाला शिकायचा अधिकार नाही. प्रेम करायचा नाही, नुसतं कामाचा ढीग उभा करायचा... पाचट... त्याला आग लावली

तर कुठला जाळ मोठा होईल, पाचरुटाचा की काळजातला? या ढिगाच्या ज्वाळा आभाळाकडं जायला तडफडतील, धडपडतील पण त्यांना आभाळ कधी गवसणार नाही न् आपल्याला रेवा... रमेश कितीतरी वेळ बांधावर बसलेला. अंधार वाढायला लागलेला.

ऊस तुटून गेला. सगळं पाचरुट गोळा करून ठिकठिकाणी पेटवून घेऊन त्या ज्वाळांची वर झेपावणारी तडफड बघताना रमेशला बरं वाटायचं... शेजारच्या रानातली पाचट तो गोळा करून ढीग घालू लागला. त्याला आग लावून ज्वाळांची धडपड, तडफड बघत बसायचं वेडच लागलं. तो मालक डाफरला म्हणाला, "तुला कुणी चोंबडेपणा करायला सांगितलाय? आमी न्हाय पेटवणार. कडबाकुट्टीतनं बारीक चुरा करून असंच पसरणारेय शेतात. गांडूळ खत व्हतं. लेका एवढा शिकलेला तू... तुला एवढं बी माहीत न्हाय; आगीनं प्रदूषण होतं? खोडवा जळतू." रमेशनं हातातली पाचट टाकली न् मुकाट्याने बाहेर पडला.

ऊस तुटून गेला. जोंधळा, हरभरा, गहू, तूर, साळ ही बाकीची पीकेही पिवळी पडली. पाखरांचे थवेच्या थवे त्यांवर बसू लागले. मचाण बांधून गोफणी फिरू लागल्या. एकेकाचं पीक काढणं सुरू झालं तसं रमेशला न् बायाला उसंत मिळेना. दोन दोन पाळ्यांतून कामं चालायची. गव्हाच्या कापणीला वगैरे झुंजूमुंजू व्हायच्या आत रानात हजर व्हायला लागायचं. कुणी आज़ारी पडायचं नाही. मरायलाही बंदी. रमेश मळणीच्या यंत्रावर जायचा. जोंधळ्याचं मोती पोत्यांत पडायचं. शेतकऱ्यांची, मजुरांची मनं आनंदानं, उत्साहानं सळसळत असायची. खळ्यावरच पंगती पडायच्या. वस्तीला तिथंच राहायचं. अशी लगीनघाई सुरू. रमेश पोती शिवून ठेवायचा. बैलगाडी आली की गाडीत पोती टाकायची. मालकाच्या घरी उतरवून एकावर एक थप्पी लावायची. रातपाळी की दिवसपाळी कशाचा हिशेब नव्हता. रात्रंदिवस काम करणे, बस. कामचुकारपणा कोणीच करत नव्हतं.

आजारी माणसं खळ्यावर आली की टुणटुणीत व्हायची. बाराबलुतं, नंदीवालं, गोसावी, पारधीसुद्धा मागायला यायचं. कडब्याच्या गंजी घातल्या. सगळं रान उघडं बोडकं झालं. काळीमाय सूर्यस्नान करीत सैलावत पडून राहिली. आवळलेलं अंग नांगरणीनं मोकळं होत होतं. सुगी झाली की नांगरट करून घेतली माधवरावांनी. आता गावोगावच्या जत्रा, बैलगाड्या शर्यती, लोकनाटकं, लग्न, बारसं एक ना दोन. पैसा खुळखुळत होता. रमेशपण जत्रा यात्रा करायचा, मटणाच्या तिखट पाण्याचा आस्वाद घ्यायचा. पण यंदा त्याचं मन कशातच रमेना. मित्रांबरोबर पोरींची टवाळकी करू वाटेना. तो मग बायाबरोबर हरभऱ्याचा, गव्हाच्या शेतातला सर्वा वेचायला जायचा. रमेशला ती कॉलेजातील वर्षं आठवायची. अकरावी बुजत, संकोचतच गेली. बारावीत जरा धीटपणा आलेला. ओळख मैत्री झालेली. कट्ट्यावरच्या गप्पा, सिनेमा एखाद्या मित्राची हॉटेलातली पार्टी मजा होती. पण मित्रांच्या पैशावर... एखादा म्हणायचा, ''लेका रम्या, तुझा कधी वाढदिवस असतो का न्हाय? उद्याच करू काय? ये ऐका रे उद्या रम्याचा वाढदिवस हाय. हिथंच, ह्याच वेळी जमायचं.'' आपली तर फाटायची. गप्प बसलो. काय खरं न्हाय. मग धडा करून सांगितलं, ''मी पार्टी देतो आधी आईकडून पैसे तरी आणू द्या.''

''जारे यार नको आम्हांला तुझी पार्टी. आईला खोटंच सांगणार ना तू...''

''मग खरं सांगून आणतो न् कायमचा घरी बसतो.'' घरी तर बसावंच लागलं पण साधी वडापाव, इडली सांबार सुद्धा मित्रांना खिलवता आलं नाही आपल्याला.

माधवरावांनी रमेशला कुळवणीसाठी बोलवलेलं. वळीव हजेरी लावून गेलेला. ऊसाच्या खोडव्यातून कोवळे कोंब तरारून वरती आलेले. नुकतीच खुरपान झाल्यामुळे रान धुतल्यासारखं होतं. काळ्या लुगड्यावर हिरव्या

बुड्यांची गर्दी झालेली. बांधाची हिरवी रुंद किनार अशी भरजरी रेशमी लुगडं नेसून पतीची वाट पाहाणारी नवी नवरीच जणू. रमेशला भारी हूरहूर वाटे. जिथे तिथे रेवाच आठवायची, भासायची 'ती तर तिकडे मजेत असेल आपण तरी काय गुलबकावलीच्या फुलाची अपेक्षा करतोय...' रमेश जड पावलांनी निघालेला. मालकाच्या खोपीकडं निघाला. लांबूनच त्याला बाभळीच्या झाडाखाली रेवा ऊस खात बसलेली दिसली. त्यानं नीट न्याहाळून बघितलं... ती रेवाच होती. साडी नेसलेली. छापील, नायलॉनची. रेवा बाईसारखी दिसू लागलेली. रमेश भरभर तिच्याकडे आला. तिचं ते रूप पाहून त्याला हसू आलं. रेवा हसली. निरागसपणे, खुप दिवसांनी जुना खेळगडी भेटावा तसंच काहीसं...

"कधी आलीस?"

"चार दिवस झालं की, ऊस खायचाय?" रेवा चोय चघळत हातातलं कांडकं त्याच्यापुढं धरत म्हणाली.

"नगं, तू खा. कुळवणी कुठं चाललीय?"

"त्या तिकडं. उशीर केला रं." रेवानं हातानं शेत दाखवलं. काचेच्या बांगड्या किणकिणल्या. रमेश तिच्या भरल्या हाताकडेच बघत राहिला. हिंदी सिनेमातलं दृश्य आठवलं त्याला.. ते गुंजन अंगभर झिरपलं. रेवाच्या लक्षात आलं.

"रमेश..."

"आँ?" रमेश दचकला.

"कुठं चाललीय कुळवणी?"

"तिकडं, दिसंना व्हय?"

रमेश गेला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडं रेवा कितीतरी वेळ पाहात होती, ऊस खायचा विसरून. तो ऊसातला प्रसंग तळातून उसळून वर आला. आक्काच्या घरी गेल्यावर तिच्या नणंदा, सख्खे, चुलत दीर

यांच्या चेष्टामस्करीत दिवस जात होते. लग्नाचं म्हटल्यावर गडबड, गोंधळ, फिरक्या, टोमणे, असं बरंच काही. जोपर्यंत मुलीचं लग्न होत नाही तोपर्यंत सगळे मेव्हणें, तिचे नवरे अशी काहीशी म्हण तिच्या अनुभवाला येत होती. अशा चिडवाचिडवीमुळं आतून गुदगुल्या व्हायच्या. जाता येता होणारे, जाणूनबुजून केले जाणारे स्पर्श तिच्या जाणिवा जागवत होते. एकदा तर तो कोण? राजा... आपण कणगूल्यातल्या पापड न् भातवड्या आणायला गेलेलो तर मागे आला. तिसरं कोणीच नव्हतं. दोन्ही हातात पापड-भातवड्या घेतल्या न् वळून निघाले तर हा खट्याळपणे हसला. दचकली केवढ्यांदा. ''एवढं भ्या वाटतंय'' असं म्हणत त्यानं दोन्ही दंड धरून भिंतीत दाबलं न् तेवढंच खट्याळपणे बघत राहिला. किती घाबरलेले. दिलं सोडून त्याने काही न करता... पण त्या बघणं... फक्त मस्करीच होती त्यात? त्याचं जवळ असणं हवसं वाटू लागलेलं. पण तो जसं काही विसरलाच सगळं की काय? काहीच जाणवू दिलं नाही त्यानं पुन्हा. नजरानजर झाल्यावर मात्र काळजाचा ठाव घ्यायची. बस एवढंच. एवढंच?

मंगलला रेवाचे भारी कौतुक वाटे. सगळ्यात मिळून मिसळून वागणारी, कामसू इकडचाच मुलगा बघून द्यावा. आपल्याला आधार मिळेल. पण नकोच इथला. एवढी मॅट्रिक झालेली रेवा तिला नोकरीवालाच नवरा मिळायला हवा. असं मंगलला वाटायचं. मग वाटायचं कुणाच्या मनात बसण्याआधी तिला आता पाठवून द्यावं घरी. लग्नाच्या निमित्ताने पोरांची ये-जा वाढलेली. उगा काय झालं तर... जोखीम नको. राहिली तर मदत होत होती; पण नकोच... मंगलने सासूजवळ तिच्या जाण्याचा विषय काढला.

''आत्यासाहेब रेवाला घालवावं का?''

''राहू दी की, तुला का अडचण व्हायला लागलीय?''

''तसं न्हवं पण किती दिवस ठिवायची. वैनीच तानं पोरगं हाय. आय रानात गेल्यावर वैनीची लय तारांबळ हुती.''

''रेवा, शेंगा आणं गं वायच.'' मंगलची सासू सोप्याला बसलेली.

''ती न्हाय घरात मी आणते.'' मंगलने भांडभर शेंगा सासूबाईंच्या पुढ्यात ओतल्या.

''कुठं गेलीय?'' शेंगा फोडत सासूबाईंनी विचारलं.

''थोरल्या घरी जेवायला गेलीय. बताशीबायची जया आलीय.''

''रत्ना गेल्यापास्नं उदास वाटतं गं राहू दी, रत्ना असल्यासारखं वाटतं...'' सासूबाईंनी डोळ्याला पदर लावला. मग मंगलही गप्प झाली. जया पुण्याला गेल्यावर मात्र रेवाने लकडा लावला, 'मला घालव.' म्हणून, 'किती दिवस राहायचं? महिना झाला.'

''कट्टाळ्ळीस व्हय?''

''आयची आठवण व्हती. राजू तर माझ्याशिवाय राहातच नाही.''

''आत्यासाबच नकू म्हणत्यात्या.''

''नगं बाई आता पहिल्यांदाच आयला सोडून इतकींदी राहिली.''

''लगीन झाल्यावर नांदायला न्हाय जावं लागायचं. आईला सोडून.'' सासूबाई आत येत म्हणाल्या. तस दोघी चपापल्या.

✦ ✦ ✦

बाहेर कोण पाहुणा आलाय म्हणून सासूबाईंनी डोकावलं रेवाचा भाऊ विष्णू आलेला. मंगलचा नवरा म्हणाला, ''काय पावणं असं अचानकच आला?''

''बहिणीच्या घरी यायला काय मुहूर्त बघायचा का सांगाव्याची वाट बघायची?''

''ते बी बरोबरच हाय.''

''रेवानं जायसाठी घोसरा काढलाय. बरं झालं आलास.'' मंगल पाण्याचा तांब्या त्याला देत म्हणाली. विष्णू बाहेरनं चूळ भरून पायावर

पाणी घेऊन आत येत म्हणाला, ''आमाला तरी कुठं करमतंय, मंगलला पण न्यावं म्हणतोय.''

''दोघींना कसं नेता? आता रत्नाला मूळसाडा, बुत्ती द्यायची. रेवामुळं बरं वाटत हुतं. रत्ना येईपर्यंत थांबली असती...''

''आयला बरं न्हाय.''

''काय झालंय?'' रेवा घाबरलीच.

''किरकोळ आपलं. शिसंभासं येतंच की वयामानानं. राजू लय पळतोय आता. एक माणूस लागतं त्याला लक्ष ठिवायला.''

चहा करताना मंगल ऐकत होती. पण रत्ना मुळसाड्याची बुत्ती घेऊन इल. तिला पुन्हा करायची. मुलीकडची बाजू म्हणून त्यांच्यापेक्षा जास्तच द्यायची. लगीनघरात दोघांना एकांत मिळालाच नाही. मंगलचा नवरा चिडचिड करायचा. मंगलला तर भीतीच वाटायची पण लक्षात यायचं, असं का करतोय. सगळे पाहुणे गेलेले. आता रेवाही जाईल... मंगलच्या डोळ्यांत पाणी तरारलं आईला भेटावसं वाटत होतं. एक दिवसात जाऊन आली असती पण सासूबाईंना असं पटत नाही. बुत्ती, वानवळा न्यायलाच पाहिजे. इकडून जाताना, तिकडून तसंच व्यवस्थित. तिनं मग मनाला मुरड घातली. रेवाच्या जाण्याची तयारी केली. सासूबाईंनी नव्या पातळाला कुंकवाचं बोट लावलं. घडी उलगडून पदर तिच्या डोक्यावर पांघरला. रेवा लाजली.

''आता पाताळच नेसत जा. असली कापडं न्हायीत बरी वाटत.''

''घरी गेल्यावर नेसीन की.''

''आ गऽ नेसून गेल्यावरच ग्वाड दिसतं. झाकून नसतं न्यायचं.'' सासूबाईंनी हुकूम दिला. रेवा वैतागली. रत्नाच्या लग्नातला छानसा ड्रेस घातलेला. आता तो काढून साडी नेसायला तिला नकोच वाटत होतं. पण मंगलने सांगितलं, ''नेस बाई. न्हायतर मला टोमणे खावे लागतील.''

"साडी नेसून कसं जायचं एसूटीतनं..." रेवा फणफणली.

"सवय लावायची." मंगलने साडीची घडी उचकटून तिला दिली. आता बॅगेत भरलेला परकर, ब्लाऊज काढावाच लागला, रेवाला. मग ती नेहमीच स्वतःला साड़ीत गुंडाळू लागली.

✦ ✦ ✦

रेवाला एकटं एकटं बसावसं वाटायचं. पण वहिनी सारखं काम सांगायची. रेवा तिची नणंद म्हणून तिला 'राणीसाब' म्हणायची. रेवा घरातच सारखा टी.व्ही. लावती म्हणून ओरडायची. 'एवढी चार भांडी घासून बसा मग,' म्हणता म्हणता एवढी केरसुणी फिरवून घ्या, एवढी दादाची कापडं धुऊन टाका. असं एकेक काम पाठपुरावा करीत राहायचं. ती मग आईला रानात येती म्हणायची.

खोडव्याचा ऊस चांगला उंच आलेला कमरेला लागायचा. सगळीकडे हिरवंगार शिवार दिसत होतं. काळ्या मातीचा कुठं तुकडाही दिसेन. श्रावण संपत आलेला. वावरात तण माजलेलं. जरा वापसा आला की खुरपान करावं लागायचं. कधी पावसाची झड लागली की अर्ध्यातन उठावं लागायचं. भादवा आला की म्हाळ सुरू झालेलं. एकेका घरचं आमंत्रण. आपल्या घरी सगळी भावकी बोलवायची. पितृपंधरवडा सरला. गवर-गणपती आल्यावर कुणाला रानात यावंस वाटेना. रुक्मिनीनं मग बायाला न् रमेशलाच गोड बोलून घेतलं खुरपायला. रेवा मग रोज जायची भाकरी घेऊन. घरकामातनं न् वहिनीच्या जाचातनं तेवढीच सुटका. रमेश बोलायचा, भेटायचा. तिला रानातच थांबावं वाटायचं. रुक्मिणी राजूसाठी लवकर घरी पाठवायची. ऊसानं आता बरीच उंची गाठलेली. मग रमेश ऊस ओलांडेपर्यंत सोबत करायचा. कधी बाया शिवाय दुसऱ्या बायका आल्या की रुक्मिणीला लवकर जावं लागायचं. आता ऊसाचं भ्या तिला पण होतंच. मग ती

रमेशला पाठवायची. 'ऊसाच्या बांधावर उभा राहा तिकडून इल रेवा पाटी घेऊन.'

सूर्य माथ्यावर आलेला. रेवा पाटी घेऊन शेताच्या बांधाबांधाने निघालेली रमेशला दिसली. तो मग पळतच गेला. तिच्या डोक्यावरची पाटी घेतली. "एवढ्या पुढं कशाला आलास?"

"तुमच्या आईनंच पाठवलं."

"आरं पण माणसं बघत्याती. असं दोघंच निघालेलो?"

"बघू दे.. घरातली काय म्हणत न्हाईत ना?"

"बाहेरच्यांनी बोल लावू न्हाय."

"रेवा, किती दिवस गावाला जाऊन राहिलीस? किती आठवण यायची. तुला यायची का गं माझी?"

"नाही... म्हणजे तिथे गडबड घाई एवढी तर... तिला आठवलं ते दंड धरलेले दणकट हात आणि ती आरपार गेलेली नजर."

"मला तर काही सुचायचं नाही. कशातच लक्ष लागत नव्हतं." रमेश जड आवाजात बोलत होता. रेवाला अपराधी वाटलं. तसं ती विसरूनच गेलेली. ऊसाचं शेत आलं. दोघं बांधावरनं चालताना हाताला काचोळं कापत होतं. रमेश तिच्याकडे बघत होता. पदर दोन्ही हात झाकतील असा लपेटलेला. काचोळ्यापासून संरक्षण. रमेशनं पाटी बांधावर ठेवली. 'रेवा" त्याने आर्तपणे हाक मारली. रेवा थरारून गेली. मागे वळून बघितलं त्याच्या डोळ्यातलं प्रेम. तिचंही पाऊल उचलेना. त्याने आवेगाने तिला मिठीत घेतलं. चेहरा, मान गळा सापडेल त्या जागेत चुंबीत होता. रेवा घुसमटून गेली. "सोड आता उशीर होतोय."

रमेशने तिला सोडलं. तो पाटी घेऊन भराभरा पुढे चालू लागला. रेवाने किटली घेतलेली. अंग हलकं झालेलं. पण जे झालं ते चुकीचं झालं, अशी तिला टोचणी लागून राहिली. तरी शरीरभर सुखाच्या उर्मी उसळत

होत्या. बायका खुरपत होत्या. तिनं किटली बाभळीच्या झाडाखाली ठेवली. रमेश पाटी ठेवून लगेच गेलेला.

"रमेशबरोबर आली व्हय रेवा?"

"व्हय. म्याच म्हणलं रमेशला सोबत जा. ऊस वाढलाय ना आता."

रमेश निघालेला बघून बाया त्याच्याकडे गेली. तिला गेलेली बघून ठेंगलीण मावशी रुक्मिणीला म्हणाल्या, "रुक्मिणी राग मानू नगंस. पण ह्या तरण्या पोरांचं काय सांगता येत न्हाय. सापापरास वाईट बघ."

"मंजी?" रूक्मिणी म्हणाली, "लहानपणापास्नं दोघं भनीभावंडासारखं राहात्याती."

"लहानपणाची गोष्ट येगळी. सोळावं वरीस धोक्याचं असतं बाई... झापडं बांधू नगंस आसं डोळ्यावर." ठेंगलीणमावशी बाया यायला लागल्याचं बघून पुढं बघून खुरपू लागली. तिला किंवा इतर बायकांना बायाचा मत्सर वाटायचा. ती कशी घरच्यासारखं वागती... त्याला फाटेही फुटत अनेक. आता तर काय दोघं एकत्र ऊसातनं आलेली बघून शंकांचं म्हव उठलेलं. जाणती नजर उडत्या पाखराचं पंख मोजणारी. जवळीक साधायला, बायाला तोडायला दुसरी संधी कुठून मिळणार? खरं तेच तर सांगत होत्या त्या... दुरातून स्पष्ट आणि पूर्ण दिसतं... रेवाची आई रुक्मिणी विचारात पडली. रेवा लहान असली तरी इषाची परिक्षा कशाला घ्यायची. आपुनच लवकर स्वयंपाक करून आलेलं बरं. दुसरी म्हणाली, "अशी रोज रानात यायला लागली तर काळी पडायची. आता म्होरल्या वर्षी लाडू देणार न्हवं?"

"का वो मावशी, कटाळा आला का? एकदा लगीन झालं की पोर लोकाचीच. राहू द्या की वरीस दोन वरीस." बायामावशीनं खुरप्यानं माती उकरत तणाच्या बुडावर टोच्या मारत म्हटलं.

"जेवढ्या लवकर आक्षदा पडत्याल तेवढं बरं असतं. घरात तरणी पोरगी मजी इस्तू असतोय, बाय."

"खरंय गं पण मंगलच्या लग्नाचं कर्जतरी फिटलंय का अजून." रुक्मिणी.

"पोरीच्या लग्नासाठी काढलेलं कर्ज न्हाय न्हात."

"नीट वावरा गं जमीन. बोलण्याच्या नादात नुसतंच तण उपटताय." रुक्मिणीनं विषय बदलला. रेवा येताना दिसलेली तिला. ती आईजवळ पातीवर बसली.

"नकू खुरपूस. जा सावलीत बस जा."

"एकटीच बसू व्हय?"

"झालं बघ एवढी पात कडंला घालावली की सुट्टीच करायची."

✦ ✦ ✦

रुक्मिणी जेवण घेऊनच गेलेली. कमलची सगळी कामं झालेली. राजूला घेऊन वारंघशी झोपलेली. दुपारची शांतता आळसावून पहुडलेली. रेवा बैचेन होती. आपण पाप केलंय हे तिला जाणवत होतं. आता आई म्हणाली तर एकटं जायचं... कोण खातंय? त्याच्याबरोबर कधीच न्हाय जायचं. झालं एवढं झालं. असा कसा रमेश... केवढं धारिष्ट्य त्याचं? मी ओरडले का नाही? कशाला कायपण खपवून घ्यायचं? तिला कालचा प्रसंग आठवला पुन्हा नव्याने ती तिच्या नकळत त्या वर्षावात भिजू लागली. कितीतरी वेळ सायकलची घंटी वाजत होती. रेवा भानावर आली. रमेश रस्त्यावर उभा राहून घंटी वाजवत होता. रेवाचे लक्ष जाताच त्याने मानेने येण्याची खूण करीत जाऊ लागला. रेवा त्याच्या धीटपणाने चिडली. याने सायकल तरी कुणाची आणली? काय सांगून आणली?

तिच्या मनावर दडपण आलं. काळीज धडधडत होतं. ती तशीच बसून राहिली. आपण तसल्या नाही. तिकडे जाताना कोण ओळखीचं

भेटलं तर? तिला प्रचंड भीती वाटली. असला नालायकपणा नाही करायचा... पुढ्यात रमेश उभा. तिने मान वर करून बघितलं.

"चल की." तो आर्तपणे म्हणाला. तिचं काळीज हाललं.

"वैनी हाईत."

"पुष्पीकडं जाती म्हणून सांग." तो आर्जव करू लागला.

"तू जा." ती तुटकपणे म्हणाली:

"बसतो बांधावर... लवकर ये."

वेडपटचय... अशी बरी येईन मी. ती बसून राहिली. तिचं काळीज धडधडत होतं. त्याचं अजीजीने बोलणं. आरक्त डोळे तिला काहीच सुचेनासं झालं. ती उठली पायात चप्पल सरकवली. कमल जागी झाली, आवाजाने.

"कोण व्हतं, राणीसाब?"

"रमेश."

"काय म्हणतोय?"

काय सांगावं? आईनं बोलावलंय म्हणून सांगाव? नंतर खरं कळंलच की...

"काय न्हाय. कुणाची तरी सायकल घेऊन आलेला. जाता जाता सहजच आलेला." आता इथनं उठावं नाहीतर हा परत येईल. ती मग पुष्पीकडे गेली. शाळेतली मैत्रीण. तिची आई रानात जायची न्हाय. मग दोघी मायलेकी घरीच असत. तिला अजून भावजय आली नव्हती. मग घरातली उगानिगी दिवसभर पुरत. तिचं दहावीला गणित, इंग्रजी गेलंलं. पुन्हा बसलीच नाही. परीक्षेला रेवा कमलाला म्हणाली, "मी पुष्पीकडं जाती." तिनं दार ओढून घेतलं. तिला वाटलं पुष्पीपण झोपली आसली तर? तिची खडूस आई वैतागायची. रमेशला चुकवायला निघालोय पण असं अचानक जायचं तिला काय सांगायचं? रमेश तरी कसा हलकट

निघाला खुशाल बोलवतोय... रमेश दोन वर्षं तालुक्याच्या कॉलेजात जायचा त्यामुळे चांगलं राहायचा. स्वच्छ कपडे घालायचा. वळणदार केसांचा कोंबडा कपाळावर रुळायचा. त्याचे डोळे काळजाचा ठाव घेणारे. शेतात काम करायला लागल्यापासून पिळदारपणा शर्टातून बाहेर दंडातल्या बेंडकुळीसारखा पडू पाहायचा. त्या दिवशी जवळ घेतले त्यांने कसली ती पोलादी पकड... रेवा पुष्पीच्या घराऐवजी शेताकडे निघाली. पावलं वळली त्याच्यातलं वाकडेपण, निसरडपेपण या क्षणी तिला कळत नव्हतं. तिला त्याची मिठी फक्त आठवत राहिली न् ती भराभर चालू लागली. सगळीकडे शांत आळसावलेली दुपार रेवा रमेशच्या आयुष्यात रसरसत होती.

✦ ✦ ✦

रेवा कुणाशीची स्वतःहून बोलायची नाही. नादात काम करायची. राजूला खेळवायची नाही. ने म्हटल्यावर गपगुमान उचलून कडेवर घ्यायची. बाहेरनं चक्कर मारून यायची. त्या निमित्तानं बायाच्या घरी जायची. कमलला जाणवत होतं मागं दुपारी रमेश आल्यावर रेवा कितीतरी वेळ बाहेर गेलेली... आणि रोज कशाला पुष्पीकडं जाती? तिला काय कामधाम न्हाय का? दुपारी परसाकडेला गेल्यावर पण किती उशीर लागतोय...? तशा कुणी मैत्रिणीपण नाहीत... कमल तिला पडताळून पाहात होती. संशय तर होताच...

✦ ✦ ✦

एकदा पुष्पीच दुपारी आलेली. रेवा नव्हतीच. आताशा कमळाला पण विचारायची नाही. ‘‘बसा. परसाकडला गेल्या असत्याल्या. संडासात पाणी ओतावं लागतं ना मग दुपारी ओढ्याकडं जात्यात्या.’’

"किती दिवस झालं गाठभेट नाही म्हणून म्हनलं आपुनच जावं." दोघी तासभर बोलत बसल्या. तरी रेवाचा पत्ता न्हाय.

"तशीच आमच्या घरी गेली आसंल." असं म्हणून पुष्पी गेली. काही वेळानं रेवा आली.

"कुठं गेलंता, राणीसाब?"

"पुष्पीच्या घरी." तिनं तार लावलेला डबा खुंटीला अडकवला. हातपाय साबणाने धुतलं. विस्कटलेली, जड आत आली. कमलने नीट बघितले. ती पाठमोरी झाली. मागच्या बाजूला गवतातलं सराटं चिकटलेलं. कमलने ते काढत म्हणाली, "पुष्पीच्या घरी सराटं वाळत टाकल्यातंय का काय?"

रेवा चपापली. "बघू ते व्हय. वड्यातलं चिकटलं असत्यालं."

"पुष्पी काय म्हणाली?"

"लोळत व्हती. तिनं रुकवतासाठी काय काय करायला घातलंय."

"च्यापाणी झालं आसल." राजूला तिच्याकडं देत कमल म्हणाली.

"हो केला व्हता च्या." रेवा बाहेर निघाली.

"राणीसाब, मागं फिरा." रेवाच्या तर पायातलं बळच गेलं.

"एवढं खोटं बोलायला कुठं शिकला?"

"कुठं गेलंता, खरं सांगा. पोरगं हाय कडेवर."

"पुष्पीकडं" रेवा घाबरत चाचरत बोलली.

"ती तिथंच तासभर बसली व्हती. तुमची वाट बघून आताच गेली. लग्न ठरलंय तिचं, सांगायला आलती." रेवा पांढरीफटक पडली.

"खरं सांगा कुठं गेलंता." तशी रेवा हमसून हमसून रडायला लागली. राजूनं भोकाड पसरलं. कमलने त्याला घेतलं. त्याला पाजू लागली. तो शांत झाल्यावर रेवा म्हणाली, "वैनी कुणाला सांगू नका. पुन्हा नाय जाणार... कधीच न्हाय जाणार..."

“पण कुठं?”

रेवाचं धाडस होत नव्हतं. जे काही केलंय, झालंय, ते भयंकरच होतं. तिला खूप भीती वाटत होती...

“राणीसाब, खरं सांगा. मी कुणाला न्हाय सांगत.” तिच्या डोक्यावरनं, पाठीवरनं हात फिरवत कमल म्हणाली.

“सांगा बघू.”

“ऊसात.”

“त्यात एवढं रडण्यासारखं काय हाय? बरोबर कोण व्हतं?”

“रमेश होता. वैनी, पाया पडती. दादाला सांगू नका. आता कधीच जाणार न्हाय.”

“कवापासून जाताय?”

“मधी भाकरी घेऊन गेली तवापासून.”

“मुडदा उचलला त्या रम्याचा खाल्ल्याघरचं वासं मोजतूया किरडीवाला.”

“वैनी, त्यानं जबरदस्ती न्हाय केली...”

“तिथं जाऊन गप्पा मारायचा का आणखी काय...?”

“कधी कधी नुसत्या गप्पा, कधी सगळंच...” तीनं कमलचं पाय धरून रडू लागली.

“न्हवं. सगळं करत व्हता. असं सगळं केल्यावर बाई पोटुशी राहती माहितेय का तुमाला? तसं झालं तर सगळ्यालाच आपोआपच कळल की.”

रेवाने कमलचं हात घट्ट पकडलं.

“काय करायचं, वैनी. आमी पळून जाऊन लग्न करतो.”

“तुमी गप्प राहा. तो काय आपल्या जातीचा हाय का? तुमी गेला तरी बायाची गावातनं धिंड काढत्याली माणसं.”

"वैनी, दादाला, कुणालाच सांगू नका. नाही ना सांगणार?"

"न्हाय सांगत. पण आता बाहेर जाणं बंद. परसाकडंला पण हिथं संडासातच बसायचं."

"न्हाय जात."

"पाळीची तारीख लक्षात हाय ना?"

"हो महिना भरलाय पाचसहा दिवसांत इल."

✦ ✦ ✦

रात्रीची निजनिज झालेली. रोज कमल थकून झोपी जायची. पण आज ती विष्णू चावडीवरनं येईपर्यंत जागीच राहिलेली. तिला वाटलं आपण तरी जागं राहाण्याच्या योग्यतेचे आहोत. सगळेच झोपा काढायला लागल्यावर पत राहील? असं वाकड पाऊल पडलं राणीसाबाच. चांगली पोरगी बिघडली. तिला अचंबा वाटत होता. काय जादू केली का काय रम्यानं? रमेशला आठवताच तिच्या मस्तकाची शीर तडकली. हिंमत कशी झाली भडव्याची... विष्णू आला. कमलला जागी बघून विष्णू म्हणाला, "आज बरी जागी राहिलीस?"

"थोडं बोलायचंय. शांतपणे ऐका."

"आता बोलायचं न्हाय नुसत शांतपण करायचं." तिच्या अंगचटीला येत विष्णू म्हणाला.

"आवो राहु द्या. ती कॉपर्टी दुखती. वायच ऐका तरी."

"हूं सांगा" तिच्या मांडीवर डोकं ठेवत विष्णू म्हणाला.

"घरात लग्नाची बहीणय. तिचं कधी बघायचं?"

"कुठं लय मोठी झालीय. राहू दे चारदोन वर्स."

"आतापास्नं सुरुवात केली तर येळंत होऊन जाईल."

"तुला काय अडचण व्हायला लागलीय का?"

"मला कशाला हुईल अडचण... तरणाताठी पोरगी. ह्या वयात चांगल वाईट कळतं का? लवकर लग्न झालेलं बरं."

"कुणाची हिम्मतय माझ्या बहिणीकडं वाकड्या नजरनं बघायची?"

"जरा हळूऽ"

तिला जवळ ओढीत म्हणाला "मंगलच्या लग्नाचं कर्ज हाय अजून. लगीच एवढा पैका कसा उभा करायचा?" विष्णू तिच्या ब्लाऊजची बटणं काढत म्हणाला. "पैसा जमतो. तुमी सुरुवात तरी करा." तिनं त्याला घट्ट आवळीत तोंडात तोंड घातलं.

✦ ✦ ✦

रात्रीची जेवणं चालली होती. कमल भाकरी टाकत होती. रेवा बाजूला दूधभात चारत होती. रुक्मिणी दोघांना वाढत होती.

"आण्णा तो घोरपड्याचा शंकर म्हणालाय त्याच्या सासुरवाडीची जागा लय जोरातंय. यायचं का बघून."

"रेवासाठी व्हय?" रुक्मिणी.

"हो. चांगलीय जागा. सगळं जुळतंय..."

"तू ये बघून शंकरबरोबर. त्यांनी रेवाला पसंत केल्यावर मग बघू." माधवरावांनी हात धुतला. अंगणातल्या बाजल्यावर दात कोरत बसले. "बिडी आणा रे पेटवून." बसल्या बसल्या त्यांनी आत रोजच्यासारखा आवाज दिला. रेवाने बिडी घेतली, विस्तवावर पेटवली न् माधवरावांच्या हातात दिली.

"पोराला नोकरी हाय का?" रुक्मिणी हळू आवाजात कुजबुजली.

"मुंबईत एका मोठ्या कंपनीत हाय. सोळा हजार रुपये पगारेय. चाळीत भाड्याच्या खोलीत राहतो. फलाट का काय बुक केलाय." त्याने आमटी भाकरीच्या काल्याचा भुरका मारला. "जागा लय चांगलीय. आज

ना उद्या ते रेवाला बी मुंबईला नेतील. बरं लय हुंड्याची आशा नाय. सुशिक्षित हायती सगळी.''

''लगीन तरी करून द्यायला व्हवं का नको?'' रुक्मिणी काळजीनं म्हणाली.

''तेवढं करू की आपुन. तेवढंबी जमंना व्हय!''

''उद्याच जाऊन बघून ये.'' माधवरावांनी बिडीचा धूर हवेत सोडत विष्णूला सांगितले.

''बरं'' विष्णूनं असं म्हणत हात धुतला न् गेला बाहेर. चावडीवर जायच्या आधी शंकरला गाठून त्याच्याशी बोलायला हवं. घाईतच गेला.

शंकर न् विष्णू बघून आले. मुलगा मुंबईवरून येईपर्यंत विष्णूची दुसरीकड चौकशी सुरू झाली. चांगली जागा वाटली की बघून यायचं. सावळी रेवा तिकडूनच नकार मिळायचा. कमळ, विष्णूला काळजी वाटू लागली. पौष महिना आला न् स्थळं बघणं थांबलं. पौष महिन्यात बघू नाही म्हणून रेवाची पाळी येऊन गेली. त्यामुळे कमल निश्चिंत झाली. रेवा आता बाहेर पडतच नव्हती. रमेशला एकेक दिवस पहाडासारखा पुढ्यात ठाकलेला. पलीकडचं काहीच कळत नव्हतं. चढून जावं तर धाप लागते. ओलांडून जावं तर पाय दुखतील चालण्यानं. दोघांमधला अडथळा कसा पार करायचा याचं कोडं त्याला सुटत नव्हतं. दिवस सरता सरत नव्हते. उदास धूळभरली पानगळ, मनातलं एकेक मोरपीस गळून पडत होतं. रेवाच्या घरचे नेहमीसारखेच सगळे बोलत होते. पण रेवा कुठंच दिसायची नाही. संडासात जाताना तरी दिसेल म्हणून जरा दूरवर बसून राहयचा. घराच्या बाजूला संडास, बाथरूम बांधलेलं. तिथंच पाण्यासाठी हौद होता. टेलरच्या दुकानात बसलं की ते संडास तिथं कोणं आलं गेलं दिसायचं. सकाळी चहा प्याला की हा तिथं जाऊन बसायचा. दुकान उघडलं नसलं तरी पायरीवर बसायचा. बाया त्याला बोलवायला यायची. आंघोळ,

जेवणखाण कशातच त्याचं लक्ष नव्हतं. रेवा एकदाची जाऊन आली न् त्याला दिसली की मग त्याला गळून गेल्यासारखं व्हायचं. पाय ओढत तो घराकडं जायचा. रेवाला चिठ्ठी पाठवावी का? पण कशी? बहुतेक कमलवहिनीचं तिच्याकडं लक्ष असावं. आजकाल घरी गेलं तरी बोलंत नाही. राजूला घेऊ देत नाही. राजूला बाहेर फिरवायला तीच येती. रेवानं बाहेर यायचंच सोडून दिलंय. तिच्याशी बोलायची भेटायची कशी संधी मिळेल याचे आडाखे बांधत राहिला. संधीची वाट बघण्याशिवाय त्याच्या हातात काही नव्हतं. हे कुणाशी बोलता येत नव्हतं. त्यामुळे तो बेचैन असायचा.

रमेश घरीच होता. त्याला कसंही करून रेवाला भेटायचं होतं. किती दिवस झाले... तिला आता पाहुणे बघायला येतात असं बायानं सांगितलेलं... रेवा जाईल लग्न करून. तोपर्यंत तरी... लग्न व्हावं असं कधी वाटलंच नाही. तो भुईवरच लोळू लागला. अवतीभवती सारखा रेवाचा भास व्हायचा. तिचं ते भिऊन बिलगणं, सुरुवातीला लाजणारी, ब्लाऊजची बटणं मोकळी करू लागली, स्वतःही मोकळी होऊ लागलेली. रमेशला झोप येतच नव्हती. तो उठला. तोंड धुतलं. दुपारचे तीन वाजलेले असतील. तो मग रेवाच्या घरीच गेला. त्याला वाटलं तिची वहिनी झोपली असलं, तेवढ्यात चान्स मारून घ्यावा. तिला मिळवायचीच... कसंही करून हा इरादा करूनच निघालेला. रुक्मिणी गडबडीत दरवाज्याला कुलूप लावीत होती. रमेश आलेला पाहून म्हणाली,

"काय रं रमा? कामाला गेला नाहीस?"

"न्हाय गेलो."

"आरं आता सुगीसरायचं दिवस... सारखा गावातच असतू आसं बाया म्हणत होती. आसं न्हाय बाबा करायचं. रांडमुंड आई तुझी, रातूंध्या राबती. एवढा शिकला सवरलेला तू... आयला कवा इसावा मिळायचा?"

रुक्मिणीनं पाटी उचलली न् निघाली. रमेश बावचळल्यासारखा थोडा रेंगाळला न् म्हणाला, "वैनी कुठं गेल्यात्याय." त्याला वाटलं रेवाला कोंडून ठेवलं आसलं तरी वैनी कुठंयेत मग? रुक्मिणीचं त्याच्या बोलण्याकडं लक्षच नव्हतं. तो तिच्यामागं गेला न् म्हणाला, "काकी, पाटी मी घेतो द्या. मला पण रानात यायचंय."

"असू दी घेती मी. एवढी किटलीच घे..."

"इतका कसा उशीर झाला?"

"सगळं एकटीनंच बघायचं म्हणल्यावर होतो उशीर. कमल गेली माहेराला."

"रेवा आसंलच की." रमेशनं धडा करून विचारलं. विचारलं नसतं तरी वेड लागलं असतं त्याला. की खरंच कोंडून ठेवली... जावं माघारी न् कुलूप तोडावं...

"रेवाला पण नेली तिनं. राजू राहतोय कुठं तिच्याशिवाय. दोघींचं लय जमतं बघ. भनीभनीसारख्या राहत्यात्या." रमेश रुक्मिणीच्या मागे फुफाट्यात चाललेला. पायात चप्पल नव्हती. पाय पोळत होते. त्या चटक्यांनी त्याला बरं वाटत होतं. थंडीनं फुटलेल्या हातापायावर धुरळा बसून अंगाला खाज सुटत होती. हातपाय खाजवण्याशिवाय रमेश काही करू शकत नव्हता.

पौष संपला. शंकरचा मेव्हणा मुंबईवरून आला. रेवा हडकली होती. घरात बसून पिवळी पडलेली. बाळंतिणीसारखी. गोरी मुलगी मधुकरला पसंत पडली. दहा एकर जमीन गावात घर आणि मुंबईत नोकरी. लग्न ठरलं न् इकडं रमेशची तहानभूक हरवली. बायाला काळजी वाटू लागलेली. सारखं पडून राहातंय... वाकळ त्याला सोडीना न् तो वाकळंला सोडीना.

"तुला झालंय तरी काय सांग बघू. काय दुखतंय का. चल दवाखान्यात जाऊ?"

''काय न्हाय झालं तू जा.''

''तुला लाज वाटती का? मी जाऊ कामाला? तू लोळत पड.'' ती त्याच्याजवळ बसली. तोंडावरून हात फिरवित म्हणाली, ''हे बघ लेकरा. तुझ्यासाठी हाडाची काडं केली. माहेराला गेली न्हाय. कुणाची मिंधी झाली न्हाय.'' तिने डोळे पुसले.

''तू शिकला. म्हनलं नोकरी करशील ते बी न्हाय.'' कामावर जायला लागल्यावर जिवाला बरं वाटलं म्हनलं. नोकरी असती तर पोरगं जवळ नसतं राहिलं... आता डोळ्यासमूर हाय, नसना का नोकरी. कुठं बी कष्ट केल्यावर उपाशी ऱ्हातं का माणूस... आता लगीन लावून दिलं की मी मोकळी. तर तुला काय आसलं ढवाळ लागलंय.

''आयं मी लग्नच करणार न्हाय.''

'' तुझ्या कोण हाय मनात, अं? आपल्याच जातीतली असली तर लगीन लावून देती.''

''आपल्या जातीतली न्हाय.'' रमेश तिच्या हाडकुळ्या मांडीवर डोकं ठेवून झोपलेला. तोंड मांडीत लपवलेलं.

''नाव तरी सांग.'' त्याच्या वाढलेल्या केसांतून हात फिरवत म्हणाली.

''रेवा.'' तो स्फुंदत रडू लागला. ''तिच्याशिवाय जीव रमत न्हाय कुठंच.''

झटदिशी बाया त्याचं डोकं बाजूला सारून उठली. बुक्क्या, धपाटे घालू लागली.

''किरडीवाल्या, तुला गोळा उठला, नसता आला असला पोटाला तरी बरं झालं आसतं... माझ्या माहेरासारखं हाय मला ते घर... अन् तू कशावर जीव जडवून बसला... बाप मेल्यापासनं इज्जतीनं राहिली. आता गावात तोंड दाखवायला जागा ठिवली न्हाईस.'' बाया थकली. बाजूला बसून गुडघ्यात डोकं घालून गदगदून रडू लागली.

"आयं आगं ते कंाय आपल्या हातात असतं का? आपोआपच झालं."

"मुडद्या मन आवरलं की सगळं असतं हातात. मी न्हाय आवरलं? कारं असं केलंस?"

"मी काय पाप केलं का गुन्हा केलाय?"

रमेश चिरडीला येऊन म्हणाला.

"माहितेय का कुणाला?"

"नसंल माहीत."

"तू तर वाघाच्या तोंडातच हात घातलास की."

"प्रेम आंधळंच असतं..." रमेशच्या मनावरचं दडपण गेल्यामुळे मोकळेपणानं बोलू लागला.

"रोग आला त्या पिरमाला. इथून पुढं भेटलास ना तर तंगडंच मोडीन बघ. तिच्या म्होरं अजिबात जायचं न्हाय." बायानं पाटी उचलली न् निघाली. रमेश वाकळंत तोंड खुपसून पडून राहिला.

एकेक दिवस जवळ येत होता लग्नाचा. निमंत्रण पत्रिकावर नावं लिहायला विष्णूने रमेशला बोलावलं. 'रात्री जेवायलाच ये'. म्हणाला. जेवणं झाली की दोघं अंगणात बसली. सगळी नावं लिहून झाल्यावर रमेश गेला. जाताना विष्णूने सांगितलं. 'सकाळी लवकर ये. तालुक्याला जायचंय. तुला एकट्याला जमंल ना द्रोण-पत्रावळ्या आणायचं.' रमेशच्या काळजाला चरं पडत होतं. पण नाही म्हणता येत नव्हतं. दिवसभर काही ना काही काम असेच. आता वाईट वाटणं बोथट झालेलं. नाहीतर तिच्याशी लग्न होणारच नव्हतं... पण अजून थोडी मजा केली असती... त्याची इच्छा अजून उफाळून यायची. एकदा असंच सामान ठेवायला गेला. रेवा एकटीच घरात. अंगणात बायकांचं रुकवत करणं, रवा, बेसन चाळणं असं काय

काय चाललेलं. रमेश सामानाच्या पिशव्या आत ठेवायला गेला. आतपर्यंत दुसरं कुणीच नव्हतं, रेवाशिवाय. तिच्याकडे सामानाची यादी वगैरे देत म्हणाला, 'एकदाच भेट. उद्या दोन वाजता दुपारी.'' दुपारी तिचा हात दाबला. तो गेला रेवाच्या अंगात करंट सोडून. आता कमलचा धाक, लक्ष नव्हतंच. बाहेर पडायला कारण कुठलं सांगायचं? शरीराने उभा दावा मांडलेला. ती विचार करीत होती, कारण शोधीत होती. तिचे जुने ब्लाऊज सगळे ढिले झालेले. कुणीतरी म्हणाला टिपा मारून घे. रेवा मग दुपारी ब्लाऊजला टिपा मारण्यासाठी निघाली. ढगळ ब्लाऊज एका पिशवीत भरले. ती कमलला म्हणाली, ''टिपा मारून आणू का?''

''हं जावा की त्याला काय इचारायचंय.''

दुपारचं वाढतं, चटका बसणारं ऊन रेवानं डोक्यावरनं जरा पुढं कपाळ झाकेल असा पदर घेतला. हातात पिशवी. कुणी सासुरवाशीण निघालीय असं वाटत होतं. मागं पुढं बघत झपाझपा निघाली. एकेक पाऊल उचलण्यासाठी किती वेळ जातुया... रस्ता लांबच लांब वाटू लागलेला. ती ऊसात शिरताच खसपस झाली. ऊस डोक्याच्या वर गेलेला. रमेश वाट बघतच होता. आवेगाने तिला जवळ ओढली. त्याचा धुवांधार वर्षाव. ती चिंब भिजत होती. कुठलाही संभ्रम नाही. तो क्षण फक्त दोघांचा, दोघांसाठीच होता. जशी माथ्यावरची लख्ख दुपार स्वच्छ, स्पष्ट.

टिपा मारलेलं ब्लाऊज आणायला, साड्यांना पिको-फॉल करायला, कधी मुंडावळ्याचं कागद आणायला. लग्नघरचं ते किती काढतील तेवढी कामं निघंत होती. जेवायला म्हणून रमेश दुपारी वेळ काढायचा. ऊसाची जमीन रेवाचीच. आता खुरपणी वगैरे काही नसतं. ऊस मोठा झाल्यावर पाण्याच्या पाळ्या तेवढ्या पाळायच्या. दुपारचं तिकडं ऊसाचं काचोळं कापून घ्यायला कुणी फिरकायचं नाही. कुणी जाणार नाही अशा जागेतला

थोडा ऊस तोडून रमेशने मोकळी जागा केलेली. रेवाची भीड चेपली. कमलच्या लक्षात येत होतं. पण जाऊ दे चार-पाच दिवस राहिलेत. रेवा खंगत चाललेली तिला बघवत नव्हतं. भर लग्नात तोंडावर थोडीतरी रया येईल म्हणून ती दुर्लक्ष करायची.

✦ ✦ ✦

रुक्मिणी मांडवात आली नाही. अक्षदा पडताना ती तुळशीला पाणी घालत होती. दोन डोळ्यांतल्या धारा एक कलशातली. "शुभ मंगल सावधान" अक्षदा पडल्या. पायलीभर तांदळाला कुंकू लावून पवित्र केलेले तांदूळ नवरानवरी सोडून वऱ्हाडींच्याच डोक्यात पडत होते. लग्न फक्त दोघांचंच असतं कुठं? दोन घरांचं, दोघांच्या गोतावळ्यांचं. सगळ्या गावाचं असतं. मग हजर असलेल्यांची डोकी पवित्र व्हायला पाहिजेतच ना! प्रेम पवित्र असतं... नंतर कुंकू माखल्या तांदळासारखं पायदळी तुडवलं जातं... ही परंपरा, हीच संस्कृती, हीच भारतीय मनामनांतली सभ्यता...!

अक्षदा पडल्या, सात मंगलाष्टका म्हटल्यावर कुणीतरी ओरडले "वाजवा रेऽऽ" बँड आणि फटाक्याचा एकत्र आवाज वऱ्हाड्यांच्या गलबल्यापेक्षा मोठा होता. फटाक्यांनी राक्षस पळून गेले. बँडने देव आले. हल्ली राक्षसांना पळवून लावण्यासाठी देवांना अवतार घ्यावा लागत नाही. फटाकेच ते काम करतात. या सगळ्या गोंधळात कुणाला स्पष्ट कळणारं नाही असा स्पीकरवरून आवाज येत होता. 'जेवल्याशिवाय कोणी जाऊ नये'

"ज्ञानदेव, विठ्ठल यांच्याकडून पाच रुपये..."

"नामदेव, नरहरी यांच्याकडून फुल पोशाख"

'सगळ्यांनी जेवायला बसून घ्यावे.'

'हरी नारायण यांच्याकडून अकरा रुपये.'

लोक मांडवात ओळीने बसू लागले. पत्रावळ्या टाकल्या. द्रोण वाटले. पत्रावळीवर पांढरा भात मुठीने बकाबका वाढला. त्यावरच प्रत्येकाने आपला आपण द्रोण बसवला. भाताच्या ढिगाला खड्डा करून त्यात द्रोण ठेवायचा. नेणत्यांना जाणत्यांनी मदत केली. मग त्या द्रोणात आमटीचं तिखट पाणी वाढलं. द्रोण गळके. बहुतेक. भात आपोआप भिजला. पचकन वांग्याची भाजी वाढली. थोडाफार रस बाहेर पळू लागला. मग शिरा, मसालेभात, बुंदी येऊन पडले. त्यानेच मग भाजीचा रस आडवण्याचं काम सुरू झालं. नवरा येतो नवरीसाठी, वऱ्हाडी पोटासाठी. ढेकर दिली तृप्तीची पाहुण्यांनी. ज्यांना जायची घाई होती ते गेले. घाई नव्हती त्यांना आता नवरानवरीकडं जावसं वाटलं. नवरानवरी शाही खुर्च्यांत बसलेली. पश्चिमेच ऊन लागू नये म्हणून पडदा सोडलेला. तो वाऱ्याने फडफडत होता. बाशिंग मुंडावळ्यांनी झाकलेला. चेहरा लोक निरखून बघत. गंभीरपणे कुणाच्या तरी नवरीशी किंवा नवऱ्याशी तुलना करीत. मुंबईचा एखादा पाहुणा आला की नवरदेव नवरीची ओळख करून देत. मग तोही म्हणे 'एखादं नाव घ्या की राव.'

'रेवा.'

'एवढंच इकडं तर उखाणे असतात.'

"तो प्रांत तिकडे." नवरदेव डावीकडे खूण करतो.

"वहिनी घ्या नाव मोठं." रेवा खाली मान घालून गप्प. पुष्पीनं उखाणं पाठ करून घेतलेलं. एकही आठवायचा नाही. मग तीच कानांत सांगायची. कसंतरी ते कामं उरकायचं. सतरा-अठराची रेवा. शालू, बाशिंगं सगळं बोजडच वाटत होतं. लग्न म्हणजे दोन जिवांचं मीलन. कशाला ही आवरणं, टरफलं घालायची?

एक पोक्त बाई धावत आली, "चला सगळ्या मोठ्या माणसांच्या पाया पडा जोडीनं. मजी निघायला बरं." दोघं जोडीनं पाया पडताना कुणी

दहाची नोट, कुणी पन्नासाची नोट नवरदेवाच्या हाती देत होते. बहुतेक नवरीकडचेच. एखादी माणसं, चुलत सासू नवरदेवाला चांदीचा गणपती देत. रुक्मिणीला कुणीतरी विचारलं, "तू काय देतीस?" "पोटचा गोळा दिला की बाय. अजून काय देयायचं?" रुक्मिणीनं हुंदके द्यायला सुरूवात केली. त्या रडण्याच्या आवाजाने रेवा रडू लागली. मधुकर चेहरा पाडून तिच्याकडे बघू लागला. आता निघताना गाडीत जवळ बसले की तिच्याशी बोलायचे होते. जमले तर हातात हात घ्यायचा होता. तिच्या रडण्यामुळे त्याला वाईट वाटू लागले. तेवढ्यात एक करवली म्हणाली नवरदेवाला, 'लगीनघरी देवाच्या पाया पडताना बाळकृष्ण चोरून आणायचं ध्यानात ठिवा.' बाळकृष्ण वगैरे चोरून खिशात टाकल्यावर नवरा-नवरीला जेवायला वाढले. सकाळपासून जेवलेले नव्हते. रेवाने तर उपासच केलेला. नवरदेवाच्या ताटात नऊदहा कुरवले तर नवरीच्या ताटात सातआठ कुरवल्या जेवू लागले. दोनदोन घास पोटात गेले.

पुरे झाले लग्नाचे वर्णन. नवरी जातानाची रडारडी तिचं नकोच वर्णन.

सासरी निघालेली रेवा फार दुःखी होती. शेजारी बसलेल्या नवरदेवाकडे बघणं कठीण झालेलं. रस्त्यावरची झाडे मागे पळत होती. तसा तिचा भूतकाळ तिला आठवत होता. तिला भीतीही वाटायची. दादांनी त्याला आपल्याला आणण्यासाठी किंवा असंच कुठल्या कामासाठी पाठवलं तर कसं व्हायचं?

तिचं सासरचं घर आलं. शांतपणे नारळाचं तोरण मिरवीत गृहलक्ष्मीची वाट पाहात होते. कुणीतरी भाकरीचा तुकडा-पाणी नवरानवरीवरून ओवाळून टाकले. उंबऱ्यावर गव्हाची आदुली (माप) भरून ठेवलेले. ते माप सांडून आत यायला सांगितले. मग वाटेत ठेवलेली भांडी ठेचाळत ती आली. देवाला, मोठ्यांना नमस्कार केला. कोनाड्यात एक कोपरा धरून बसून राहिली. थोडा वेळ नवरदेव तिथंच बसलेला. एकांत मिळताच हातात हात

घेतला. रेवा दचकली पण... झाली शांत. ''नाराज आहेस का? पसंत नाही का?'' मधुकर विचारीत होता.

''अं? भीती वाटते'' तिनं कसंबसं उत्तर दिलं.

''कुणाची? माझी?'' मधुकर हसू लागला. ''मी काय खातोय का तुला?'' त्याने तिची हनुवटी बोटावर तोलत तिचा चेहरा वर उचलला. तेवढ्यात कोणीतरी आले. ती झटकन मागे सरकली. मग एकेक जण येत जात राहिले. मधुकर उठूनच गेला. वहिनीनं सांगितलेलं नवरदेवाशी नीट बोला म्हणून त्यांना संशय येईल नाहीतर. काय बोलायचं ते समजत नव्हते. नाराज झाले तर...

रात्री घरभर माणसे. मिळेल तिथं झोपलेली. सकाळी लवकर उठून कुलदेवतेच्या दर्शनाला जायला सुमो ठरवलेली. रेवा थकली होती. निपचित पडून होती. झोप लागावी वाटत होती. पण लागत नव्हती. धडधड, धस्स... असं सारखं चाललेलं. केव्हातरी तिचा डोळा लागला. तिला फारच विचित्र स्वप्न पडलेलं. ती पुढं पळत होती. घोडा मागे धावत होता. मधुकरने ऊस तोडायच्या कोयत्यानेच घोडा मारला. तो जोरात खिंकाळला. रेवा पळता पळता पडली. घोडाही तिथंच तडफडत होता. रेवा दचकून जागी झाली. खूप घाबरलेली. तिला ते तडफडणार शरीर दिसत होतं. पण ते घोड्याचं की माणसाचं? काही नीट आठवेना. पळताना तर घोडाच होता. ती तडफड, रक्त सतत नजरेसमोर येत होते. रेवा यांत्रिकपणे सगळं करीत होती. बेचैन, सैरभैर झालेली. प्रवास संपला. रात्री पुन्हा जागरण, गोंधळ. देवापुढे पोत जळत होता. त्याला तेल घालत जागावं लागणार होतं. खूप थकलेली. तिला मग कोणीतरी जाऊन झोपायला सांगितलं. ती कोनाड्यात जाऊन पडली. झोप लागताच पुन्हा काहीतरी विचित्र स्वप्न पडल. घाबरून जागी झाली. घामाघूम झाली होती. 'आपल पाप देवाला कळलंय म्हणूनच तो भीती दाखवतोय.' असं तिला वाटून आणखी घाबरली.

रेवा हळद काढण्यासाठी पाठराखीणीबरोबर माहेरी एक दिवस गेलेली. मधुकरची रजा संपत आलेली. त्याला हे शास्त्र वगैरे फालतू वाटत होतं. असं एक दिवस सुद्धा किंवा रात्र वाया घालवणं बरं वाटत नव्हतं. पण रुढी, परंपरा कशी बदलायची? आभाळ कोसळलं म्हणजे? दुसऱ्या दिवशी सकाळीच तो रेवाला आणायला गेला. खरं कुरवल्याला बरोबर घ्यायचं असतं. मग नवरीकडचे दोघांना पोशाख वगैरे करतात; पण मधुकरने मोटारसायकलवरूनच तिला आणायचं ठरवलं. एक पोशाख चुकला. माधवरावांचा खर्च वाचला. जाण्याचं ठरलेला कुरवला हिरमुसला. आता फटफटीवर बुत्ती कशी आणायची? म्हणजे नाहीच आणणार. बुत्ती चुकली म्हणून वरमाई नाराज झाली. पण मधुकरला आता हे सगळं ऐकायला येतच नव्हतं. तो तयार होऊन निघाला. जाताना विश्वासातल्या कुरवलीला सांगितलं. त्यांची खोली सजवायला. मधुकर भरधाव निघाला. तिथून लवकर निघून एखाद्या पिक्चरला जायचं असं काहीसा बेत मनाशी ठरवला. रेवाच्या घरी गेला. सगळेच अचंबित झालेले. एवढ्या सकाळी पावणं एकटंच कसं? लवकर जायचं वगैरे सांगून झाले. रेवा कुठंच दिसत नव्हती. मुंबईकर जावई बराच धीट होता. त्याने विष्णूला विचारले, 'रेवा कुठेय.' मधुकरला वाटलं आता तरी ती मोकळेपणाने बोलेल. इथं माहेरात कसलं दडपण? जरा रानाबिनात चक्कर मारून येऊ मोकळी होईल वगैरे.

"रानात एक देव आहे. त्याला गेलीय रेवा. बसा येईलच ती." विष्णू.

"मी जातो की, जोडीनं देवाला नमस्कार करतो. कसं जायचं तेवढं सांगा." मधुकर उतावळा झालेला.

"मीच येतू चला."

"नको, नको तुम्ही ते जेवणाचं वगैरे बघा. लवकर जायचंय. मी तिला घेऊन येतो."

मग विष्णूनं मागच्या खिडकीतून त्याला रस्ता समजावून सांगितला. जपून जा म्हणाला. मधुकर खूश झाला. आता रेवा वाटेतच दिसली तरी तिला माघारी न्यायची. तिथे झाडाखाली बसायचं. रानात छप्पर, कोप असेलच की... मधुकर इकडं तिकडं बघत भरभर निघालेला.

विष्णू कमलला म्हणाला, "जावय पावणं लयच उतावळं झाल्यातंय. बघ की आता रेवा येईपर्यंत सुद्धा त्यांना दम निघना. तिथं काय ती एकटीच हाय का?"

"आवो, राणीसाब देवाला कुठं गेल्यात्याय. पुष्पीकडं जाऊन येती म्हणाल्या." कमल म्हणाली.

"आरं देवा. पावणं तर गेलं रानात."

"तुमालाबी कळंना व्हय. हळदीच्या अंगानं राणीसाब चालत कशा जात्याल्या? गाडी बोलावली व्हती की."

"आता पावणं लय वैतागणार."

"जावा घेऊन या. आधीच जायचं होतं त्यांच्याबरोबर."

"जात हुतो तर नकू म्हणालं. आयला कटकटच झाली."

विष्णूने पायात चपला घातल्या. पायात राजू आला. 'कडेवर घे' म्हणून रडायला लागला. त्याला समजावत कमलकडे दिले अन् निघाला. विष्णूला वाटलं. हे रम्या बी कुठं गाडलंय कुणास ठावं. विष्णू निघाला तरी वाटेत काहीना काही आडवं यायचंच. कुणी काय विचारायचं, कुणी काय मागायचं. वेळ जात होता...

मधुकर शेतातून निघालेला पायवांट पडलेली त्यामुळे तो मजेत निघालेला. नाहीतरी या वेळी लग्नामुळं घरच्या वावरात जाता आलं नव्हतंच. कुठंला का असंना रानाचा वारा लागला. हरभऱ्याचं पीक काढायला आलेलं. सगळं रान पिवळं पडलेल. त्यातलाच हिरवा बघून एक डहाळा उपटला. खात खात निघाला. अशा मोकळ्या हवेतली

रेवा मुंबईत कशी राहायची? पण होईल सवय. आपण तिला काही कमी पडू द्यायचं नाही. ती शिकत असली तर शिकवायचं. खूण राहायला पाहिजे. फ्लॅट मिळाला की लगेच न्यायची. तिला इथं एकटं ठेवायला नको वाटतंय. मधुकर उदासला. चालत चालत तो पायवाटेने ऊसाच्या बांधावर आला. पाच एकराची पट्टी पसरलेली. एका कडेने जायचं म्हणजे दुसरं टोक गाठायला हवं. वाट पण नीट नव्हती. ही रुळलेली दिसतेय. जावं इथूनच. तो निघाला. चार पाच पावलं गेला. त्याज्यायला जावं का नको तो थांबला. तेवढ्यात बोलण्याचा, कण्हल्याचा आवाज आला. मधुकरने कानोसा घेतला. खुसपुसत आवाज येत होता. मधेच कण्हत होतं कोणी. मधुकरला वाटलं कोणी जखमी वगैरे होऊन तर पडलं नसेल? आवाजाच्या दिशेने पायवाट गेल्यासारखी दिसत होती. तो सावधपणे सावकाश कानोसा घेत घेत पायवाटेने निघाला. काचोळं चेहऱ्यावर हातावर कापत होतं. जरा पुढं गेला तर वेगळं दृश्य. त्याज्याआयला उगाच आलू. पोरगा न् पोरीचं चाललं होतं. गर्रकन तो मागे फिरला. त्याला रेवाची तीव्रतेने आठवण झाली.

''आज जाणार व्हय?'' मधुकरला आवाज आला त्याने कान टवकारले, चालणं मंदावलं.

''होऽ आता लवकर येणं न्हाय व्हायचं?'' हा आवाज कुणाचा? तसा रेवाचा फारसा कानावर पडला नव्हता. पण तरी ओळखीचा वाटला. त्याने मागे वळून बघितलं. खाली तो तरुण पोरगा त्यांच्या छातीवर डोकं ठेवून बोलणारी रेवाच होती. ह्या बाजूलाच तोंड करून डोळे मिटून पडलेली. तो तिचं केस जे काय हाताशी येईल ते कुरवाळत होता. मधुकरने पुन्हा नीट बघितलं ती रेवाच होती. त्याला काहीच सुचेना. थिजल्यासारखा उभा राहिला. रेवा उठली. तिथंच बसून ब्लाऊजची बटणं घालू लागली.

रमेश पुन्हा तिला जवळ ओढून घेतलं. "अरं बाबा जाऊ दे मला. नवरदेव न्यायला येणारेय. सोड."

"लगीच घाबरायला लागलीस त्याला."

"लगीन लागलंय बाबा. सोड जाऊ दे."

मधुकरला खूप राग आला रमेशचा. ती एवढं सोड म्हणतेय ना... तो पटकन पुढं झाला. संतापाने बेभान झाला. दोघांना काय करावं तेच कळेना. मधुकर रमेशला हाताने, पायाने वाट्टेल तसं मारत होता. रेवा छाती उघडी टाकून भान हरवून बसलेली. मधुकर रमेशच्या छातीवर बसलेला. त्याने चेहरा तर थोबाडलाच पण गळा दाबू लागताच, तो ओरडायला लागला. रेवा भानावर आली. तिनं मधुकरला बाजूला सरा म्हणून ढकलू लागली. "का गं लय कळवळा येतुया व्हय."

'तुझ्या मायला' मधुकरने गळा दाबून त्याला अर्धमेलं केलं. रेवा त्याचे पाय धरत म्हणाली,

"सोडा वो त्याला सोडा."

"ये रांडं मला सांगतीस? लगीन लागलंय ना तुझं कालच. काढ त्यो झंपर कशाला घातलायस काढ." रेवा काढण्याऐवजी बटणं घालू लागली.

"काढ म्हणूतूया ना. न्हायतर नागडी करून गावातनं धिंड काढीन. काढ त्यो झंपर." तिनं रडत रडत काढला. साडीचा पदर अंगभर घेतला. मधुकरने रमेशला नागडंच केलं. तिला म्हणाला

"बांध त्यांच्या गांडीला. बांध," तो ओरडला.

रेवाला काही कळेना ती तशी उभी राहिली. त्याच्याकडे बघत. रमेश अर्धमेला झालेला.

"बांधऽ" तो पुन्हा ओरडला. तिनं ब्लाऊज बांधला. ती भेदरून मधुकरकडे बघत होती.

"घट्ट आवळ" आवळताच रमेश ओरडला.

"आवळ अजून" पुन्हा आवळला. रमेश तडफडत होता. त्याचा जीव जाईपर्यंत त्याचं लिंग आवळायला मधुकर रेवाला सांगत होता. रेवा तसंच करीत होती. रमेश ओरडत होता. त्याची तडफड संपली. लिंग रक्ताने माखलेलं. रेवा बिन ब्लाऊजची बसलेली तिथंच. मधुकरने तशीच तिच्या कमरेत लाथ घालून त्याच्याच अंगावर ढकललं न् निघाला. वाट फुटेल तिकडं... सैरभैर... सगळ्या दिशा कोसळत होत्या... एका पाटातून पाणी वाहात होतं. पाय घसरून मधुकर तिथंच कोसळला.

✦ ✦ ✦

# मंदीत जग... मेंदूत वादळ

आलापीची गडबड चाललेली तर गंधारही आवरण्याची घाई करीत होता. आलापीला कळेना. आपल्याला मदत करायची सोडून हा मध्येच स्वतःचंच का आवरतोय. ती म्हणाली, ''तू जाणारेय का कुठे?'' तिला वाटलं इंटरव्ह्यू वगैरे असेल, पण सांगितलं असतं स्वतःहून त्यानेच.

''गावाकडे जाऊन येतो. तुला तुझ्या आईकडं जायचं असेल तर जा दोन दिवस.''

''मध्येच काम निघालं आता गावाकडे?'' तिला त्याचं असं अचानक ठरवणं आवडलं नाही. कधी नव्हे तो निवांतपण लाभत होतं... घरातली कामंतरी काय कमी असतात का?

"रिकामं, एकटं... कंटाळा येतो."

"पेंडिंग कामं करायची. घरातली तर किती असतात."

"करतोच की. परवा भांडी घासली. काल भाजी केली. झाडून-पुसून तर रोजच करतोय."

आलापीचे डोळं भरले. तिनं मुकाटपणे डबा भरला. आधी दोघांची नोकरी म्हणून बाई नकोचं म्हणाली. आता परवडणार नाही. संध्याकाळी पाणी राहात नाही. बारा-एकला टाकी रिकामी होते. ती रात्री नऊलाच भरतात. आल्या आल्या नळाला पाणी नसतंच. बेसीनमध्ये खरकटी भांडी बघून कंटाळ्याचा वैताग होतो. दोघंही नऊलाच बाहेर पडायची. नऊच्या आत आणि रात्री नऊनंतर येणारी कुठली बाई मिळणार? मग दोघांनी घरीच काम करायचं ठरवलेलं.

गंधार घरीच असतो तर ती जाता जाता म्हणालेली, "तेवढी चारपाच भांडी आहेत, घासून टाका." तर तेवढंच मनात ठेवलंय. आपणही नोकरी करून सगळी कामं करतोच की... दिवसभर रिकामाच असतो म्हणून सांगितल.

"पुन्हा नाही सांगणार, तुला आवडत नाही तर..."

"आता आवडण्याचं काय... वेळ आलीय तर..."

"मी नाही असं मनात आणत, नव्हे येतच नाही. माझं घर, माझी माणसं तसं माझं काम..."

"अगं, मी पन्नासहजारांपेक्षा जास्त कमावतो, तू पाच हजार..."

"लाखभर कमावले असते तरी भांडी घासताना काही वाटलं नसतं." हे वाक्य ओठांवर आलेलं. तिनं गिळून टाकलं. गंधारने बॅग भरली. आलापी म्हणाली, "निघते मी."

"थांब. मी सोडतो जाता जाता." तिला खूप बरं वाटलं. विसावून खुर्चीत बसली. बराच राग निवला. तिचा मूड ऑफ पाहून गंधारनेच दारं-खिडक्या बंद केल्या. नळ चेक केले. 'चल' म्हणाला.

गाडी रस्त्याला लागल्यावर न राहवून आलापीनं विचारलंच "परत कधी येतोय?"

"दोनचार दिवस राहीन म्हणतोय. परवा इंटरव्ह्यू आहे. फोनवर झाला तर ठीक नाहीतर बोलावलं तर येईन."

"मी नाही आईकडे जाणार. एकटीच राहीन. माझ्या घरात मला कसली भीती!" दोघांनाही एकदम वाटलं, हे घर राहील ना आपलंच? आलापीला आदित्यचा तुसडेपणा आठवला. त्याच्या लॅपटॉपला हात लावलेला त्याला चालत नाही. आपलंच घर बरं!

"गावाकडे काही करता येतंय का बघतो. नाहीतर तुझ्या बाबांकडचा गाळा बंदच असतो ना तिथं करू काहीतरी..."

"मुळीच नको."

"गावाकडे गेलो तर तुला तिथंच राहावं लागेल. तिथं तुला नोकरी करता यायची नाही." तिच्या पोटात धस्स झालं. तिचं ऑफीस आलं ती उतरली. गंधार गेल्यावर सुन्नपणे पाठमोरं बघत राहिली.

ॲडव्हर्टायझिंगची छोटी कंपनी. सकाळी फारसे क्लायंट येतच नाहीत. पेंडिंग कामे नाहीत. नेटवर सर्फिंग. चारनंतर क्लायंट येतात. बॉस त्यांच्याशी चर्चा करतो. नंतर आपल्याकडं काम येतं. त्यांच्याशी चर्चा करत डिझाईन फायनल करायचं. रात्रीचे नऊ वाजायचे घरी जायला. मग स्वयंपाकपाणी वगैरे... तिला मागच्या महिन्यातला प्रसंग आठवला. मंदीची तलवार लटकत होतीच. पण पडेपर्यंत आपल्या डोक्यावर नाहीच पडणार असं गंधारला वाटे. त्याचं वाटणं मग आलापीपर्यंत झिरपतं. पडल्यावर मात्र ती नुसती तलवार नसून मशीनगन होती... छातीत धडधडणारी...

त्या दिवशी रुटीनप्रमाणे गंधार आलापीला स्टेशनच्या स्टॉपवर सोडून कोथरूडला गेला. साधारण अकरा सव्वाअकराला त्याचा आलापीला

फोन आला. रडत होता... 'जॉब गेला.' जॉब गेला ह्यापेक्षा त्याने ते रडत सांगितले, ह्याचं दुःख आलापीला अतिशय झालेले. नवऱ्याचा राग सोसता येईल, पण रडू... तेव्हापासून आलापी सतत रडत होती. नवीनच 'ग्राफीक डिझाईनर' म्हणून तिला जॉब लागला. शांत, हडकुळी. आपलं काम मुकाटपणे करणारी. हिला अचानक काय झालं? का रडतेय? सोबती, बॉस सगळेच हवालदिल. विचारले तरी काही सांगायला तयारच नाही. नुसतं रडणं. डोळ्यांना खळ नाही. बॉस म्हणाले, "काम राहू दे. शांत बस. पाणी पी. चहा मागवतो." तर "नकोच" म्हणाली अगदी तुटकपणे. डाव्या हाताने डोळे, नाक पुसत उजव्या हाताने माऊस चालूच. कामही बंद करेना. बॉस वैतागला.

"तुला घरी सोडू का?" म्हणाला.

"नको. काम झाल्यावर नेहमीप्रमाणे जाईन." तिचं ठाम उत्तर. तिला आता नोकरी नीटच करावी लागणार अन् करायलाच हवी. एकीकडे एकेक बुरूज ढासळत होता. मन खचत होते. दुसरीकडे आता आपलीच नोकरी घर चालवणार तर ती नीटच, निष्ठेने करायला हवी... म्हणून स्वतःच मनाला उभारी देत होती. दुसऱ्या कुणाला काही मदत कशी करता येईल? तिला स्वतःचाच अपमान झाल्याचे घाव बसत होते... अन् ते सोसण्याचं बळही आतून मिळत होतं. तिला संगीता आठवली. सॉफ्टवेअरमधला नवरा मिळाला म्हणून वरवरचे कौतुक करणारी, पण आतली असूया लपत नव्हती. नातेवाईकांतही तसंच... खरी, खोटी कौतुकं झेलत हवेत तरंगत होतो आपण... त्याचं सावळेपण किती जणांनी सांगितलं तरी खटकत नव्हतं. कधीतरी फॉरेनला जायचा योग येईल, म्हणून व्हिसा, पासपोर्टची तयारी चाललेली. कमर्शियल आर्टची फायनल एक्झाम दिली न् लग्न ठरलं. त्यामुळे सगळेच खूश. सगळ्या गोतावळ्यात असा पगारदार कोणी नव्हता. अगदी तिच्या बाबांनी तीस वर्षे नोकरी केली तरी त्यांनाही अजून

एवढा पगार नाही. तिच्या नोकरी करण्याला त्यामुळेच सगळ्यांचाच विरोध. आजी 'राणी' म्हणायची. लग्न ठरल्यावर म्हणाली, 'सावळ्या पांडुरंगाची राणी रखुमाई. राणीसारखं राज्य कर.' पण गंधारनेच प्रोत्साहन दिले. म्हणाला, 'खूप बर्डन असतं प्रचंड टेन्शन...' मला नाही वाटत दहा-अकरा वर्षांपेक्षा अधिक काळ नोकरी करेन... वगैरे. आणखी म्हणाला, 'दोघांची क्षेत्रं वेगवेगळी असलेली बरी. कधी कुठे मंदी येईल न् कुठे कशाची चलती असेल काहीच सांगता येत नाही.' त्याचं भाकीत असं एवढ्या लवकर खरं होईल असं वाटलंच नव्हतं. आलापी आतल्या आत कोसळत होती. तरी हे गंधारचे असे काही विचार आठवल्यावर मनाला उभारी देत होती. पंधरा वर्षं भरावा लागणारा बारा हजाराचा हप्ता डोळ्यांसमोर नाचत होता. फ्लॅट विकावा लागला तर... तिला गावाकडंचे घर दिसू लागले. मातीच्या भिंती, वर पत्र्याचे छप्पर. गुरांचा गोठा सासूबाई धारा काढतात. गडी नाही आला तर शेणही काढावं लागतं. ती शेतं-वावरं बघून आलापी केवढी हरकलेली. आता तिकडंच लावं लागेल... तिथंच राहावं लागेल... आणि आपल्याला शेणही काढावं लागेल... तो वास आठवूनच तिला मळमळायला लागलं. गॅस होता पण वेळेवर सिलेंडर मिळायचे नाही म्हणून चुलीवरच स्वयंपाक असायचा. लालभडक विस्तवावर भाजलेली खरपूस भाकरी, पापड, भातवड्या न् वावरातल्या भुईमुगाच्या शेंगा. त्या परिस्थितीतही तिला तोंडाला पाणी सुटल्यासारखं वाटलं. तिनं आवंढा गिळला. दुपारचा डबा खाल्लाच नव्हता आपण... आता काय गावरान मेवा, ताजं दूध याबरोबरच चूल, चुलीतला जाळ न् धूर हे ही सोसावं लागेल. असं बरंच काहीबाही आठवत होतं, मनात येत होतं न् तिला रडू येत होतं. सहा वाजता आदित्य त्याची बाईक घेऊन आला. त्याला बॉस म्हणाले, "तुझी बहीण का? सारखी रडतेय. काय प्रॉब्लेम आहे? काही मदत करू का म्हटले तर काही बोलेना पण."

आदित्यला वाटलं तिनं सांगितलं नाही तर आपण तरी कशाला बोला. तो म्हणाला, "सर, तिचा एकटीचाच नाही साऱ्या जगाचा प्रॉब्लेम आहे. साऱ्या जगाला मदत करावी लागेल... कळेल उद्या." असं सावध बोलल्यावर बॉसला अधिक बोलता येईना. ते दोघे गेले. बॉसचं डोकं सणकलं.

हे वर्करच... कशाला ह्यांच्यात डोकं घाला. पण नाही घातलं तरी मेंदूत जातं फिरतयं अन् चेंदामेंदा होतोय. नुकत्याच येऊन गेलेल्या क्लायंटला त्याने शिव्या घातल्या. त्याबरोबर रणजितलाही. त्याने केलेले डिझाईन आवडलं नाही म्हणून त्याने ऑर्डरच कॅन्सल केली... भडव्याने. खरं तर खूप छान झालेले काम. बॉसला आवडलं होतं. खूश होता. पण क्लायंटला नाही आवडलं. मग रणजितवर सगळा राग. रोहिणी धास्तावून गेलेली. सात वाजायला आलेले. तिला जायचं होतं. घर जवळ असलं तरी तिची दुसरीत असणारी मुलगी वाट बघत असेल. नवरा सात वाजता येतो, चिंचवडला असून. रोहिणी बॉस उठण्याची वाट बघत होती. सुरुवातीला बॉसने खूप मदत केलेली. चांगला मूड असता तर जाता जाता सोडतोही घरी. पण आज मूड खराब होता. निघावं की कसं? तिलाही ठरवता येईना.

"तू काय इथेच रहाणारेयस का?" बॉस तिच्यावर खेकसला.

"नाही, सर."

"मग नीघ आता. की सोडायची वाट बघतेस?"

"नाही सर." तिनं पटकन पर्स उचलली. पायात चपला सरकवल्या.

"आलापीचं तुला तरी माहितेय का?"

"नाही, सर" या तिय्याचं तिला हसू आलं न् ते बॉसच्या लक्षात येऊ नये म्हणून ती भरभर चालू लागली. ह्या आलापीला काय झालंय? सांगत का नाही? कोणी मेलं असतं तर तिचा भाऊ एवढा नॉर्मल नसता, काम सोडून गेली असती, तिचा नवरा कुठे अडकला की काय? तो सॉफ्टवेअर

इंजिनिअर आहे. माय गॉडऽ सध्या सॉफ्टवेअरवाल्यांच्या धडाधड नोकऱ्या जाताहेत. तरीच तिचा भाऊ म्हणाला, सगळ्या जगाचा प्रॉब्लेम आहे. बिचारी... रडेल नाहीतर काय? बाईला रडत रडत कामं करायची सवय असतेच. आपण नाही का कित्येक वेळा हसऱ्या केल्या, हुंदके गिळून. आलापी लहान आहे अजून...

✦ ✦ ✦

आलापी, आदित्य तिच्या घरी आले. गंधार शांतपणे टी.व्ही. पाहात बसलेला. आदित्यला नेमकं कसं वागावं, काय बोलावं. ते कळेना. बाबांनी तर सांगितलंय, 'मी येईपर्यंत थांब.' भूक लागलेली त्याला आलापीचं आश्चर्य वाटलं. एवढी धो धो रडणारी, आल्या आल्या गंधारच्या गळ्यात पडून रडेल असं वाटलेलं. रडक्या सिरीयल बघायची आवड आहे ना... पण ही बया घरात आली की गंधारकडे न पाहाताच आत गेली, काहीच न बोलता! बेडरूममध्ये जाऊन झोपली. आदित्य मग बसला टी.व्ही. बघत. टी.व्ही. नसता तर काय केलं असतं? त्याला डिस्कव्हरी न् इंग्लिश फिल्म शिवाय काही आवडायचं नाही. आता मात्र दार्जीनी काय लावलंय ते बघायला पाहिजे. बातम्याच होत्या. या क्षणी काहीही असतं तरी तो बघत बसला असता. गंधारने पाणी दिलं. चहा ठेवला. चहा होईपर्यंत तो आलापीकडं जाऊन आला. ती उठली. फ्रेश झाली. तिघांनी चहा घेतला. आदित्यला बिस्किटाशिवाय चहा जायचा नाही. पण घेतला बरं वाटलं पोटात काही गेल्यामुळं तिघांनाही. नेहमीच्या सवयीनं आलापीनं चहाचे कप आत नेऊन धुऊन ठेवले. खरं तर तिला तिथं बसवत नव्हतं. बसायचं नव्हतं. तिला कुठेच बसवत नव्हते. ती बेडरूममध्ये झोपली. आदित्य आणि गंधार त्याच्या कॉलेजच्या, करियरच्या गप्पा करत बसले. अधूनमधून मोबाईल वाजत होताच. तेवढ्यात बाबा आले. हातात पाच कप्प्यांचा

जेवणाचा डबा होता. डबा बघून आदित्यला बरं वाटलं. त्यात जेवणच असेल ना? असावं. कारण बाबांनी नीट धरलेला. ते जेवण ह्या दोघांसाठीच असलं तर... तर आपण घरी जाऊन जेवायचं असलं तर... त्याला पुन्हा वैताग आला.

झक मारत आलो... पण आपलं कुणाला पडलंय... बाबांनी त्याच्याकडेच डबा दिला. जड होता. त्याने डबा किचन कट्ट्यावर ठेवला. आत प्रचंड धुमसणे दाबून शांतपणे तो बाहेर येऊन बसला. टी.व्ही.तल्या चित्रांसारखा त्याच्या मेंदूत गोंधळ, अस्वस्थता माजलेली.

''कुठंय आलापी? अरे काय झालं? ऊठ.'' ती झोपली होती. तिथं बाबा गेले. ''एवढ काय घाबरायचं? अशा छपन्न नोकऱ्या मिळतील. ऊठ चल जेवण आणलंय ते वाढून घे. आपण जेवू सगळेच.'' 'सगळेच' ऐकल्यावर आदित्यला बरं वाटलं. बाबा टॉयलेटला गेले. आलापी उठली. बाबांच्या बोलण्याने ती बरीच सावरलेली. भूकही जाणवली. तिनं वाढून घेतलं. गंधारला हे बाबांचं वागणं पाहून खूप आधार वाटला. मंदी, चांदीच्या गप्पा झाल्या. गंधार म्हणाला, ''वर्षभर घरी बसलं तरी हप्ते व्यवस्थित जातील एवढं सेव्हिंग्ज आहे.''

''अजिबात टेन्शन घेऊ नका. निर्धास्त राहा.'' बाबा आणि आदित्य गेल्यावर आलापी गंधारच्या गळ्यात पडून राहिली. गंधार तिला थोपटत होता. तिला समजावत होता, अनेक पर्याय सांगत होता. गावाकडे जाऊन शेती करणे काय वाईट? आपल्याला शेती तरी आहे. जे पिढ्या न् पिढ्या इथलेच आहेत, ज्यांना नोकरीशिवाय पर्याय नाही त्यांचं काय? ''तू आता तुझ्या कामात नीट लक्ष घाल..''

''हूं. माई न् तात्या तर नातवंडाची वाट बघताहेत.''

''लक्ष द्यायचं नाही.''

''पण तुम्ही तर म्हणत होतात, मला फारसा धोका नाही.''

"मीटिंगमध्ये काहीही होऊ शकतं. आधी कळलं तर लोक आग लावतील. अचानक सांगितलं. पोरी रडत होत्या, भांडत होत्या. पोरं शिव्या, संताप. सगळेच संतापलेले होते. इतक्या इटपट झालं. पोलिसांनी सगळ्यांना बाहेर काढलं. न् गेट बंद केलं. कुणालाच काही डिसीजनच घेता येईना. जायला सांगितलं नी मी एक मिनिटही न थांबता निघून आलो." गंधारला तो माहोल आठवला. संतापाच्या उकळ्या फुटत होत्या. सगळेच पेटलेले: ह्या सगळ्याची त्यांना कल्पना होती म्हणून तर त्यांनी पोलीस बंदोबस्त मागवलेला. कंपनीच्या न् बॉसच्या चिंधड्या उडवाव्यात राई, राई एवढ्या असं वाटत होतं. घरी आल्यावर पहिला फोन तात्यांना लावला. ते म्हणाले, "मायला, लाथ घाल त्या नोकरीला. ये हि़कडंऽ. शॅतभात तरी कोण बघायचं? मर्दा डोळ्यातनं पाणी नाय काढायचं; तुझा बाप जिवंत असताना. तू काय रस्त्यावर येणार न्हायस." गंधारचा सैरभैरपणा बराच निवला. तरी कर्जाचे हप्ते आ वासून नाचत होते. नोकरी लागल्यावर रूम घेऊन मुलंमुलं राहात होतो. पहिलंच स्थळ आलं. शिरीष म्हणाला, "अडकलास यार, तू."

"एवढंच बघणार. अजून आऊटऑफ स्टेट जायचंय. तात्या म्हणालेत म्हणून एवढंच बघणार."

आलापीला बघितलं न् आत बासरी वाजू लागली. वाटलं होतं तीच नकार देईन. एवढी सुंदर, मोठ्या घरची आणि आपण काळे. काळेच. पुण्यात राहिलोय म्हणून सावळे दिसतोय नाहीतर काळेच. एका नोकरीशिवाय पॉझिटिव्ह काय आहे आपल्याकडे? नकार तर तिचाच ऐकायचा होता. म्हणजे तात्यांना सांगता आले असते. पण कशाचं काय... तिनं होकार कळवला. काय क्रेझ होती आयटीवाल्यांची. लग्नाच्या बाजारात तर चांदीच की. एवढे मोठे फॉरेस्ट ऑफिसर तिचे बाबा. सरकारी नोकरीचा आग्रह त्यांनीही धरला नाही. धडाक्यात लग्न लावून दिलं. भाड्यानं फ्लॅट

घेतला तेव्हा म्हणाले, "फ्लॅट बुक करा. बुकिंगचे पैसे देईन." तात्याही म्हणालेले, "एवढं भाडं भरता त्यापरास सोताचं घर घे. किती बी भाडं भरलं तरी... भाड्याचं घर न् खाली कर. आपलं दोन खोल्यांचं का आसना सोताचं घर पायजे."

आणि हा सुंदर फ्लॅट घेतला. आलापीचं लग्नातलं सगळं सामान आणलं... किती खूश होती. घरभर बागडत होती. माझं घर... आपलं घर करत. घराचं इंटिरियर तिचंच. मी शेतकरी माणूस मला तर काही कळायचं नाही. धान्य भरलेल्या पोत्यांच्या चवडीनं घराच्या भिंती सजतात. घमेली, फावडी यांनी कोपरे भरतात. तुळईवर खुरपी, विळे, कुऱ्हाडी खोचलेल्या. झोपण्यापुरती खाट. एरवी भुईवरच खाणं-पिणं. केवढी गुंतून राहायची घरात. वाटायचं हिनं असंच घरभर वावरत राहावं. घरपण सजवावं. कशाला हवा हिला जॉब...? पण मंदीची कुणकुण लागलेली. दुसरं काही करेपर्यंत, पैसे मिळवेपर्यंत तुझ्या नोकरीमुळे उपाशी राहाणार नाही... आता ती जाणार ऑफिसला अन् आपण घरात... किती दिवस... गंधारने उसासा सोडला. तिला सावकाश बाजूला केलं. तिनं खांदा ओला केलेला... गंधारला भरून आलं. तिची नोकरी गेली असती तर रडलो असतो आपण? अपमान झालाय असं वाटलं असतं? गंधारने तिचा चेहरा दोन्ही पंजाने उचलला. तिचे ओले डोळे पिऊ लागला.

✦ ✦ ✦

वादळ होऊन गेल्याची पडझड बरीच सावरली. आठ पंधरा दिवसांत दुसऱ्या कंपनीत बोलावलं. आलापीला आपल्या नवऱ्याचा अभिमान वाटला. नव्या कंपनीत नवा स्टाफ. राहूल सांगायचा असं कर, तसं कर. तो सिनिअर होता. बॉसला मात्र म्हणाला,

"मी याच्यापेक्षा चांगलं काम केलं असतं." गंधारचं डोकं सणकलं. कंपनीनं जा म्हणून सांगण्याआधी आपणच रिजाईन करावं. सोडली नोकरी. नंतर कळलं त्याच्याच नात्यातल्या मुलाला त्याला तिथं आणायचं होतं. तेवढं वजन होतं त्याचं कंपनीत. आलापीने खंबीरपणे सोसलं. घरातली कामं करत करत तो नेटवर सर्फिंग करू लागला. नव्या नोकरीचा शोध. एवढं जगल्याचा बोध, मेंदूचं सर्फिंग चालूच राहील अखंडपणे...

✦ ✦ ✦

आलापी बसमध्ये बसली. आज पुढेच जागा मिळाली. त्यामुळे तिला बरं वाटलेलं. तिच्या उपनगरातल्या घराजवळचा शेवटचा स्टॉप. बस सोडून ड्रायव्हर कंडक्टर टपरीवर उभे राहून विसावा घेत होते. बऱ्यापैकी बस भरल्यावरच येतात. तरी बरं सकाळी ऑफीसच्या वेळेचं जरा भानही ठेवतात. सकाळी निघताना गडबड होते. घाई केली तरच बसायला जागा मिळून तेवढाच आराम मिळतो. आज गंधार घरातच त्यामुळे बाल्कनीचा दरवाजा बंद केला का? गॅस, पंखे बंद केलेत का? कधी कधी मध्येच पाणी सोडतात लवकर, मग नळ वाहातात. जाताना नीट बंद करावे लागतात. असले मध्येच चमका मारणारे प्रश्न नव्हते. तिनं आईला फोन केला. मागच्या वेळी बाबांना आधी केलेला. आज कुठलीच खळबळ नाही. तिला स्वतःचंच आश्चर्य वाटलं की, रोज मरे... तसं? मनाची किती तयारी केली तरी काय झालं? पडल्यावर आपटल्यावर जखमी तर होतंच ना? त्रास तर आहेच. फक्त ते सोसण्याचं बळ वाढलंय. तिला आईबाबा, माईतात्या, आदित्य सगळ्यांबद्दल खूप कृतज्ञता वाटली. आई सकाळी सकाळी कामात तरी असते किंवा आंघोळीला जाते. किती वेळ रिंग वाजतेय... बहुतेक आंघोळच... असं काहीसं मनात येताच धापा टाकत "हॅलो" आवाज आला आईचा.

"कुठ गं होतीस?"

"तू बोल." फालतू प्रश्न विचारलेले न् त्याची उत्तरे द्यायला तिला आवडायचे नाही. फोनवर बोलतोय याचं भान ठेवून कामाचंच बोलावं असं ती नेहमी म्हणते.

"ऑफीसला निघालीय."

"मग? काही विशेष...?"

"गंधारने रिजाईन केलं..."

"म्हणजे पुन्हा... का?"

"नंतर सांगेन."

"तू कशी आहेस? ऑफीसला कशाला निघालीस? गंधार कसे आहेत? कुठायत ते? तू थांबायचंस ना घरी... !"

"आम्ही दोघंही ठीक, अगदी व्यवस्थित आहोत. आराम करतोय घरी गंधार."

"अगं पण..." तिची आई गप्प झाली.

"काळजी करू नकोस. रविवारी बिर्याणी न् पांढरा रस्सा मस्त बेत कर. येतो आम्ही. ठेवते फोन. बस सुरू होईल." आलापीनं फोन कट करून कंडक्टरला पास दाखविला. बसच्या खिडकीवर कोपर टेकवून विरूध्द पळणाऱ्या हवा, झाडे, माणसे, गाड्या यांच्याकडे स्थिर नजरेने बघत राहिली. डोळ्यांतल्या पावसाला गिळत डोक्यातल्या वादळाला शांतवत येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी बळ गोळा करत, साठवत.

✦ ✦ ✦

# हत्ती आणि मुंगीचं मंथन

मनीषा फोन करून आली. सकाळीच. तिची प्रूफं शोधतोय तर दारातच उभी. उभ्या गावावरून आल्यासारखी. बस म्हटलं तरी बसेना. अर्ध्या हळकुंडाने पिवळे झाले की असे होते. आतून प्रतिभा केस विंचरत आली न् अंगणात झोपाळ्यावर बसली. मग मनीषा पण तिथे खुर्चीत बसली. माझ्या मनावरचं दडपण कमी झालं. कुठं ठेवलीत तिची प्रूफं... सापडेनात. कोणीतरी हाताखाली पाहिजे आता. तरुण चटपटीत. अशी कामं ध्यानानं करणारं. आपुलकी असणारं. मनीषा तशीच तर होती म्हणजे आहेच. पण त्या बदल्यात तिच्या फडतूस कवितांना प्रस्तावना लिहून हवी होती. पानभर प्रस्तावना लिहिण्याचे फार प्रयास नव्हते. माझी प्रतिष्ठा,

नाव वापरणार तर त्या तोडीचं मला काही द्यायला हवं, तर हिला ते कळणारही नाही. आयुष्य पणाला लावावं लागतं. अनेक तडजोडी कराव्या लागतात काही गमवावंही लागतं. तेव्हा थोडंफार मिळतं. कुणाशी नाव जोडलं जातं यावरून आपली प्रतिष्ठा ठरते. मला माझी प्रतिष्ठा वाढवायचीय. तशी मनिषा हुशार कामसू आहे. तिनं घरी नेलं तेव्हा केवढा छान पाहुणचार केलेला. जेवणाची चव अजून जीभेवर रेंगाळतेय. तिच्या हाताला चव आहे. आतापर्यंतच्या साधनेचं, कष्टाचं फळ आहे ते. अशीच तपश्चर्या लेखणीसाठी लागते. हेच ह्या लोकांना कळत नाही. दुखवायचं नाही म्हणून चांगलं म्हणावं तर... द्या लिहून. बोट दिलं की हातच धरावा... तसा तिनं हात धरला तर आवडेलच. नव्हे तेच तर हवंय आपल्याला. पण हिला कुठे कळणारेय ते. सतीसावित्रीची वंशज ना. स्त्रीमुक्तीचा कळवळा आणि पुरुषद्वेष करायचा हे ह्यांचं ब्रीद. येताना काहीना काही घेऊन येतेच त्यामुळे तर प्रतिभा तिच्यावर खूश असते. आज मात्र मोकळीच आलीय. तिचंच धन ती न्यायला आलीय. विश्वासाने आदराने अपेक्षेने आपल्याकडे सोपवलेलं. तिचा अपेक्षाभंग झालाय. ती धुमसतेय आतून पण वरवर छान गप्पा मारतेय प्रतिभाशी. प्रतिभाला तर स्वयंपाकाशिवाय काही बोलताच येत नाही. मनिषा म्हणत होती तिचा नवरा न् मुलगी नाष्टा करून डबा घेऊन जातात नऊ वाजता. दिवसभर ती तशी एकटीच असते. लेखन-वाचनात दिवस जातो. स्वतःला कवयित्री समजते. साहित्यिक चर्चा वाद करायला येते. तिची प्रातीभ बुद्धी चांगली आहे. पण आजकाल तरुण पिढीला प्रसिद्धीची घाई झालेली असते. एकदोन पुस्तकं काढतात स्वतःच्याच खर्चाने अन् साहित्यिक समजायला लागतात स्वतःला. धीर संयम नाहीच. काल तर केवढा वाद घातला तिनं. म्हणाली ''का नाही देणार प्रस्तावना लिहून? माझ्या कविता काय कविता नाहीत का? काय असतं कविता

म्हणजे? हृदयातून आलेला संवेदनशील मनाचा हुंकार म्हणजेच ना कविता? आम्ही बायका सोसतो. आपला समाज संस्कृती बदलत नाही. भारतीय पुरुषाची मानसिकता बदलत नाही तोपर्यंत दुःखही तीच तशीच राहाणार ना ! घाव बसल्यावर जखम होती रक्त निघते. वेदना होतात त्या खोट्या का असतात? सर त्या वेदनांमुळे फुटलेले, गिळलेले हुंदके खरेच असतात. किती करायचा साठा असा या दुःखांचा? माझं एकटीचं थोडंच आहे. बाईच्या जातीला सोसायलाच लागतात हे भोग.'' ही कसले भोग भोगतेय. परवा रोहनला भविष्य कळतं म्हटलं हात बघून, तर किती वेळ बसली त्याच्या हातात हात देऊन. सूनबाई नव्हती घरात म्हणून बरे. घरात असलाच तो तर त्याच्याशीच गुलूगुलू बोलत असते. जणू त्यालाच भेटायला आलीय. मागे एकदा एका लेखकाची ओळख करून दिली तर पत्रबित्र पाठवू लागली. म्हटलं खूप मोठा आणि श्रीमंतदेखील आहे तो त्याच्या वयाकडे बघू नकोस. काय काय लिहीलं होतंस पत्रात? तर म्हणते कशी, 'सगळंच तुम्हाला सांगायचं का?' अरे वाऽ मी म्हातारा वाटतोय. फक्त प्रस्तावना लिहून घेण्यापुरता हवाय. काही शंका आली की माझी आठवण येते. कुठलं पुस्तक हवं असलं यायचं डब्यात खाऊ घेऊन. हिला वाटतं तेवढ्याने खूश होईल मी. वय वाढलं म्हणून काय झालं मी मनानं तरुणच आहे अजून. मला हवं ते मिळत नाही तोपर्यंत का देऊ हिला प्रस्तावना लिहून. म्हणे हिणकस असेल तर सांगा त्यासाठीच तर येते ना तुमच्याकडे. कवितांमधलं हिणकस काढायचं हिला घडवायचं त्या बदल्यात काय देणार? हिच्या खाऊने खूश व्हायला मी मूर्खही नाही अन् अल्पसंतुष्टही नाही. स्वतःला संवेदनशील म्हणवते पण माझं मन कुठे हिला कळतेय? कितीदा हिंटस् दिल्या. तेवढी पोचच नाही. म्हणे यंव त्यंव... सापडलं एकदाचं. पुस्तकांच्या गठ्ठ्याखाली गेलेलं. दिवाळी अंक येतील तसे

त्यावरच ठेवत गेलेलो. नवनव्या पुस्तकांची थप्पी पाहून मनिषा केवढी हरखून जाते. म्हणायची. "सर, केव्हा वाचणार एवढी पुस्तकं ! मी नेऊ का?" म्हटलं "ने, पुस्तकं वाचण्यासाठीच असतात, त्यावर खुणा केल्यातरी चालतील. कळेल तरी कितपत कळतं ते. फक्त नोंद करून ठेव माझ्या लक्षात राहात नाही ना कुणी कुठलं पुस्तक नेलं ते," "बरं झालं त्यामुळे पुस्तकं ढापली तरी कळायचं नाही." मनिषा पुस्तकावर प्रेम करणारी. प्रतिभाची कीव वाटायची. एवढं ऐश्वर्य आहे पण तिला काहीच किंमत नाही. कशाचं महत्त्व नाही... कमळाशेजारी बेडूक झालीय. अन् ही मनिषा म्हणतेय् घरातल्यांना माझ्या कवितांच कौतुक नाही. नाहीतर मी कुठल्या कुठं गेले असते. फुलाचा सुगंध लपून थोडाच राहातो! जो रसिकतेने आस्वाद घेऊ शकतो त्याला घेऊ द्यायचा नाही... प्रस्तावनेसाठी प्रूफं दिल्यावर दोन दिवसांनी तरी चक्कर मारणारच. आली की मी काय काम करीत असेल तर बिनासंकोच करू लागणार. फायली लावू लागेल. कात्रणं चिटकवत बसेल तासन्तास. तिला म्हटलं. "तुझ्यासारखी पी. ए. मिळाली तर मला खूप मदत होईल. मला अशी नेटाची कामं होत नाहीत. सांधेदुखीनं हालचाल मंदावलीय."

"सर, म्हातारपणी हालचाल जेवढी जास्त तेवढं प्रकृतीला चांगलं."

.आता ही मला सांगते. रोज पहाटे उठून योगासने प्राणायाम करतो.

"हे तू टी.व्ही. बघणाराला सांग. माझं सतत बौद्धिकमंथन चालू असतं. त्यामुळे हालचालींवर मर्यादा येतात. रोज सकाळी मात्र टॉयलेट साफ करतो. मला सध्या पी. ए. ची गरज आहे."

"सर, मी आले असते पण माझं लेखन, वाचन असतं."

मोठी आलीय कवयित्री!

"पण कधीतरी येत जाईन. तुमच्याशी गप्पा करताना ब्रेन वॉश होतं. नवं सुचतं. तुमची अशी कामंही करत जाईन."

इथपर्यंत ठीक होतं. तिनं आणलेल्या नारळाच्या वड्यां, आलूपराठे, पालकपुऱ्या खात खात गप्पा मारताना जे बोललं जातं. त्यालाच ही बौद्धिक चर्चा म्हणतेय ! हिची कुवत एवढीच. चुंबनाला संभोग मानणारी हुंदक्याला कविता. छंद वृत्तं मात्रा असतात हे तरी हिला माहीत आहे की नाही कुणास ठाऊक. शब्दांची लय असते. विचारांचा समूह असतो. हिला का सांगू? लक्षार्थाकडे लक्ष देणारी व्यंगार्थ कळायला अभ्यास करावा लागतो. चिंतन, मनन करावं लागतं. हिला वाटतं आपल्याला सगळं येतं, अजून कसला अभ्यास करायचा? माझी झालीस तर सगळं ज्ञान उधळतो, राणी तुझ्यावर. मी प्रेम करतो गं मनापासून पण तुला मात्र काहीही न गमवता माझं ज्ञान हवंय. पण तुझं येणं चालू राहायला तर हवंच. तू जाताना पायाला स्पर्श करून जातेस तेव्हा त्या स्पर्शातून ऊर्जा सळसळत मेंदूपर्यंत जाते. ताजं करते मन, मेंदू, मनगट. हा तरुण ऊर्जास्त्रोत न येऊन आपलं म्हातारपण वाढतच जाणार. तिनं यायला हवं. म्हणून तर झुलवत ठेवली. तिला वाटतंय मी परीस आहे. मी प्रस्तावना लिहिली की तिच्या कवितांचं सोनं होईल. पण माझं काय... संतापलीय. या रागाचं रुपांतर प्रेमात केलंस तर तू सुखी मी सुखी.

प्रूफं दिली तिला. प्रतिभाशेजारी बसलो झोपाळ्यावर. तिनं खाण्यापिण्याचा विषय बदलला नाही. जणू माझ्या येण्याची दखल घेतली नाही. मग मीच म्हटलं,

"सध्या पोह्यांचा विषय बाजूला ठेवू. आज उपास आहे. उपास नसेल तेव्हा येऊ तुझ्याकडे पोहे खायला."

"सर, तुम्ही कसले येताय गरिबाकडे."

"तू कशाने गरीब झालीस." प्रतिभा म्हणाली. मनिषाच्या डोळ्यांत अंगार उतरलेला. नाकाचा शेंडा लाल झालेला. तिचं मनस्वी रूप डोळ्यांत साठवू लागलो.

ती उठू लागली. तिला थांबवून म्हटलं.

"हे पाहा मनिषा, माझ्या ओळखीचे एक कवी आहेत. त्यांना मी सांगितलं तर ते नक्की देतील प्रस्तावना."

"सर, तुम्ही एवढे जवळचे सोडून तिकडे कुठे जाऊ?"

"ते इथे येतात नेहमी. मी सांगतो त्यांना तसं."

"नको."

"हट्टीपणा काय करतेस?" तिला असं फुकाफुकी सोडणं चूकच आहे. पण ती उठलीच. आधी प्रतिभाच्या पाया पडली. मग दुरूनच माझ्या. ती गेली एक उबदार झोत दूर गेला. विषण्ण पोकळी भरून राहिली. उदासीनतेला डिवचत प्रतिभाची वटवट सुरू झाली.

"द्यायची होतीत ना. तुमच्या प्रतिष्ठेपायी माणसं तुटायला लागली. तुमचे काव्य विचार लिहायचे. बिचारी केवढ्या अपेक्षेने आलेली. तुमचं हे ज्ञान वगैरे आहे ना? ते दुसऱ्याचा मनोभंग करण्यासाठीच असते वाटतं. माणूस महत्त्वाचा नाहीच. साहित्य जास्त महत्त्वाचं तुमच्यालेखी."

"तुला काय वाटत ती पुन्हा येणार नाही? ती येईल गं. हे ज्ञान चुंबकाप्रमाणे खेचून आणेल की नाही बघ तू. ज्ञानाची लालसा असणारे ज्ञानाकडेच आकर्षित होतात. दिव्याभोवती पतंग फिरतो न तसं."

"कसलं डोंबलं ज्ञान. ती काय किडा आहे का?" प्रतिभा केसांची सुपारीएवढी गाठ मारीत आत गेली. कपाळावर येणाऱ्या बटा सावरणारी मनिषा आठवली. दीर्घ उसासा सोडत पाय जमिनीत रेटत झोका घेतला. मी

ज्ञानी असलो तरी माणूस आहे. मला भावना आहेत. वासना आहेत. राग लोभ आहे. ज्ञानामुळे ह्या गोष्टी अलिप्तपणे पाहाता येतात. स्त्री पुरुष संबंधातले सौंदर्य भोगण्याची इच्छा चूक नाही. प्रतिभाच्या या वृत्ती क्षीण झाल्यात. तरुणांना लैंगिक सुखातले अभाव कळत नाहीत. जुनाट कल्पनांत अडकलेली मानसिकता. मनिषा त्यांपैकीच. मुक्त विचारांची तरुणी भेटेलच केव्हा ना केव्हातरी. व्यवहार जाणणारी. काय घाई नाही, वाट बघायची. मंद झोके घेत ते झोपाळ्यावर झुलत राहिले.

✦ ✦ ✦

सरांनी मनिषाला फोन केला. म्हणाले.

‘‘मनिषा, तुला समजत कसं नाही? लोक वेगळा अर्थ काढतील. तुझं मन निर्मळ आहे बेटा, पण हे जग तसं नाही ना? माझ्यापेक्षा मोठ्या लोकांची तुला प्रस्तावना मिळवून देतो. मग तर झाले. गेली ना तुझी नाराजी. वेळ मिळाला की ये घरी. डिक्टेशन घ्यायला आवडेल का तुला. ये तू मग, आपण बोलू.’’

‘‘काय पण सर आहेत. मलाच समजत नाही. ह्यांच्या मुलीच्या वयाची मी अन् म्हणे लोक वेगळा अर्थ काढतील. एवढे थोर महान ज्ञानी व्यासंगी अभ्यासू माणसाला माझ्या पुस्तकाची प्रस्तावना देताना चारित्र्याचं भय वाटतं. पाप तर ह्यांच्याच मनात आहे. बाईला बघितलं की यांची बुद्धी चळते हे कळत नव्हते का. पण म्हटलं आपण नीट सांभाळून राहिलं, सावध असलं तर कशाला कुणाला भ्यायचं? त्यांचं थोर आहे तर शिकायचं. अंतरावरून. ज्ञानाच्या तेजाने जीवन प्रकाशमान होतं म्हणे. पण ह्यांच्या मनातली स्त्रीलालसा काही कमी झालेली नाही. रोहिणी म्हणतच होती, ‘सर, बरे नाहीत जरा जपूनच.’’ पण म्हटलं आपण बरे असल्यावर सगळे

बरे असतात. पण असे धक्के मिळतातच. शिखर गाठायला चढ चढून जावे अन् तिथल्या आपण मानत असलेल्या देवानेच ढकलून द्यावे. जखमा बऱ्या होतात. मानसिक धक्का प्रचंड असतो. त्यातून सावरणं कठीण. खरं तर पहिल्या भेटीतच जाणवलं होतं. त्यांच्या  हॉलमधल्या भिंतीवरचा फोटो पुरस्कार घेतानाचा. पुरस्कार देणारी बाई होती ती कोण? केवढी? यापेक्षा ती बाई आहे. नजरही तशीच. पण मनात म्हटलं आपली साधूसंतांची शिकवण. विंचूने आपला स्वधर्म जपावा आपण आपला. तेही जाणतच असतील ना स्वतःचा स्वधर्म. मागे एकदा स्त्रीमुक्तीच्या संदर्भात गप्पा चाललेल्या. तर म्हणाले 'बाई पन्नाशीनंतर पुरुषाला डेमोनेट करते. त्याचे सेक्सुअल लाईफ असमाधानी राहाते.' 'एवढ्या दिवस पुरुषांनी खच्चीकरण केलेलं असतं तेव्हा?'

'तेवढी बंधनं हवीतच. मुलांसाठी बाई सहन करते. पुरुष भ्रमर वृत्तीचा असतो. तो संसारात गुंतणारा नसतो.'

माणूस विचारांनी थोर होतो की ज्ञानाने? माणुसकी, करुणा यांनी मोठा होतो का प्रतिष्ठेने? सर किती थोर आहेत ते कळलेच होते ! त्यांचं हत्तीएवढं थोरपण त्यांना लाखलाभ. आपण आपलं मुंगी होऊन सतत कष्टाचं सातत्य राखावं हे बरं. सरांना हे माहीत असेलच की हत्तीच्या कानात मुंगी गेली तर काय होतं... !

ज्ञानी लोक मराठी साहित्य सकस व्हावं म्हणून काही प्रयत्न, काही योगदान करण्यापेक्षा क्षुद्र स्वार्थातच बरबटत राहातात. प्रयोग करायचे नाहीत किंवा वाट धुंडाळायची नाही. बदल नको. पूर्वजांनी विरजण घातलंय तेच घुसळत बसण्यात धन्यता मानायची. बाई बदलतेय... निसटू पाहातेय... ह्या पुरुषांनी मन मोठं करून बदलावं. निदान मान्य करावं तिचं बदलणं.... स्वतःचं लिखाण मैलाचा दगड.

मानतात सर. पण त्यांना हे कळत नाही. मैलाचा दगड मैलाच्याच अंतरावर असतो. पावलापावलांवर मांडलेले धोंडे अडथळाच निर्माण करतात. वाक्यावाक्यात ज्ञान आहे, पण ओघ नाही. तुटकपणामुळे तद्रूपता येत नाही. अवघड वाटते. आपली बुद्धीच तोकडी असा न्यूनगंड वाटत राहातो. सरांना एकदा म्हटले 'असे अवघड शब्द का वापरता?' तर म्हणाले ''प्रचलित शब्द नसले तरी मराठीच आहेत ना. वजनदार शब्दांमुळे लेखन भारदस्त होतं. नाही कळला अर्थ तर फोन करून विचारावा.''

सरांना विचारावंसं वाटलं 'तुमच्यानंतर कुणाला विचारायचं?' अमर असल्यासारखं बोलायचं. शिळ्या भाताला फोडणी द्यायची न् त्यावर सॉस घालायचा अन् म्हणायचे फ्राइड राईस. म्हणे मला वेगळं सौंदर्य जाणवतं ते उलगडून दाखवितो.

सर तुच्छ लेखतात, घरगुती कामांना, म्हणे ती कामं बाईकडून करून घेता येतात. प्रायोरेटी कशाला द्यायची ते ठरव. म्हणजे घरदार सोडून यांच्याकडे ज्ञान घेत बसते. ह्यांचा कावा कळत नाही का? ह्या ज्ञानी लोकांना कळत कसं नाही स्वयंपाकघर हीच प्रयोगशाळा असते. स्वयंपाक म्हणजे रोजचा प्रयोगचं नाही का? म्हणून तर बायका कुठल्याही पदावर असल्या तरी स्वयंपाक करू शकतात. हे पुरुष वाचतात आयतं... खातात आयतं... असं आयत्या बिळात कोण असतं?

मनिषा चपात्या लाटत होती. एकीकडे भाजी टाकलेली. सकाळची घाई डब्याची. काव्याचं आवरायचं काम मकरंद करत होता. तेवढ्यात फोन वाजला. एवढ्या घाईगडबडीत कशाला फोन करतात हे लोक? तिनं पुटपुटतच फोन घेतला,

''तसंच महत्त्वाचं असेल.'' मकरंद म्हणाला तिनं ''हॅलो'' म्हटलं तरी मनात आलंच तिच्या. 'माझ्याकडं कसलं महत्त्वाचं काम?' फोनवर प्रकाशक बोलत होते.

"प्रूफं पाठवून दोन महिने झाले. प्रस्तावना कधी पाठवताय?"

"पाठवते, पाठवते आता मी खूप घाईत आहे. दहा वाजता फोन करू का? प्लीज?"

"ठीकायं" फोन कट केला पण डोक्यात गोंधळच. काय करावं... पानभर प्रस्तावना मिळू नये आपल्याला? का असं होतं आपल्याच बाबतीत? आपल्या कविता खरंच तेवढ्या लायकीच्या नाहीत? मग कशाला संग्रह तरी काढायचा? कमवत नाही कवडी. सारखं नवऱ्याला लोणी लावा. त्याला पटवून द्या. हे त्यानं सुखासुखी करावं म्हणून घरदार व्यवस्थित सांभाळायचं. स्वतःच सगळी कामं करायची. कशात कमी पडायचं नाही. सगळी कर्तव्य नीटच पार पाडायची. आपल्या छंदाची कुणाला झळ लागू द्यायची नाही. कागदांचा पुस्तकांचा पसारा कुणाला दिसता कामा नये. किती गोष्टीचं भान राखायला लागतं. एका कविता वाचनाच्या कार्यक्रमाला गेले तेव्हा एका प्राध्यापकाची ओळख झाली. बोलता बोलता प्रस्तावनेचा विषय निघाला. तो म्हणाला.

"माझ्या खूप ओळखी आहेत. मी देईन प्रस्तावना मिळवून. रा. ग. गवस माझ्या चांगले ओळखीचे आहेत. अगदी मित्रच." मनिषा हुरळूनच गेली. सरांविषयीचा संताप खदखदतच होता. सरांच्या नाकावर टिच्चून मिळवली की नाही असं मिरवता येईल. आपणही काही कमी नाही आहोत. वगैरे वगैरे... खूप काही वाटून गेले. एक वाट बंद झाली तरी दुसरी सापडतेच ना? मनिषा मनोमन सुखावली. ती त्या तरुण प्राध्यापकाला म्हणाली,

"मानधन व्यवस्थित देईन. पैशाची काळजी करू नका." "नवऱ्याच्या जिवावर बायको उदार. तर तो आता फोनच बंद ठेवतोय. रिंग वाजलीच तर आश्वासनं देतोय. शेवटी हाही पुरुषच निघाला."

"कुणाचा गं फोन?" मकरंदने विचारले.

"प्रकाशकाचा."

"काय रॉयल्टी पाठवतोय की काय."

"पुस्तक छापण्याआधी? तेही माझ्यासारखीचा कवितासंग्रह? एवढंपण कुजकं बोलू नये माणसाने. प्रस्तावनेचं विचारत होता."

"तो तरुण, स्मार्ट, नवा मित्र त्याने पण मारली वाटतं टांग."

"हो ना. नुसता देतो देतो म्हणतोय. स्पष्ट काहीच बोलेना. मिळत नाही म्हणून सरळ सांगावं ना. हाही झुलवतोय फक्त."

"मी काय म्हणतोय. हवी कशाला प्रस्तावना वाचकाला ठरवू दे ना काय ते. प्रस्तावनेचा अडथळा कशाला? अगाध काहीतरी लिहितात हे समीक्षक लोक. कवितांपेक्षा अवघड. नसलेले अर्थ काढत बसतात." मनिषा बघतच राहिली.

नवऱ्याकडे. सी.ए. झालेला आपला नवरा कधीपासून कवितांचा वगैरे एवढा विचार करू लागला? तिला नवऱ्याबद्दल अगदी प्रेम दाटून आलं. हातातलं लाटणं ठेवलं न् त्याला मिठी मारली.

"अगं, चपाती करपली बघ." तिच्या खांद्यावरून त्याने चपाती उलटली.

"भर लवकर डबा. काय केली भाजी? मी काय घोडा आहे का, चणे खायला? पनीरमटर, राजमा, दमआलू असं पण करत जा ना कधी कधी."

"छोले आहेत ना हे !"

"हरभऱ्याच्या उसळीला छोले का म्हणतात?"

"राजमा मटर या पण उसळीच असतात की." तिनं दोघांचे डबे भरले.

ते दोघे गेल्यावर मनिषा विचार करत बसली. काय फरक पडतो? नसली प्रस्तावना तर? तेवढ्यापुरतं वाटतं भारदस्त वगैरे. पण त्याला काहीच अर्थ नाही. उगाच महत्त्व देतोय आपण झालं. तरी आशा सुटेना. आता शेवटचाच फोन करून बघाव' ाध्यापकाला... शेवटचाच. फोन स्विच ऑफ होता. मार्ग बंद झाला न् प्रश्न संपले. तिनं प्रकाशकाला फोन केला.

"प्रस्तावना काही मिळत नाही. बिनप्रस्तावनेचाच कवितासंग्रह काढू."

"नाही ना दिली सरांनी. अहो, हे लोक जितके मोठे तितके खोटे असतात. बरं ठीकाय."

मनिषाला आता खू‍ः रिलॅक्स वाटू लागलं. सहजतेने जगू आता आपण. तिनं पोटभर श्वास घतला. अगदी खोलवर.

✦ ✦ ✦

# पराभूत मध्यस्थ

मुक्ता सकाळी उठली. कंमरेत असह्य कळा मारत होत्या. तिनं तसाच डबा तयार केला. माधव विद्युत महामंडळात अधिकारी आहे. सध्या सांगलीला बदली झाल्यामुळे, सुट्टीत पुण्यात येतो. म्हणजे सांगलीत त्यांना वन् बीएचके फ्लॅट आहे. पुण्यात फ्लॅट म्हणून माधव येतोच. त्यांचा मुलगा पुण्यात शिकतोय. शिवाय मुलगीही पुण्यातच नांदतेय म्हणून मुक्ताची पुण्यात येण्याची ओढ. अक्षतने कॉलेजजवळ रूम घेतलेली. दोन दिवस पुण्यात आईबाबा असूनही अभ्यास आहे म्हणून अक्षत भेटायला नाहीच आला. खरं तर जाण्यायेण्याचा मुक्ताला त्रास होतो तरी ती येते. माधव आवरून तयार झालेला. त्याचा डबा देत मुक्ता म्हणाली,

"मी नाही येत आज. अंगावरचं जास्त जातंय. तिथं पाण्याच्या प्रॉब्लेममुळे त्रास होतो. कंबर पण दुखतेय." माधव मग काहीच बोलला नाही. त्याला वाटले, 'हे नसते कारण सांगतेय. लेकाला भेटल्याशिवाय हिचा पाय निघेल का.' थोडा घुश्श्यातच गेला. मुक्ताला या गोष्टीचा ताण आला. तिला वाटलं ह्यांना खोटं बोलतेय असंच वाटतं. दवाखान्यात जा म्हणावं. आराम कर म्हणावं ते राहिलं नुसतं फुगायचं काय? पाळीचा त्रास होतो हे काय आपल्या हातात असतं का? पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य म्हणून ती नेहमी सुती साड्यांच्या घड्याच वापरते. पण सांगलीत सकाळी एकदाच पाणी येते. पाणी कपात तर पुण्यातही असते केव्हा केव्हा. पण इथे पाणी साठवायला भांडी आहेत. सवयीचं घर आहे. तिथं सगळंच तात्पुरतं. माधवला वाटतं मुक्ताला पोरांचीच ओढ. आपली काळजीच नाही. डॉक्टर म्हणतात मोनोपॉज आहे. पाळी जाताना होतं असं. आणि अक्षतला भेटल्याशिवाय नाही येत असं म्हणायची सोय नाही. जोपर्यंत ठणठणीत आहे. सगळी कामं व्यवस्थित करतेय तोपर्यंतच ह्यांचा मूड ठीक राहाणार... तिचे डोळे भरले. हल्ली जरा काय झालं की लगेच डोळे भरतात. एकीकडे नवरा दुसरीकडे मुलगा.. ती केव्हापासून अक्षतला फोन करतेय. उचलतच नाही. काय झालंय ह्याला. ती मेसेज पाठवावा म्हणून मोबाईलशी खाटखूट करू लागली. सराव नसल्यामुळे कुठलीही अक्षरे कुठंही टाईप होत होती. मोबाईल कसा वापरायचा हे अक्षतनेच शिकविले. एकदा तर मेसेज टाइप केला अन् नंबर शोधता येईना म्हणून लिहून ठेवलेला नंबर टाइप केला. कुठेतरी एक अंक चुकला न् काय झाले कुणास ठाऊक? दुसरीकडेच तो मेसेज गेला तोही ब्लॉक. रात्रीचे दहा वाजलेले माधवची वाट बघता बघता अक्षतला मेसेज पाठवायचा उद्योग चाललेला. त्या माणसाने उलट फोन केला. त्याला सॉरी म्हटलं. अक्षतला सांगितल्यावर केवढा ओरडला म्हणाला, 'गैरसमज होतात वगैरे. आताही ब्लॉकच कॉल गेला.' त्यानेही ब्लॉकच रिप्लाय पाठवला.

बराच वेळ खटपट केल्यावर हवी ती अक्षरे टाइप होऊ लागली. तिला हायसं वाटलं. कधी कधी ही यंत्र पण आपल्याला समजूत घेतील असं वाटतं. भांबावलेपणा धांदरटपणा किंवा नवखेपणा त्यांना कळतो की काय. असं अचानक नीट वागायला लागतात. गाडी चालवताना असंच होतं. अडथळा चुकविण्याच्या नादात ताबा सुटतोय की काय असं वाटत असतानाच गाडी सुरळीत चाललेली असते. एकदा अक्षतनेच सांगितलेले. दुपारी डबा खाऊन लगेच निघतो. शिवाजीनगर ते सांगवी सरळ रस्ता. दुपारची रहदारी कमी होती. मध्येच डुलकी लागली. दोन स्टॉप गेल्यावर जाग आली. म्हणाला, खूप घाबरलो. तेव्हा नुकतीच गाडी वापरायला लागलेला. मुक्ता तर त्याला बसनेच जा म्हणाली. 'हवीय कशाला गाडी?' पण एकदा हाताशी गाडी आल्यावर कसला सोडतोय. वर आणखी हे बाबांना सांगू नकोस. आता रूम घेऊन राहतोय तेच बरं माधवला मात्र वाटतायचं एवढा सुंदर फ्लॅट आहे तरी ह्याला तिथं राहायला नको. मुक्ताला प्रश्न पडला एवढा वेळ गाडी चाललीच कशी. तिनं देवाचे मनोमन आभार मानले. माधवचं ड्रायव्हिंग कच्चंच आहे. सरकारी जीप असल्यामुळे घरची कार फारसी चालवण्याची वेळच येत नाही. तर मागे एकदा जेवल्या जेवल्याच निघाला. म्हणाला थांबलो की अंगात आळस भरले. पुणे सातारा हायवेवर लागली डुलकी. गाडी मातीच्या ढिगावर जाऊन थांबली. मुक्ताने तेव्हा बलेरोची पूजा केली. म्हणाली सांभाळ 'गं बाई माझ्या माणसांना'. माधव आणि अक्षत दोघेही हसत होते. 'मी एवढंच करू शकते'. मुक्ता म्हणाली. अशी ही यंत्रं माणसासारखी समजुतीनं वागतात. माणसं मात्र यंत्रासारखी... मुक्ताने मेसेज टाइप केला. तू माझ्यावर का चिडला आहेस. तू सगळ्यांच्यावरच रागावला आहेस. तू हातात निखारा ठेवतो आहेस. रागावणे म्हणजे हातात निखारा ठेवणे. हा सुविचार

तिने दोघांना वाचून दाखविलेला. पेपरमध्ये आलेला. अक्षतने उत्तर पाठविले, "तुमच्यावर माझा काय हक्क आहे चिडायचा. मी कोण लागतो तुमचा. मला तुम्हांला त्रास द्यायचा नाही. गुड डे." मुक्ता उत्तर पाठवू लागली तर आता मोबाईल चिडला. वैतागून तिनं ठेवून दिला. अक्षत किती धुमसत असेल याची तिला कल्पना आली. तिचं कशातच लक्ष लागेना. तिला वाटलं ह्या दोन्ही बाप्यांना आपली मन:स्थिती का कळत नसेल? मी सतत त्यांचाच विचार करतेय काहीच सुचत नाहीये अक्षत अशी डोक्यात राख का घालून घेत असेल? समजून घेण्याचं नावच नाही. बहिणीविषयी तिरस्कार, मत्सर का..? मनोज्ञा मोठी अक्षतपेक्षा. तिनंही फार प्रेमाने त्याचं लाड, कौतुक केलं असं नाही. ती एकटी, शांत बाजूलाच असायची. माधवचं सतत बाहेर असणं. अवखळ अक्षतमध्येच मुक्ता सदा गुंतलेली. तो राबवून घ्यायचा. स्वतःकडेच लक्ष वेधून घ्यायचा. स्वतःचे हट्ट लाड पुरवून घ्यायचा. माधवच्या हे लक्षात यायचं मग घरात असेल तेव्हा तो मनोज्ञाकडे लक्ष द्यायचा. नंतर तर माधव मनोज्ञाचा एक गट आणि मुक्ता अक्षतचा एक गट असं व्हायचं. अक्षत आणि मुक्ताचं खूप ट्युनिंग जमायचं. पण जसजसा अक्षत मोठा होऊलागला. तसतसा बापाकडे ओढा वाढू लागला. बापाच्या सहवासासाठी आसुसलेला असायचा. माधवचं लक्ष मात्र मनोज्ञाकडेच. वयात येताना असा चिडका आक्रमक झालेला.

मनोज्ञाचं लग्न झालं. ती तिच्या घरी गेली. माधव सांगलीला. लांब पडतो फ्लॅट म्हणून अक्षतने रूम घेतली. मनोज्ञा जॉब करते. म्हणाली 'कॉम्प्यूटर लागतो मला नेऊ का?' अक्षतची इच्छा नव्हतीच. पण लग्न झाल्यामुळे मऊ आलेला थोडा. त्याने हार्डडिस्क तेवढी देणार नाही म्हणून सांगितलं. मनोज्ञाच्या नवऱ्याचा जुना कॉम्प्यूटर होता. मग फक्त सीपीयू न्यायचं ठरलं. नवीन जॉब लागलेला. पगार कमी. नवऱ्याला म्हणता येईना.

आणि आता रिकामाच पडून राहील तर अक्षत म्हणाला ''मी कुणाकुणाला भीक मागून काय काय सिलेक्शन केलंय. काय झालं तर? मी नाही देणार.'' मुक्ता म्हणाली ''मग नवीन आणून दे.''

''बाबांनी सांगू दे, देतो आणून. तिच्या नवऱ्याला तेवढंही येत नाही का? सारखं इथनूच नेतेय?'' ''अरे आपली ताई. लग्न नसतं झालं तर हाच वापरला असता ना? आता बंदच राहाणार आहे तर काय होतं दिला म्हणून?'' काही बंद राहाणार नाही. मी येतच असतो की वरचेवर.''

मुक्ताला वाटलं लग्नात बाकीचं आंदण वस्तू न देता कॉम्प्यूटरच दिला असता तर बरं झालं असतं. अक्षतचं म्हणणं हार्डडिस्क म्हणजे मेंदू, तर सीपीयू म्हणजे कॉम्प्यूटरचं डोकं असतं. तर त्याने बिनमेंदूचं नुसतंच डोकं दिलं मनोज्ञाला. नंतर एकदा मनोज्ञा घरी आली तर भडकलाच तिच्यावर. खूप बोलला. मनोज्ञा नेहमीप्रमाणे शांत राहिली. तिला गरज होती म्हणून हक्काने मागितला बापाला. भिडस्तपणामुळे नवऱ्याला मागू शकत नव्हती. बाबा म्हणाले पूर्ण सेटच ने. पण भाऊ असा ! मुक्ताने दोघांनाही समजावले. मनोज्ञाला म्हणाली ''असू दे लहान भाऊ आहे राग मानू नकोस.'' तर अक्षतला म्हणाली, ''कसला रे तू भाऊ स्वतःच्या कमाईचा असल्यासारखा वागतोस. बाबांच्या वस्तूवर दोघांचाही तेवढाच समान हक्क आहे.'' लहानपणी मुक्तासारखा वागणारा बोलणारा अगदी दिसणारासुद्धा आता अगदी बापासारखाच वागायला लागला. गोरा रंग सावळा झालाय. प्रदूषणामुळे. आवाज तर फुटणारच होता. पण पुरुषी विचार, गुर्मी तशीच तीच. उन्हाळ्याची सुट्टी लागली की त्याला इतर उद्योगांबरोबर मुक्ता स्वयंपाकाची कामेदेखील शिकवायची. पोहे, उपमा, ऑम्लेट, चहा, कॉफी छान करायला लागलेला. एकदोनदा चपाती लाटलेली. कणीक मळताना मात्र खेळत बसायचा पिठाशी. एक दिवस मनोज्ञा फरशी

पुसायची, तर एक दिवस अक्षत. एकदा भांडी घासणारी मदतनीस बाई आली नाही तर अक्षतने किचनकट्ट्यावर बसून भांडी धुऊ लागलेला. अकरा वर्षांचाच होता, तेव्हा हे काम त्याने स्वतःहून केलेले. मुक्ताला आपल्या आईपणाचा केवढा अभिमान वाटलेला. लहानपणातली त्याची समज पाहून तिला भविष्याचा दिलासा मिळायचा. म्हातारपणाची काळजी वाटायची नाही... पण मनासारखं सगळंच घडलं तर ते आयुष्य कसलं? आज तिघांत मध्यस्थी करण्यातच सगळी शक्ती खर्च होतेय. विशेष म्हणजे मनोज्ञा नीट समजून उमजून वागू लागलीय. बाईमाणूस झालीय. अन् अक्षत पुरुष झालाय, पण माणूस कितपत झालाय? कुठास ठाऊक. किती नकळत निसटून चाललीयेत घरातलीच माणसं.... आपल्यावर अन्याय होतोय. हेच अक्षतने मनावर बिंबवलय. त्यामुळे सतत धुमसणं. मध्यंतरी डोकेदुखी सुरू झालेली. असह्य कळा यायच्या डोक्याच्या मागच्या भागातून. स्कॅनिंग वगैरे करायचं चाललेलं. तोवर मुक्ता घरगुती औषधं करायची. हळकुंड जाळून हुंगव. सुंठीचा लेप लाव कफ वाढला असेल म्हणून मधातून मिरी, पिंपळी, ज्येष्ठमधाचं चाटण द्यायची. अक्षतही मुकाट्याने सगळं करून घ्यायचा. एकदा त्याच्या मित्राने त्याला दूरवर फिरायला नेले. त्यालाही असाच त्रास व्हायचा. घरातल्या हजार कटकटी. घरापासून थोडं लांब राहिल्यावर बरं वाटतं. घरातल्यांबद्दल साचलेला खळमळ शेअर केला. डोकेदुखीची तीव्रता कमी झाली. मग मुक्ताजवळ बडबड केली. अक्षत तिला म्हणाला,

"घरी आलं की मला त्रासच होतो. घरातलं वातावरण नकोसं वाटतं. सांगवी जवळ आलं की डोकं ठणकायला लागतं. कशाला एवढ्या लांब फ्लॅट घेतला." मुक्ता शॉक्ड. कुठल्या, कुठल्या भ्रमात आपण घरातल्यांवर प्रेम करतोय. कष्ट करतोय. हे तुटणं मेंदूत नोंद झालंच. स्वतःला सावरून तिनं म्हटलं, "अरे, आता ठरवलंय ना रूम घ्यायचं? तुला हवी तशी घे."

"फ्लॅटच तिकडं घेतला तर काय होईल !" अक्षतला रूममधल्या गैरसोयी नको होत्या.

"ह्यावर आतापर्यंत खूप बोलून झालंय. पुण्यात बाबांना घर घेणं शक्य आहे का? तुला पुण्यात रूम घेऊन राहयला नको म्हणताहेत का? एटीएम आहे तुझ्याकडे, बाइक आहे."

"कसली जुनी बाइक. ओल्ड फॅशन."

"आपण कवडीही कमवत नाही आहात. मिळेल तेवढ्यात समाधान मानावं." आधी ताईचं लाड करतात म्हणून भुणभुण आता हे. मुक्ताचं पीठ व्हायचं दोघांच्या घरघरीत. अक्षतजवळ माधवची बाजू मांडायची न् त्याची नाराजी ओढवून घ्यायची. माधवजवळ अक्षतची बाजू मांडली की माधव नाराज. आता तर मनोज्ञाही नाही अन् माधवही. तरी हा आपल्यावर चिडतोय... मुक्ता खूप दुखावली. तिचं तुटणं अधोरेखीत झालं मेंदूत. हा जर आपला तिटकारा करत असेल तर इथं राहाण्यात काय अर्थ आहे? बस् झाली वेडी माया. मन घट्ट केलं तरी पराभुतासारखी आतल्या आत कोसळत राहिली. बुरूज, तटबंद्या ढासळत राहिल्या. कोसो दूर गेली. दूरांतून ती भूतकाळ पाहू लागली. तिला आठवलं अक्षत दीड वर्षाचा असताना अंगावरचं दूध पिणं तोडतानाचा त्रास. त्याचं स्तन्य तोडण्यासाठी एकटीचं झगडत होती. आतून बाहेरून स्वतःशी त्याच्याशी. ह्या भेगाळल्यापणाची त्याच्याही मनात मेंदूत नोंद झालीय असेल ना ! मग तो शाळेत जाऊ लागला. तेही तुटणंच होतं. पण अपरिहार्य होतं. उदासी होती, उत्सुकता होती. दुःख नव्हतं. पहिलीत गेला तेव्हा त्याला स्वतःची 'शी' स्वतःला धुवायला शिकविली. ती त्याला म्हणाली. "शाळेत शी लागल्यावर कोण धुणार? आता काय बालवाडी नाही. बाईंनी लक्ष द्यायला. तुझं तू धू." तो शिकला लगेच. पण ती त्या वेळी मोडून पडलीच. आत

आत खोलवर! आणि आता तर त्यानेच घाव घातला तारुण्याच्या ताकदीने. तुटणं अपरिहार्यच. स्वतःच स्वतःचा अवयव तोडण्याइतकं क्लेशदायक. तिनं स्वतःला सावरलं भणंगपणा बाजूला सारून स्वतःला गोळा केलं. मनाला समजावलं. घट्ट केलं. आपलंच रक्त आपलं वैरी... चार दिवसांनी ती माधवकडे गेली.

मनोज्ञाचा फोन आला. "सीपीयू घरी ठेवून आली." तिनं अक्षतला तसं कळवलं. तेव्हा तो लगेच घरी गेला. आता आईच्या ओढीनं लेकरू गेलं म्हणण्यापेक्षा प्रियकराच्या ओढीनं प्रेयसी धावावी तसा धावला कॉम्प्यूटरच्या ओढीनं. कधी एकदा सुरू होतोय कॉम्प्यूटर अन् गेम खेळतोय असं झालेलं त्याला. आर्मीत जायचंय त्याला मग तसल्याच मारधाडीच्या युद्धाच्या गेम खेळणार. मनोज्ञा सारखा टी.व्ही. बघते म्हणून त्याचा शिमगा असायचा. 'हा सारखा गेम खेळतो म्हणूनच ह्याच्या डोक्यात हिंसक विचार येतात त्यामुळेच भडकू झालाय.' असं मुक्ता म्हणायची. पुरुषी अहंकार पुरेपूर वाढलाय त्याच्यात स्वतःचे दोष झाकण्याइतपत दाट झालाय. असं मुक्ताला वाटायचं.

सगळं जोडून झाल्यावर कॉम्प्यूटर चालू केला त्यानं. पण चालूच होईना. मनोज्ञाला फोन केला. दोनतीन तास खटपट केली. अतीव निराशेने, संतापाने, विफलतेने त्यानें मुक्ताला फोन केला. धाय मोकलून रडला. मुक्ताला वाईट वाटले. नेहमीप्रमाणेच मनोज्ञाचा राग आला. ती अक्षतला म्हणाली,

"इंजिनियरला बोलावून घे. काय करायचं आता?"

"ताईला सांगून दे पाठवून म्हणावं. किती पैसे घेईल तो माहितेय का? मी बाबांनाच सांगतो."

"बाबांना सांगू नकोस. परत का दिला म्हणून चिडतील बाबा तुझ्यावरच. त्यांना वाटेल तूच काहीतरी म्हणाला असशील. त्यांचं भडकणं

मला कंट्रोल होणार नाही. तुझ्याकडे एटीएम आहे ना घे दुरुस्त करून.'' मुक्ता वैतागली. ह्याला साधं सहजं बोललं तरी वाकडे अर्थ काढतो. ह्याचं मात्र ताईनं आईनं कितीही बोलून घ्यावं. किती वेळा समजावलं गेली आता दुसऱ्याच्या घरी. सोड हेवेदावे. तुझंच आहे सगळं. एंजॉय कर कॉलेज लाईफ... सीपीयू परत दिला म्हणून झालेला आनंद. आता चालू होईना म्हणून त्याचे संतापात झालेलं रुपांतर. त्याची धग मुक्ताला दूरवर जाणवत होती. घट्टपणा ठिसूळ झाला. खडकाला तडे गेलेत.

रात्री घरी आल्यावर मुक्ताने माधवला अक्षतला फोन करायला सांगितले. कॉम्प्यूटरबद्दल माधवला काहीच माहीत नव्हते. माधव कुऱ्यातच म्हणाला. ''त्याला काय कमीपणा वाटतोय का मला फोन करायचा?'' मग मुक्ताच अक्षतला म्हणाली ''बाबांना फोन कर ना.''

''वेळ मिळाला की फोन करतो तर बाबा विचारतात काय करतोस? खरं सांगितलं की फोन कट करतात. नाहीतर ओरडतात. अभ्यास का नाही करत म्हणून. चोवीस तास अभ्यासच करत बसायचं का?''

अक्षतचं न् माधवचं, अक्षतचं न् मनोज्ञाचं नीट जमावं त्यांना एकमेकांबद्दल आतून माया. ओढ वाटावी म्हणून अट्टाहास चाललेला तिचा. आपली कुणी नसेना का पर्वा करीत... आपलीच कर्म न् आपलीच फळं. तिला पराभूत वाटू लागलं. कोणीतरी म्हटलेलं नवरा नसतोच आपला पण आपणच जन्म दिलेली मुलं तरी आपली असतात ना ! आपण त्यांना हवं तसं वाढवू घडवू शकतो. मुक्ताला वाटलं आपल्याला नाहीच जमलं ते. आपण फक्त पराभूत मध्यस्थ झालोय. पराभूत मध्यस्थ !!

✦ ✦ ✦

# हिऱ्याच्या कुड्या

मीनाने आकांक्षाबरोबर बोलून दीपककडे जायचं ठरवलं. पण दीपकला कळू द्यायचं नाही. मीनाला वाटलं नाही ना आपल्या नवऱ्याला सरप्राईज द्यायची सवय तर आपण द्यावं. तिनं मग दीपकला आवडतात म्हणून चकल्या अन् मुलांना मैद्याचे काजू करायचं ठरवलं. दिवस पीठ तयार करण्यातच गेला. आकाश, आकांक्षा येण्याआधी तयार व्हायला हवेत. आकांक्षाला लवकर यायला सांगितलं. ती मदत करते जरा. काजू तळून होताहेत तोवर आकाश आलाच आकांक्षाला आजच उशीर झाला... खरं तर नको वाटतं पोरांना सोडून जायला. पण दीपक तिकडे एकटाच आकांक्षाची बारावी आहे तरी तिच्यावर घर सोपवून फेऱ्या माराव्या लागतात. सगळी

जबाबदारी तिच्यावरच. ती छानपणे पार पाडतेही. आकाशला मात्र वाटतं बाबा नाहीत, आई तरी जवळच असावी. शेजारीपाजारी कुजबुजतात. एवढ्या लहान पोरांना सोडून आई जाते... उंबरा ओलांडून बाहेर पडतात तेव्हा ती एकटीच असतात, एकटीच जगतात. घरात आल्यावर मात्र आई असताना किंवा नसताना ती सुरक्षितच असणार की. घर तेवढ्याचसाठी असते. चोराचिलटांची भीती तर आई असतानाही असेलच की. पण मानसिक आधार ! कुटुंब व्यवस्थेमुळे मुलं, माणसं, मानसिकरित्या खंबीर नसतात का? त्यांना सतत कोणाच्या तरी आधाराची, सोबतीची गरज का वाटते? आकाशची चलबिचल व्हायची पण आकांक्षा एकदम व्यवस्थित. तिच्या भरोशावर मीनाला जाता येतं... नाहीतर... आपल्या लोकांना पाश्चिमात्यांच्यासारख्या सुखसोयी हव्या असतात. त्यांना नाव ठेवत त्यांचं अनुकरण चाललेलं असतं. वरकरणी. पण त्यांची स्वयंशिस्त, स्वावलंबन हे मात्र नको असतं. त्यांची मुलं चौदा–पंधराव्या वर्षी स्वतंत्र होतात. इथं मात्र भारतीय बाळं सत्तावीस अठ्ठावीसची झाली तरी आईबापाच्या पदराखालीच असतात. तर मुलांना घरात ठेवल्यामुळे शेजारचे कुंजबुजतात. सरकारी नोकरी प्रामाणिकपणे करावी ही साधीच गोष्ट. प्रामाणिक सरकारी नोकराला मुलांना होस्टेलवर ठेवून चांगल्या शाळांत ठेवायला परवडत नाही. मग स्वतःच एकटं परगावी राहून बायकोमुलांना चांगल्या ठिकाणी ठेवावं वाटतं. स्वतः सतत बदलणाऱ्या गावाला फिरत राहाणं सोपं पडतं. कामामुळे मग येणंजाणं जमत नसेंल तर... खरं तर मीनाला वाटायचं मुलांना घेऊन जावं पण येण्याजाण्याचा खर्च वाढतो. अभ्यासही बुडतो. नवऱ्याकडे दुर्लक्ष करू नये वाटायचं. ती अशी महिनाभरातून फेरी मारायची तर शेजारी कुजबूजायचे. मुलं समंजसपणे राहात होती. कुणाला त्रास देत नव्हती तरी कुजबूज. दीपकच्या ऑफीसमध्ये लोक म्हणायचे हा एवढा

मोठा साहेब. तरी एसटीने जाणं येणं चारचाकी गाडी नाही अजून. म्हणजे काय प्रामाणिकपणे वागलं तरी कुणी हारतुरे घेऊन सत्कार, सन्मान करत नाहीत तर कुजबुजतातच ! आपल्या अशा मानसिकतेमुळे कृष्णाला नाही पण गांधीजींना वरचेवर जन्म घ्यावा लागेल. मीना मग मन खंबीर करते अन् कुजबुजीकडे दुर्लक्ष करते आणि नवऱ्याला भेटून येते. प्रामाणिक लोकांना घरातूनच मानसिक बळ मिळाले की कुजबुजीचा त्रास होत नाही.

✦ ✦ ✦

बेल वाजली. दार उघडलं मीनाने तर आकाश एकटाच. "अरे ताई, नाही आली?" "मैत्रिणीबरोबर गप्पा मारतेय. आई खायला कायेय?" आकाश बूटमोजे काढतच म्हणाला. "झालं सुरू फक्त खाण्यासाठीच घरी येतोस की घर बघितलं की खाण्यापिण्याची आठवण येते, भूक लागते? हातपायतोंड धुऊन ये. मस्तपैकी खाऊ देते."

"कायेय सांग आधी" तो तसाच स्वयंपाकघरात आला.

"आधी आवर नाहीतर काहीच मिळणार नाही."

मग नाईलाजाने तो बाथरूममध्ये गेला. अंगातून शक्ती गेल्यासारखा काय चालतोय? एवढं काय होतं या मुलांना दमायला? रोज रोज उपदेश करायचा, लेक्चर द्यायचं. आता टेपच करून ठेवायला पाहिजे. रोज व्यायाम करा वगैरे. मीना वैतागून गॅसकडे गेली. एकीकडे दूध ठेवून दुसरीकडे चकल्या करू लागली.

"काय घमघमाट सुटलाय बाहेरपर्यंत. म्हणून आम्हीच आलो, काकी. आकांक्षा म्हणाली, "आईचं कायतरी चाललंय. टेस्ट करायला चला." प्रिया किणकिणली. "होऽ. बघ ना. खायचं अन् थोडी मदत पण करायची." खाणं झाल्यावर मंजिरी म्हणाली, "काकी खूप उशीर झालाय. आई वाट बघेल. जाऊ का?"

“बरं, बर. अगं, मी गेली की आकांक्षाशी भांडू नकोस हं.”

“बिनधास्त जा तुम्ही, काकी.”

ठॉऽऽक ठॉऽऽक आवाज आला. लगेच आकाश चकली हातातून नेत खात गॅलरीतून ओरडला. “आलो रे”

“अरे दूध पी.”

“हो पितो. आई चकली लय भारी झालीय. नचिकेतला नेऊ एक?”

“ने पण लगेच ये. जरा मदत कर. आजच्या दिवस राहू दे खेळायचं.” उद्या जाणार हे ह्याला नीटच सांगावं लागतं.

“बरं तसं सांगून येतो. आकाश पळाला. आता लवकर येणं शक्य नाही. शेवटी आकांक्षाला पकडलं. भरवशाची एवढीच.”

“आई खूप अभ्यासयं.”

“फक्त अर्धा तास दे. मग तुला काही सांगणार नाही प्लीज.”

“तो ठोंब्या बघ काय करतोय का? मला मात्र कंपलसरी करायला लावतेच. बारावीचं कसं व्हायचं?”

“असू दे गं लहान आहे.”

“हूं” या गोष्टी किती कळल्या तरी नाहीच बदलवता येत. नवऱ्यांना नावं ठेवली तरी मुलं आपलीच असतात. आपणच जन्म दिलेली! हवं तसं घडवू शकतो; तरी बायकी वळण लागेल याची, कुठतरी आत भीती असतेच. मुलींनी मुलांसारखं वळण असलं तर ती धाडशी, स्ट्राँग. मुलांना घरकाम करायची सवय असल्यावर मात्र बायकी वाटतं. अगदी आपल्याला सुद्धा. बायकी कामं कमी प्रतिष्ठेची का वाटतात? स्वयंपाक करणं कमीपणाचं का वाटतं?

“आई, बाबा आता एकदम खुष होतील. आता तुला हिऱ्यांच्या कुड्या नक्की घेतील.” आकांक्षा.

"तोंड बघा हिऱ्यांच्या कुड्या घेणाऱ्यांचे मी तर अपेक्षाच करायचं सोडून दिलंय."

"महाग असतात ना गं म्हणून."

"मनातच नसतं... जाऊ दे कर्णाला कशी कुंडलं होती तशी मला पण दोन हिऱ्याची कुंडलं आहेत. आकांक्षा, आकाश."

"दागिने घातले की चोरांची भीती. साड्या तरी छान छान आहेत."

"निम्म्या मामांनीच घेतल्यात."

"मी सांगू का, बाबांना."

"काही नको. त्यांना विचारच करायचा नसेल तर उगाच कशाला भिकारी व्हायचं."

"आई मला नोकरी लागली ना की पहिल्या पगारातून तुला हिऱ्याच्या कुड्याच घेईन."

"देव करो तुला एवढ्या मोठ्या पगाराची नोकरी मिळो."

मग दोघी अभ्यास, करियर यावर बोलल्या. आकांक्षा म्हणाली,

"आई. तू गेलीस की करमत नाही बघ. आकाश तर सारखा बाहेर जातो. अजिबात अभ्यास करीत नाही. रात्री झोपायला सूरज, किरण असले की दंगाच असतो. ऐकत नाही."

"असू दे गं. दोन दिवस चालवून घ्यायचे."

"बघ एक तास गेला. आता अभ्यास किती आणि कसा करू?"

"होईल तेवढा कर. सकाळी लवकर उठवते." मीना मनात म्हणाली, पोरी असंच असतं बाईचं जगणं. सतत दुसऱ्यासाठीच राबायचं काय मिळतं यातून? गृहीतच धरलं जातं. किती शिकलं, भरपूर पगार, पैसा मिळवला तरी नवरा वरचढच. मुलांना तर जन्म दिला म्हणून त्यांच्यासाठी करणं भागच असतं. पूर्वीच्या बाईला हे करताना समाधान तरी मिळायचं. आता तेही नशिबी नाही. तळ्यात ना मळ्यात. सतत द्विधा मन:स्थिती...

धाड धाड जिना वाजला की समजावं आकाश आला. दारापर्यंत जाईस्तोवर बेलवर ह्याचं बोट टेकणार. दार उघडेपर्यंत बोट काढणार नाही.

"आई मी न् नचिकेत उद्यापासून पहाटे पाच वाजता पळायला जाणारेय."

"जा पण आतातरी अभ्यासाला बस." बाथरूममध्ये जात जातच, "आई भूक लागलीय. जेवून झोपतो म्हणजे पहाटे जाग येईल..."

"गृहपाठ कधी करणार?"

"पळून आलो की करतो. मस्त मूड लागतो. नाद खुळा."

"अजिबात चालणार नाही. स्वयंपाक होईलपर्यंत होईल, तेवढं कर." हँऽ हँऽ करत पाय आपटीत गेला. "घरात काही मदत करायला नको मग अभ्यासात तरी दिवे लावा."

"तू म्हणतेस ना आरोग्य सांभाळणे फार महत्त्वाचे असते. आरोग्य चांगले असल्यावर मेंदू शांत राहातो, मग एकाग्रता होते आणि मग अभ्यास चांगला होतो." हा पोरगा कधी शब्दात पकडेल... गप्प बसलेलं बरं. ती डब्यात काजू भरू लागली तर हळूच मागून मूठ भरून काजू घेतले.

"अरे भूक जाईल. उद्या मी गेल्यावर खा ना."

"उद्या जाणारेय तू?" त्याच्या आवाजाने मीनालाच पोटात ढवळलं.

"उद्या लग्नाचा वाढदिवस आमच्या, नको जायला?"

"बाबांनाच बोलाव ना."

"सरप्राईज द्यायचंय बाबांना. फोनवर सांगू नकोस मी येणारेय ते बघू मला अचानक बघून काय वाटत्येय." खरं अशा आनंदाला काही मजा नाही...

मीनाने पहाटे उठून दोन्ही वेळेचा स्वयंपाक केला. भरपूर कणीक मळून ठेवली म्हणजे आकांक्षाला सोपं पडतं स्वयंपाकाचं. आकांक्षाची बारावी आहे तरी दोन दिवस घरादाराची जबाबदारी. शिवाय आकाशचे

नखरे. पोरीचे महत्त्वाचे वर्ष. पण ह्यांना इकडे बदली करून घेता येत नाही. अन् रजा काढून येता येत नाही. आता पुन्हा लवकर जाणारच नाही. तिचे सारखे डोळे भरत होते. तेवढ्यात तिला आठवलं आपण दीपकला सांगितले नाही पण शिरूर तालुक्यावरून पारनेरला जाण्यासाठी सारख्या गाड्या नसतात. खासगी वाहन पाठवून दीपक आणण्याची सोय करायचा पण आता तर त्याला न सांगताच निघालोय आपण मीनाला वाटलं आता काय करायचं. मग तिला अनेक पर्याय सुचले. पण नेहमी दीपकने पाठवलेल्या वाहनानेच गेल्यामुळे एसटींची माहितीच नव्हती.

बरं काय प्रॉब्लेम आला तर...? सात आठ तासांत मोबाईल चार्जही करता येत नाही. सांगावं का दीपकला? तिला सांगावंसं वाटलं. नाहीतर शिरूरवरून जायचीच पंचाईत. या ओसाड गावात बसायची अडकून. ना कोणी ओळखीचे ना पाळखीचे. काय करावं? तिला वाटलं, जाऊ दे सांगावंच. आपल्यासारख्यांच्या आयुष्यात कुठलं सरप्राइज न् काय. साधं सरळ. दगडधोंड्यासारखं आयुष्य. येईल त्याला सामोरं जायचं. उगाच करायला गेलो एक न् व्हायचं दुसरंच. सुरक्षिततेची एवढी सवय लागलीय की त्याशिवाय नाहीच जगता येत. थ्रिल म्हणून नाहीच काही... मीनाला वाटलं हे कसलं थ्रिल? साधीशी गंमत तरी तेवढंही करण्याचं धाडस नाही. काय हे अळीसारखं जगणं. मग तिनं नाहीच फोन केला. पण शिरूरवरून पारनेरला जाणं तरी महत्त्वाचं आहेच. मग तिनं स्टाफमधील गोसावीला फोन करायचं ठरवलं. त्याची बायको निता आणि दोघींची छान मैत्री झालेली. घरी जाणं येणं, जेवणं असायचं. मग तिनं गोसावीलाच फोन करायचं ठरवलं. बघू या आपल्या एवढ्याशा आयुष्यात एक थ्रिलचा बुडबुडा!

"हॅलो, मी कोल्हापूरहून बोलतेय."

"नमस्कार बाई, बोला." गोसावी.

"मी तिकडे येणारेय आज. आता निघालीय. शिरूरला यायचं जमेल ना?"

"जमेल की. शिर्डी गाडीने येणार ना?"

"हो. पण साहेबांना सांगू नका."

"साहेबांना विचारल्याशिवाय कसं येणार?"

"काहीतरी करा नितावहिनींना आजारी पाडा."

"बरं बघतो. येतो न्यायला."

चला एक काम झालं. आकाश–आकांक्षा दोघेही स्टँण्डवर सोडायला आलेले. आकाशने कंडक्टरला सांगितले 'आईकडे लक्ष ठेवा.' पुरुष ना! बाहेर पडले की अशी जबाबदारी घेतो. मीना त्यांना पुन्हा पुन्हा नीट राहा म्हणून सांगत होती.

"तूच नीट जा गेलं की फोन कर." दोघंही म्हणाले, त्यांना मीनाने जायला सांगितले ती दोघं गेल्यानंतर गाडी सुटली. चौकात कॉर्नरवर ती दोघं उभे राहिलेले. अशी आपली लेकरं उभी राहिलेली बघून मीनाला पुनर्भेटीचा आनंद आणि त्यांना सोडून निघाल्याचे दुःख दोन्हींनी डोळे, मन भरून आले. तिने हात केला. का निघालोय आपण, असं झालं तिला... पण आता काय...??? ती खिडकीतून बाहेर बघत होती. पुण्यापर्यंत हिरवाई दिसेल. पुणे सोडले की पुढे रखरखाट नुसता. नगरचा दुष्काळी भाग रखरखीत माळरान, अस्ताव्यस्त बाभळीची झाडं दृष्टीस पडतात. कुठेतरी एखाद दुसरं झाड दिसेल. रस्त्याने हॉटेल, ढाबे भरपूर. तिथेही झाडे, हिरवाई नसायची. या लोकांना झाडं लावून वाढवायची, जगवायची गरज का वाटत नसावी? याचं मीनाला आश्चर्य वाटायचं. आपोआप उगवून यायला पुरेसा पाऊस नाही. पाण्याची टंचाई. तरी पण घरात वापरलेल्या पाण्याने सुद्धा घरासमोर तीनचार झाडं येऊ शकतात. खरंतर निगुतीन पाण्याचं व्यवस्थापन केलं तर घरगुती पाण्याच्या वापराने दहावीस झाडझाडोरा सहज येऊ शकेल. पण एवढा कोण

विचार करणारेय? तरी बरं आण्णा हजारेंनी राळेगणसिद्धीचा यशस्वी प्रयोग राबवलाय. तिथे माठ ठेवलेले झाडाखाली वाटसरूंची तहानही भागवतात. झिरपणारे पाणी झाडाला मिळते. पणा आण्णांनीच सगळ्या गावांचं करावं ही तिथल्या लोकांची अपेक्षा. म्हणजे फक्त राळेगणसिद्धीकडेच आण्णांचं लक्ष. आमच्या गावाकडे कुठे बघतात? आता अशा विचारांना काय म्हणावं? मीनाचे विचार धावत होते. मुलांना विसरून ती तिथल्या रखरखीत माळरानाचा विचार करू लागली. तिथे झाडे लावली तर सुरुवातीला होईल त्रास पण नंतर जमिनीत पाणी धरून ठेवतील मुळे. पाऊसतर पडेलच वगैरे वगैरे.

दीपक सकाळी पाणी आल्यावर उठला. पाणी भरून ठेवले. पेपरवाल्याने पेपर दिला. त्याची तारखेवर नजर गेली. अन् एकदम आठवलं, आज तर लग्नाचा वाढदिवस वीस वर्ष झाली. किती धकाधकीत गेली वीस वर्ष... केवढा मोठा कालखंड... दोन तपं जवळजवळ. काय केलं आपण? नोकरी फक्त. पगार मिळत होताच. झालं. एवढंच. किती भरभर संपतेय आयुष्य. शांतपणे जगावंसं वाटतं आता. मीना नेहमीच म्हणते कुठं जाणं नको. एकत्र खूप गप्पा मारू या. तुमच्या डोक्यात कुठल्या केसचे किडे वळवळायला नकोत. फक्त आपल्या पुरतं आपण बोलायचं. पण किडे अळ्या असल्यावर ते वळवळणारच की. नोकरीच अशी. निवांतपण नाहीच मिळत. मनाच्या तळातून काहीतरी बाहेर यावं आनंददायक एवढा स्वस्थपणा असतो कुठे? कुठल्या बेटावर गेलं तरी डोकं तरी बरोबर राहाणार ना... तेच विच्चार. तोच ताण. बायकापोरांतही वरवरचं जगणं. मीनानेच मुलांना लहानाचं मोठं केलं. आपण काय केलं? सालं हे जगणंच... अधाशासारखी वरवर नुसती. खोलात जाताच येत नाही. नोकरीचं रडगाणं तर संपणारच नाही. असं वाटतं आपल्यावाचून काही काम होणार नाही. बालीश समजूत ! गाडीत बसलो तरी गाठोडं डोक्यावरनं खाली ठेवता येत नाही. या खेड्यात बदली झाली. न् सगळी ज़बाबदारी पडली. चार-पाच महिन्यांत एकदाही कोल्हापूरला

जाता आले नाही. मुलं कधी तरी येतात. नाहीतर मीनाच घालतेय फेऱ्या. मीना आली की सगळा स्टाफ खूश असतो. एकदा सलीम त्याच्या बायकोला म्हणालेला ते मीनापर्यंत पोचलं. तिनं तसं सांगितलं, 'तुम्ही फार काम करता. सगळ्यांनाच कामाला जुंपता. सगळेच म्हणतात बाई आल्यावर साहेब थोडं शांत असतात. म्हणून तर तुमच्यापेक्षा हेच लोक मला सारखं या, या म्हणतात. का एवढी दगदग करता? जगण्यासाठी नोकरी का नोकरीसाठी जगणं?' म्हटलं, "पाट्या टाकणं, जेवढ्यास तेवढं काम करणं नाही जमत." "पण ही कामं गुन्हेगारीची. ती चांगली व्हावीत म्हणून थोडी विश्रांती आवश्यक नाही का?" पण पटतच नाही. सगळ्यांना फोडून काढून लवकरात लवकर शिक्षा दिल्याशिवाय चैन पडत नाही. एक झालं की दुसरे दहा गुन्हे आहेत. संपतच नाही. मेंदूत किडे पडणार नाहीत तर काय. ते साफ करायला वेळ कसा काढणार? काढला तर निघतो वेळ... असं वाटतं, आपण अशी सुट्टी काढून मजा करू लागलो तर सगळेच तसे वागणार. आपला दबाव कसा राहील? ह्याच दडपणाखाली आपण वेळेच्या आधी कामं करण्याचा प्रयत्न करतो. दुसऱ्याला खूश करण्याच्या नादात स्वतःला ताबडत राहातो. ह्या लोकांना काय? आपली माणसं मात्र दुरावतात. कडकपणामुळं कुणी जवळ येत नाही. आपलेपणानं बोलत नाही. एक मीना सोडली तर सगळे अंतर राखूनच वागतात. मग कशासाठी वखवख, मरमर धावपळ? जावंच. इथला चार्ज घेतल्यापासून रजा घेतली नाही. आता घ्यावी. किती खुष होईल मीना, आकाश, आकांक्षा. जावंच. संध्याकाळपर्यंत पोहचू. मीनानं तर आज फोनही केला नाही. तिच्या अपेक्षांचा कधीच विचार केला नाही. जगाचा विचार करत आलो आपण. आज तरी आपण स्वतःहून फोन करावा एवढीच तर तिची अपेक्षा असेल. पण कधी कधी तेवढंही लक्षात राहात नाही. आज आलंय ना लक्षात तर जायचंच. आपणही फोन करायचा नाही. सरप्राईज.

बेल वाजली. दूधवाला असेल. त्याला सांगाव, 'उद्या परवा दूध आणू नको म्हणून. दार उघडलं तर दरवाजात हवालदार गोसावी. त्यांना दारात उभा बघून वाटलं, झालं कॅन्सल... उपटली काहीतरी नवी भानगड. हे असंच असतं...

"गोसावी सकाळीच... काय भानगड?"

"घरच्यांना दवाखान्यात न्यायचंय. उलट्या होतायेत. शिरूरला जायचंय."

"लगेच जाता?"

"हो. चार वाजेपर्यंत येतो."

"बरं, बरं जावा. लगेच न्या दवाखान्यात." दूधवाला येण्याच्या आधी गोसावी गेलेला बरा. दूधवाल्याला सांगायला तो ऐकेल न् बातमी लगेच कोल्हापूरला जाईल. तरी तो म्हणालाच, 'चहा करू का?' एकटा असल्यामुळे हे लोक आलं की विचारतात. त्याला नको म्हणून सांगितलं. चहा ठेवून बादलीत रॉड टाकला. आज लाइट आहे. अडचणी, अडथळे नाही आल्यावरच आश्चर्य वाटतं. आजचा दिवस चांगला दिसतोय. या खेड्यात तर अनेक अडचणी. पाणी सकाळीच तासभर येणार. लाइट असेल तेव्हा आपली चंगळ. खूपदा नसतेच. म्हणून मुलं नको वाटतात. बरोबर ठेवायला. माझे काय होतील तेवढे हाल पुरेसे आहेत त्यांचे नको. पण इथले लोक एवढे प्रेमळ हाल होऊच देत नाहीत. सलीम, पोटे, गोसावी घरचा डबा देतात. मीनामुळे आपल्या आवडी त्यांना माहितेयत. कपडे आपली आपणच पिळून टाकावीत. आज सोमा कपडे धुवायला उशिरा येईल. सकाळी तो देवळात ढोल वाजवायला जातो. दीपकने आंघोळ, कपडे आवरून देवाला उदबत्ती लावून नमस्कार केला. ज्ञानेश्वरीच्या दोन ओव्या वाचल्या. ही सवय मीनानेच लावली.

नोकरी निष्ठेने, प्रामाणिकपणे करणे हीच खरी पूजा हे दीपकचं मत. मीना म्हणायची, 'आपलं काम विवेकाने, आत्मविश्वासाने, मेंदू शांत ठेवून करता यावी यासाठी मन स्वच्छ, मोकळं असावं लागतं. प्रार्थना केल्यामुळे मन निर्मळ होतं. आत्मबळ मिळतं. फक्त पाच मिनिटे देवासाठी द्या.' वगैरे, वगैरे बरंच लेक्चर द्यायची. तिचं भाषण ऐकण्यापेक्षा ज्ञानेश्वरीच्या दोन ओव्या वाचलेल्या बऱ्या. आणि मग असं एकटं असल्यावर ह्या सवयीमुळे मीना त्याच्या अवतीभवती असल्यासारखी त्याला वाटे. आपल्या पाठीशी देवाचे आशीर्वाद आहेत. आपल्याकडून चांगलंच काम होईल. ही श्रद्धा बळ देते. निराशा पळवते. मीना म्हणते, ' बायका या श्रद्धेमुळे किती सोसतात. पडझडीतून उभ्या राहातात. स्वतः घडतात, कुटूंबाला घडवतात किती नैराश्य आलं तरी श्रद्धेमुळं माणूस व्यसनी होत नाही किंवा आत्महत्या करीत नाही.' असं बरंच काहीबाही सांगून तिनं सिगारेट सोडायलाच लावली पण पिणंही बंदच केलं. कधीतरी गंमत म्हणून एखादा पेग घेतो. दीपकला आठवलं सोलापूरला असताना क्लबवर सगळे जमायचे तेव्हा आपण प्यायचो नाही म्हणून चिडवायचे सगळे. गामणेसाहेब तर म्हणायचे, 'तुला प्यायची नसेल तर आमचे पेग भरून दे. तू बस शेवचिवडा खात?

दीपकने पोलीस स्टेशनला फोन केला. 'नमस्कार, पारनेर पोलीस स्टेशन. कॉ. दुसुंगे बोलतोय.' इथे आल्या आल्या पोलिसांना नीट बोलायची सवय नव्हती. तेव्हा कुणाचाही फोन असला तरी वरील वाक्य नम्रतेने बोलायचे. अशी तंबीच दीपकने दिलेली.

"दुसुंगे व्हटकर, झुंजार आलंय का कोणी?" दुसुंगेला वाटलं ह्या सायबाला काय काम नाही. नाहीत बायकापोरं. एवढ्या सकाळी ड्रायव्हर कशाला येतील? फोनवर अदबीने म्हणाला,

"नाही, सर."

"मग तुम्हीच या न्यायला. आज जरा काम आहे."

"येस सर." आता आपल्याला गाडी येत नाही चालवायला हे सायबांना कसं कळंना. चावी कुठं ठेवतो ड्रायव्हर... माझी ड्युटी येगळी, त्याची येगळी. मग त्याने झुंजारला बोलावून घेतलं. दुसुंगे म्हणजे पैलवान गडी. भरपूर मिशा पण साहेबांसमोर आला की लहान पोरासारखा वागणार. दीपक त्याला चिडवायचा, "काय दुसुंगे दुधाची कासंडी रिकामी केली का? का नुसताच मिशीवर ताव मारता?" भोळा दुसुंगे रिलॅक्स व्हायचा. चटदिशी काम करायचा. दीपक लवकर गेल्यामुळे फारसं कोणीचं नव्हतं. रायटर तर दहा वाजता येणार. मग दीपकनेच अर्ज लिहिला. म्हणाला, "झुंजार, सुखसेला बोलावून घ्या हा अर्ज टपालासोबत एस.पी. साहेबांकडे आजच पोचायला पाहिजे. मी जातोय कोल्हापूरला. सलीमला बोलवा." फायली बघेपर्यंत सुरवसे, सलीम, आले. काय भानगड झाली तर आधी स्टाफला कळते. पण आज लवकर काय झाले कुणालाच कळेना. सॅल्यूट मारून, प्रश्नांकित चेहऱ्याने ते उभे राहिले. "सुरवसे, हा रजेचा अर्ज एस.पी. साहेबांकडून मंजूर करून आणायचा लगेच नगरला निघा. सलीम गाड्यांच्या केसेसकडे नीट लक्ष ठेवा. त्या पोटेला म्हणावं दोन दिवस कमी झोप. माझ्या गैरहजेरीत कुठलंही काम रखडता कामा नये. दुसुंगे, त्या लोहेकरबाईंना म्हणावं दोन दिवस ड्युटीवर येऊनका. त्यांची ड्युटी असली की मोठ्या भानगडी उपटतात." हजर असलेल्यांना हसू आलं पण तरी सगळे सावधानमध्येच उभे. दुसुंगे "हां सर" म्हणाला.

"व्हटकर आला का नाही?"

"नाही अजून. रात्री पेट्रोलिंगला गेला होता."

"अरे मोरेची ड्युटी असेल मग. त्याला बोलवा लवकर मला शिरूरला जायचंय."

"सर, अचानक." सलीम भितभितच म्हणाला,

"अरे, माझ्या लग्नाचा वाढदिवस. वीस वर्ष झाली." दीपक खुर्चीत रेलून बसतो. सगळेच मोकळे होतात. तेवढ्यात मोरे येतो. सलीम म्हणाला, "मीही येतो शिरूरपर्यंत."

"अरे नको. मी येईपर्यंत इथेच सगळं नीट सांभाळा. कुणाची तक्रार येता कामा नये. अडचण आली तर लगेच फोन करा. मोरे झोप आलीय ना नीट."

सॅल्यूट ठोकून मोरे गाडीत बसला. "चला. लवकर म्हणजे साडेनऊची गाडी मिळेल."

"साहेब, दुसरी इंडिका वगैरे बोलावली असती की कोल्हापूरपर्यंत."

"अरे एवढं एस.टी. महामंडळ आपल्या सेवेसाठी असताना एकट्यासाठी कशाला गाडी. बरं. नीट लक्ष ठेवा." दीपक मोरेला चला म्हणाला. तोवर सलीम पळतच आला. कॅरीबॅगेत सफरचंद होते. ते दीपककडे देत म्हणाला, "पोरांना खाऊ न्या."

"अरे काय." दीपकने बॅग घेत म्हटलं. दीपकला बरं वाटलं आपण काम करून घेतो म्हणून यांचं मत फारसं चांगलं नसेल असं वाटायचं. म्हणून घरी गेलं की मित्रासारखे गप्पा मारायचे. घरात मुक्त प्रवेश. सगळ्यांना चावी माहीत. काटेची फॅमिली नसते. त्याला नुसतं म्हणायचं, "काय काटे, आज काय विशेष?" असं म्हणेपर्यंत लगेच कशी कुणास ठाऊक वेगात चक्र फिरणार गोसावी पैसे देणार. पोटे मसाला वाटून आणणार. सुरवसे मटन आणणार. सलीम भात, सॅलड करणार. झुंजारच्या घरी भाकरीची चवड तयार. दहा वाजता झणझणीत रस्सा तय़ार होणार. बायकाही खूश कुणीच दारू प्यायचे नाहीत म्हणून बायका अशी मेहनत करायला मनापासून तयार. दीपकला जेवायला घालतच सगळे जाणार. अलिकडे तर न सांगताच हा बेत तीन चार दिवसांनी होतो. साहेबांना खूश केले की थोडं शांत राहातात म्हणून धडपड. कोल्हापूर सोडताना डेपोटीसाहेब

गायकवाड म्हणाले, "नगरचा भाग दुष्काळी पण तिथल्या माणसांच्या मनातला पाऊस सतत प्रेमाने बरसत असतो. अन् आपण ओलेचिंब होतो." त्याची प्रचीती दीपकला नेहमीच येते. दीपक कोल्हापूरच्या एस.टी.त बसून निघाला.

शिरूरला तीन वाजताच गाडी पोहोचली. गोसावी नाही आला तर... मीनाची धाकधूक सुरू झाली. ती बराच वेळ थांबली. दीपकला न सांगण्यात चूक तर नाही ना केली. तिनं मोबाईल घेतला. तेवढ्यात गोसावी सहकुटुंब दिसला. हा सकाळीच विचारून आलेला. दिवसभर छानपैकी फिरणं, खरेदी झाली असणार. दीपकच्या परस्पर हे लोक ऐकतात. हे दीपकला कितपत आवडेल कुणास ठाऊक? कोण आपण एक साधी गृहिणी. एका सरकारी नोकराला राबवायचा काय अधिकार? हे असेच विचार दीपकचे. ती गोसावीला म्हणाली, "साहेबांना सांगितलं नाही ना?"

"नाही. दवाखान्यात यायचंय म्हटल्यावर लगेच जा म्हणाले. साहेबांना घरची कुठली पण अडचण सांगा लगेच जा म्हणतात. स्वतः सगळी जबाबदारी घेऊन आम्हांला सुट्टी देतात. ड्युटी असल्यावर मात्र नीटच काम करायचं. दुर्लक्ष केलं की मग काय खरं नसतं." गोसावीची मार्शल गाडी. घरी वापरता येते. नंतर खासगी प्रवासी वाहतुकीवर ठेवता येते. हप्ते द्यायची गरज नाही. गाडीत बसल्यावर साहेबांचाच विषय. गोसावी सांगू लागला, "परवाच मला गांजाची झाडं कुठूनतरी जप्त करून आणलेली मोजायला लावली. पण त्या वासानं उलटी होते म्हणून मी कानाडोळा केला. गेलो हॉलीबॉल खेळायला. साहेबांचं प्रोत्साहन असतं खेळाला, व्यायामाला. त्यामुळं दारूपासून दूर राहाता येतं. म्हणून आम्ही रोज नेमाने खेळायला जातोच तासभर. तर दुसऱ्या दिवशी दिवसभर बोललेच नाहीत. बॉल, नेट स्वतःच्या केबिनमधे ठेवली. सुखसे मागायला गेला तर म्हणाले,

जाळून टाकली. कामं सोडून खेळायला सुचतं.'' त्या दिवशी दिवसभर बोललेच नाहीत.

''तसंच पाहिजे. एक दिवस पण बॉल खेळायचा चुकवत नाही. गोसावीची बायको म्हणाली.''

''चैन नव्हती साहेब बोलेनात तर रागावले तरी चालतं पण बोलणंच बंद कायच सुचेना.'' बंगल्याजवळ मीनाला सोडलं. जाताना गोसावीची बायको म्हणाली, ''सहा वाजता जाऊ या ना फिरायला.''

''आता तुमचं चुकतं का फिरायला जाणं.'' गोसावी तिला म्हणाला.

''बाईंच्या मुळं आमालाबी सवय लागली.'' दार बंद होतं. ती गोसावीला म्हणाली, ''चावी कुठेय?''

''आसंल घरी पाठवून देतो.''

मीना तिथंच कट्ट्यावर बसली. मोगरा, जास्वंदी, शेवंती, बरीच शोची झाडे, कॅक्टस लावलेली. फोनवरून रोज आठवण करायची पाणी घालायची. चांगलीच तरारली होती. शेळ्या राहू देत नाहीत म्हणून त्यावर काट्याच्या त्यावर काट्याच्या फांद्या टाकलेल्या. गोसावीने कुलूप उघडून दिले. डबा ठेवला.

''मी आणलं होतं जेवण. कशाला आणलं?'' तिनं संकोचून म्हटलं.

''तिनं दिलंय. जेवा.''

गोसावी गेल्यावर तिनं दार लावून घेतलं. पोलीस स्टेशनला फोन लावला. ''नमस्कार पारनेर पोलीस स्टेशन कॉन्स्टेबल बनसोडे बोलतोय.'' एवढं मोठं वाक्य ऐकेपर्यंत तिला शांत बसावंच लागलं.

''साहेबांना फोन द्या.''

''आपण कोण?''

''मी त्यांच्या घरातून बोलतेय.''

''बाई व्हय? शेखभाऊ साहेबांच्या घरून फोन आलाय.''

"कुठून बोलताय." सलीम शेख.
"मी इथेच पारनेर मध्येच आलीय."
"साहेब सकाळीच कोल्हापूरला गेले. लग्नाचा वाढदिवस म्हणून."
"- - - -"

"आता काय करता मग? गाडी मागवतो. जाता का लगेच?" "आता शक्य नाही. आता आराम करते. ठेवते फोन." तीं कॉटवर डोळे मिटून पडली. फोन न करता आलो ती चूकच झाली नाही. चूक नाही. त्यामुळे तरी कळले त्यांना लग्नाची तारीख आठवते अन् त्या दिवशी रजा काढून आपल्या घरी जावंसं वाटलं हे काय कमी आहे का? ते बोले आपल्या हिऱ्यांकडे... आपण ह्या तीन हिऱ्यांची काय मजा चालली असेल हे मनाने अनुभवत स्वस्थ राहावं.' हिऱ्यांच्या कुड्या मिळाल्यावर सुद्धा समाधान मिळालं नसतं. आता मीनाला चैतन्य आलं. तिनं उठून फ्रेश होऊन जेवण केलं. ती गोसावीच्या बायकोची वाट पाहू लागली.

✦ ✦ ✦

# खुलली कळी

सूर्य माथ्यावर आलेला. सुगीचं दिवस, कामाच्या घाईचं गुरं-ढोरं घेऊन शेतकरी शेतात गेलेले. सासुरवाशिणी मागं राहिलेली कामं उरकीत होत्या. शेणानं सारवलेलं अंगण. एका बाजूला ठेंगणसं मातीत बांधलेलं तुळशीवृंदावन. तिथे अंगणाच्या कडेला भांड्याच्या गराड्यात तारा भांडी घासण्यात गर्क होती.

'पोष्टमनऽ' पोष्टमनच्या आवाजानेही ताराचा हात थांबला नाही.

"ताई, पत्र घ्याऽ" जरा जवळ जात पोष्टमन मोठ्याने म्हणाला. तेव्हा कुठे ताराने दचकून वर बघितले. राखेनं लडबडलेल्या हातानेच पत्र घेऊ लागली. "आधी हात तरी धुवा." तारानं बचदिशी पाण्याने भरलेल्या डेचकीत हात बुचकळले.

"कुणाचं हाय?"

"दुसरं कुणाचं असणार?" मिस्कीलपणे हसत पोष्टमनने तिच्या हातात पत्र दिले. पत्रावरचं अक्षर बघताच ताराचे डोळे लकाकले. तिच्या काळजात झुळझुळ झरा वाहू लागला. पत्र फोडून वाचू लागली.

ती. स्वरूप बापूंच्या सेवेशी शि. सा. दंडवत वि. वि. खरं तर हे पत्र खास आपल्यासाठीच असतं. मधल्या आत्या म्हणतातच, लग्न झाल्यापासून सुभाषचं आठवड्याला पत्र येतं. लग्नाआधी पोहचल्यावर एकदा, सुटीवर येताना, अधीमधी आलं तर आलं नाहीतर नाहीच. तेव्हा ताराला अवघडल्यासारखं व्हायचं. तरी बरं पत्रावर मायना मामांच्याच नावाचा असतो, नाहीतर आणखी काय काय ऐकावं लागलं असतं.... पत्र येतंय, खुशाली कळतेय, त्यांचं मन कळतंय ह्यातच सगळं झालं. 'पुढच्या आठवड्यात सुट्टीवर येतोय....' म्हणजे फक्त आठच दिवसांनी येणार. तारानं पत्राची घडी करून ब्लाऊजच्या आत ठेवली. पटपट भांड्याला राख लावून धुतली. भांडी आत आणून तशीच ठेवली. फळीला लावायला आता वेळ आणि धीरही नव्हता. दार बंद करून माडीवर पळाली. मातीनं सारवलेली पायरीची एक वीट निसटली. तिच्याकडं दुर्लक्ष करून ती वर गेली. माळवदाची शेणानं सारवलेली माडी उखणली होती. मातीच्या भिंतींना पण पोतेरा करायला हवा होता. खाटेवर गादी गुंडाळून ठेवली होती. फक्त सुभाष आल्यावरच गादी अंथरली जाई. तारा गादीला रेलून कलंडली. पत्र काढून वाचू लागली. त्याच्या वाक्यावर चार चार वेळा नजर किती दिवस? सात की आठ? तास किती बरं होतील? जरासं पुटपुटत हिशेब केला. १६८ की १९८, सकाळी येतील की रात्री? मी तेव्हा काय करत असेल की मध्यरात्रीच येतील. एकदा असाच सुभाष पहाटे चारलाच आला.

उन्हाळ्याचे दिवस. यात्रेला पाहुणे आलेले. सगळेच अंगणात झोपले होते. तिथेच झोपावं की, नाही. तांबडं फुटायला तासभरच तर राहिलेला पण ह्या पठ्ठ्याने माडीवरच अंथरूण टाकायला लावलं. मधली आत्या जागी झालेली. लाजून चूर झाली तारा. वर चहा करून आणते म्हटलं तरी ऐकेना. 'चहाने आणखी गरम व्हायला नको. एवढ्या लवकर उठून काय करतेस? झोप म्हणे ! तारा अवघडून गेली. उगवतीला चांगलंच फटफटलं होतं. सगळेच एकेक करून जागे होत होते. 'सुभाष आलाय का?' 'कुठंय?' 'वर झोपलाय'. बापरे वरती आलं कोण तर? जिन्यातून सरळ खोलीत. खोलीला दारच नव्हतं. ताराचं काळीज धडधडत होतं, तर सुभाषच्या डोळ्यांत आभाळाची लाली चढलेली. सुटका नव्हतीच. तेवढ्यात आत्यानेच हाक मारली, "अगं ताराऽ त्याला च्या करतेस ना? जास्ती ठेव मला मळ्यात जायचंय." आता मात्र सुभाषचा नाइलाज झाला. ती दडदड पायऱ्या उतरून आली. जणू काय सुभाष पाठी लागलाय. "अगं इट निसटंल हळू येत जा. लय धांदरट." आत्या पुटपुटल्या.

तारानं पत्रावर नजर फिरविली. न लिहिलेली अक्षरं तिला दिसत होती. 'प्रिय तारा, तुझी आठवण किती येते म्हणून सांगू. विसरतच नाहीस तू. तूच सारखी डोळ्यांसमोर असते. ड्युटीवरून आल्यावर बराकीत यावंसंच वाटत नाही. जेववत नाही. खायला तर लागतेच. कधी एकदा येतोय असं झालंय. तुला सोडून एकट्यानेच नको वाटते, एवढ्या लांब राहायला. पुढच्या वेळी क्वार्टर मिळाली की तुला घेऊनच येईन."

सुभाष असला की, सगळा दिवस गडबडीत जातो. नवनवीन पदार्थ करायचे. येणारे, जाणारे, मित्र पाहुण्यांची वर्दळ सारखी असते. तिलाच सगळं बघायला लागतं. आत्यांना रानातली कामं, गुरं, धारा काढायच्या, सगळी बाहेरची कामं. सुभाषला मग जेवायला वाढतानाही ताराच हवी.

तिचं वाढणं व्यवस्थित असतं. आत्या, मामा असल्यावर ती चुलीपुढंच बसायची. सुभाषचं आत बाहेर सुरू. 'ते बॅगेतलं सरसूचं तेल काढून आण.' ती वर गेली की मागे लगेच येणार. 'कायतरीच... किती चावटपणा तारा लाजेनं पाणी पाणी व्हायची. खाली मामांच्या समोर जायला नको वाटायचं...

चार महिने झाले जाऊन... आठवणींवर दिवस ढकलतेय. रात्रभर ओल्या उशीच्या संगतीत स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न करीत उजाडायची पाहात असते. आता फक्त एकच आठवडा. एकेक मिनिट युगायुगासारखं वाटतंय. तारा भरल्या डोळ्यांने कितीतरी वेळ पत्राकडे बघत बसलेली.

'ताराऽ एऽ तारा' या हाकेने तिची तंद्री भंगली. ताराचा भाऊ, 'किसा आप्पा' म्हणायची ती, हाक मारत होता. तारा धावतच खाली आली. पत्र तसंच हातात ठेवून तिनं दार उघडलं. "कुणाचं पत्र? दाजींचच आसलं. कवा आलं?" किसाआप्पा आत येत म्हणाला.

"धर, तूच वाच की." तिनं ते पत्र त्याच्या हातात दिलं. आंब्यांनी भरलेली पिशवी आत नेली. एक आंबा हातात घेऊन म्हणाली, "यंदा बागेतलं आंबं चांगलं आलतय."

"बागंतलं काय, मळातल्या हिरीजवळच्या आंब्याचं पण हायती."

"हिथं पण लय आंबं हायती. विकत पण न्हाईत. घरात पोर ना बाळ." तारानं पाण्याचा तांब्या देत विचारलं, "पिंट्या कसा हाय? पळत आसल ना?"

"पळतं, पडतं, लय ताप देतं." किसाप्पा

"आयचं कसं काय?" तारा

"मधी लय आजारी होती."

"खरं?"

"आता बरं हाय. पण म्हनलं तुला घेऊन जावं. आठ पंधरा दिवस. पण आता दाजी येणारेयत म्हटल्यावर कुठलं जमतंय?"

ताराचं डोळं भरलं आईला बरं नसतानाही कुणी कळवलं नाही. चुलीतली राख तिनं बाजूला सारली. चुलीत बारीक काटक्या घातल्या. कुठलातरी कागद आणून काटक्याखाली घातला. पेटती कांडी कागदाला लावली. कागदाबरोबर काटक्याही पेटल्या. चहाला आधण ठेवलं. चुलीतल्या जाळाकडं बघता बघता तिच्या डोक्यातली ट्यूब पेटली. त्या उजेडात तिचा चेहरा चमकला.

"किसा आप्पा, पुढच्या आठवड्यात ते येणारेयत तवर मी माघारी इल की."

"आत्या–मामा लावत्याल का?"

"तू म्हणालास ना आयला सलायन लावलं व्हतं."

"हो. पण आता बरं हाय की."

"मामाला तसंच सांग की, आय लय आठवण काढतिया चार दिवसांत माघारी आणून घालवतो."

"आगं पण, राहू दी की, दाजी आल्यावर या दोघं पण."

दोघं आलो तर संध्याकाळी माघारी फिरावं लागलं. दोन महिने चान्स न्हाय मग."

"बरं बघतो मामांला इचारून."

तारानं चहात साखर टाकली. कपबशा घेतल्या.

"मामा कुठशी हायीत?"

"मळ्यात दोघं बी हायती. वांगी भांगलायला बायका लावल्यात्याय."

"मी जाऊ का मळ्यात?"

"जा. चहा करून देती. जाताना घेऊनच जा."

"मळ्यात चहा घेऊन जायचं व्हय?"

"व्हय बाबा. हिथं लय येगळा कायदा हाय. पाटीलकी गेली तरी बडेजाव न्हाय जायचा. मामांला चहा लागतू मग एकव्यानं कसा प्यायचा म्हणून असत्याल तेवढ्या बायकांना पण न्यायचा."

"घरी येऊन काय व्हतय प्यायला?"

"मी घरात रिकामी असती. येता येता मग जळणाचं वझं, कालवणाचं भाजी-बिजी घेऊन यायला येतं."

"बरंय की, न्हायतर दिवसभर घरात बसून कटाळाच येत आसंल."

"तर काय आता तर दिवस मोठा सरता सरत न्हाय."

तारानं चहाची कपबशी किसाआप्पाच्या हातात दिली. एका पितळी जाड तांब्यात ४-५ कप चहा गाळला. त्यावर मोठी वाट पालथी घालून फडक्यानं घट्ट बांधलं. पिशवीत दोन कप ठेवले. किसाआप्पा मळ्यात गेला. घरापासून जवळच अर्ध्या कि.मी. वर मळा होता. पिशवी आत्याच्या हातात दिली. अन् तो वांग्यातनं फिरू लागला.

"तू कवा आलास?" मामांनी गवताची जुडी ढिगात टाकली. अन् बांधावर बसून चूळ भरली.

"मघाशीच आलूया." त्यांच्याजवळ बसत किसाआप्पा म्हणाला. "लगीच तारानं तुला काम लावलं का?"

"ह्यात कसलं आलंय काम !"

"ताराला यायला काय झाल व्हतं? वांगी नस्ती नेली?"

आत्यांनी तांब्याची गाठ सोडून कप घेतले.

"आण हिकडं. तुला न्हाय जमायचं. सगळा सांडून ठिवचील."

"घ्या. वता नरड्यात. मला कायच येत न्हाय." आत्या फणकाऱ्यानं पातीवर जाऊन बसल्या. मामांनी दोन्ही कपात चहा ओतला. एक किसाआप्पाकडे देत म्हणाले,

"हं, घे."

"मी घेतलाय आताच."

"थोडा तरी घे."

"नगं तुमी घ्या."

"ये तायंऽ ये च्या घ्यायला." मजूर बायकांना मामांनी आवाज दिला. वयस्कर बाई पदर सावरत आली. "राधा चल की." फुरंगटून बसलेल्या आत्याला ताईनी बोलावलं.

"घ्या जा तुमी. मला नगं."

"चल चल. काय त्याच्याकडं ध्यान देयाचं. चल."

"दाजींचं पत्र आलंय. पुढच्या आठवड्यात येणारेयत."

किसाआप्पानं चवदार चहाबरोबर आनंदाची बातमी दिली.

"खरं सांगतूस? राधाऽ सुभाष येतुया बघ." त्यानं असं सांगताच आत्या तरातरा आल्या.

"कोण म्हणालं?"

"पत्र आलंय."

"कुठंय? सकाळी आलं का?"

"आता हिथं कशाला आणील? तुला वाचायला येत का?"

"वाचून दाखवलं असतं की." आत्यानं कप धुऊन घेतले. राहिलेला चहा कपात ओतून दुसऱ्या बाईला दिला. एक स्वतः पिऊ लागली.

"इनिबाय काय म्हणत्यात."

"लय आजारी व्हती. सलायन लावल्यावर वाइच बरं हाय. ताराची लय आठवण काढतया. तवा मी न्यायलाच आलू होतो. पण..."

"तसलं काय जमणार न्हाय. सुभाष यायचा. घरं सारवून घेयची. फळीची भांडी घासाया नगू? त्यो आल्यावर कवा करायचं?"

"आय लय आठवण काढतिया. लगीच माघारी घालावतू की दोन दिवसांत."

"काय नगं, माझा रानातल्या या कामानं घरात कशाला हात लागना..." आत्याची टकळी सुरू झाली.

"तू तर लय शाण्या डोक्याची हाय. तिच्या आईला बरं न्हाय. गाठ घेऊन येऊ दी की. ल्योक यायचाय म्हणून लागली उड्या मारायला."

"घर नीटनेटकं नसलं की, त्याची भुणभुण असती नुसती ! अगं आल्यावर करील की, अजून आठ दिवस दम हाय. दोन दिसांत आणून घालव. किसा." चंचीतील तंबाखू काढून हातावर मळू लागले मामा.

"व्हय. लगीच घालाव तू की. न्हायतर परत दोन महिने जमायचं न्हाय."

"ने, ने." मामांनी तंबाखू दाढेला लावली. आता लय उशीर झालाय. उद्याच्याला च्या पिऊन निघा, सकाळी.

"ही वांगी घे अन् जा घरी. तिला म्हणावं आमरस चपाती कर. भात बी कर म्हणावं."

"झुंजूमुंजू झालं की तारा उठलीच. आंघोळ आवरून चहा केला. किसाआप्पाला दिला. स्वतः पिऊन आत्याला तांब्यात गाळून ठेवला. तांब्या चुलीच्या कोपऱ्यात ठेवला."

"आज कशी लवकर उठलीस गं, माह्याराला जायचं म्हणून?" मधल्या घरातून, मधल्या आत्यानं आवाज दिला.

"आत्या, या चहा प्यायला."

"आज माझ्याआधी चहा झाला. दे थोडा."

मधली आत्या आली. "लवकर ये न्हायतर त्यो हिथं वर, खाली हूडकत बसंल तुला."

“त्यांच्या आधी येते की. जाऊ का?” तारानं दोघींना नमस्कार केला.

“किसा, उद्या न्हायतर परवाच्या दिवशी घालव.”

“लय काळजी करताय. परवा दिवशीच आणतो.” किसानं वायदा केला.

ताराच्या माहेरी नदीजवळच एस. टी. स्टॅण्ड असल्यामुळं नदीवर गुरांची, बाया, बाप्यांची वर्दळ. “तारा आलीस व्हय?” बबन कोळी पाण्याची लगड खांद्यावर पेलीत म्हणाला. लगड करकर वाजवीत गेलाही.

“तारा खराब झालीस काय गं?” न्हाव्याची सरुनानी पाण्याचा हंडा सावरीत म्हणाली.

“पावणं आलं का?” गोदूमावशी.

“न्हाय. पुढच्या आठवड्यात येत्याल.” तारा त्यांच्याबरोबर चालू लागली. “पुष्पा कशी हाय?”

“चांगली हाय. पोरगा तर लय गब्दुल हाय. गोरापान कणकीचा लाटाच नुसता.” सरुनानी नातवाचं कौतुक करू लागली. “तुझं लय ध्यान करत व्हती.”

“गेली व्हय?”

“तर गं. परवादिवशीच गेली. घर खायला उठतंया नुसतं.” सरुनानीनं डोळं पुसलं.

“थोडक्यात चुकामूक झाली.”

“तुमी कवा पेढं देता?” धायगुडे वहिनी म्हणाल्या.

“एकीच तरी जिरू द्या की.” तारा झपझप पुढं निघाली.

“लय शांत पोरगी. नवरा बी चांगला मिळालाय.”

“मिलट्रीत असल्यामुळं हावस पण लय करतू.”

“पण वर्षातनं दोनदाच येतू सुटीवर. तवर एकटंच कसं करमत आसलं?” धायगुडे वहिनी बोलल्या.

डोक्यावरचा पदर सावरीत तारा वाड्यात शिरली. सगळी भाचरं गोळा झाली. “आत्या आली, आत्या आली.” ताराची आई पडवीत तांदूळ निवडीत बसलेली. तारा आईजवळ बसली. “किती गं पिवळी चुटूक पडलीस? एवढी आजारी पडलीस तरी कळवलं न्हाय.”

“म्हातारपणाला थोडंसं काय झालं तरी तरास व्हतूच. आता का नवं रगात हाय?”

“म्हणून कळवायचं न्हाय का?”

“निकमाच्या बेबीजवळ सांगावा धाडला व्हता की.”

“तिचं घर खालच्या आळीला. तिच्या घरच्यांना न्हाय पटत कुठं गेलं आलं.”

“पंदरा दिस झोपून काढलं बघ. जुलाब सारखं होत व्हतं. आता हाय बरं. किसाला म्हनलं घेऊनच ये. आंब तरी खाईल मनमुक्त.”

“कसलं खातिया आंबं, दाजी येणारेयत पुढच्या आठवड्यात. उद्याच घालवायला सांगितलंय.” किसा.

“राणीसाब, आता व कसं? राणी न्हाय म्हनल्यावर राजाच्या घशाखाली पाणी सुदीक उतरायचं न्हाय?” ताराच्या भावजयीनं पाणी देत तिला डिवचलं.

“वहिनी जाणारेय लगीच. तुमी नका भावाची काळजी करू.”

“कशाला रं आणायची. पावण्याला लय सोच्च्यता लागती. सारवान-सुरवान काढायचं.”

“गेल्यावर करती की गं दोन दिवसांत व्हतं सगळं.”

“कोंबडी कापायला पापाभाईला बोलावतू” किसा म्हणाला.

“नगं कोंबडी. आता दोन महिनं कोंबडी न् मटण खाऊन कट्टाळा इल. आमरस–चपातीच करा आपलं वैनी.”

“बरं राहू दी. काय असल्या उन्हाळ्यात कोंबडी खायाचीय.”

“राणीसाब, खराब झालाय काय तरी इशेष हाय वाटतं?” ताराची चुलत भावजय म्हणाली.

“आमचं काय इशेष असणारेय?”

“पेढं, बीडं कवा देयचं?”

“तुमच्या भावालाच इचारा की, मी एकटीच असती म्हाइत न्हाय का?”

“आता येणारेयत बघा, दोन महिन्याच्या सुट्टीवर पुढच्या वरसाला हाय राणीसाबांची तारांबळ.”

“मग इस्त्रीची साडी कुठली अन् पीन कुठली?”

“वैनी, गप बसा बरं न्हायतर जातीच मी कशी.”

“जावा, जावा की, आमी बळं म्हनलं तरी न्हाय ठिवून घेणार. आमचा भाऊ तिथं येणार, आन् तुमी हिथं? आता लगीच जावा.”

“नका काळजी करू लगीच जाणारेय.”

“गपा ग पोरगी आताच आलीय, च्या तरी पिऊ द्या. उगं भिरीभिरी करू नका तिला.” ताराची चुलती म्हणाली.

ताराचे दोन चुलते, चुलत्या, चुलतभाऊ, भावजय, भाचे यांनी वाडा भरलेला. मधल्या अंगणात गप्पागोष्टी करत बसलं तर वेळ कसा भुर्रकन जातो. उन्हाळ्यामुळे अंगणात पंगत पडते. खरकटं झाडून तिथंच अंथरूण टाकून सगळे झोपायचे. तिथंही गप्पा, थट्टामस्करी पी. जे. नी नुसता गोंधळ.

"तारा, बास झालं की आता ये आता झोपायला." ताराला आईनं दटावलं.

"हिथंच झोपती की गं आई."

"नगं बया, मोकळ्या हवंची सवं न्हाय आजारी पडली मजी पंचात व्हायची. तुझी तू सुखरूप घरी जा." तारा चडफडत आत आली. "तिथं पण झोपायला मिळत नाही. हिथं तरी काय होतंय एवढं?"

"अशी डोक्यात राख घालू नी. माझ्याजवळ झोप. किती दिसांनी आलीस." आईनं तिला जवळ घेऊन पाठीवरनं हात फिरविला. तारा मग शांत झाली.

"झोप. कट्टाळा आला असलं."

"एस.टी.त तर बसून आलीय. कट्टाळा कसा इल?"

"सासू, सासरा बरी हायती ना?"

"हाय की. त्यान्ला काय झालंय. आत्याची लय किरकिर असती. पण मामा देवमाणूस हायती म्हणून निभतंय."

"कोण तरी खवाट आसतंच. चांगल्याकडं बघून दिस काढायचं. आपला नवरा हिथं न्हाय म्हणताना सगळ्यासंग ग्वाड राहायचं."

"उगंच मिलट्रीवाला नवरा केला बघ. शेतकरीच असता तर रोज घरी आला असता."

"अगं नवं हाय तवर तसंच वाटतं. अशी हावस झाली असती का? कवातरी मागं जाशील."

"काय करायचंय असल्या हौसंला. आपलं माणूस आपल्याजवळ आसलेलं बरं."

"एकादं पोरबाळ झालं की काय न्हाय वाटायचं."

"झालं तुझं पण सुरू."

"तुझा दीर आता कुठं गं असतू."

"त्यान्ला बी मुंबईला नोकरी लागली. आता हाय की लगीन. जमलं की करायचं."

"तुला सोबत तरी होईल."

"ती कुठली गं राहतीया. तिथं खोली घेऊन नेणार आपल्या बायकूला. त्यो थोडाच मिलट्रीत हाय." मायलेकींच्या गप्पा चाललेल्या. मनात काय काय साचलेलं निचरा होत होता. हलक्याफुलक्या मनानं तारा आईच्या कुशीत झोपी गेली.

ताराची वहिनी तिच्या तोंडावरचं पांघरूण काढू लागली. तशी आई म्हणाली,

"झोपू दी. नगं उठवू."

"आमी कशाला उठवू? बाहेर बघा कोण आलंय."

"कोण आलंय?" म्हणत ताराची आई बाहेर गेली. दारात सुभाषला बघून, "आता गं बया. तुमी कसं वं आला?" तिला काय बोलावं तेच सुचंना. किसाआप्पा पण आलाच. सुभाषला बघून,

"दाजी पुढच्या आठवड्यात येणार होता ना?"

"पत्रं लिहिलं तवा पुढचाच आठवडा होता. तारीख बघितली का पत्रावरची?" खाटेवर बसत सुभाष म्हणाला.

"ते कुणाच्या ध्यानात आलंय. बरं झालं आला ते आता कोंबडी कापून आणतो."

सुभाष मनात म्हणाला, ह्यांना कोंबडीचं सुचतंय रोज कोंबडीच तर खात असतो. माझी तारा मला कधी भेटतेय असं झालंय. "जेवण बिवण नको लगेच जायचय."

"आसं कसं बरं, जेवल्याशिवाय मी कसा बरं जाऊन दिल."

"राणीसाब, उठा की."

"वहिनी, झोपू द्या की. आत्यासारखीच तुमी पण भुणभुण लावलीया."

"हळू बोला. किती वाजले बघा तरी."

"किती वाजले?"

"किती?" तोंडावर पांघरूण ओढत तारा म्हणाली.

"नऊ वाजलेत. बाहेर बघा कोण आलंय."

"बापरेऽ नऊ?" तारा ताडदिशी उठली.

"सकाळी, सकाळी कोण आलंय" पुटपुटत बाहेर निघाली. सोनाराची जानकीच आसंल. तिलाच सवय हाय असं सकाळीच यायची. जांभया देत तारा पडवीत आली. तिथं खाटेवर तर दुसरंच कोण बसलंय. निळी पॅन्ट, फिकट निळा शर्ट, विस्कटलेलं केस ते ध्यान पाहून ताराची झोप खाडकन उडाली. सुभाषला बघून तिचा आ वासलेला किती वेळ तसाच राहिला.

"राणीसाब चहा द्या." वहिनीनं तिच्या हातात कपबशी दिली. तारानं कपबशी सुभाषकडं नेली. पण तिकडं न बघताच सुभाषची सरबत्ती सुरू.

"पत्रावरची तारीख पण वाचायला येत न्हाय?"

"अं?"

"चला लगीच. लवकर आटपा. न्हायतर एकटाच जातो."

"येते की, चहा तरी घ्या."

"नको चहा." म्हणाला,

तेवढ्यात किसाआप्पा आला. "तारा, मला पण आण चहा." त्याच्याकडे चहा देऊन तारा आता पळाली. चुलीपुढं मटकन बसली. डोळ्यांतनं गंगा-जमुना वाहायला लागल्या.

''राणीसाब, उठा रडू नका. आंघोळ करून घ्या अन् निघा बरं.''

''वहिनी'' तिच्या खांद्यावर डोकं ठेवून तारा रडू लागली.

''रडताय कशाला? तिथं जीव टांगणीला लागलाय. तुमाला कळंना कसं? असं खुळ्यागत करू नाय. हसा बघू.''

''आता राग दिसतुया पण वाटंला लागल्यावर बघा. साताऱ्यात गेल्यावर हाटेलात नेत्यालं. सिनेमा बघूनच जालं की न्हाय बघा.''

''वहिनी'' तारा खुदकन हसली.

''आता कशी कळी खुलली !''

✦ ✦ ✦

# विश्ववात्सल्य

मैत्रेयी गेल्या दोन दिवसांपासून अस्वस्थ होती. तिचं कशातच लक्ष लागत नव्हतं. यांत्रिकपणानं रोजची कामं उरकत होती. आज योगाही नीट केला नाही. चहात साखर टाकण्यासाठी डबा हातात घेतला न् कट्ट्यासमोरच्या खिडकीतून दिसणाऱ्या पावसाळी आभाळात पोकळ नजर हरवून उभीच मागून विश्वामित्र आला. "चहा ऊतू चालला बघ." त्याने फुंकर मारत पक्कड घेतली. चहाचं पातेलं पकडीनं पकडून हालवलं. चहा ढवळला. "साखर टाकायचीच अजून." मैत्रेयी भानावर येत म्हणाली.

"मैत्रेयी, साखर आता कपातच घाल, म्हणजे पावडरच्या चोथ्याबरोबर वाया जात नाही. गोडसर नसल्यामुळं चिलटं, माशा यायची नाहीत. असा

बिनगोड चोथा गुलाबाच्या कुंडीत घातलास तर मुंग्या लागणार नाहीत."
विश्वामित्रने तिच्या हातातला डबा घेऊन दोन्ही कपात साखर घातली, चमचे ठेवत म्हणाला, "डायरेक्ट कपात साखर घातली की कमी लागते. चल बाहेर." स्वतःचा कप घेऊन तो बाहेर आला. एवढं लेक्चर दिलं तरी आपली बायको गप्प कशी? कोचावर बसत त्याने वर्तमानपत्र घेतले.

"काय गं, नचिकेताची आठवण येतेय? जायचं का रविवारी?"

"अं?" मैत्रेयीनं स्वतःला आवरलं. म्हणाली, "तो नको म्हणालाय. उगाच ये ये न् जा जा कशाला म्हणाला."

"अस्सं! मला तर म्हणाला केव्हा चक्कर टाकताय?" असं म्हणत विश्वामित्र पेपर वाचण्यात गुंग झाला. मैत्रेयीने आज पेपरकडे बघितलेही नाही. कप विसळून ठेवताना नचिकेताच्या आठवणीने डोळे पाणवले. 'केवढा समंजस झालाय ! पहिल्या दिवशी सोडून येताना गेट बंद होईपर्यंत सोडेचना. किती रडवेला झालेला. आठवड्याला एक चक्कर मारावी असा हट्टच क़रायचा. वर्षात एवढा बदल ! पंखात ताकद आली की आकाश कवेत घ्यायचे वेध लागतात. दमणूक होईपर्यंत जमिनीची आठवण होत नाही... येत्या रविवारी त्याच्यासाठी नाही. पण आपल्या स्वतःसाठी जायला हवं.' या विचाराने मरगळ कमी होऊन तिनं पटपट स्वयंपाक आवरून विश्वामित्रचा डबा भरून दिला.

मैत्रेयी वर्गात गेली तर फक्त दोघी हजर. ती खुर्चीत बसताच मुली सावरून बसल्या, "नंदिता, कालची कविता वाच पाहू."

"मॅम, मी लिहिलेली वाचू का?"

"कविता करतेस तू? वाच ना मग?"

"मॅम बोअर आहेत." सारिका.

"ऐकल्याशिवाय कसं कळेल? वाच."

"खरंच वाचू?"

"वाच" मैत्रेयी ऐकण्याच्या अविर्भावात बसली.

नंदिता वाचू लागली, "राधेने ध्यास धरला होता कृष्णाचा

कंसाने घेतला धसका

दोघांच्याही हृदयी शाम बसे

भक्त असो किंवा वैरी भला."

"अरे वाऽ व्वा!" मैत्रेयी उठून तिच्याजवळ आली. म्हणाली, "छान विचार सुचतात गं. हल्ली काय महाभारत वाचतेस का?"

"मॅम, टी.व्ही. वरंच पाहाते." नंदिता निरागसपणे म्हणाली.

"छान. टी.व्ही. वरचे कार्यक्रम बघून एवढ्या छान कविता सुचतात तर."

"एकदा कीर्तनकाराने असंच काहीतरी सांगितलेलं टी.व्ही. वर पाहिलं की सुचलं."

"बरं बरं एकदा महाभारत वाच मूळातून." मैत्रेयीनं जाता जाता दिलेला सल्ला नंदिताला आवडला. पण मूळ महाभारत मैत्रियीनं तरी कुठं अभ्यासलं होतं. सगळं महाभारत लोककथेच्या आधारानेच केवढं हाडीमासी खिळलेलं. आता तर टी. व्ही मुळे साक्षात साकार होतेय. मैत्रेयी लेक्चर उरकून घरी आली. सकाळी रेनकोट न्यायची विसरलेली. चांगलीच भिजली. गाडी पार्क करून वरती आली. तिनं कपडे बदलले. ब्लँकेट पांघरूण लोळू लागली. पुन्हा घरघर. थंडी कुठल्या कुठे पळून गेली. ती उठून बसली. काही सुचेनासे होऊन तिनं स्वयंपाकघर गाठले. डबे शोधले. नचिकेत नसल्यामुळे लाडू, बिस्कीटं काही नव्हतं. विश्वामित्राला एखाद्या पेगबरोबर फरसाण वगैरे लागते. ते सापडले. वाटीत घेऊन खात बसली. टी.व्ही चालू केला पण खास काहीच नव्हतं अस्वस्थपणे ती इकडे तिकडे करत होती.

तिला जोराजोरात ओरडावं वाटलं. सगळं गदागदा हालवून भूकंप घडवावा वाटत होतं. यातलं काहीच करू शकली नाही. तिनं कोचावर झोकून चेहरा झाकून घेतला. नकळत हुंकारू लागली. तिला एकदम सुचलं भ्रामरी करावी. ती मांडी घालून बसली. कान झाकून भ्रामरी करू लागली. विचारांना मागे सारत रेटून दहा वेळा भ्रामरी केल्यावर तिचा मेंदू पोखरणारा भुंगा शांत झाल्यासारखे वाटले. काहीतरी करावं म्हणजे बरं वाटेल असा विचार करत ती गोदरेजच्या कपाटाजवळ आली. आरशात बघताना काळवंडलेल्या चेहऱ्यावर नाराज होत तिनं दार उघडलं. सगळ्या साड्यांचे बोळे झालेले, बाहेर काढून एकेक साडी उलगडून, झटकून व्यवस्थित घडी घालून त्यात लवंगा, वेखंड सरकवीत कपाटात ठेवू लागली. जरीकाठाच्या रेशमी साड्यांच्या घड्याही किती महिन्यांत, वर्षांत उलगडलेल्या नाहीत. त्याही उलगडल्या. एकेका साडीबरोबर आठवणीत ती रमून गेली. क्रिम कलरची साडी हाताशी येताच तिला पुन्हा सरांची आठवण झाली. डोकं भणभणलं. छान चाललं होतं आयुष्य परीटघडीचं नचिकेतला नाशिकला भोसला मिलट्री स्कूलमध्ये घातलं.

त्याला मिलट्रीत जायचंय. युरोप अमेरिकेत जाण्यापेक्षा हे बरं. एकेक आठवत गेलं. कॉलेजात लेक्चर कुणाला द्यावं ते कळत नाही. खूपदा विद्यार्थी हजर नसतात; असले तर काहीना काही उद्योग चालू असतात. पाट्या टाकून उबग आलाय. मैत्रेयी वाचनालयात बसलेली तेव्हा दुर्गा आली.

"काय? कशावर करतेयस पी.एच.डी.?"

"करावी असा विचार चाललाय पण कुणावर ते नक्की होईना निर्णय."

"तुला कवितांची आवड आहे तर कर ना एखाद्या कवीवरच."

"होऽ माझ्या कवितांचंही परीक्षण होईल."

“एकमार्गी सराव अभ्यास होईल. बुद्धीला धार येईल. मला तर बघ भरल्या गोकुळातून बाहेर पडणं कठीण होतंय न् नवरा म्हणतोय कर पी.एच.डी. कसं करू?”

“अगं पण मार्गदर्शक कोण आहेत चांगले.”

“खोदा म्हणजे मिळेल, शोध म्हणजे सापडेल.”

“खोदल्यावर काय मिळेल?”

“पाण्याचे झरे, इतिहासातले पुरावे, आणखी...”

“पुरे, पुरे मला इतिहास संशोधन नाही करायचंय.”

“हो गं जे मनापासून करावंस वाटत असेल तेच करावं. मी निघते. सासूबाईंना बेलफुलाची पुडी न्यायचीय. मामंजींना हे पुस्तक” दुर्गा गेली. दुर्गासारखं आपल्यामागं आता काही नाही. विश्वा तर सारखं म्हणतो भरपूर वाच. कविता कर. कथा लिही. आता निवांत वेळ मिळतोय...

विभागीय साहित्य संमेलनात मैत्रेयी काव्यवाचनासाठी आलेली. प्रमुख पाहुणे एक थोर कवी, कथाकार होते. ललित साहित्य वगैरे बरंच लेखन केलेलं. त्यांचं भाषण झाल्यावर काव्यवाचन सुरू झालं. मैत्रेयीचे कविता ऐकण्यात लक्ष नव्हतंच. कवीचं भाषण कानांत निनादत होते; ‘साहित्यात विश्ववात्सल्य यायला हवं. जसं जी.एं.च्या कथांमध्ये आहे. सर्व सृष्टीवर, वनस्पती, पशूपक्षी, मानवजात सर्वांवर प्रेम करणं जमेल तुम्हांला, तेव्हा तुमचं साहित्य दर्जेदार होईल. आकाशाएवढं तुमचं मन होईल तेंव्हा तुमच्या साहित्यात वात्सल्य, करुणा पाझरेल. सगळं विश्व कलेत घेण्याची आस हवी. ज्ञानेश्वर, तुकारामांनी काय वाचलं होतं? पण त्यांचं प्रेम, या इथल्या प्राणीमात्रांवरचं वात्सल्य; त्यामुळेच ते असं अमर काव्य लिहू शकले. शेकडो वर्षांनीही आपल्याला ते वाचावसं वाटतंय.’ मैत्रेयी भारावून गेली या विचारांनी.

काही वेळ बसून ते उठून निघाल्यावर मैत्रेयीही उठून त्यांच्या मागे गेली. ते घरीच निघाले होते. तिनं 'सर, सर' असं म्हणताच थांबले. "घरी निघालात का?"

"अगं, मला स्पाँडीलायसीसचा त्रास आहे. जास्त वेळ बसू शकत नाही." सरांचं बोलणं केवढं लाघवी, मायाळू वाटत होतं.

"सर, तुमचं भाषण छान झालं."

"हूं." सर सावकाश पावले टाकीत कॉरीडॉरमधून निघालेले.

"सर, माझ्या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहाल." तिनं धाडसाने विचारलं.

"लिहीन असं म्हणणार नाही. माझ्या अभिरुचीला धक्का लागणार नाही, अशा असतील तर लिहिन. कारण प्रस्तावनेत फारशी टीका करू नये." सर गाडीपाशी गेले. त्यांनी खिशातले कार्ड दिले. तिला न्याहळून बघता बघता म्हणाले, "मला नाही वाटत तू येशील."

"येईन सर."

"विसरशील गं." असं म्हणत त्यांनी गाडीचा दरवाजा बंद केला.

मैत्रेयीनं उत्साहाने विश्वामित्राला सगळं सांगितलं. त्याच्या डोक्यात कितपत शिरलं काय माहीत. त्याचे उद्योग-धंदा करायला जसा तो पूर्णपणे स्वातंत्र्य घेणारा तसेच त्याने मैत्रेयीला मोकळीक दिलेली. तिनं निश्चय केला. जायचंच भेटायला! साडींच्या घडीबरोबर तिची एकेक आठवण उलगडत होती. पण आता मन बरंचसं जागेवर आल्यामुळे घडी पोटात वेखंड, लवंग घालण्याचंही विसरत नव्हती. सरांकडे जाताना साडी की ड्रेस असा विचार करता करता साडीच बरी. क्रिम कलरची साडी एकदाची निवडली. पुष्कराज रत्नाचा रंग गुरूचा खडा. विद्यार्थिनी म्हणूनच जायचं तर...! ती पहिली भेट आठवली. सरांनी त्यांच्या अभ्यासिकेत बसवलं.

छोटीशी खोली. चारीबाजूंनी पुस्तकांची कपाटे, उंच, उंच पुस्तके पाहूनच मैत्रेयी दिडमूड झाली. सरांचं मांजर त्याच्यासाठीच ठेवलेल्या छोट्या खुर्चीत झोपलेलं. बोलण्याच्या आवाजाने ते उठून इकडेतिकडे लुडबुडू लागते. मध्ये लिहिण्याचं टेबल अन् दोन खुर्च्या. ती एका खुर्चीत बसली. सरांना वही काढून दिली. "बघ ना, तोपर्यंत एखादं पुस्तक." सरांच्या आवाजातल्या मार्दवाने मैत्रेयी विरघळून गेली. पुस्तक घेऊन बसली पण सगळं लक्ष सरांकडे. सर मधूनच सूचना द्यायचे. 'लय पाहिजे विचार मांडण्यात, रचनेतील व्यामिश्रता, व्यूह नाही.' एखाद्या ओळीबद्दल विचारायचे तेव्हा खासगीपणावर प्रहार केल्यासारखं व्हायचं. पण आलोच आहोत डॉक्टरकडे जिव्हारीचं दुखणं घेऊन तर लाजून कसं चालेल! ती धिटाईनं बोलू लागली. सरांनी वही मिटवून तिच्याकडे दिली. त्याचा लक्ष्यार्थ तिला उमगला होता. सरांनी उठून तिला काही पुस्तके दिली. त्या वेळी इकडे तिकडे करताना होणारा स्पर्श तोही नेमका पाठीवरच्या उघड्या बाजूवर... साडीची उघडी परंपरा, तरी सोज्वळ मानायची ! अस्वस्थ वाटत होतं; जाणवत होतं.

पण दुसरं मन बंड करत होतं, हे संस्कारच आडवे येतात. झाला जरा स्पर्श तर लगेच नाना कुशंका...? स्वतःला समजावत, दूषणं देत तिचं पुस्तकांबद्दल बोलणं चाललं होतं.

"तुम्ही एक एक कवी घेऊन पूर्णपणे अभ्यासा. तुम्हांलाच कळेल तुमच्या कविता कशा आहेत."

"सर, प्रस्तावना..."

"तुमच्या कविता जुन्या वळणाच्या आहेत. आपल्याला काही घाई नाही. विचार चांगले आहेत. वृत्ती कवीची आहे. होईल सुधारणा !"

"या कवितांत बदल करता येईल का?"

''नाही. याच्यात नको बदल. हे सोडून द्या.'' सरांचा हावभाव असा की, कचरा टाकून द्या. सर बोलता बोलता त्या छोट्याशा खोलीत फिरत होते, पुस्तके काढीत होते. नकळत (?) स्पर्श करीत होते. पण मैत्रेयीची पुरती सखाराम गटणे झालेली. 'आपल्या पित्याप्रमाणे, आपण त्यांना गुरू मानतो.' असा विचार मनात घोळवत ती बसलेली. तिचं ते बावळटासारखं बसणं बघून सर म्हणाले, ''तुम्हांला कोणता कवी आवडत असेल त्यांचे संग्रह घेऊन जा. या चिठ्ठीवर पुस्तकांची नावं, तुमचे नाव, फोननंबर तारीख लिहून ठेवा. या आता.'' मैत्रेयीला ते स्पर्श लख्ख आठवत होते; घरी आल्यावर. जाणवत होतं, वळवळणारी ती बोटे 'पुरुषी' होती. तिला किळस वाटली. पुन्हा जायचे नाही असं ठरवलं. आपल्या बुरसटलेल्या संस्कारांचा रागही आला.

आता जाणवतंय; ते स्पर्श खूप दिवसांचे भुकेले असावेत. किती मुक्त मोकळे व्हायचे म्हटले तरी या गोष्टींचा सामना नेमका कसा करावा तेच तिला कळत नव्हते. कवितासंग्रह वाचता वाचता तिच्या मनातून ते स्पर्श, नदीच्या खळाळत्या धारेतून पाचोळा वाहून जावा तसे वाहून गेले. विरून गेले. राहिले ते फक्त कवितेबद्दलचे वजनदार शब्द. तिने झपाटल्यासारखे कवितासंग्रह वाचून टिपणं काढली. कविताही केल्या नव्या. तिनं ती पुस्तके, टिपणं, नव्या कविता सरांकडे देऊन आली. दुसरी घेऊन आली. तर लगेच दुसऱ्याच दिवशी सरांचा फोन. ''अरे बेटा, तुझ्यात बरीच सुधारणा झालीय. छान उतरल्यात कविता. तू ये आपण सविस्तर बोलू.''

मैत्रेयीचा उत्साह वाढला. भेटी वाढत गेल्या. पण सावधपणे. पी.एच्.डी. चा विषय निघाला तेव्हा सर म्हणाले, रेग्यांच्यावर कर. मी करतो मार्गदर्शन. माझ्या विद्यापीठात तुला पी.एच.डी मिळेलच. माझे

पन्नासेक विद्यार्थी आहेत; पी.एच.डीचे कवितांवरून सर तिला विचारायचे, 'तुझ्या कवितांत एवढे दुःख, उदासी का? नवऱ्याशी चांगले संबंध आहेत ना?

"होऽऽ."

तिला कळेना सर कविता कशा आहेत ते न सांगता असं खासगी आयुष्याबद्दल का बोलताहेत? संसार, नवराबायको म्हटल्यावर मतभेद, विसंवादी सूर तर राहणारच ना? दुसऱ्यांचे दुःख समभावाने भोगणे ही तर कवी वृत्ती आहे ना? भारतीय स्त्रियांचे भोग तर काय सारखेच. नाविन्य तरी काय असणार? शब्द मांडण्याचं कौशल्य तेवढं निराळं प्रत्येकाचं. पूर्वी काय किंवा आता काय जखम झाल्यावर. तांबडेच रक्त येणार ना? काळ बदलला म्हणून रक्ताचा रंग तर तोच असणारेय ना? त्यात नवीन काय म्हणून दुर्लक्ष करायचं? कुचेष्टेने बघायचं? उपचारच करायचे नाहीत? आम्ही लिहितो तेव्हा म्हणायचं तुझा नवरा कसा आहे न् तुझा काय प्रॉब्लेम आहे?

"सर, सुखाच्या कविता कशा लिहावयाच्या? त्या वाचायला ऐकायलाही नाहीत चांगल्या वाटत एवढ्या. सुख आपण भोगतो दुःख मात्र सलत राहातं. त्या वेदनांची गाणी होतात."

"तुझं बरोबर आहे. प्रत्येकाला शृंगारिक किंवा प्रेमकाव्य कसं जमेल?" म्हणजे अशा कविता असाव्यात असं वाटतं की काय सरांना! स्त्रियांची होणारी गळचेपी, पिळवणूक विसरणं शक्य आहे का? पावलापावलांवर परंपरा, संस्कार, जात, कुळ, मूळ या नावाखाली बाईचं आयुष्य भरडलं जातंय. शहरात काय किंवा खेड्यात काय. ती अन्यायी वागणूक विसरून पुरुषांच्या बद्दल वाटणारे आकर्षण, प्रेम वगैरे कवितात व्यक्त कसं होईल? यांत तरी नवीन काय आहे? पण स्त्रियांनी मुक्तपणे

जगायचे ठरवलं. काही कर्तृत्व करताना, दाखवताना जरा मोकळेपणा दाखवला की सरळ दुखऱ्या नसांवरच फटके मारायचे? असं वाटतं कविता वगैरे लिहिणंच नको. पण, लिहिणं ही तर निकड आहे. त्याशिवाय निचरा होत नाही. मग...? मग काय दाखवायच्या नाहीत. कचरा कधी कोणी दाखवतं का कुणाला?

रेग्यांच्या कविता, टिपणं, चर्चा. पण सर हल्ली स्वतःच्या आयुष्याबद्दल जास्त बोलू लागलेत. मुलगा, सून, बायको वगैरे. मैत्रेयीनं एकदा साबुदाणा वडे डब्यातून नेले होते. वडे खाताना सर म्हणाले, "वडे छानच झालेत. आमची मनकर्णिकासुद्धा छानच करते वडे. तू हे नेहमी काही ना काही घेऊन येतेस. तुला एवढं वाटतं माझ्याबद्दल?"

"घरात केले होते म्हटलं आणावेत. आवडतं मला असं खाऊ-पिऊ घालणं. मला आनंद मिळतो."

"आपलं काही नातं असावं, गेल्या जन्मीचे ऋणानुबंध."

परवा ते पत्रकार आलेले ते सुद्धा म्हणाले, "तुमची फार जुनी ओळख असल्यासारखं वाटतं. तुझं वागणं लाघवी आहे.'

"तुझ्या कवितांवरून तुझं आयुष्य फार सुखी आहे असं वाटत नाही. पण इथे माझ्या सहवासात तू आनंदी दिसतेस."

"एकटीच असते घरात. साहित्यिक विचार शेअर करता येत नाहीत. नवरा-मुलगा त्यांच्या विश्वात. बौद्धिक भूक भागत नाही."

"होत असं, तू नियमित येत जा. तुझं पी.एच.डी.चं काम होऊन जाईल. मी तरुण, उत्साही आहे. एकदम निरोगी. मनकर्णिका मात्र डायबेटीसमुळे मलूल झालीय. आधीच नाजूक. कुठलं काम जोखमीनं करणं तिच्याच्याने झालंच नाही. तिला कुठली महत्त्वकांक्षाही नाही. आता तर तिच्या सगळ्या वृत्तीच क्षीण झाल्या आहेत. रात्र रात्र तळमळतो मी.

ती शेजारी गाढ झोपलेली असते.'' डोळे ढहुळले होते. स्वर कापरा झालेला. मैत्रेयी एकदम शॉक्ड्. तिला मागचे सगळे संदर्भ आठवतात. मुद्दाम मनामागे टाकलेले; पण अंतर्मनाने जाणलेले पाऊस नुकताच सुरू झालेला. सर म्हणाले, 'सावकाश जा गं बाई, घसरशील.' मैत्रेयी यावर म्हणाली, ''सर, मी घसरत नाही कधी, माझ्या पायात मेंदू आहे.'' भेटायला आलेल्या एका कवीला सर म्हणाले, ''सावकाश जा. घसरायला होतं. तिच्याकडे तिरपा कटाक्ष टाकत म्हणाले, ''काही लोकांना नाही घसरायला होत, पायात मेंदू असल्यामुळे.''

''खरंच, सर. मी योगा करते. खुपदा अनुभव आलाय, घसरता घसरता प्रतिक्षिप्त क्रियेप्रमाणे उभीच.''

''मला वाटलं वेगळ्या अर्थाने म्हणतेस.''

''हो, तसा तर दुसरा अर्थही लागू पडतोच की, संस्कारच इतके दृढ आहेत की दुसऱ्या अर्थानेही नाहीच पाय घसरणार.'' मैत्रेयी जाणीवपूर्वक आत्मविश्वासाने म्हणाली. मोकळेपणा असावा. सर वयाने दुप्पट असले तरी कलावंत आहेत. अभ्यासू साहित्यिक म्हटल्यावर शब्दांच कीस काढत मोकळेपणाने बोलत असत. शब्दांचाच खेळ. हा खेळ रोजच्या जगण्यात मिसळल्यावर कठीणच की. किरकोळ म्हणून दुर्लक्ष करून आपण अभ्यासाकडे लक्ष द्याव, झालं.

सरांचा फोन आला, ''अरे बेटा, जरा लवकर येशील काय? बँकेत जायचं होतं. गणू आला नाही दोन दिवस झाले. चेक भरायचेत.''

''हो सर.''

बेटा, बाळे म्हणतात पण नजर वेगळंच बोलत असते. जाऊ दे. ती वैतागली. नुकतीच कॉलेजातून आलेली. सरांचे हे फारच वाढलंय. हल्ली मार्गदर्शनापेक्षा कामच जास्त करून घेतात. गुरूगृही राबावे म्हणून तीही

आनंदाने येणाऱ्या पाहुण्यांना पाणी दे, चहा झाल्यावर कपबशा विसळून ठेव. पुस्तकांची धूळ झटकून, बांधून ठेव. गेल्या महिन्याभरात तर पंधरा दिवसांची लेखमाला वर्तमानपत्रात लिहावयाची होती. म्हणून रोज लेख लिहावयाचे. ते झेरॉक्स करून आणायचे. कुरियर करायचे. लेखनिकच झालेले. त्याचंही काही नाही. पण ह्या कामासाठी गणू होता. मैत्रेयी गेली की गणूला जेवायला घरी पाठवायचे. ही कामे मैत्रेयी करायची. अर्जंट असायचं म्हणून. येणारे फोन रोज दोनतीन. अर्धा–पाऊण तास बोलणारे. पाहुणे तेवढेच. तेवढ्यातून वेळ मिळाला, मूड आला तर कधी मार्क्सवादावर, कधी भटांच्या गझला, कधी रणांगण यावरच बोलायचे. बोलताना अश्लील संबंधावर भर असायचा. त्यातली कलात्मकता आपल्यालाच कळत नाही. आपल्याच संस्कारांच्या भिंती अशा बुलंद आहेत; की मोकळेपणाने ऐकणंही जमत नाही आपल्याला. ती स्वतःला, स्वतःच्या संस्कारांना दुषणं द्यायची. नोकर असल्यासारखं सर सांगतात न् आपण ऐकतो. तिनं रेनकोट घातला. निघाली. सरांचे घर जवळ असल्यामुळे ती चालत जायची. पण आज बँकेत जायचं तर गाडी घ्यावी म्हणून तिनं पर्समधली फक्त चावी काढून पर्स टेबलवर ठेवली. पर्स नेली की पैसे खर्च होतात.

सरांनी दार उघडलं. हॉलमध्येच हातात प्लेट घेऊन जेवत होते सर. 'ये बस,' असं म्हणून पुन्हा जेवू लागले. तिला आठवलं, 'अरे, आपण जेवलोच नाही. सरांनी बोलावले न् धावत आलो. प्रोफेसर ना आपण कॉलेजात; मग असं कावरं बावरं व्हायचं कमी कधी होणार? कधी येईल मॅच्युरिटी? आधी हे मुरायला पाहिजे अंगात, विचारांत. 'स्व' जागृत झाला की अशी धावाधाव नाही होणार मग. हे सगळं कळण्यासाठी, असं शिकण्यासाठी असे प्रसंग यावे लागतात. यालाच तर घडणे, वाढणे म्हणतात. घडणं चालूच राहातं, त्यातून वाढणं किती आहे कुणास ठाऊक...?

''सर, चेक द्या पटकन, भरून येते.''

''थांब गंऽ जेवू दे कसली गडबड आहे.'' मैत्रेयी चौकटीला टेकून उभी राहिली, ''मॅडम दिसत नाहीत.'' नेहमीच टी.व्ही समोरच्या सोफ्यात बसलेल्या किंवा झोपलेल्या असत. हाताला ॲलर्जी म्हणून सगळ्या कामाला बाई.

''ती गेलीय नातीला भेटायला.'' सरांनी जेवण आटोपून प्लेट धुऊन ठेवली. चेकबुक तिच्याकडे दिले. मैत्रेयी बँकेतून आली. घरात कोणी नाही. अवघे वय पाऊणशे म्हणणारे तरुण सर घरात. तिला हे खटकत होते. नुसते चेक तर जमा करायचेत तरी आपण धावतपळत उगाच आलो. चुकलं, तरी आलो. आता तर वेळ निभवायलाच हवी. तिनं रेनकोट काढून गाडीच्या हँडलला अडकवला. सरांना चेकबुक देत म्हणाली, ''निघू का सर?''

''बस. का घाई आहे का?'' मैत्रेयीनं हाताकडे बघितले तर घड्याळ. पण विसरलेले. ''घड्याळ विसरलं वाटतं. चल मी देतो.'' असं म्हणत सर आत गेले. मैत्रेयी अभ्यासिकेत पुस्तक चाळत बसली. खाली बघत डावा हात चेहऱ्याजवळ, उभा. सरांनी पटकन हात हातात घेऊन घड्याळ घातले सुद्धा. मैत्रेयीच्या काही लक्षातं येण्याआधीच, ''सर नको मला. तुमचं एवढं मोठं घड्याळ कसं बसेल? माझा हात केवढा...''

''तुझा हात केवढा आहे हे हातात घेतल्याशिवाय कसं कळेल...''

''ती घड्याळ इकडे तिकडे फिरवून बघत होती.''

''मोठ्ठंच होणार. बारीक करून घे.'' तिनं मग काढलंच नाही. ''भटांचं गझल बघ निवडक गझलांचं पुस्तक घे.'' तिनं काढलं त्यावर भटांबद्दल खूप बोलू लागले. त्यांची मधुरा भक्ती. राधेनं कृष्णासाठी लिहिलेली अशा अर्थाची गझल. ते किती वाचायचे, किती खायचे

याबद्दल भरभरून बोलू लागले. बोलताना पायाला पाय लागला. मांजर असेल म्हणून मैत्रेयीनं पाय झटकल्यासारखं केलं. सावरून बसली. राधेची कृष्णभक्ती वगैरे बद्दल सर बोलताना पुन्हा पाय लागला. तिनं वाकून बघितलं तर सर चक्क पावलावर पाऊल घासत होते. तरी मैत्रेयी तशीच काहीच न झाल्यासारखे दाखवून बसून राहिली. थोडंसं मागे सरली. आता निघावं तिला वाटत होतं. तिनं कुठंतरी ऐकलेलं बाईनं बोट दिलं तर पुरुष हात हाती घेतो. आपण तर बोट दाखवलंही नाही. तरी सरांनी हातात हात घेऊन घड्याळ घातले आणि आता पाय. सर काय बोलत होते ते तिला ऐकायला येतच नव्हते. हा भास आहे का सत्य कळत नव्हते. तेवढ्यात फोन वाजला. 'सर जाते' म्हणत ती उठली. भ्रमिष्टासारखी. घरी आल्यावर एक एक क्षण तिनं उलगडून बघितला. तिला किळस वाटली सरांची. विश्ववात्सल्याच्या गप्पा मारणारे सर असं करू शकतात? छे. तिचं डोकं तेव्हापासून भणभणायला लागलेलं. कशात लक्ष नाही. नचिकेतचाही विसर पडला तिला. यांत्रिकपणाने उरकत होती रोजची कामं. भ्रामरी केल्यापासून डोक्यातली घरघर कमी होऊन ती अलिप्तपणाने घडल्या गोष्टींकडे पाहू लागली. विचार करू लागली. तिनं सगळ्या साड्या नीट घड्या घालून ठेवल्या. बरंच शांत झालंय डोकं. पी.एच.डी. हवीय, कवयित्री म्हणून नाव कमवायचंच? या जगात काहीतरी दिल्याशिवाय फुकट काहीच मिळत नाही का? नाव कमविण्यासाठी एवढी तडजोड करायचीच का? का करायची?

नाव मिळवलं तर ते किती वर्षं राहणारेय? पन्नास वर्षं, पाचशे वर्षं... पुढे? सर एकदा सांगत होते एक लेखिका जगभर फिरते, भरपूर लिहिते, कुणाजवळही झोपते, हवं तसं पुस्तक छापते वगैरे, वगैरे. असं वागण्यात तिला आनंद मिळत असेल. तो तिचा स्वधर्म! चूक काय किंवा बरोबर

काय, ज्याचा त्याचा प्रश्न. ज्याची जशी निकड तसा तो वागेल. दुसऱ्यांना त्रास न देता स्वानंद मिळविण्यात काहीच हरकत नाही. आपल्याला नचिकेतला सामोरं जाताना आई म्हणूनच सामोरं जायला जास्त आवडेल. काही तडजोडी मनाविरूद्ध करून नाव कमावलेली बाई म्हणून नाही जायचं.' मी तरी स्वतःला प्रतिभावंत का समजतेय ! आपली आई किंवा तत्सम बायकांत प्रतिभाबुद्धी नाहीय का? किती गुण एकेकीचे. इतरांना देत देतच त्यांनी आनंद मिळवला. 'स्व'ला तेजस्वी ठेवतचं पिढ्या घडवल्या. विश्ववात्सल्य म्हणजे आणखी वेगळं काय असतं? त्यांनी कधी काही विकून नाव पैसा कमवायची भाषा नाही केली. एका पाश्चिमात्य देशातील केंटुकी चिकनवाल्याच्या बायकोला चिकन सुंदर बनवता येतं. त्यानं त्याची विक्री करायला सुरुवात केली न् केंटुकी चिकन जगभर प्रसिद्ध झालं. कलावंत कलेची निर्मिती करतो त्याचे व्यापारीकरण दुसरेच करतात. तीही कलाच आहे.

आधी तनमनात वात्सल्य, करुणा मुरायला हवी. मग ती झिरपेल बाहेर माठातल्या पाण्यासारखी, पानांच्या हिरव्या रंगासारखी.

वादळ शांत झालेलं. कोवळं ऊबदार ऊन सुरुवात होतं, मनाला दिलासा देत होतं. मैत्रेयीचं पिसासारखं मऊ, मायाळू झालेलं मन सर्व मागे सोडून आकाशात झेप घेऊ पाहात होतं. ती सरांकडे गेली. सर अगत्याने म्हणाले, "किती दिवसांनी आलीस. बरं नव्हतं का? तुझा फोनही लागत नव्हता."

"नचिकेतकडे जाऊन आले. त्याचा पाय मुरगळलेला. पोट बिघडलं माझं प्रवासानं. त्यामुळं अशक्तपणा आलेला." ती उदासपणे शून्यात नजर लावून बोलत होती. सरांचं मांजर म्यॉव, म्यॉव करीत इकडे तिकडे उड्या मारीत होतं. ती नेहमी मांजराला बिस्किंट वगैरे न्यायची. आज काहीच नेलं

नाही. मांजराला भूक लागली होती. सरांचे लक्षच नव्हतं. मांजराने सरांच्या हातावर उडी मारली. हाताला ओरबाडले. रक्त आले. सरांनी तिला फटका मारला. ती कोपऱ्यात जाऊन आर्तपणे म्यॉवऽ म्यॉव करत राहिली.

"सर, तिला भूक लागलीय. दूध-पोळी देऊ का?" मैत्रेयी म्हणाली.

"दे बेटा, आज तिला काय झालंय, असं करत नाही कधी." सर ड्रॉवरमधले बँडेजकीट काढून कापसावर डेटॉल घेऊन रक्त पुसू लागले. मैत्रेयीने मांजराला दूधपोळी कुस्करून दिली. सरांना म्हणाली, "बापरे बरंच रक्त आलंय. बघू मी लावते मलम." तिनं मलम लावताना म्हटलं, "सर मांजराच्या जीभेत पण म्हणे रेबीजचे जंतू असतात. पण हे नख लागलंय. होईल बरं. आमच्या नचिकेतला तीन वेळा रेबीजची इंजक्शेन्स दिलीत. गावाकडे गेला की बसायचा गावठी कुत्र्यांच्या खोड्या करत." मैत्रयीनं हाताला बँडेज बांधले. हळूवारपणे हात हातात घेऊन आपला हात त्यावरून फिरवला. मनात म्हणाली, 'सर, माझ्या स्पर्शातले वात्सल्य तुमच्या रक्ताच्या कणाकणाला कळू दे. जाणवू दे. भूक लागल्यावर ओरबाडणं, रक्त काढणं मांजराचं चालतं, त्या आदिम प्राण्याला शोभतं; याचा झटितीप्रत्यय आला का?'

✦ ✦ ✦

# ढळता सूर्य

मस्टरवर सही करताना मन कातर झालंच. शेवटची सही. उद्यापासून या रजिस्टरची अन् आपली गाठभेट बंदच. अशा कितीतरी गोष्टी आहेत... फक्त आठ तासांचा ऋणानुबंध उरला.

"सरऽ अहो, चव्हाण सरऽ" शिपाई घाईगडबडीत ओरडूनच हाक मारत होता.

"काय रेऽ ओरडायला काय झालं?"

"सही करा याच्यावर, तुमीच ऱ्हायला आन् वर्गणी पण..."

"अहो झगडे, त्यांच्याकडून नका घेऊ वर्गणी." नलावडे सर वर्गावर जाण्यासाठी उठता उठता म्हणाले. झगडेने प्रश्नार्थक चेहरा त्यांच्याकडे वळवला.

“कमाल आहे. अहो झगडे त्यांचाच निरोपसमारंभ आणि त्यांनाच वर्गणी मागता?” स्टाफरूममध्ये खसखस पिकली. “तरिही असू दे. झगडे हे घ्या पैसे. माझ्यासाठी सगळे जण एवढे करता तर माझा सहभाग असू दे.” झगडे गेल्यावर पोवळेबाई म्हणाल्या, “सर, तुम्ही पण नाऽ बरं नाही हं वाटत असं.”

“बरं वाटण्या न वाटण्याचा आता काय संबंध उरणारेय ! आतापर्यंत नियमाला धरून चाललो. तत्त्वं सांभाळली, शिस्त पाळली. शेवटच्या दिवशी ती कशाला मोडायची. शेवटी वागलेलं तेवढं लक्षात राहतं.” आपल्याबद्दल लोकांचं मत चांगलं होवो हीच तर आस असते. त्यासाठीच तर धडपड. मग अशीच सवय होते, अंगवळणी पडते. प्रतिक्षिप्त क्रियेप्रमाणे सगळं सहज होतं. वर्षानुवर्षं हाच प्रोग्रॅम मेंदूत फीड केल्यावर शरीरातल्या पेशी न् पेशी तशाच वागतात. मी अशाच विचारात माझ्या वर्गावर गेलो. ‘माझा वर्ग.’ फक्त आजचा दिवस. दिवस तरी कुठला, काही तासच. हे माझेपण उद्याच दुसऱ्या कुणाचंतरी होईल. इतके दिवस दुसऱ्यांचे मरण बघत आलो...

मानसिक तयारी झालेली. तरी आत तुटतेच की. वरवर फारसं काही न भासवता चाललंय, तरी आतून कणाकणांत ढासळणं कळत-नकळत चालूच आहे. आता हे असंच होणार... आठवीच्या वर्गावर गेलो. शिकविण्याचा मूड नव्हताच. वाटलं मुलांशी मित्रत्वाच्या नात्याने बोलावं, त्यांना शिस्तीचं महत्त्व सांगावं, मुलांनी सुविचार लिहिला होता, ‘तीव्र इच्छाशक्ती हेच यशाचं गमक.’ सुविचार छानच होता. मी त्याखाली माझा शेवटचा म्हणून, जाता जाता काहीतरी भव्य, भरीव असं करावं या हेतूने लिहिलं. मला ऐन वेळी सुचलं. विचार केला की सुचतंच म्हणा.

‘माथ्यावरचा सूर्य ढळण्यासाठी असतो म्हणूनच उगवत्या सूर्याला हिरण्यगर्भ म्हणतात का? आपल्या तारुण्याचा सूर्य ढळलाच आहे पण

येणाऱ्या अंधारात फक्त अंधारच आहे. आता कुठली पहाट न् दिवस. डोळ्यांचा कडा ओलसर वाटल्या. छे, छे असं कसं... मुलांवर आपल्या भावना लादायला नकोत. असं हताश होऊन कसं चालेल? पुढच्या बाकावरच्या योगेशने विचारलेच, ''सर ढळण्यासाठी म्हणजे काय?'' एवढा अर्थ कळेना. आठवीची मुलं तेही माझ्याच वर्गातील! ढळणे म्हणजे काय ते कळेना. काय? ढळणे म्हणजे काय? समांतर शब्दही आठवेना. ढळणे हा शब्दच कितीतरी दिवसांनी असा पुढ्यात उभा ठाकलाय, साक्षात. स्पष्ट. दुसऱ्या शब्दात कसं सांगायचं? पण शेवटचा दिवस आहे. चांगलंच शिकवलं पाहिजे. ''अरे ढळणे म्हणजे जागा सोडणे. किंवा सरकणे.''

''ये जरा ढळ की तिकडं.'' मधल्या रांगेतला सोहम बोलला. 'शब्दाचं वाक्यात रुपांतर' यांना काय शिकवायचं? आजची मुलं फारच हुशार, स्मार्ट! पल्ल्याची आठवण झाली. तिचंही असंच. पटकन आकलन होऊन चटकन उदाहरण देईल. माधवी मात्र विचार करीत बसेल. सावकाश. मी गप्प बसलेला पाहून मुलं आपापसांत बोलू लागली. मुलांच्या समोर भावनांना आवर घालायलाच हवा.

''तर मी काय सांगत होतो, ढळणे म्हणजे काय? ढळणे म्हणजे जागा सोडणे. माथ्यावरचा सूर्य खाली उतरू लागला की म्हणतात सूर्य ढळला. खरं तर तो उगवल्यापासून पूर्वेकडून वर चढत असतो तेव्हाही ढळतच असतो की. पण तेव्हा ढळणे हा शब्द वापरणं योग्य नाही वाटत तर उतरणे किंवा अधोगती होते तेव्हा ढळणं हा शब्द वापरतात. अशा प्रत्येक शब्दाला बारीक, वेगवेगळ्या छटा असतात. खूप वाचलं ना की अर्थ कळतात. म्हणून मुलांनो, अवांतर वाचन भरपूर करा.''

''सरऽ'' शेवटच्या बाकावरचा विक्रम म्हणाला, ''रात्रीच्या अंधारात दिवसाचा गर्भ राहातो म्हणजे काय?''

सुविचार लिहून फसलोच. पण आता माघार घेण्यात अर्थ नाही; शेवटचा दिवस ! मग सुविचारांचा अर्थ सांगत, पोळलेल्या उन्हाचे, सोसलेल्या पावसाळ्यांचे अनुभव थोडेफार सांगितले. मुलं कंटाळली. अभ्यास सोडून ही काय बडबड चालवलीय सरांनी असंच वाटलं त्यांना. हुशार, स्मार्ट मुलांना उपदेश बोअर करतात. जाणवत होतं... तास बेल झाली. एकदाची माझी सुटका झाली. दुसऱ्या वर्गाचा नेहमीप्रमाणे गृहपाठ वगैरे बघून पुढचा पाठ शिकवायला सुरुवात केली.

सूचना देऊन मुलांना निरोपसमारंभासाठी थांबवून घेण्यात आलेले. गेटबाहेर खालच्या वर्गातील मुलांचे पालक, काहींचे रिक्षावाले ताटकळत होते. पालक मुलांसाठी थांबतील पण रिक्षावाल्यांचे काय? त्यांना बाकीची मुलं गोळा करून त्यांच्या त्यांच्या घरी सोडायची होती. सगळे जमले होते. कार्यक्रम सुरू व्हायच्या आधीच मी माईकवरून सूचना केली "ज्यांचे रिक्षावाले, पालक वाट बघताहेत, ज्यांना जाण्याची घाई असेल त्यांनी जावं." निम्मी मुलं कमी झाली. दहावीच्या जादा क्लासची मुलं आणि आठवी, नववीची तेवढी थांबली. सगळ्यांची धावपळ, उरकण्याची गडबड चाललेली. झगडेने टेबल मांडलं. त्यावर चादर टाकली. पोवळेबाईंनी फ्लॉवरपॉट मधोमध ठेवला. सगळं ओकेऽ झाल्यावर दुरूनच बघणारे कार्यक्रमाचे अध्यक्ष, मुख्याध्यापक येऊन बसले. मग नलावडे, सोनार, गायकवाड, थोरात वगैरे. नलावडेसरांनी सुरूवात केली. बसलेल्या विद्यार्थ्यांवर नजर फिरवित कार्यक्रमाचे प्रयोजन सांगितले. मग माझ्याबद्दल बोलू लागले, "चव्हाण सर कसे शिस्तबद्ध आहेत, तत्त्वनिष्ठ आहेत, मग त्यामुळेच आमचा सूर जुळला." वगैरे. खासगी क्लास चालवणारे नलावडे मलाही बोलवत होते. मराठी शिकवायला. पण सरकारी नोकरी करताना असं खासगी क्लास घेणं नियमात बसत नाही म्हणून मी स्पष्ट, 'नाही' सांगितलेले.

म्हणे, 'आमचा सूर जुळला.' माझ्याबद्दल सांगता सांगता असं स्वतःबद्दल बोलून बोलून मग बसले. नंतर पोवळेबाई, मुख्याध्यापक बोलले. मुलं कंटाळली होती. काही मुलांनी तयारी केली होती. गेल्यावर्षी माझ्या वर्गातली मुलं – नववीतली, थांबलेली. दीप्ती सूर्यवंशी, प्राची तुपे, गौरव कदम चांगले बोलले.

महेशने तर कमालच केली. पाठ न करता त्याला जे वाटलं ते मनापासून बोलला. माझ्या शिस्तीमुळे आलेला राग मग जिरविण्यासाठी केलेल्या क्लृप्त्या, झालेली फजिती, शेवटी शिस्तीचं महत्त्व वगैरे. आठवणी सांगताना नंतर तर रडला. माझं मन भरून आलं. मला बोलायला सांगितलं. जे जे ठरवलं होतं ते विरूनच गेलं. शब्द विसरले. सुचेल तसं बोलून सर्वांचे आभार मानून हात जोडले. दाटून आलंच. किती ठरवलं होतं बोलायचं म्हणून. पण शेवटी नाहीच नीट जमलं. कार्यक्रम संपल्यावर मुलं भेटली. 'घरी या' म्हणाली. शिकवणी सुरू करा वगैरे. या वाटेवरून निघालो. शिक्षक म्हणून शेवटंच. माझ्या शाळेची वाट, हा हक्क संपला. आता फक्त वाटसरू. 'पब्लिकसारखं' यायचं. ही आजची मुलं जातील वर्ष दोन वर्षांन. मग कोणी ओळखणारही नाही. या विचारांनी डोकं सुन्न झालं. पोटात तुटल्यासारखं. मुलांमध्ये दिवस कसा टवटवीत जायचा. आपलं अस्तित्वपण, जिवंतपण जागतं राहायचं. चैतन्यमय चेहरे बघून वय विसरायला व्हायचं. त्यामुळेच आयुष्याची टळटळीत दुपार एकट्याने काढली; सुशीला नसताना. आता आपण जगाच्या दृष्टीने बेदखल.

सुशीला गेली एकटं जगायला सोडून. एकमेकांचा स्वभाव, बारीकसारीक पैलू कळे न कळेपर्यंत ती गेली. माधवी न् पल्ल्याला मागे ठेवून गेली. म्हटलं तर क्षणात किंवा पहिल्या भेटीत माणूस कळतो, म्हटलं तर आयुष्यही पुरत नाही, आपल्या माणसांना ओळखायला, जोखायला.

तिच्या रसिकेतला, हौशीपणाला आपल्या शिस्तीमुळे न्याय देता आला नाही. हे आता कळतेय. आपल्या कठोर वागण्यामुळे तिचं बी.पी. वाढलं. तिला पुरेसा वेळच दिला नाही आपण. गेली निघून. चांगली शिक्षा दिली तिनं मला. एकीला नीट सांभाळता आलं नाही तर दुसरीचा कशाला विचार करायचा? बायको म्हणजे फक्त घर, पोरं सांभाळणारी, शेजेची सोबत करणारी एवढंच असतं हे नातं? जोडीदारीण, अर्धांगिनी म्हणून पुरुष किती गुंतवणूक करतो? पुरुष भ्रमर वृत्तीचाच असतो. नात्याचे बंध नकोच असतात. किती जणांनी आग्रह केला, किती स्थळं आणली... आई कंटाळली, थकून गेली सांगून.सांगून. एकदा न सांगताच थोरल्याकडं गेली. मग माधवीची वेणीफणी, आंघोळ आवरून तयार करेपर्यंत पल्ल्याने गोंधळ घालायचा, रडणं, सांडलवंड, चड्डीत शी, शू. तिकडे गॅसवर चहा ऊतू जाऊन पातेलं करपल्याचा वास घरभर पसरायचा. दोघींना तयार करून डब्यात मुगाची खिचडी नाहीतर सॅण्डवीच द्यायला दहा वाजायचे. कधी शाळेला उशीर झालेला चालायचा नाही, पण उशिरा जाऊ लागलो. मग लवकर उठायची सवय लावली. हळूहळू जमू लागलं. करायला गेलं की जमतंच की. धडधाकट शरीर, मेंदू असल्यावर, आईला राहवलं नाही. पंधरा तीन वारांनी आली, सकाळची धांदल पाहून व्याकुळली.

"स्वतःचा छळवाद का मांडलायेस, कळत नाही?"

"अगं माझ्या पोरींचं करतोय, सुशीला करत होती, तूही केलंस तसं... यात कसला छळवाद? मला कळेना !"

"जा तू तुझं आवरून. मी बघते." तेव्हापासून तिनंच घर सावरलं, सजवलं. तिचा भूमीवर भार असेपर्यंत माझ्या संसाराचा भार उचलला. आपण तर शाळा, विद्यार्थी यातच गुंतून राहायचो. उसंतच नव्हती. पण रात्र... रात्री शरीर बंड करायचंच... त्यालाही निग्रहाने गप्प बसवलं.

सुरुवातीला त्रास होतो. नंतर लागते सवय! विचारांची दिशा ठरवली तशी मनाची-शरीराची साथ मिळतेच. पोरींचं नीट शिक्षण करता आलं. माधवी तर अकाली प्रौढ झाली. शांत, समंजस. खरं तर कुढल्यासारखीच पल्ल्याच्या बंडखोरपणापुढं, अवखळपणापुढं ती सदा पडती बाजू घेऊन मागं राहाणारी. दहावी-बारावीत मात्र अभ्यासाने पडतेपणाची कसर भरून काढली न् मेडिकलला गेली. सुटली, मूळचीच हुशार. एम.बी.बी.एस ला क्लास मिळवून एम.डी. केलं. भूलतज्ज्ञ झाली. मोठ्या हॉस्पिटलमध्ये जॉब मिळाला. रात्री-बेरात्री कॉल आला की जावं लागतं म्हणून सॅण्ट्रो घेतली. तिचं ती स्वतः गाडी चालवित गेली तेव्हा भरून आलं होतं, एकटेपणाच्या जाणीवेने... मुली मोठ्या झाल्या. आपली गरज संपली या गोष्टीचं तुटलेपण एकट्यानंच भोगलं. सुशीला असती तर या भावनेचं रूपांतर आनंदात, समाधानात झालं असतं. पोकळी नसती जाणवली. सुशीलाच्या स्मृती धूसर झाल्या... सगळं मागं सारून शाळा एके शाळा, आला दिवस आपला असं समजून वागलो, जगलो. पडली अंगवळणी ही सवय... पल्लवीला कमी टक्केवारी होती तरी इंजिनिअरिंगला जायचं म्हणून हटून बसली. देणगी देऊन प्रवेश मिळवणं किंवा वशिला लावून लाचार होणं माझ्या तत्त्वात बसत नव्हतं. तेव्हा सगळी खटपट, धडपड माधवीनेच केली. पल्लवी सॉफ्टवेअर (आय.टी.) होऊन अमेरिकेला गेली. क्लासमेटलाच पटकावलं. तेव्हाही माधवीनंच पुढाकार घेतला. सुशीलाची जागा तिनं अशी भरून काढली. आपण माधवीला माजी विद्यार्थी डॉक्टर बघून दिला. तिनं ते आनंदाने मान्य केलं. माधवीने लग्नाआधी फ्लॅटला दिलेल्या पैशामुळे फ्लॅटवर हक्क सांगू लागला, आपलाच माजी विद्यार्थी! एवढी कमावणारी बायको असून त्याची हाव बघून खूप दुःख झालं. बोटात मोडलेला वांग्याचा काटा सलतो, कुठे आहे ते लवकर कळत नाही, दिसत

नाही. तसं झालं माधवीचं. एवढी समंजस म्हणूनच की काय तिच्या नशिबात खडूस नवरा होता? आपण कसे होतो? नवरा म्हणून? बायकोवर एवढा हक्क का दाखविला जातो? एवढं का गृहीत धरलं जातं? त्यांनी भरभरून प्रेम करावंच मुलांवर, नवऱ्यांवर, नवऱ्याच्या नातेवाईकांवर, घरावर. त्या बदल्यात परक्या घरून, स्वप्न सजवून आलेल्या मुलीला काय दिलं जातं? दुसरीकडचं हे रोपटं आपल्या अंगणात रुजावं म्हणून त्याला फक्त ओंजळभर पाण्याची अपेक्षा असते. रोज घातलं जातं पाणी आपलेपणाचं? विश्वासाचं? त्याच्या मुळांना जमिनीत जागा करून दिली जाते हक्काची? आकाश कवेत घेण्यासाठी मोकळा श्वास घेऊ दिला जातो? बदल होतोय. पण कोरडेपणा, परकेपणा वाढलाय. माहेरावरचा हक्क संपतो, सासर पुरतं आपलं म्हणत नाही. जगात फेकलेलं हे बाईपण तरी कुठंही रुजतं हरळीच्या मुळीसारखं, जरा ओल मिळाली की.

✦ ✦ ✦

मुलीचं वाढणं, फुलणं बघितलं, त्यांचे संसार बघितले, विद्यार्थ्यांच्या दोन, दोन पिढ्यांना शिकविलं. थोड्यांनी ओळख ठेवली, बाकीचे विसरले. सवयीने वर्षांमागून वर्षं गेली. अवती-भवती सुशीलाचे भास होत होते. तिचाही विसर पडला. आईचा प्रेमळ सहवास संपला. फ. मु. शिंदे म्हणतात, आई उरतही नाही सरतही नाही. पण अस्तित्वच संपल्यावर काय उरतं? सुशीलाची सारखी आठवण येतेय. ते नव्हाळीचे ओलेते दिवस... गद्दे पंचविशीतले... शाळेत जाताना दार उघडण्याआधी स्वतःला मिठी-ओठांत बंद करून घेण्याची तिची असोशी. माधवीच्या वेळी बाळंतपणावरून ती तीन महिन्यांनी आली अन् आपण सकाळी तिला न विचारताच गेलो, शाळेत. घरी आल्यावर ती किती रडली, भांडली. 'सवय मोडल्यामुळे

विसरलो.' म्हटलं तर म्हणाली, 'मला विसरला? माझी सवय मोडली? कशाची लागली मग?' किती काय बडबडत होती. हमसून रडत होती. अन् आपण हिचं आपल्यावर किती प्रेम आहे म्हणून सुखावत होतो.

✦ ✦ ✦

निकमसर घरापर्यंत आले. जाताना म्हणाले, "सर, एकटे असता. काही अडचण असेल तर निःसंकोच सांगत चला."

"नक्कीच, अहो, तुमच्याशिवाय दुसरं आहे का कोण?" त्यांना निरोप दिला. कुलूप काढून आत आलो. फोनची रिंग वाजत होती, "हॅलोऽ"

"हॅलोऽ बाबा, कसा झाला निरोपसमारंभ? किती शाली, नारळ मिळाले? पोवळेबाईंनी नुसतंच श्रीफळ दिलं असणार. त्या येतीलच बघा दोन-चार नारळ न्यायला, न् वड्यांचा डबाही पाठवतील. बाबा, तुम्ही काही बोलतच नाही? कसं वाटतंय? एकदम रिलॅक्स..."

"अगं तू गप्प झालीस तर मी बोलेन ना?"

"बाबा, मस्त वाटतंय ना? एन्जॉय फ्रीडम, बाबा. आता मी तिकीट पाठवते. या अमेरिका बघायला. कधीचं पाठवू?"

"मी नंतर सांगतो. थोडे दिवस मोकळं राहू दे. घाई करू नको. पेन्शन मंजुरीचं काम होऊ दे. मग बघू."

"बरंऽ ठेवू फोन? नंतर करेन." फोन कट झाला. ह्या पोरी अशाच. प्रेम करतात. आठवणीनं फोन करतात. पुन्हा स्वतःच्या विश्वात, संसारात दंग. प्रेम पुढं धावतं असं म्हणतात. मी तरी दुसरं काय केलं... आईवडील इथं राहिनात मग वर्ष-सहा महिन्यानं भेटून येणं, हातावर पैसे टेकवणं या पलीकडं काय केलं? आण्णा सुशीलाआधीच गेले. आईची सेवा करायची

तर तिनंच माझा संसार सांभाळला. हातपाय चालेनात तेव्हा गेली गावाकडं, थोरल्याकडं. तो म्हणालाच मग, "धडधाकट होती तवर त्याचा केलास संसार, आता थकल्यावर मी करू का तुझी सेवा?"

"कुणीच करू नका बाबांनो. मसणात गवऱ्या गेल्या माझ्या. आपल्या गावात, स्वतःच्या घरात मरण यावं म्हणून आले. त्याला नव्हती जड झाले."

चालती–बोलती आई महिनाभरात गेली. शेवटपर्यंत नाहीच सेवा करून घेतली. एवढा व्रतस्थपणा जमेल आपल्याला? असं सुखाचं मरण येईल आपल्याला? शेवटी कोण असेल माझ्याजवळ? सुशीलाऽऽ नकळत डोळे मिटून खुर्चीत मागे डोके टेकवले.

"सर, लाइट लावली नाही?" मिलिंदच्या आवाजाबरोबर तोही आत आला. लाइटचे बटनही त्यानेच दाबले. पाखरं उडून गेल्यासारखा अंधारही भुर्रकन उडून गेला. मिलिंद समोर उभा, हातात डबा घेऊन. त्याच्या निरागस चिवचिवण्यात मनातलं मळभ कमी झालं. हातातला डबा टेबलावर ठेवत म्हणाला, "आईनं घाऱ्या न् मसालेभात दिलाय. गरम, गरम खाऊन घ्यायला सांगितलंय."

"अरे, अरे वाऽ आमच्या स्वयंपाकीणकाकूंचा स्वयंपाक उरेल कीः"

"उद्यापासून शिकवणीला येऊका असं आईनं विचारायला सांगितलंय" टेबलावरील पेपरवेटशी खेळत एका पायावर भार देऊन दुसरा पाय बिनभाराचा सैलसर वाकडा करून माझ्या उत्तराची अपेक्षा करत उभा राहिला. आता कसला विचार करायचा? शिकवणी सुरू करण्याशिवाय दुसरा पर्याय आहे का? त्याला म्हटलं, "येत जा रे, आता तूच..." पुढं बोलवेना, मी उठून आत आलो. मिलिंद खूश होऊन गेला. इतके दिवस टाळत होतो; पण आता मानसिक, आर्थिक दोन्ही गरजा आहेत. पेन्शनचा अर्ज पाठवलाय.

तो प्रस्ताव मंजूर होईपर्यंत काहीतरी करायलाच हवं. मिलिंदच्या आईची न् माधवीची मैत्री. मागे, 'मिलिंद अभ्यास करत नाही, तुमच्याकडे शिकवणी लावता का?' विचारायला आली न् आमचीच गुरुजी झाली. आईला शहरी रिवाजातल्या कानगोष्टी, पोरींना तर किती काय काय शिकवलं. माधवीला पाळी सुरू झाली तेव्हा मी तर हबकूनच गेलेलो. म्हाळ होता म्हणून आई गावाकडे गेलेली. सगळं निभावलं तिनं. माझ्या मर्यादा कळल्या मला? उगाचच शिस्तीचा बडगा अन् तत्त्वांच्या बढाया मारतो आपण ! एकदा आई म्हणाली, "असा कारे गप्प, गप्प उदास असतोस? आज पोरी आहेत तोवर गप्पागोष्टी कराव्यात उद्या गेल्या नवऱ्याच्या घरी नांदायला मग एकटंच आहे आपलं."

माणसाला आयुष्यात कोण, कोण किती न् काय शिकवतील सांगता येत नाही. उगाच शिक्षकाने जगद्गुरू असल्याचा आव आणू नये.

"ट्रिंगऽऽ ट्रिंग" फोन वाजला, "हॅलोऽ"

"झोपला होतात का?" माधवी.

"नाही बेटा. एवढ्यात कुठली झोप. बोल कशी आहेस?"

"एकदम छान आत्ताच आले. तुम्ही जेवायला काय केलं? स्वयंपाकाच्या मावशी संध्याकाळी पण येतात ना?"

"आता त्यांना सुट्टी दिली. मिलिंदच्या आईनं मसालेभात, घाऱ्या पाठवल्यात."

"घाऱ्याऽ बाबा, मिलिंदच्या आईला म्हणावं मला सोडून करवतं कसं हे सगळं? किती दिवसात खाल्ल्या नाहीत घाऱ्या."

"ये ना मग. आता मी मोकळाच आहे. सगळं करून घालतो."

"बघते पुढच्या आठवड्यात येताना तुम्ही माझ्याबरोबर यायला हवं. आता आरामात राहायचं. नो टेन्शन."

"अगं पेन्शन मिळेपर्यंत टेन्शन राहाणारच."

"अजून नाही मंजूर झाली?"

"दिलाय अर्ज पाठवून. उद्या जाऊन चौकशी करतो."

"बाबा पेन्शन मिळेल तेव्हा मिळेल. तुम्ही आता इकडेच यायचं. नातवाला घोडा घोडा करायला."

"अरे वाऽ वाऽ अभिनंदन बाळेऽ अभिनंदन. छान बातमी दिलीस. यावंच लागेल. पण जास्त दिवस नाही राहाणार हं उगाच जावईबापू नाराज व्हायचे."

"बाबा तुमचं आपलं काहीतरीच. एवढे काय वाईट आहेत का ते? बरं सेण्डऑफ कसा झाला?"

"नेहमीप्रमाणे उत्तम. तू येतीयेस ना तेव्हा बोलू. घाऱ्या गार व्हायला लागल्या."

"ठीकेय. टेक केअर. उद्यापासून फिरणं योगा सुरू करा."

"हो बेटा. तूही स्वतःला जपायला हवं. वेळेवर नीट खातपीत जा. ठेवतो फोन. गुडनाइट."

काल परवाची माधवी. अजून तिचं लहानपणाचं गोंडस रूप विसरत नाही ती आता आई होतेय. मी आजोबा. बापरे ! आता खरंच म्हातारं वाटू लागलंय. चला घोडा घोडा खेळायला ताकद चांगली पाहिजे. त्यासाठी या घाऱ्या संपावयला हव्यात. 'हूं' घाऱ्या छानच आहेत. आता खरी काळजी पेन्शनची. उद्या जाऊन चौकशी करायला हवी. आणि पहाटे उठून फिरणंही.

✦ ✦ ✦

जिल्हा परिषदेच्या कार्यालयात गेलो. चौकशी करीत लिपिकापर्यंत पोहोचलो एकदाचा. पानाचा तोबरा तोंडात धरून बोबडं बोलत होता तो

समोरच्याशी. मी नमस्कार करून ओळख सांगितली. पानाची पिंक मागे टाकून म्हणाला, "उद्या फाईल बघतो." पुन्हा समोरच्याबरोबर बोलण्यात गुंग. चुळबुळत थोडा वेळ उभा राहिलो. "साहेब उद्या ह्यावेळी येऊ का?" त्याने हात दाखवून मान, डोळे हालवले. मग बाहेर पडावेच लागले. काय समजेनाच. कुणाला विचारावं? दोन महिन्यांपूर्वीच अर्ज पाठवलाय, लिपिकाला माहीत नाही. उद्या सगळं नीट स्पष्ट विचारावं.

"अरे सर आलात? रोजची सवय."

मुख्याध्यापकांनी हाक मारली न् भानावर आलो.

"पेन्शनीचं कुठवर आलंय त्याची चौकशी करायला गेलो होतो..."

"बरं बरं ठीकेय. मी सातवीच्या वर्गावर निघालोय. थोरातसर आले नाहीत. ओ.के." मुख्याध्यापक टक्टक् बूट वाजवित गेले. झगडे घाईतच. नेहमीप्रमाणेच त्याने फारसे लक्ष दिले नाही. मग निघालोच. समोरून पोवळेबाई येत होत्या. "अय्या सरऽ करमत नाही ना शाळेशिवाय? मी दोन-तीन मुलांना पाठवू का ट्यूशनसाठी, म्हणजे घरीच शाळा सुरू."

"अन् आपला वेळ खायला अशा चकरा मारणं बंद होईल. आयला हे रिटायर लोक म्हणजे डोकेदुखीच." नलावडे सर कुजबुजले, टेबलवर काहीतरी खुडबुड करीत, खरं तर मी त्यांना विचारणार होतो. 'तुमच्या क्लासला जॉईन होऊ का?' पण... मनच उडालं. फक्त चोवीस तास. चोवीस सुद्धा नाही, रात्र उलटलीय अवघी... घरी निघालो.

"पोवळेमॅडम, ते ट्यूशन कशाला घेतील? अमेरिकेत जाणारेयेत लेकीकडे. मागे ऑफर दिली तर नाही म्हणालेले."

"लवकर कटा म्हणावं." कुजबुज. पाठीला डोळे नसले तरी मागून बोललेले कानांना ऐकू येतंच की. कशाला गेलो... पण नकळतच पायच वळले...

घरी येऊन हातपाय धुतले. तोंडावर भरपूर पाणी मारलं. त्या लिपिकाच्या नावानं, नलावडेच्या नावानं... जरा बरं वाटलं. स्वयंपाकीणकाकूंनी शिजवून ठेवलेलं वाढून घेतलं. स्टाफरूमधले थोड्या वेळापूर्वीचे वातावरण आठवले न् घासच उतरेना. सुशीला तू असतीस तर हा दिवस किती वेगळा ठरला असता. एकदा सहा ते नऊच्या शोला जायचं ठरलं. नवा संसार टी.व्ही नव्हता. त्या वेळी जोडीनं पिक्चरला जायचं जास्त प्रस्थ. दिवसभरात लक्षातच नाही. निघताना दहावीचे पालक मुलाच्या अभ्यासाबद्दल बोलायला आले. त्यांच्याशी बोलता बोलता सात वाजलेले कळलेच नाही. सुशीला साडी बदलून स्वयंपाकाला लागलेली. नंतर तिने असं काही ठरवलंच नाही. रविवारी दहावीचे क्लास असायचे. सरप्राईज देण्याचा आपला स्वभाव नव्हता, नाही. नंतर माधवी झाल्यावर माधवीतच गुंतली. ती उत्साहाने काय ठरवायला लागली की फुकट वेळ जाईल म्हणून वैतागायचो. तिच्या चेहऱ्यावरची उदासी जाणूनच घेतली नाही. तिच्या तारुण्यसुलभ भावनांकडे लक्षच दिलं नाही. पोटाची भूक भागवली की शरीराची भागवायची, निसर्ग नियमानुसार. सगळं नियमानुसारच करण्याची शिस्त बाणवलेली. तिचं फिरणं, पिक्चर, हौस-मौज या गोष्टी नियमात बसत नव्हत्या???

जिल्हा परिषद कार्यालयात गेलो नुकतेच लिपिकसाहेब येऊन बसलेले. मी समोर जाताच, "काये य?" खेकसले. मी एवढा म्हातारा, लाचार दिसतोय? पुन्हा ओळख सांगून त्यांना पेन्शनीबद्दल विचारले. "हे पाहा म्हणजे तुम्ही बघितलंच ना मी आताच आलोय. चार वाजता या." तो फायली चाळू लागला. "मी संध्याकाळी येतो. तोपर्यंत तरी नक्की शोधून ठेवा." त्याने मुंडी हालवली. आलो घरी. मिलिंदच्या आईला येता येताच सांगितलं, 'दुपारी जि.प. कार्यालयात जायचंय. संध्याकाळी यायला उशीर

होईल.' ती वाट बघते न् काळजीही करते. मिलिंदला सकाळीच शिकवतो म्हणून बरे. दुपारभर घड्याळाकडे लक्ष. लक्ष दिले की काटेही रमतगमतच पुढे सरकतात. दोनलाच तयार झालो. म्हटलं जावं हळूहळू. चारच्या आधीचं पोहचलो तर साहेब नव्हतेच. शिपायला विचारले तर तो म्हणाला,

"ते लवकर गेले आज."

"परत येणारेत का? मला चार वाजता बोलावले त्यांनी."

"काय की?" तो गेला. पाच वाजेपर्यंत बसलो. पण लिपिक काही आलाच नाही. मग हळूहळू घरी.

एकदीड किलोमीटर अंतर. दोन दोन हेलपाटे घातले तर पाचसहा किलोमीटर होतंय रोजचं चालणं. माधवीला सांगायला हवं रोजचं चालणं. येता येता मिलिंदकडे डोकावलो. त्यांच्याकडेच चहा झाला. दिवस मावळत होता. मावळता मावळता हा कसा सोनेरी रंग उधळतो, माणसाची संध्याकाळ अशीच झाली तर... नव्हे माणसाला करता यायला हवी. असं सुवर्णधन उधळता यायला हवेत. सूर्याच्या मावळण्याबरोबर हळूहळू सोनेरी रंग गडद अंधारात बुडू लागला. तसं उदासपण दाटून आलं. आठवणी एकेक चोरपावलाने येऊ लागत. मुंगीप्रमाणे एक आली की दुसरी एकमेकीला डोकं लावत मग तिसरी, चौथी, पाचवी... रांगच. काय करायचं या आठवणींच??

'पुस्तक लिहायचं !' कुठून आला आवाज? कशाला कुठून येईल? असे मार्ग दाखविणारे आवाज आतच असतात. पण कामाच्या धबडण्यात ऐकायला कुठं येतात. गांधीजी रिकामे नसायचे तरी त्यांना आतले आवाज नेहमी ऐकायला येत. त्याप्रमाणे ते वागत. शिस्तप्रिय माणूस. 'गंगेमध्ये गगन वितळले.' वाचायला हवं. रामदास भटकळांनीही लिहिलंय तेही पाहायला हवं.

सकाळीच जि.प. कार्यालयात लिपिकाआधीच पोहचलो. त्याच्या मागोमागच गेलो. दोन्ही हात एकमेकांना गुंफून नम्रपणे टेबलाशेजारी उभा राहिलो. माझे विद्यार्थीसुद्धा एवढे नम्र, दीन नसत.

"तुम्ही आलात?" फायलीवरील धूळ झटकत खूप घाईत असल्यासारखं दाखवत लिपिक खेकसला.

"मिळाली का फाईल?" मी अजिजीने विचारले.

"अहो शोधलीय कुठे अजून?" त्याने पुडीत बांधून आणलेले पान तोंडात कोंबत म्हणाला, "तुमच्यासारखे रिटायर रिकमटेकडे रोज रोज येऊन वेळ आणि डोकं खातात. कशी कामं करायची?"

"साहेब, कृपाकरून लवकर शोधा. पेन्शन नाही मिळाली तर उपासमारीची वेळ येईल."

"काय सांगता? मग अमेरिकेतली एक, डॉक्टर एक मुली काय करताहेत?"

"साहेब तुम्हांला कसं माहीत?"

"काही गोष्टी लपून नाहीत रहात, फायलीसारख्या."

"साहेब, मुली सासरी गेल्यावर त्यांच्यावर हक्क कसा काय राहील? आपलं आपण स्वावलंबी असावं."

"अगदी लाखातलं बोललात." लिपिकाने मागे पिंक टाकली. आपलं आपण आर्थिकदृष्ट्या सक्षम असावं. मी तुमची फाइल शोधून ठेवतो. तुम्ही या संध्याकाळी बोलू. तो फायली चाळण्यात गुंग झाला. त्याच्या आजच्या बरंच बोलण्यानं मन खुललं. गळालेल्या हातापायात आशा ग्लुकोजसारखी पसरली. परत येण्यासाठी पुन्हा घराची वाट धरली. आपण कधीच कुणाला असं ताटकळत ठेवलं नव्हतं. देवपूजा कधी नाही केली. नोकरीलाच देव मानला. ज्ञानदान ही पूजा. मग आपल्याला का

अशी शिक्षा मिळतेय? कुठली कर्मे चुकली? सुशीला... सुशीला ! किती वाट पाहायला लावली. ताटकळत हिरमूसून, भुकेजून जायची. दमूनभागून घरी आलो तर हिचा चेहरा हसरा नसतो म्हणून तिच्याकडे बघणेच टाळायचो...

दुपारी पुन्हा परेड. जि. प. कार्यालय. हा लिपिक किती दिवस हेलपाटे घालायला लावणार आहे. वैताग नुसता...

"या, या सर, सापडली तुमची फाइल." इकडं तिकडं बघत कोणी नाही असं बघून म्हणाला, "पण फुकट नाय काम होणार बघा. दीड दोन तरी द्यावे लागतील." डोकंच सणकलं. पण चिडण्यात अर्थ नव्हता. म्हटलं,

"अहो साहेब मी रिटायर माणूस. माझ्याकडे एकरकमी एवढे पैसे कुठले? पोरींची शिक्षणं, लग्न, घर आता शिल्लक काही नाही. पेन्शन नाही मिळाली तर खरंच उपास घडतील."

"बघा बुवा दीड हजारापर्यंत तरी द्यावे लागतील. मग अजिबात अडचण येणार नाही. असा तपासून शिक्षणाधिकाऱ्यांची सही घेऊन स्वतः शिक्षण उपसंचालक कोल्हापूरच्या ऑफीसला जमा करतो. दीड तरी द्यावेच लागतील."

मी उठूनच निघालो. इतक्या दिवसांच्या हेलपाट्यांना हे उत्तर. तडक घरी आलो. संतापाने डोकं भणाणून गेलं. काय करावं तेच सुचेना.

दरवाजावरची घंटी वाजली.

"अरे कदम सर! कशी आठवण झाली. याऽ याऽ."

"रिटायर झाल्याचे कळले म्हणून आलो. म्हटलं ज्येष्ठ नागरिक संघात नाव नोंदवावं."

त्यांना पाणी देऊन गॅसवर चहा ठेवला.

"काय हो सर तुमचं पेन्शन कसं मंजूर झालं?"

"महिनाभर लागला की."

"तो लिपिक हरामखोर पैसे मागतोय होऽ"

"देऊन टाका. या वयात कशाला झगझग करायची."

"पण लाच देणं गुन्हा आहे. माझ्या हे तत्त्वात बसत नाही."

मी चहा गाळून बाहेर आणला. सरांना एक कप दिला.

"तत्त्व बित्त्व मुलांना शिकवायला ठीक असतात. देऊन टाका."

एक कप चहाच्या बदल्यात दिलेला सल्ला मला मानवणं शक्यच नव्हतं. कदम सर गेले. डोक्यातला भुंगा मेंदू पोखरू लागला. आजपर्यंत बेकायदेशीर काही केलं नाही. नाही ! मुळीच नाही ! नकोच वाटतं हे असं... लढायचं आपण. या वृत्तीविरूद्ध लढायचं. काय अधिकार आहे. त्याला पैसे मागण्याचा... जिवाला चैन पडेना. हक्काचं पेन्शन देणार सरकार. हे कोण उपटसुंभ मधल्या मध्ये पैसे मागणारे? आपण वर्षानुवर्षं पोरांना शिकवलं. एक पैसा मागितला नाही. मनातही तसं आलं नाही. प्रत्येक विद्यार्थ्यांनी वर्षाला हजार रुपये द्यावे, असं केलं असतं तर चाललं असतं? सरकार पैसा, पगार देत होते. मुलांना पैसे मागण्याचा अधिकार कुठला शिक्षक वापरत नाही. मग ह्या लिपिकाला का द्यायचे पैसे? तक्रार करायची. धडा शिकविल्याशिवाय यांना अक्कल येणार नाही. तरी म्हटलं हा साधा लिपीक पानथुक्या आलिशान इंडिगोमधून कसा येतो? आधी वाटलं होतं, असेल कुणाचीतरी. पण रोज त्याच गाडीतून उतरताना दिसू लागला. उद्याच लाचलुचपत कार्यालयात जायचं; असा निश्चय करूनच थकलेलं शरीर लवंडलं. अंग दुखत होतं. पायावरून कुणीतरी हात फिरवावा वाटू लागलं. डोळ्यांना झोपायची घाई झालेली.

✦ ✦ ✦

जातायेता बोर्ड वाचलेला. पहिल्यांदाच ऑफिसात जावं लागतंय. हा वेडेपणा तर नाही ना? इथलेही लोक खातात पैसे. बघू या तरी. सगळं पायरीपायरीनं शिस्तीत करायचं. ह्यांनी दाद दिली नाही तर वरचं ऑफीस. नाहीतर पेपरवाले आहेतच की.

पायरीवरूनच विचारलं, आत जायचं धाडस होईना.

"साहेब आहेत का?" इथे सगळे सारखेच दिसत होते. साध्या खासगी ड्रेसमधेच होते सगळे. खाकी गणवेश एकाच्याही अंगावर नाही. कोणी लिहीत होते, त्याला कोणी काही सांगत होते. कोणी कॉम्प्यूटरवर खाटखूट करत होते, तर कोणी फोनवर बोलत होते. इथे तरी घेतील फिर्याद? मनात असंख्य शंका-कुशंका. पोलीस खात्याचा कधी संबंधच आला नाही. बाहेरून-बाहेरून वाईट-साइट तेवढं ऐकलेल. साहेब कोण न् शिपाई कोण काहीच समजत नव्हतं. एका खोलीचे दोन भाग केलेले. यापेक्षा आमच्या मुख्याध्यापकांची खोली मोठी असते. एक जण उठून आला. उंचेला, ओबडधोबड, काळासावळा, राकट पोलिसी चेहरा.

"काय काम काढलं?" त्याचा तो खर्जातला घोगरा आवाज ऐकूनच जरब बसत होती. थोडं घाबरायला झालं. तो साधा लिपिक तर खेकसायचाच. पण त्याचा राग आलेला. आता थोडं धाकधूक वाटत होतं.

"तक्रार करायची होती." मी चाचरत बोललो.

"या आता या." ते साहेब असावेत. चारपाच पायऱ्या चढून गेलो. त्यांनी सांगितल्यावर त्यांच्यासमोरच्या खुर्चीतच बसलो. खिशातल्या रूमालाने घाम पुसला. साहेबांनी पाण्याचा ग्लास पुढे केला. तहान लागल्याची जाणीव पाणी पाहाताच झाली. घटाघटा पाणी पिऊन टाकले. ओठ पुसले. बरं वाटलं. पोलिसांच्या ऑफीसात असून."

"बोला." तो जाडजूड जबरी आवाज. मग त्यांना सगळं सांगितलं. खूप हलकं वाटलं, त्यांनी लक्षपूर्वक ऐकून घेतल्यामुळे. थोडा वेळ विचार केला त्यांनी. आणि मग भराभर हुकूम सोडले.

"देशपांडे, यांची तक्रार लिहून घ्या रीतसर. कुलकर्णी एक पत्र तयार करून जाधवांकडे द्या. सरकारी पंचाना घेऊन येतील ते." लोक पटापट कामाला लागले. "अरे कुलकर्णी, निवडणुकीमुळे लोक बिझी असणार. असं करा आर.टी.ओ. चे लोक मिळतात का बघा." कुलकर्णी सॅल्यूट ठोकून निघाले. मला त्यांनी बारीकसारीक माहिती विचारली. पुन्हा जि. प. कार्यालयात जाऊन लिपिकाकडे 'अमूक वेळेला पैसे घेऊन येतो.' अशी वेळ ठरवून या. मी जि. प. कडे गेलो. आपल्या पाठीशी कोणीतरी आहे, असं वाटल्यामुळे पायात बळ आलं.

लिपिक जागेवरच होता. आज नशीब चांगलं आहे. त्याला गयावया करू लागलो. संशय येऊ नये म्हणून म्हटलं, "साहेब, माझ्या लेकी मोठ्या घरी दिल्या म्हणून तर मी गरीब झालो, त्यांच्या सासरच्यांना हजार दोन हजार भिकाऱ्यासारखे मागणे लेकींला कमीपणा नाही का? साहेब, आपल्याकडं लेकीच्या घरी द्यावं लागतं, काही मागितलं की पोरीची माझ्या काय किंमत राहील. तुम्हीच समजून घ्या. अहो तत्त्वाला कधी मुरड घातली नाही म्हणून तर अशी अवस्था झाली. ही परिस्थिती ओढवली. साहेब हजार रुपयात भागवा की, अहो पेन्शन हातात पडेपर्यंत तरी थोडंफार पैसे लागतीलच ना... म्हातारं माणूस दवापाणी लागतं, कधी कुठली वेळ येईल सांगता येते का?" लिपिक तयार झाला. म्हणाला, "संध्याकाळी साडेपाचला या. गर्दी कमी होते. इथे दुसरे लोक असले तर बोलू नका. कॅन्टीनमध्ये बसू."

मी घरी जाऊन हजार रुपायांच्या दहा नोटा घेतल्या. लाचलुचपत (अॅण्टी करप्शन) कार्यालयात गेलो. सरकारी कर्मचारी पंच म्हणून आलेले.

सगळी जय्यत तयारी पाहून आश्चर्य वाटले. सगळ्यांसमोर कुलकर्णींनी तक्रार वाचली. मी नेलेल्या नोटांना 'ऑथ्रासीन' पावडर लावली. ते पैसे मी लिपिकाला कसे द्यायचे, पैसे दिले की इशारा कसा, कुठे करायचा याच्या बारकाईने सूचना दिल्या. सगळं नीट करा. नाहीतर सगळेच गोत्यात येऊ असे म्हणून साहेबांनी पाठीवर हात ठेवून मला जायला सांगितलं. सगळ्यांच्या आवाजात जरब होती पण खेकसाखेकसी नव्हती. पाच वाजताच त्यांनी जि.प. कार्यालयाच्या भोवती सापळा रचला. मागच्या बाजूला खिडकीतून दिसतील असे लोक उभे केलेले. लिपिक तासाभराने भेटला. वर्दळ कमी झालेली, मी त्यांना नम्रतेने विचारलं, "साहेब, झालं ना माझं काम?"

"पैशाचं काय केलं?" फायलीतून डोकं वर न काढता लिपिक गुरगुरला. मी खिडकीतून इशारा केला.

"आणलेत की, पण नक्की काम होईल ना?"

लिपिकाने इकडे तिकडे बघून घेतले. मी दिलेल्या नोटा मोजू लागला. मी पुन्हा इशारा केला.

"शंभर टक्के काम होईल." लिपिक मागे पिंक टाकत खूश होत खुर्चीत रेलून बोलला. लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातील लोक भराभर आले. लिपिकाला घेराव घालून जागेवरच रंगेहाथ पकडले. स्थानिक पोलीस स्टेशनला गुन्ह्याची नोंद करून लिपिकाला अटक केली. त्याला मग न्यायालयात हजर केले. या सगळ्या धावपळीत रात्रीचं जेवायलाही कोणी गेलं नाही. ब्रेड-ऑम्लेट मागवून सगळ्यांनी खाल्लं. मलाही दिलं. घरी जायला सर्वांनाच पहाटेचे तीन वाजले. त्यांनी त्यांच्या पोलीस जीपमधून घरी सोडले. दिवसभराच्या दमणुकीने पडल्या पडल्या झोप लागली.

'ट्रिंगऽऽ ट्रिंगऽ' केव्हाची फोनची रिंग वाजतेय. अंग नुसतं आंबून गेलंय. घड्याळात बघितले तर सात वाजून गेलेले. फोन घेतला. "हॅलोऽ"

"बाबा, माधवी बोलतेय."

"बोल बेटाऽ"

"बोल काय, काल कुठे होतात दिवसभर? मिलिंदच्या आईला तरी सांगून जायचं नाही का? काळजी करत होत्या."

"अगं ते पेन्शनीचं काम. त्या हरामखोराला चांगला धडा शिकविला."

"मरू दे ती पेन्शन. या इकडे लवकर."

"आता पेन्शन मिळेल. मरणार नाही मी मिळेपर्यंत." कितीतरी दिवसांनी मोकळं हसलो.

"बाबा, गम्मत वाटतेय?"

"अगं तो लिपिक लाच मागत होता. दिली तक्रार अॅण्टीकरप्शन खात्यात. छापा घालून रंगेहाथ पकडले. सगळा रूबाब संपवला. मला पैसे मागतो काय बेट्या."

"काय सांगताय बाबा? पैसे खाणाऱ्या पोलिसांनीच हे काम केलं?"

"अगं सगळेच नसतात तसे. आपल्याला तरी कुठे अनुभव असतो? सांगीवांगीपुरतं आपलं ज्ञान. तुला सांगतो माधवी, हे अॅण्टीकरप्शनचे लोक फारच चांगले होते. माझ्यासाठी पहाटेपर्यंत सगळा स्टाफ झटत होता. माझं खाणंपिणं त्यांनीच केलं. आपण त्यांना नावे ठेवतो. पण आमच्या शिक्षणखात्यातलेच लोक किती कृतघ्न वागतात. मी तर म्हणेन पोलीसखात्यातलेच लोक सर्वसामान्यांचे पैसे न घेता काम करतात. हां नंतर राजीखुशीने दिले तर घेत असतील पण पैशासाठी कामं अडवून ठेवत नाहीत. त्यांच्यासारखी माणुसकी आजपर्यंत कुठेच अनुभवली नाही. खानदानी वागणं असतं. चांगल्याशी चांगलंच वागतील. गुन्हेगारांना मात्र... कळेल त्या लिपिकाला."

"पण जपूनच राहा. या आपले इकडे."

"बरं. तू काळजी घे गं. ठेव फोन." आता कुठलं येणं न् जाणं. आता माझी लढाई सुरू झाली. रिटायर झालो म्हणून काय थकलो नाही. शिकवणीचे वर्ग सुरू करावे लागणार. ज्येष्ठ नागरिकांच्यासाठी, अडल्या नडल्या माझ्यासारख्या लोकांसाठी. सामान्यजनांची अडवणूक करणाऱ्या लोकांना धडा कसा शिकवायचा याचे धडे द्यायला हवेत. लोकांना आता माहिती अधिकाराची माहिती देऊन जागृती करायला हवी. लाचखोरांना अद्दल घडविण्यासाठी नव्याने वर्ग सुरू करायचे. त्याशिवाय देशाची प्रगती कशी होणार? नीतीची समृद्धी यायला हवी. तरच भारत महासत्ता होईल. खंबीर, कणखर !! या संकल्पाने सळसळती ऊर्जा अंगभर वाहू लागली. सूर्य उतरणीला लागला, ढळला तरी त्याची आच कमी थोडीच होते? आता सोनेरी किरणांची उधळण करणं का नाही जमणार? खूप तरुण वाटू लागलं. त्या पोलीस ऑफीसरसारखा भारदस्त पोटभर श्वास घेतला. दरवाजा उघडला. सूर्यकिरणांचा झोत अंगावरून घरभर पसरला. घरात विसावला. छानच वाटले चढत्या सूर्याचे ऊन.

✦ ✦ ✦

# पाणीरंग

तन्वी रांगोळी काढत होती. रांगोळीच्या रेषा रेखीव येत होत्या, लक्ष, ध्यान नव्हते तरी, विचार नवऱ्याचाच. इतका कसा हा रुक्ष? हा प्रश्न लग्न झाल्यापासून चाळीस लाख तीन हजाराहून अधिक वेळा पडला असेल. प्रश्न पडले की आपला मेंदू उत्तर शोधायला सुरुवात करतो. मग कधीतरी सापडते उत्तर. आपल्या मेंदूला काही उत्तर सापडलेच नाही. त्याच्या विनवण्या करून करून हा एक्झिबिशनचा घाट घातला. हा मात्र गुंतवून घ्यायला तयारच नाही. स्वतःच्याच कामात मग्न. थोडीतरी मदत करावी. पहाटे उठून खाण्यापिण्याचे आवरून निघाले तरी हा घोरतोच आहे. याचं थोडं काम वाढलं, काही प्रॉब्लेम आला की आपली झोप

उडतेच. तो कुठे म्हणतो, माझी काळजी कर... नवऱ्यांना बायकांनी करियर करावं असं का नाही वाटत? हाही प्रश्न दोन कोटी वेळा पडला असेल... ! पुरुषांना बायकांचं कौतुक असतं, पण स्वतःच्या बायकोनं जीव तोडून संसाराकडे दुर्लक्ष करून करियर करणं नको असतं.... ह्यात तरी नवीन काय आहे. नेहमीचाच गुळगुळीत प्रश्न. मेंदूच्या पृष्ठभागावरून घरंगळतच जात असेल. परिस्थिती बदलत नाही. आपल्याला वाटतं गुंग होऊन फक्त पेंटिंग्ज करावीत हे प्रदर्शन वगैरे त्याने बघावे. पण त्यालाच हे जाहीर प्रदर्शन आवडत नाही. पटत नाही. 'चित्र काढण्यात मिळतोय ना आनंद, मग हवंय कशाला प्रदर्शन?' खरंच का हवं प्रदर्शन? एवढी शेकडो पेंटिंग्ज काढून घरातच कुजवत ठेवायची? लोकांनी बघावीत. वाटलं तर कौतुक करावं त्यातूनच गेलं एखादं विक्रीला तर रंग, ब्रश, कॅनव्हास पुरतेतरी हक्काचे पैसे मिळतील. सदा न् कदा अहंकारी नवऱ्यापुढे हात पसरायचे.... पैसे मिळावेत हाच सुप्त हेतू आपला. पण पैशासाठी प्रदर्शन भरवते, चांगल्या खात्यापित्या घरची बाई... हिचा नवरा काय देत नसेल.... मिडलक्लास मेंदूतले हे प्रश्नही मेंदूत गुंतत, अडकत नाहीत. एकूण काय हुसेनची चित्रे कशी लाखोंत विकली जातात याची फक्त चर्चा करणार आपण. जवळच, आपल्याच पावलाजवळ कोणीतरी धडपडतेय इकडे दूरदृष्टीच्या लोकांचं लक्ष कसं जाणार? तर काय ! पिकतं तिथं विकत नाही म्हणून तर आपलेच ढोल आपण बडवायचे दिवस आलेत. रसिकांना, जाणकारांना काय स्वप्न पडलेय का? ते आपला पत्ता शोधत स्वखर्चाने धडपडत चित्र बघायला येणारेयत का? घरातूनच रिस्पॉन्स मिळत नाही.... तडसरकर सरांनी प्रोत्साहन दिले म्हणून तर एवढे धाडस केले. नाहीतर काय, शिजवणं, खाणं, झोपणं याशिवाय आयुष्यात काय केलं... काय करता येतं, येऊ शकतं हेच तर दाखविण्याचा प्रयत्न. हा पहिला हेतू. पैसे

मिळवणं दुसरा हेतू. बराच वेळ दोन पावलांवर बसल्यामुळे तन्वीचे पाय अवघडले. हातात रांगोळीचा डबा घेऊन ती उभी राहिली. रांगोळी सुंदरच आली होती. आलीच म्हणायची. आपलं पुरेसं लक्ष कुठं होतं. शुभ्र, नाजूक नक्षी. सगळ्या रंगांना सामावून घेऊनही पवित्र राहिलेला शुभ्र रंग. सूर्यप्रकाशासारखा. सात रंग पोटात ठेवूनही लख्ख राहिलेला. अशीच तर सुंदर दिसतेय. आत रंगोत्सव बघायचा तर असंच स्वच्छ कोरं मन घेऊन जायला हवं. तन्वीनं मग रांगोळीत रंग भरायचं रद्द केलं. आकाराचा बॅलन्स ठाकठीक करीत असतानाच कलामंदिराच्या विद्यार्थिनी, तडसरकरांनी पाठविलेल्या आल्याच. "मॅडम, किती सुंदर काढलीत रांगोळी. द्या आम्ही भरतो रंग." स्वप्नालीने ओढणी सावरत रंगीत रांगोळीचा डबा घेतला. "मी म्हटलं ठेवावी अशीच. आत रंगच रंग आहेत तर..."

"आतली झलक प्रवेशद्वारात, अंगणातच दिसायला हवी." अश्विनीनं हिरव्या रंगाची चिमूट घेतली. "ठीकय." म्हणत ती आत गेली. पेंटिंग्ज कसे, कुठे लावायचे त्यासाठी सूचना देऊ लागली. एवढंतरी अथर्वला करणं जमलं असतं पण... मी तरी सारखी सारखी, त्याने हे केलं असतं तर, तसं केलं असतं तर अशी अपेक्षा का करतेय. त्यामुळेच आपल्याला त्रास होतो. मन वढाय... शीट्. त्या विचाराला झटकून ती घाई करू लागली. टेबलवर वही ठेवली. पेन विसरलंच. तिनं पर्समध्ये शोधाशोध केली पण नाही सापडले. पर्समध्ये पेन कसे सापडेल कधी ठेवलेच नाही तर. ब्रशच्या पाऊचमधून पेन्सिल शोधून तीच ठेवली. फ्लॉवरपॉटमध्ये फुलांचा गुच्छ नीट मांडून ठेवला. तांब्या भांडं. सरला पळत आली, "मॅडम सर आले." ती पटकन बाहेर त्यामुळेही असेल पण तिच्या छातीत धडधडू लागले. सर अगदीच वेळेवर आले. अथर्वचा पत्ता नाही. नशीब हॉलतरी बुक करायला मदत केली. आपल्याला एकटीला तेवढंही नसतं जमलं. मग सरांच्याच मागे लागावं

लागलं असतं. त्यांना तरी किती त्रास द्यायचा. उद्‌घाटक तरी कोणाला बोलावणार? तेवढ्या ओळखी पण नाहीत. महत्त्वाचे म्हणजे मोठमोठ्या सेलिब्रेटीजकडे जाण्याचे धाडसच होत नाही. अथर्वच्या किती ओळखी आहेत... शेवटी तडसरकरांनाच बोलावले. सकाळकडे लेख पाठवला. खऱ्याखुऱ्या रसिकांपर्यंत पोहोचण्याचा तो एक मार्ग. सहज, सोपा. बिनवशिल्याचा. सरांनी फांउडेशनचे विद्यार्थी पाठवले मदतीला, म्हणून बरं. नाहीतर हे प्रदर्शन वगैरे चित्रं काढण्यापेक्षा फार अवघड रे देवा. स्वतःलाच बाजारात उभं केल्यासारखं जीवघेणं दुःख. सगळं नीटनेटकं झालंसं बघून ती गेटजवळ सरांच्या स्वागताला थांबली. 'अथर्वने आता तरी यावं.'' पुन्हा अथर्व. नको येऊदेत त्याच्यावाचून काय अडतंय... पुढच्या वेळी हॉलसाठीसुद्धा त्याला विचारणार नाही. यातली दोन-पाच पेंटिग्ज जरी विकली गेली तरी त्याच्या हातीपायी पडावं लागणार नाही. विकली तर...??? तिनं दीर्घ सुस्कारा सोडला. सरांचे हात जोडून हसतमुखाने स्वागत केले, अथर्व नसण्याची ठसठस मनामागे टाकत. सर म्हणालेच, ''अरे अथर्व नाहीत का आले?''

''येतीलच एवढ्यात. सगळ्यांनाच वेळेचं महत्त्व कुठे असते?''

''उद्‌घाटक उशिरा येतो हे त्यांनी गृहित धरले असणार.''

''तुम्ही वेळेत याल अशी खात्री होती.'' तिने सरांना गणपतीच्या चित्राकडे नेले. तिथे ठेवलेली समई लावताना सर म्हणाले, ''अगं वातीच्या टोकावर कापूर ठेवला ना तर वात पटकन पेटते.''

''लक्षात ठेवीन मी.'' ती म्हणाली. सगळे सोपस्कार झाल्यावर सर तिच्याबरोबर एकेक चित्र बघू लागले. ''वंडरफुल. मी नव्हतो सांगत तुला कलाकाराने आपली कला लोकांसमोर आणायलाच हवी. लोकांना आनंद वाटावा. देवाने दिलीय देणगी तर स्वार्थीपणाने, संकुचित होऊन एकट्यानेच निर्मितीचा आनंद उपभोगू नये.''

“हो ना.” तन्वी सरांना दुजोरा देत म्हणाली. मनात मात्र म्हणत होती हे माझ्या नवऱ्याला कुणी पटवून द्यावं. सरांची भेट झाली असती तर... पण हे बोधामृत ज्यांना हवं त्यांना कुठे मिळतंय. कलानंद सुद्धा घेणं आयुष्यात गरजेचं असतं. मानसिक कुपोषण होतंय आधी जगण्यासाठी, भाकरी मिळवण्यासाठी कलेकडं दुर्लक्षं केलं. नव्हे तें रिकामटेकडे उद्योग समजून बाजूलाच टाकले. आता बऱ्यापैकी आर्थिक स्थैर्य आहे तरी उपेक्षा. हे कुपोषण नाही का? पण कोण कुणाला समजवणार? सर चिंत्र बघता बघता टीका टिप्पणी करत होते. ते म्हणाले, “बघ आता अशा प्रदर्शनामुळे, प्रसिद्धी मिळतेच. आणखी वाव मिळत गेला की आपली कला विकसीत होते. पूर्णत्वाला पोहचण्यासाठी सतत धडपड केलीच पाहिजे.”

“हो सर” ती भारावून ऐकत होती. नंतर तिनं सरांना बसायला सांगितले. चिवडा आणि नारळाच्या वड्या सगळ्यांना दिल्या. चहा मागवला. सर म्हणाले, “अथर्वची भेट झाली असती तर बरं वाटलं असतं. हे एवढ्यावरच तू भागवतेस त्यांना पार्टी मागता आली असती.”

“पार्टी पण देऊ की. नक्कीच.”

“वड्या बाकी छानच झाल्यात. याही कलेत तू पारंगत आहेस.”

“नाही सर. बाहेरून आणल्यात. आणखी देऊ”

“बस. बस. पुरे आता. मी निघतो ही पोरं आहेत तुला मदत करायला.” सर गेले.

मुलं आणि ती एवढेच चित्रांसोबत. बाहेरचं अजून तरी कोणी नव्हतं. तिनं खाण्यापिण्याचं मुलांकडे सोपवून दमली-भागली खुर्चीत डोळे मिटून बसून राहिली. येतील कोणी बघायला? तिचा जीव कुरतडू लागला. खेळ तर मांडलाय, पसारा घातलाय. काय होईल? कॉलेजातल्या अभ्यासाव्यतिरिक्त पहिलं चित्रं काढलेलं पावडर शेडिंगचे. वर्गातल्या सगळ्यांनीच ठरवलं

सुट्टीत असं काम करायचं. नितीनने बाळाचे काढले. आपण आदिवासी स्त्रीचं काढलं. मैत्रिणीला प्रेझेंट द्यावं म्हटलं तर बाबांनी नाहीच देऊ दिलं. अशा कौतुकाने वॉटरकलर, ऑइलपेंट, पोस्टल कलर अशी कितीतरी चित्रं काढत गेले. बाबा म्हणाले, ''लग्नात तुझ्या रुकवतात फक्त पेंटिंग्ज ठेवू या.'' पण सगळंच दिलं न् चित्रांना हॉलमध्ये जागाच नव्हती. पुढे संसारात किती स्थान उरलं आपल्या चित्रकलेला. बाबांना किती कौतुक. म्हणायचे, ''तुला असा श्रीमंत नवरा मिळवून देतो; तू कशाची काळजी न करता फक्त पेंटिंग्ज करत राहायचं.'' त्यांनी शोधला श्रीमंत, सुंदर सुद्धा नवरा. संघर्षच नाही. अशी फुलते का कला? खरं तर अथर्वने आपली चित्रं पाहिली न् आपण सुंदर नसताना पसंत केलं. तेव्हा वाटलं होतं किती कलारसिक हा ! आपल्या कलेचे चीज होईल. पण ह्याचे प्रणयातले रंग सोडले तर बाकी रंगाचे अज्ञानच. पैसा असला की सगळ्या गोष्टी मिळवता येतात हे त्याचं तत्त्वज्ञान. म्हणे, ''पैसा आहे तर सगळं आहे. बघ तुझ्यासारखी कलाकार बायको मिळविली की नाही.'' म्हणजे विकत शोभेच्या वस्तू घेऊन घर सजवतात तसं ह्यानं ह्याचं आयुष्य सजवलं. तन्वीनं एकदा वैतागून त्याला विचारलं होतं, ''तुझ्यासारख्याला परीसारखी बायको मिळाली असती. चित्रातले काही कळत नाही तर का केलंस माझ्याशी लग्न?''

''मी वरवरच्या सौंदर्याला भुलणारा नाही. मनस्वी आहे, रसिक आहे. हेच तर सगळ्यांना दाखवायचं असतं.'' तिला प्रेमाने जवळ घेत अगदी खरंखुरं म्हणाला, ''कलाकारावर परमेश्वराची कृपा असते. एवढं तरी नक्की आहे. आणि असा कृपावंत कोण डावलेल?'' तिला मिठीत घेत अथर्व असं म्हणताना भावूक झाला. तन्वी त्याच्या मिठीत विरघळून गेली. याच एका क्षणाभोवती आयुष्य फिरू लागलेय. पक्का बिझनेस

माइंडेड. शब्दात खेळणे, झुलवणे त्याला छान जमते. आपल्याला त्याच्यासारखं लाघवी बोलणं नाही जमत. त्यामुळे मित्र–मैत्रिणी पण कमीच. लग्न झाल्यापासून तर तसं फार जवळचं कोणीच नाही. आता येतील का लोक? तिला वाटलं येतील नक्की येतील. नामवंत येतील. श्रीमंत येतील. आपले पेंटिंग्ज खरेदी करतील. रंग ब्रश आणायला गेलं तरी दुकानदार आधी आपली दखल घेईल. थोडीफार सवलतसुद्धा देईल. म्हणेल, "मॅडम, आमच्या दुकानात ठेवा तुमची चित्रं विकायला." सोसायटीतली ती आशा काय भाव खाते हिऱ्यांचे दागिने चमकवते गाडी तर अशी चालवते की जगात तीच एकटी इंडिगो चालवणारी आहे. तुच्छतेने बघते आपल्याकडे. आता प्रसिद्धीमुळे तिचा आपल्याकडे पाहण्याचा लूक बदलेल. ती मंदाकिनी तर भिशीत पण घेत नाही. आपल्याशेजारी नवीन आलेल्या स्मार्ट सुजाताला लगेच घेतले. पण आपल्याला कधीच तिनं विचारलं नाही. अर्थात मिशीची हौस कुणालाय पण असं निग्लेट केलं की दुःख होतंच की ! अथर्वने कुठं गेला की हिऱ्यामाणकांचे दागिने, ड्रेसेस काय कमी आणलेत? पण शोभत नाही. तर उगाच बुजगावण्यासारखं का दिसायचं. अथर्वने आपल्या गबाळ्यापणात गोड मानून घेतलं की त्याला तेवढा विचारच करावासा वाटत नाही. राहा कशीही. तन्वी तरंगत होती. तिला वडणगेकरांची आठवण आली. त्यांचे ते मनावर कोरलेले वाक्य, 'कॉपी करू नका. तुमचे विचार, भावना दिसू देत. पिकासो काहीही काढतो असं समजू नका. त्यानं चित्रकला आत्मसात केलेली होती. त्याला त्याच्या भावना रंगरेषांतून स्पष्टपणे व्यक्त करता येत होत्या. तेवढ्याच करायचा. अभ्यासाने आपल्याला हवं तेवढंच व्यक्त करता येतं. फापटपसारा टाळला जातो आपोआपच. सहजता येते. मनातले सूक्ष्म तरंग प्रकट होण्यासाठी अभ्यासाबरोबर ढोरमेहनत हवी. खूप वाचा, कष्ट करा, स्वतःला हजारो प्रश्न विचारा. समोरचा

माणूस आपल्यापेक्षा सुजाण असतो, शहाणा असतो. त्याला मूर्ख समजू नका.' ती खाडकन जमिनीवर आपटली. खाड... खाड... खाड... चाबकाचे फटकारे बसल्याप्रमाणे तिचे अंर्तमन पिळवटून निघाले. मनोहर सर म्हणायचे, "आधी दुःख सोसा, मग ते मांडण्याचा प्रयत्न करा." अपमान, उपेक्षा, अवहेलना, दुर्लक्ष याचे दुःख काय कमी असते? ते मांडण्याचा प्रयत्नही केलाय. पण हे सगळं कसं उतरलं आहे ते कळणार कसं? दुसऱ्यांना दाखवून प्रतिक्रिया अजमावण्याची ओढ का वाटते? खरं कौतुकाचीच अपेक्षा असते. का वाटतं सगळ्यांनी कौतुक करावं? ह्या सन्मान हौसेपोटी मग आपण मनासारखं जगू शकत नाही. कौतुकापेक्षा फटकारणे जमिनीवर स्थिर ठेवते. दुसऱ्यांचा सहानुभूतीने विचार करायला शिकविते. अपण काही थोर कलाकार नाही आहोत... आपली लायकीच नाही. तन्वीला खूप एकाकी वाटू लागले. बाबांच्या कुशीत शिरून रडावंसं वाटत होतं. मग बाबांचे बोल आठवतात अशा वेळी, "आपलं आपण खंबीर असावं." खंबीरपणा कसा येईल? कसं होईल मन घट्ट, निगरगट्ट? सारखं असं आतल्या आत ढासळल्यासारखं वाटतंय. ती बरीचशी भानावर आली. मुलांच्या गप्पा चाललेल्या. अश्विनी जोक सांगत होती, "एका माणसाला दुसऱ्या माणसाचा मेंदू बसवायचा होता. एक पुरुषाचा होता. एक बाईचा त्याच्या बायकोला, डॉक्टरला विचारलं." तर बायको म्हणाली, "बाईचा बसवा म्हणजे नवरेगिरी करणार नाही." फॅमिली डॉक्टरही म्हणाले, "बाईचा बसवलेला बरा. तो वापरलेला असतो. वापरण्याची सवय असते." तो जोक ऐकून बऱ्याच वेळाने तन्वी हसू लागली. ती एकदम हसू लागल्यामुळे मुले चपापली. गप्प झाली. ती उठून त्यांच्याकडे गेली. "अगं छान जोक सांगितला." नितीनच्या डोक्यात टपली मारत म्हणाली, "बघ पुरुषांना मेंदू वापरायची सवयच नसते; हे डॉक्टरही मान्य करतात."

"असं काय नाही हं मॅम." नितीन हिरमुसला. तन्वी मात्र खुसखुसतच होती. तिच्या मनावरची मरगळ गेली. किशोरी आमोणकरची मंद सुरावट वाजत होती. कोणीच येत नव्हतं. जेवणाची वेळ झालेली. आता दुपारी कोण येणारेय? तिनं मुलांना पैसे देऊन हॉटेलात जेवायला पाठवलं.

"ए आता माघारी नको ना यायला?" अभिजीत.

"हो ना कॉलेजच्या वेळेपुरतं ठीकंय. घरच्यांना सांगितलं नाही. मी तर जाणार बाबा घरी." स्वप्नाली.

"बोअर होतंय. मॅम, काही बोलतच नाहीत मी पण नाही माघारी येत. उद्या येऊ." अश्विनी.

"सर ओरडतील आणि बघायला लोक सहानंतरच शक्यतो येतात. त्यामुळे मी तरी येणार." सतीश. मुलांच्या कॉमेंटस् तन्वीला ऐकायला येत होत्या. पण तिनं दुर्लक्ष केलं. आले माघारी तरी चालेल नाही आले तरी काही बिघडत नाही. घरात एकटेच असतो तसे इथे! तेवढ्यात स्वप्नाली पळत आली आणि तन्वीला म्हणाली,

"मॅम, तुमच्यासाठी पार्सल आणतो. काय आणू?"

"आणतेस? मला पण भूक लागलीय. वडापाव आण." ते ऐकून स्वप्नाली बघत राहिली. तन्वी म्हणाली, "अगं खूप दिवसांत खाल्ला नाही. पोरांच्यामुळे कॉलेजचे दिवस जागे झाले. तशी वडापाव खाण्याची इच्छापण. दोन घेऊन ये. आणि तू जा नंतर घरी." स्वप्नाली पळाली. सख्खा नवरा येत नाही अन् मुलांवर का हक्क दाखवायचा? गेटबाहेर पडतानाच मुलांना एक तरुण जीन्स, टीशर्ट हातात बॅग असा तरतरीत उंच गोरापान आत जाताना दिसला. सतीशने अंदाज घेतला तो प्रदर्शन बघायलाच आला असावा. सतीश त्यांच्याकडे गेला. त्या दोघांचं काही बोलणं झालं.

"या इकडं" सतीश म्हणाला. तो उत्साहाने पायऱ्या चढू लागला. मुलं वैतागून घुटमळली.

"फारच शांत वाटतंय." तो म्हणाला.

"हो दुपार आहे ना." सतीशनं त्यांना आत नेलं. तन्वी फुलांतल्या सुकलेल्या पाकळ्या काढत होती. तिनं आवाजाच्या दिशेनं बघितलं. दुपारच्या वेळी हा कोण पाहुणा? बरं मुलं आहेत तोवर आला. तिला बाईपणाची जाणीव झाली. मुलं त्याच्याबरोबर बडबडत चालत होती. पण त्याचं मुलांच्या चिवचिवाटाकडे लक्षच नव्हतं. तो चित्रांचं सूक्ष्म निरीक्षण करीत होता. मध्येच काहीतरी पुटपुटायचा. तन्वी त्याला पाठमोरा बघत होती. हा साहील तर नव्हे? छे तो कशाला येईल इकडे? त्याला कळायचं तरी काय कारण? साहील! अजून मनातनं नाहीच जात. ती वहीत काहीतरी लिहिण्याचा प्रयत्न करू लागली. लिहिण्यापेक्षा रेघोट्याच ओढण्यावर भर. रेघोट्या ओढणं म्हणजे रियाजच. कॉलेजमध्ये पहिल्या दिवशी सरांनी पेपरवर उभ्या-आडव्या तिरक्या, वाकड्या वाट्टेल तशा रेघा ओढायला सांगितल्या. म्हणाले, "हा हातांचा रियाज आहे. हात पक्का होण्यासाठी दोन महिने तरी एवढा रियाज हवाच." केवढं बोअर व्हायचं. आधीच ॲडमिशन उशिरा नंतर दीड महिन्याने कॉलेजात गेलेले. त्यात हा रियाज.

"हॅलो मॅडम." तो टेबलासमोर उभा राहिला.

"अरेऽ खरंच की तू?" ती आनंदाश्चर्याने ओरडली.

"म्हणजे एवढा वेळ खोटा वाटत होतो की काय?"

"मला वाटलं भासच झाला की काय?" मुलांना वाटले हे तर ओळखीचेच निघाले. आता जायला हरकत नाही.

"मॅम" सतीश विचारू लागला.

"हो अरे जावा तुम्ही. दोन चहा पाठवून द्या. जाता जाता. दुपारच्या शांत वेळी, एकांत म्हणावा अशी सामसूम आणि साहील समोर... तन्वीच्या मनातले कारंजे थुईथुई उसळत होते. तिला हे सत्य की स्वप्न कळेना. भास तर नसेल. नाही. भास नाही, साहीलच आहे. साक्षात, पूर्ण साहीलच!"

"बस ना." ती म्हणाली. "इकडे कसा काय?"

"यालाच टेलिपथी म्हणतात." तो खुर्चीत बसत म्हणाला.

"उगाच चेष्टा नको. एक्झिबिशनचे कसे कळले?"

"म्हटलं आलोच आहोत कोल्हापुरात तर जाता जाता जावं बघून. इथे काहीना काही असतंच. म्हणून."

"मला वाटलं सकाळमधला लेख वाचलास?"

"आजचा पेपर कुठे बघितला?"

"मग?"

"जाऊ दे ते महत्त्वाचे नाही. तू नाव बीव बदललेस?"

तिनं नुसती मान हालवली वहीशी चाळा करत, खाली नजर.

"जोरात चाललंय की तुझं?" तिला खुलवण्यासाठी तो.

"प्रदर्शन भरलं की जोरात चालतं की काय? बघतोयस ना तू. एवढ्या मोठ्या हॉलमध्ये बघायलाच कोणी नाही."

"म्हणजे मी कोणीच नाही? चला फुटावं आपलं?" तो उठला.

"बस रे." तिनं पटकन त्याचा हात पकडला. अजिजीनं. थोड्या हक्काने.

"तुझं ऐकायचं काय कारण? काय संबंध?" चिडून तो.

"बोलावल्यासारखा आलास. ज्यांना आमंत्रण दिली ते फिरकतही नाहीत. रसिक म्हणून की सुहृद? मला तर काय बोलावं तेच सुचत नाही." तो बसून स्थिरावल्यावर म्हणाली, "कशी वाटली पेंटिंग्ज. तुझ्या पासंगालाही पुरणार नाहीत... पण." तिनं आशाळभूतपणे विचारलं.

"छान आहेत." साहील टेबलावर कोपर टेकवून उभ्या केलेल्या हातांच्या मुठीनं हनुवटीला आधार देऊन तिच्याकडे बघत बसला.

"हे काही खरं उत्तर नव्हे. खरं खरं सांग मी हा उद्योग केलाय त्या योग्यतेची आहेत का? एखादं तरी?" तन्वी काकुळतीनं त्याच्याकडे बघू लागली.

"तू ठरवशील तीच तुझ्या निर्मितीची योग्यता." तो.

तन्वी टेबलक्लॉथवरच्या पानाफुलांची नक्षी निरखू लागली.

"कशी आहेस?" तिच्यावर रागावणं नाहीच जमलं त्याला. ती दुखावली. आपण दुखावलं ना याला. मग हा सूड उगवायची संधी मिळालीय तर का सोडेल तो? "तुला कशी दिसते?" तिने शांतपणे प्रतिप्रश्न केला.

"नेहमीसारखीच. हट्टी म्हणूनच सुंदर."

"सुंदर? मी?" ती मोठ्याने हसली चेहरा वर करून. त्यामुळे तिच्या डोळ्यांतले पाणी त्याला दिसणार नाही असं तिला वाटलं. पण तो एवढं आरपार न्याहाळत होता काहीच लपवता येत नव्हतं...

"तू कसा आहेस? लग्न झाल्याचे कळले." तिच्या विचारण्याने तो भानावर येत म्हणाला,

"हो मुलगी झालीय. त्यासाठीच कोल्हापुरात आलोय."

"ओऽ" तिच्या काळजात कळ उठली. थोडा वेळ कोणीच काही बोलले नाही. मग साहीलच म्हणाला,

"चल निघतो."

"अरे असं कसं चहा प्याल्याशिवाय कसा जातोस? येईलच आता. आणि वडापाव सुद्धा."

"जेवूनच निघालो होतो. सासुरवाडीचा पाहुणचार जडच झालाय." त्याचे सुस्तावलेले बोलणे ऐकून हा अगदी मजेत आहे, संसारात रमलाय तिला वाटलं. ती म्हणाली.

''एवढा जड झालाय तर थांब, मला मदत कर.''

''बाप रेऽ माझी बायको सोडचिठ्ठी देईल.''

''ती बाळातच दंग असेल. तिला आता तुझी काय गरज?''

''हूं'' त्याला ती थकलेली आठवली. सारखं कोणीतरी येत-जात होतं. बाळ उठणार, रडणार बरंच काय काय त्याचं चाललेलं असायचं. तेवढ्यातनं अगदी थोडा वेळ ती कसंतरी बोलायची.

''राहा ना रे आमच्याकडे. खुप गप्पा मारायच्यात. पोटभर. किती दिवसांत मी सलग दोन मिनिटेसुद्धा बोलले नाही. कुणाशी गप्पाच मारता येत नाहीत रे.''

''मग हे काय आहे?'' त्याने पेंटिंग्जकडे हात फेकत म्हटले.

''ह्या गप्पा वाटतात तुला?''

''हो ऽ स्वतःशीच मारलेल्या गप्पा.''

''किती सोपं करून सांगितलंस. मग ह्या गप्पा कशा आहेत हे विचारणंही मूर्खपणाच की.''

''तर काय. ही सवयच आहे. तुला. सतत दुसऱ्यांनी प्रतिक्रिया द्यावी; तीही पॉझिटिव्हच असंच वाटतं तुला.''

''माझ्यात मॅच्युरिटीच नाही एवढी.''

''असू दे, काही लोक लहानपणीच मोठं होतात तर काही नुसतेच वयाने वाढत असतात.'' चेष्टेने हसत तो.

''मी काय करणार'' वरती बोट दाखवत. ''त्यानेच तसा प्रोग्रॅम फीड केलाय ना माझ्या मेंदूत. माझं बसकं नाक तो सरळ धारदार करू शकत नाही, तसंच हे.''

''मग कशाला काढायची चित्रं?''

''काय करू रे, असं काही केलं नाही की आपण जगतच नाही वाटतं. खूप बैचेन, अस्वस्थ वाटत राहातं. भुईला भार. काही रंगवत राहिलं

की टॉनिक मिळाल्यासारखं मन उत्साही राहाते... चित्र समोर असताना त्यात रंग भरताना माझी मी नसतेच... पूर्ण झाल्यावर मात्र सारखं वाटतं कुणीतरी बघावं... दखल घ्यावी."

"हेच ते कशाला कुणी दखल घ्यायला हवी? खूप लोक आहेत. कलाकार, रसिक, सगळ्यांनी सगळ्यांची दखल घेणं कसं शक्य आहे? व्यवहारी विचार सांगतो. फ्रेंडसर्कल मोठं पाहिजे. ते जेवढं मोठं करशील तेवढं टीका आणि कौतुक जास्ती."

"तुझ्यासारखा विचार नाही करता येत. असं नीट कुणी सांगतच नाही. सगळे उडवून लावतात. मग मीही जशास तसे वागते."

"जरा म्हशीचं दूध पी, कट्ट्यावरचं कोरं. तांबडा, पांढरा रस्सा ओरप म्हणजे जड झाल्यावर कुणी उडवून लावणार नाहीत."

"मग खड्ड्यात घालतील." दोघे हसतात. ती मोकळी होते. "ए थांब रे किती दिवसांनी भेटलास." साहीलला तिचं म्हणणं मोडवेना. हवंच होतं त्याला खूप काही बोलायचं होतं, विचारायचं होतं, भिरभिरणारा वावटळीसारखा प्रश्न मेंदूचा पाचोळा करत होता. उकल करायची होती. चहा आलेला दोघांनी घेतला. पाच वाजून गेले. लोक येऊ लागले. तन्वी तशीच बसून राहिली. मग तोच उठला लोकांना डेमोस्ट्रेशन देऊ लागला. त्याचे ते बोल ऐकायला तीही त्याच्या मागे मागे चालू लागली. स्वतःच्याच चित्रांची नव्याने ओळख होऊ लागली तिला. त्याचे शब्द फुलांसारखे कानांत साठवत होती ती. तीच फुले तिचं हृदय पिळवटून काढीत होती. निव्वळ फालतू अहंकारापायी केवढी मोठी चूक केली आपण... ही चूक वॉटरकलरच्या पेंटिंग्जप्रमाणे कधीही दुरुस्त करता येणार नाही. ती उदासली. खुर्चीत येऊन बसली. एक जण येत होते. गर्दी वाटेल एवढे लोक येत जात होते. अंधार पडू लागलेला. गर्दी पाहून तिची उदासी कमी झाली. साहीलही

आपलेपणाने बोलत होता. त्याच्या शब्दाशब्दांतून चित्रांचं कौतुक होत होतं. तीही लोकांच्या प्रश्नांना उत्तरे देऊ लागली. तेवढ्यात अथर्व आला. तिच्या खुर्चीत धप्पदिशी आदळला. तन्वी रागातच त्याच्याकडे गेली.

"ए किती वेळ अजून?" तो वैतागून म्हणाला.

"अरे, नऊ तरी वाजू देत. आता तर गर्दी वाढायला लागलीय. सकाळी नाहीसच आला तू." तिचा दुखावला आवाज.

"ते जाऊ दे. मला उद्या मीटिंग आहे मुंबईला सकाळीच. आताच निघावं लागेल. मी बॅग भरून जातो."

"अरे, अरं जरा थांब ना. साहील आलाय बघ ना, ओळख करून देते." तिनं अथर्वला ओढतच साहीलकडे नेले. अथर्व आणि साहील हस्तांदोलन करतात.

"बरं झालं तुम्ही आलात. आपली ओळख झाली. पण मला लगेच निघायचंय मुंबईला जायचंय."

"मलाही जायचंय. आपण निघू की बरोबरच."

"तुम्ही दोघेही मला सोडून जाणार?" तन्वी रडवेली.

"तुम्ही राहा. तन्वी छान बिर्याणी करते. प्लीज तिला सांभाळा." अथर्वने तिच्या नकळत त्याला डोळा मिचकावत त्याच्या पाठीवर थोपटत म्हटले.

"ठीकाय." साहील म्हणाला.

"थँक्यू." असं म्हणत अथर्व गेलाही. तन्वी खूप चिडली.

"बघ असा आहे हा. ह्याच्या बिझनेसपुढे माझी काय किंमत?"

"आपणच आपली किंमत कमी करतो असं अवलंबून राहाण्यानं."

साहील पुन्हा लोकांच्यात मिसळला. ह्यात माझं काय चुकलं? मी कशी केली किंमत कमी, माझीच? तन्वीला प्रश्न पडला. सकाळी तो

आला नाही... जाऊ दे. ती मग साहीलच्या मागे मागे चालत राहिली. तरी अथर्वचा तिच्या मनातला राग सारखा उफाळून येत होता. याच्या भरंवशावर काही करूच नये. नाही लागत हाताशी तर गेला उडत... छे, छे नवरा आहे तो... नवऱ्याबद्दल असे विचार मनात येणंही महापाप. तिला पतिव्रता आई आठवली. अथर्वला तर मिरवायला आवडतं, पण बायकोचं कौतुक ऐकत, करत कशाला मिरवेल? आणि हा साहील... आपल्या उद्धटपणाची फळं आहेत झालं.

साडेनऊपर्यंत लोकांची वर्दळ संपली. मग दोघांनी आवराआवर करत शटर बंद केलं न् निघाले.

"तन्वी, तुझा नवरा मुंबईला गेला. तू एकटीच का घरी?"

"हो. अजून तिसरं कोणी नाही आलेलं."

"मग मी जातो शम्मीकाकडे."

"का रे? माझी भीती वाटते की काय?" ती आश्चर्याने म्हणाली. दोघं रिक्षा स्टॅण्डकडे चालत निघाली.

"तुझीच का माझीही वाटतेय."

"चल. आई नेहमी म्हणते, आपल्या मनात वाईट विचार आले नाहीत तर दुसऱ्यांच्याही येत नाहीत. सावध असावं, बस."

"आणि तुझे बाबा म्हणायचे खंबीर असावे." तिची जुनी सवय आणि बोल त्याने ऐकवले. दोघेही खळखळून हसले. रिक्षा स्टॅण्ड आला. दोघे बसले. रिक्षाच्या घरघराटात दोघेही गप्प झाले. जरा वेळाने तिनं त्याचा हात हातात घेऊन, 'थॅंक्स.' म्हटलं. तो कोरडेपणाने म्हणाला, "वेलकम. ओ.के." तिनं हात काढून घेतला. पुन्हा शांतता. रिक्षा घराकडे धावत होती. दोघांची मने भूतकाळाकडे पळत होती. तिला पहिली भेट वगैरे आठवत नव्हतं. पण सरांनी सांगितलेला रियाज ती

मनापासून करायची. तेव्हा तो अशीच टिंगल टवाळी करत फिरताना तिच्याजवळ आला. ''सरांनी सांगितले न् तू करतेस. येऽ करत मोठ्याने हसला.''

''मग? मी उशिरा आलेय ना? तुझा झाला असेल.''

''हातात दम असला म्हणजे झाले. बिनधास्त फटकारे मारायचे. रियाज म्हणे...'' ती तर गुंग होऊनच बघत राहिली त्याच्याकडे. पण तो गेलाही होता. तन्वीची असाईनमेंट नेहमीच मागे राहायची. रंगरेषा सावकाश काम चालायचे. तो वर्गातच पूर्ण करायचा. पहिल्याच दिवशी. मग टवाळी करत फिरायचा. एकदा तन्वी जाम वैतागली. सर्दीनं नाक गळत होतं. तिनं त्याला विचारलं, 'दे ना एवढी असाइनमेंट करून.'' त्याने लगेच मनापासून केली. थोडं काम शिल्लक राहिलं तर घरी नेतो म्हणाला. उद्या पूर्ण करून आणतो. मग खूपदा असं होऊ लागलं. ससा कासवाची जोडी कॉलेजात फेमस झाली. बाकीच्या मुली साहीलच्या मागे लागत तेव्हा तो तन्वीला म्हणायचा, 'तुझं देतो ना करून कुणाला सांगत जाऊ नकोस. तुझ्यामुळे माझं काम वाढलंय.' 'पण प्रॅक्टिसमुळे चांगलंही होतंय. तसा केला नाहीस ना रियाज तर असा कर. पुण्य मिळेल.'

''त्याने काय होईल?''

''तू सुखात राहशील.''

''सुखात तर मी आता आहेच.'' असं बरंच काही ते बोलत राहात. बडबडत. एकदा तन्वी आजारी झाल्यामुळे पंधरा दिवस कॉलेजात गेलीच नाही. साहील घरी तिला भेटून गेला. तेव्हापासून आईही त्याच्याबद्दल विचारायची. नंतर अभ्यास राहिल्यावर त्याच्याशिवाय कोणंय? फाइल जमा करायची मुदत तर दोन दिवसांवर आलेली. तो म्हणाला, ''मी थोडीफार मदत करीन.'' पण पूर्ण फाइल कशी होणार? त्याला घरी

बोलवावं तर स्पेशल रूमही नव्हती मग तिनंच त्याच्या रूमवर जायचं ठरवलं. आईला म्हणाली, "साहील मदत करणारेय. हेमापण बरोबर आहे." आईनं जा म्हणून सांगितलं. तेव्हा रात्रभर दोघेच बसलेले. त्याचे पार्टनर आतल्या खोलीत झोपलेले. हे दोघे बाहेर. पण त्यांना असाइनमेंटशिवाय दुसरं काही दिसत नव्हतं, सुचत नव्हतं. तन्वीला वाटलं आपली तर ती गरज होती. पण साहीलसुद्धा किती निरागस राहिला. मग त्याची कधी भीती वाटलीच नाही. काश्मीरला ट्रिप गेली तेव्हा मग आमचा ग्रुपकेअर म्हणून तोच होता. तो जवळ असलं की कसं बिनधास्त वाटायचं. आईला तिनं सांगितलं तेव्हा-ती तसं म्हणाली, "आता तो राहील तसाच? आपण तरी..." तिचा स्वतःचाच विश्वास वाटेनासा झाला.

साहीलला आठवलं पहिल्या वर्षी तन्वी उशिराच कॉलेजात आली. पंचवीस तर मुलं होती. सगळ्यांची ओळख झालेली. ही आली काळीसावळी तरी शिष्टासारखी एकटीच बसून राहायची. तिच्या लांबसडक वेणीकडे मात्र बघत राहावं वाटायचं. ऐटदार चालणं आणि जाडजूड वेणी तिला पाठमोरं न्याहाळत राहायचो आपण. आयुष्यात ती पाठमोरीच राहिली. कुणाचीच गरज नसल्यासारखी वागणारी आपल्याशी मात्र मऊ वागायची. तिनं तसंच वागावं, बोलावं म्हणून तिच्या असाइनमेंट पूर्ण करून द्यायचो आपण. खूप जमायचं. ओळख, मैत्री, आपुलकीचं रूपांतर प्रेमात झालं. असं वाटायचं तिच्याशिवाय जगूच शकणार नाही. घरातले ओरडायचे. तू कसा ती कशी... मग तिनंच नाही म्हटलं... का तस केलं तिनं तिला जाब विचारायचाय...

रिक्षा थांबली. तन्वीने पैसे देऊन उतरली. दोघेही जिना चढू लागले. दुसरा मजला गाठेपर्यंत साहील दमला. "कोल्हापुरात लिफ्ट का बसवत नाहीत हे बिल्डर लोक?"

''म्हशीचं कोरं दूध पचवायचं असेल तर असे जिने चढायलाच हवेत. म्हणजे पोटं वाढत नाहीत.'' ती त्याच्या फुगलेल्या पोटाकडे बघत म्हणाली.

''मी जातो रोज जॉगिंगला. लग्न झाल्यापासूनच जमत नाही.''

''वाऽ वाऽ काय कारणं सांगतोस.'' तिनं दार उघडलं.

''फारच वर मिळाला. पण हवेशीर आहे. मागे राजवाडा दिसतोय बघ. इकडे ये. ते बघ वडणगे गाव त्याच्या अलिकडे नदी वाहाते पंचगंगा. तुला माहित्येय. आम्ही राहायला आलो त्यावर्षी खूप पाऊस पडला. नदीचं पाणी इथे ग्राउंडवर आलं. तेव्हा वाटलं, बरं झालं वरतीच फ्लॅट घेतला.''

''तुला भेटायला आली असेल गंगा.''

''काहीतरीच. चार-पाच वर्षांनी असा मोठा पूर येतोच.''

''खरंच गं तुझ्या जलरंगाला भेटायलाच आली असेल पंचगंगा.''

''बरं असू दे. तू असा विचार केल्यामुळे मला फार पवित्र वाटू लागलंय. मन पवित्र झालं तरी देहाला शुद्ध करायला मी आधी जाते बाथरूमात.'' साहील अलिशान सोफ्यावर बसला. फ्लॅट छान सजवला होता. कॉलेजात असताना एक असाइनमेंट नीट न जमलेली. पानसुपारी, घंटी अन् गणपती. ती फ्रेम करून तिनं पूर्वेला लावलेली. तन्वी फ्रेश होऊन किचनमध्ये गेली. जाता जाता त्याला म्हणाली, ''साहील हातपाय तोंड धुऊन घे रे. मी जेवणाचं बघते.'' ती त्याच्याशी, स्वतःशी बोलत होती. ''हा अथर्व बघ नीट जेवलाही नाही. सगळं उघडंच ठेवून गेलाय. तिनं पातेलं गॅसवर ठेवलं. वरणभात तरी ताजा करावा म्हणून कुकर लावला. मग बेडरूममध्ये गेली. ''बघ केवढी कपडे टाकलीयत. बायको आहे फुकटची मोलकरीण सगळं आवरायला.'' तिची बडबड चालली होती. कुकरची शिट्टी वाजत होती. साहील फ्रेश होऊन किचनमध्ये डायनिंग टेबलाशी येऊन बसला.

"कसला बिझनेस करतो गं तुझा नवरा मिन्स अथर्वसाहेब."

"वाइनचा छोटा कारखाना आहे. सध्या मंदी आहे ना, टेन्शनमध्येच असतो. दोन वेळा फ्रान्सला जाऊन आला. फॉरेनला जाते वाइन. पण मंदीमुळे डिस्टर्ब झालाय. सत्तरलाखांचं कर्ज आहे."

"बापरे, मग?"

"जेवढं कर्ज अधिक तेवढा बिझनेस यशस्वी." तिनं वरणभात टेबलवर ठेवले. सकाळच्या चपात्या न् भाजी होतीच.

"आता दमलेय रे. उद्या सोमवार आहे पण तरी बिर्याणी करेन. आता याच्यावरच भागव."

"असू दे. तशी भूक नाहीच."

"मला मात्र खूप लागलीय. सध्या तू काय करतोस?"

"मुंबईत ॲड एजन्सीत जॉब करतोय. पोस्टग्रॅज्युएशन करण्याचा विचार आहे. फॉरेनला चान्स मिळेल."

"संसार करता करता एवढं जमतं सगळं?"

"संसार शम्मीका सांभाळते. ती हुशारेय. मला पण नीट सांभाळते."

"लवकर सेटल झालास."

"तू पण झालीसच की."

"लग्न झालं की सेटल झालं असं थोडंचंय? आपल्या मनासारखं जगता आलं तर म्हणावं तसं. भात घे ना. तूप घे. मी घरीच केलंय."

"तुझ्या मनाविरूद्ध काययेय?"

"आज जे हवं ते उद्या चुकीचं वाटतं मग कुणाचा आधार हवासा वाटतो."

"तुला भक्कम आधार मिळालाय."

“तो तर टिकतच नाही माझ्याजवळ...”

“तुझ्या तक्रारीच फार असतात.”

“तसा तो फार चांगलाय रे पण माझ्या वाट्यालाच येत नाही. मन भरतच नाही.”

“मला वाटतं तसं. पण कामाच्या धबडग्यात विचारच करत नाही. एवढा. त्यामुळे मी खूश आहे.”

“तुम्ही पुरुष असेच रे.”

“शेवटी पुरुषाबरोबरच केलंस ना लग्न.”

“काहीही काय बोलतोस?”

“ऐन वेळी धोका दिलास?”

“अरे तुप घेतलेच नाहीस बघ. मी वाढते.”

“लोणी नाही म्हणून तूप लावू नकोस. का नकार दिलास?”

“मी तर आहेच हट्टी. तू तरी कुठे आलास नंतर विचारायला, मनवायला?”

“एकदा ठोकरलं तरी?”

“प्रेम होतं ना?” तन्वी उठली. तिनं ताट बेसिनमध्ये ठेवलं. हात धुऊन गॅसवर दूध उकळायला ठेवलं.

“तुझा नकार ऐकल्यावर तुझं तोंड बघायची सुद्धा इच्छा नव्हती कधीच. आता चुकून आलो न्...” त्याने ताट उचलून ठेवले. हात धुतले. तन्वीने सगळं झाकून ठेवलं. उकळलेलं दूध दोन मगांत ओतलं त्यात साखर कॉफी अन् चमचे घालून हातात मग घेऊन आली. त्याच्याशेजारीच बसली. “घे ना कॉफी. म्हशीच्या ताज्या दुधाची आहे.”

“आधी सांग का दिलास नकार?”

“आता भांडणार आहेस का?”

"मग काय जीव द्यायला हवा होता का?" साहीलचा चेहरा लाल काळा झाला. डोळे वाहू लागले. "फार निष्ठूर आहेस तू." तो. तन्वीने त्याचे डोळे पुसले.

"चल दोघेही जीव देऊ एक दुजे के लिए."

"चेष्टा सुचते तुला." तो तिच्या कुशीत डोकं खुपसून हमसून रडू लागला. ती रडत रडत म्हणाली.

"खरंच चुकले रे मी. चुकाच करत आले. वाट्टेल ती शिक्षा दे." ती त्याच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाली.

"तुझी शिक्षा ती माझीच नाही का?"

"मागंच विसरून जाऊ रे."

"सांग ना, का दिलास नकार?" तिचे हात हातात घेत व्याकुळपणे राहील म्हणाला.

"मला वाटलं तू, तुझ्या घरातल्यांनी फिल्डिंग लावलीय. अन् माझा कॅच घेतला. मी बावळटासारखा माझा बळी दिला. असं काहीतरी लक्षात आल्यावर खूप संताप आला."

"दुष्ट आहेस. कशावरून तर्क लढविलास? कॅच काय, बळी काय?"

"तुझा तो मित्र बघ नाव आठवेना. शुभम् तुझ्या रूमवर आलेला तेव्हा तो म्हणाला, साहीलला पोरगी घावली रे घावली. शुभम्ने मला सांगितलं तेव्हाच ठरवलं... मी काय रस्त्यावर पडलीय का घावायला?"

"शिट् कशाचं काय? कुणी काहीही चिडवतात. मुलांच्यात तर काहीही बोलतात. त्याचं एवढं मनावर घ्यायचं? एवढी मोठी चूक? तुला माणसं कळत नाहीत हेच खरं." तन्वीने त्याला मिठीत घेत म्हटलं, "चल दूर कुठेतरी जाऊ" साहील तिच्यावर चुंबनांचा वर्षाव करू लागला. तन्वीला कसंतरी झालं. पुरुषच हा. ती त्याची मिठी सोडवून समोरच्या खुर्चीत जाऊन बसली.

"निघून जाऊ म्हणशील दूर..." साहील म्हणाला.

"मी कुठं तुझ्यासारखी महान कलाकार आहे. दूर कुठे जाणार? तू शम्मीका, बाळापासून की मी अथर्व पासून...?" ती दोघंही नि:शब्द बसून राहिली. कॉफी थंडगार झाली होती. तन्वीनं दोन्ही मग आत नेऊन पातेल्यात पुन्हा गरम करून आणली.

साहीलला वाटलं, काय भंकस आहे. आयुष्य म्हणंजे जलरंगातले चित्रच. एकदा कॅनव्हासवर फटकारा मारला की तो पुसला जाणारच नाही; पोस्टलकलरसारखा. किंवा त्याचे ऑईलपेंटसारखे थरावर थर देता येणार नाहीत.

प्रत्येक फटकाऱ्याचे परिणाम चित्रात दिसतात्च. तन्वीने वॉटरकलरचे फटकारे जोरकस मारले नाहीत पण आयुष्यात असे जोरकस फटकारले आपल्याला..... आता काय...

दोघेही अंतर ठेवून कॉफी पिऊ लागले. मनातली वादळं निरखीत, थोपवीत, विझवीत. तरीही वरवर कसं सगळं स्थिर, नि:शब्द होतं. चित्रासारखं ! वॉटर कलर पेंटिंग !! जलरंगातले !!!

✦ ✦ ✦

# उपयोग

"माझा आता काहीच उपयोग नाही कुणालाच..." असं म्हणत मी ओंकारकडे (माझा मुलगा) बघितले. या वाक्यावर तो काय म्हणतोय वगैरे ऐकायचे होते; पण तो काहीच बोलला नाही. पुस्तकं इकडं तिकडं ठेवताना त्याच्या नाकाचा शेंडा तांबूस झालेला तेवढा बघावं लागलं. कॅम्पला जायच्या त्याच्या आवराआवरीतला उत्साह थोडा उदासला. मग मलाच गिल्टी वाटू लागलं. बाहेर जाताना उगाच असं काही बोललो आपण. कॉलेजला सुट्टी लागल्यापासून हा एनसीसीचे कॅम्प करतोय. तीन दिवस सुट्टीला आलेला. ओंकारचे बाबा नोकरीमुळे महाराष्ट्रभर इकडे तिकडे फिरत असतात. मुलगा लहान होता तेव्हा आम्ही सगळे मिळून

फिरायचो. माझी जाऊ म्हणायची, "सारखं काय ते गबाळं घेऊन या गावांवरून त्या गावाला पारध्यासारखं चाललेलं असतं तुमचं..." ओंकार कॉलेजात गेल्यावर त्याला हॉस्टेलवर ठेवण्याची ह्यांची तयारी नव्हती. मुलं भावनिकदृष्ट्या दुरावतात, बिघडतातही वगैरे ह्यांचं तत्त्वज्ञान. त्यांना वाटलं मुलगा पुण्यात ठेवावा, त्याची काळजी घ्यायला त्याची आई आहेच. मला काय, नवऱ्याजवळ राहण्यापेक्षा मुलाजवळ बरं. म्हणजे नवऱ्याजवळ बायको म्हणून सतत दबून राहाण्यापेक्षा मुलाजवळ त्याच्यावर धाक ठेवत रुबाबात राहाता येतं. मोकळं, रिलॅक्स वाटतं. तसं नवऱ्यावर प्रेम आहे पण नवरे जोपर्यंत त्यांचा नवरेपणा सोडत नाहीत तोपर्यंत असं काही वाटतच राहाणार ना ! त्यांनी मग मध्यवर्ती विद्येचे माहेरघर, वगैरे वगैरे म्हणून पुणे निवडले. तिथे अर्थात पुण्याबाहेर उपनगरात वनबिएचके फ्लॅट घेतला. चांगलं कॉलेज निवडलं तर ओंकारची किरकिर, 'इतक्या लांब कशाला घेतला असेल बाबांनी फ्लॅट. रोज वीसवीस कि.मी. जाऊन येऊन प्रवास करावा लागतोय. येण्याजाण्यातच एनर्जी खर्च होतेय. अभ्यास होत नाही. शेवटच्या वर्षी होस्टेलवरच राहीन.' त्याचं असं चाललेलं असायचं. स्वस्त पडला म्हणून घेतला लांब. खरंतर त्याला घराची, आईवडिलांची फारशी गरज उरली नाही. त्यालाही स्वातंत्र्य हवंच असेल ना?

हे सांगलीत ड्युटीवर. सरकारी क्वॉर्टर मिळालेली. घरगुती जेवणाचा डबा सुरू केला. ते तिकडे व्यवस्थित. आता राहिली मी एकटीच. मी एकटीनंच काय करायचे? तसं महिलामंडळ होतं. शेजारी बरे होते. पण घरात एकटंच की. फारच पोकळ पोकळ वाटायला लागलं. ओंकार म्हणाला, "क्वार्टर मिळालीय तर राहा ना बाबांच्याजवळ." मग मीही त्यांना तसं सांगून टाकलं. ते म्हणाले, "ये. माझं काय?" नाखूशी वाटली त्यांच्या आवाजात. जावंस वाटेना. तरी नेटाने मी सगळी निरवानिरव केली. केबलवाल्याला केबल बंद करून टाकायला सांगितली. अगदी लिहूनच घेतलं

नाहीतर नंतर अचानक कोणी घरात असलं की यायचा, (तसं ओंकार वरचेवर येणारच.) आणि म्हणायचा, ''एवढ्या, एवढ्या महिन्याचं बिल राहिलंय.'' पेपर बंद केला. वाण्याचं, लॉण्ड्रीचं, दूधवाल्याचं कामवालीचं असं सगळ्यांचे हिशेब चुकते केले. मंडळातल्या भगिनींचा निरोप घेतला. त्यांची स्तुतीयुक्त हळहळ ऐकून मलाही गद्गदल्यासारखं झालं. संपलं! आता निघायचं सांगलीला. संपला इथला शेर! ह्यांना मात्र तसं वाटत नव्हतं. आपलं घर जिथं तेच आपलं गाव. सगळी निरवानिरव कशाला करायची? आपण अधूनमधून जाणारच की. म्हणजे मीच जावं, त्यांच्या घराची देखभाल करायला. खरं तर फिरणं, प्रवास कुणाला नकोय. पण आपल्या घरी यायचं म्हणजे झाडलोट, साफसफाई हे सगळं आलंच. (मग नको का करायला?) वय वाढल्यावर अशी कामं होत नाहीत. इच्छाही नसते. कामवालीकडे काय फोन नसतो. तिला लगेच बोलवायला. भेटलीच तर ती नेहमीची कामे सोडून धावत पळत आपल्याकडे महिनाभराचा धूळ कचरा काढायला कशाला येईल? हे ह्यांना सांगणार कसं? पुरुषी डोकं एवढा बारकाईनं थोडाच विचार करतं? एकूण काय सारखं सारखं झाडलोट करण्यासाठी यायची माझी इच्छा नसते. नवऱ्याला वाटतं एवढं पुण्यात (पुण्यात!) घर केलंस तर बायकोला तेवढंही सांभाळता येत नाही. मला वाटतं, मी मुलगा, नवरा हे घरातले पुरुष नीट सांभाळले. आता तेच घरात नाहीत तर नुसत्या भिंती नी छत सांभाळत बसू का? मुलगा मोठा झालाय तर राहू की दोघं, दोघंच. असा आपला माझा रोमॅण्टिक मूड.

सांगलीतल्या सरकारी बंगल्यात आले. आजूबाजूला भरपूर गवत वाढलेलं. पावसाळा होता. तारेच्या कुंपणावर शेजाऱ्यांची कपडे वाळत होती. मोठमोठी झाडे होती. खिडकीतून समोरच मोडक्या, जुन्या गाड्या पडलेल्या. (सरकारी जागा-कोणीही वापरा.) दिसत होत्या. ह्यांनी घर स्वच्छ करून घेतलेलं. मोकळं म्हणून मोठ्ठं वाटत होतं. देवळासारखा आवाज घुमत होता. मनही मोकळं असलं की मोठ्ठं वाटतं.

एक सिंगल दिवाण, एक टेबल, एक खुर्ची असं सगळं ह्यांच्यासारखं एकुलतं एक. एकुलतं माणूस माणूसघाणं असतं म्हणतात. तसं हे सामान पण ह्यांच्यासारखं असेल का? उगाचच काहीतरी वाटत राहातं. सत्तावीस वर्षं संसार केला. म्हणजे काय केलं? अनेक वस्तूंनी घर भरलं. सामानाची समृद्धी वाढली तशी मनं, माणसं झाली का समृद्ध? वरचेवर घर बदलावं लागायचं तरी दारंखिडक्यांना पडदे शिवायचे. सामान वाढवायचा सोस काही कमी नव्हता. नंतर ते झाडतपुसत सांभाळत बसायचं. हे मोकळं घर बघून सत्तावीस वर्षं मन मागे गेलं तेच दोघे आम्ही. पण किती बदललेलो. तेव्हा किती स्वप्नं, केवढी उत्सुकता होती जगण्यात. सगळं कवेत घ्यावं एवढी ऊर्जा ओसंडत होती. एकमेकांपेक्षा घर, संसार, कुटुंब ह्यांचाच विचार खूप करायचो. दोघंपण. एकमेकांची मनं जिंकण्यापेक्षा दुसऱ्याची मनं सांभाळण्यातच गेली ही सत्तावीस वर्षं. कोवळेपणा कमी होता होता उदासीनतेची छटा पिकू लागली. देठ सुकून केव्हाही गळून पडायचे दिवस आता आले. नुसतं वरवरचे तरंग, निसटते प्रणयप्रसंग, अनंत गोष्टींची दडपणे. सगळं निरर्थक वाटतंय आता. पण ते तसं जगण्याशिवाय गत्यंतर होतं का? वाटतं, आंतातरी खोल बुडी मारावी, कसं आणि किती जगलो हे दोघांनी मिळून जोखावं, पारखावं. नव्यानं एकमेकांना समजून घ्यावं, दुपार कलली आहे. उन्हाची धग कमी झालीय. येणारी संध्याकाळ गुलाबी नाही पण, सोनेरी असावी, प्रसन्न, कृतज्ञ असावी. भिडस्तपणा सोडून दोघांनी फक्त एकमेकांचा विचार करावा. एकत्र असावं. दमछाक झाल्यावर रस्त्याच्या एका बाजूला थोडं झाडाखाली विसावा घेताना अलिप्तता येते तशी आलीय सगळ्या जगाविषयी. छोट्याशा सावलीत घासभर खाणं, घोटभर पाणी पिणं तरी एकत्र असावं. असं बरंच काही बाही मला सुचत होतं, वाटत होतं. तर ह्यांना घर सोडून आलीय ह्याची काळजी. आता पावसाळा सुरू होईल. गॅलरीतून घराच्या आतपर्यंत पाणी जातं. चुकून खिडकी उघडी राहाते वगैरे, वगैरे.

"नीट पोती लावलीयेत ना दरवाजाला?" ह्यांचं ऑफीसमधून आल्या आल्या सुरूच. अर्थात मी समोरच होते, म्हणजे प्रवास धडच झालाय. समोर नव्हतं घर. न ऐकल्यासारखं करून मी मोकळ्या घरभर फिरून घेतलं. लाकडी दिवाणवर बसले. तर म्हणताहेत,

"जपून हं. आधीच्या साहेबांचा आहे. गेल्यावर्षी पूर आला तेव्हा घरभर पाणी, पाणी झालेलं. पाण्यावर तरंगत होता. घासून, पुसून घेतलाय. पण दोघं, दोघं बसल्यावर तुटायचा?"

"एवढं काही नाही हं माझं वजन."

"दोघांचं मिळून आहेच की." स्वतः तिथेच बसले. उठून मी चटई अंथरली. मस्त पाय पसरून बसले. आता तुटायची भीती नको अन् उठवायचीही नको.

स्वयंपाकापुरती भांडी आणलेली. वाणसामान, भाजी आणायलाच हवी. डबा देणाऱ्या फिरोजमामांना म्हणाले, "थोडे दिवस डबा चालूच राहू दे. आता पोहे वगैरे दुकानातून आणून दे." फिरोजमामा अशी किरकोळ कामे करायचे. मी पोहे करण्यासाठीच्या सामानांची यादी दिली. मामांनी वाणसामान आणलं. पण पैसे संपल्यामुळे मिरची, कोथिंबीर, लिंबू, कांदे आणण्यासाठी पैसे मागितले.

"ते राहू दे." हे वैतागून.

"मग पोहे कसे करणार?" मी.

"राहू दे पोहे करायचेच."

मग राहूनच दिले. पोहे खायची इच्छा झालेली मी आल्यामुळे. पण एवढं तेवढं सामान आणण्याचा वैताग. एकदा पुरेसं सामान भरलं की मी चिकटलीच की. पुण्याच्या घराकडं दुर्लक्ष होणार. ह्यांना तेच नको होतं. मामांना म्हणाले, "ही केव्हातरी इथे येणार, पाचसहा दिवस राहाणार. कशाला पसारा वाढवायचा?" मग टोस्ट, बिस्किटावर रोजचा नाष्टा सुरू झाला. तसं तर तसं... माझं काय!

सत्तावीस वर्षांत संयम, सहनशीलता, प्रतिक्षा, तत्परता, कोंड्यांचा मांडा करणे, सर्वांच्या काळज्या करणे. हे गुण अलंकारासारखे मिरवले. या सगळ्यामुळे सुरक्षितता मंगळसुत्रासारखी मिळत होती; मिळतेय! आता एवढे उन्हाळे, हिवाळे बघितल्यावर कशाचेच महत्त्व वाटेनासं झालंय. गोष्टी जास्त आणि सहज मिळाल्या की उबग येतोच की ! तर काय दोघांचा डबा सुरू झाला. मी खूश. मग दिवसभर करायचं काय? ह्यांची कामं दिवसाची पंधरा-वीस तास चालत. सांगली नगरवाचनालय जवळच होतं. ते सुरू केलं. त्यानिमित्ताने फिरणंही होई. रोज एक पुस्तक वाचून होई. एकूण काय नवऱ्याच्या नाही पण पुस्तकांच्या सहवासात गुंग झाले घर आणि गृहिणीपणा सांभाळण्यात जाणारा वेळ, ऊर्जा एवढी खर्च व्हायची, तन-मन थकलेले पुस्तकं वाचायला काही शक्तीच उरायची नाही. मग ते वाचनालयातून बदलून आणणे वगैरे लांबची गोष्ट. मुळातच सततच्या गाव बदलण्यामुळे वाचनालय सुरू करणंच कठीण. त्यांचे नियम, अटी तर विचारायलाच नको. किती आवडीचं असलं तरी वाचन असं दुरावतच होतं. दमल्यावर पटकन हाताशी येणारा रिमोट जवळच होता. टी.व्ही. मालिकेतली कथा नाही आवडली तरी दिपवणारी श्रीमंती जी फक्त पडद्यावर बघायला मिळायची, फर्निचर, साड्या दागिन्यांचं प्रदर्शन तर असतंच ना. आता मात्र मनसोक्त पुस्तकं वाचता येऊ लागली. मी अतिशय खूश होते.

अधूनमधून कोणीतरी जेवायला बोलवायचे. परतफेड म्हणून त्यांनाही बोलवायचे. ह्या निरर्थक गोष्टीत वेळ वाया जातोय म्हणून थोडं बेचैन व्हायचं. वाईट वाटायचे. पण कुटुंब, घर, सुरक्षितता आणि सगळ्यात महत्त्वाचे आपण किती चांगले आहोत हे दाखवण्यासाठी एवढं सहन करायलाच पाहिजे. एकदा ह्यांच्या मित्राला जोडीनं जेवायला बोलावलं. डबा अर्थातच मामांनी दिला. आता ह्या वयात हॉटेलातलं पचत नाही ना. हे सांगताना ह्यांना गिल्टी वाटत होतं. वहिनींनी (मित्रांच्या सौ.) मग उपदेश केला, "या वयात दोघांना कितीसं लागतं... एवढं पैसे देण्यापेक्षा करावं घरातच. वेळ

जातो. दिवस घालवता तरी कसा?'' वगैरे, वगैरे. बाईनं स्वयंपाक करणं हे कुठल्याही वयात, परिस्थिती आवश्यकच आहे का? केवळ पैसे वाचवणं हाच हेतू असतो का? तसं नाही. प्रश्न पैशाचा नसतोच. बाईनं स्वयंपाक करायलाच हवा. बाईनं मंगळसूत्र, कुंकू, बांगड्या घालायलाच हव्यात. नाहीतर धर्म, संस्कृती नष्ट होईल. मग तरी बाई माणसासारखं, मनासारखं जगेल. वहिनींना जेवण आवडलं. म्हणाल्या, 'हे यायला नको म्हणत होते. पोट बिघडलेय. म्हटलं, जाते एकटीच... येताना तुमच्यासाठी वरणभाताचा डबा आणते. रोज रोज रांधत राहायचं... एखाद्या दिवशी तरी सुट्टी नको का?'' म्हणजे स्वयंपाकाचा कंटाळा, वैताग यांनाही येतोच की. पण कर्तव्य म्हणून करावंच लागतं. अशी कितीतरी अगदी अनावश्यक कर्तव्ये बाईच्या माथी मारलेली असतात. हे सगळं बाईनं आनंदाने, उत्साहाने, हसतमुखानं करावं अशी सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक अपेक्षा असते. असो. तर ह्यांना दोन्ही वेळेचा डबा बाहेरून आणतो हे सांगताना गिल्टी वाटत होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी झाडूवाला आला. काम झाल्यावर त्याला उरलेलं मटण-भात दिलं. खाऊन झाल्यावर त्याने भांडी घासून ठेवली. म्हणाला, ''काल अंगारकी होती. तुमची नसती व्हय?'' मी तर हादरलेच.. उपास वगैरे नाही पण अंगारकीला मटणाचं जेवण... धर्म असा रक्ताच्या कणाकणात भिनलाय. पटो न पटो रक्तच जुमानत नाही. मन तर काय... झाडूवाला म्हणाला, ''आमच्यात चालत नाही. आता घरी जाताना मला आंघोळ करूनच जावं लागेल. आमी जैन.'' मला दुसरा धक्का. ''आमचा तो देवय बाहुबलीचा. लय उंचय. लय पायऱ्या चढाव्या लागत्यात्या. त्यो आमचा देवय...'' हे सांगताना त्याच्या चेहऱ्यावर समाधान होतं. भुकेल्या पोटात काहीतरी गेल्याचं. तीनचार दिवसांनी झाडाला पाणी पाजल्यावर जशी टवटवीत दिसतात तसा तो टवटवीत दिसत होता. तरी तो म्हणत होता मला घरी जाताना आंघोळ करून जावं लागेल. हे सांगताना त्यांना

अपराधीपण नव्हतं वाटत. आंघोळ केल्यावर आपण पवित्र होऊ असं मात्र त्याला वाटत होतं.

ओंकारचा फोन आला तो उद्या येतोय कॅम्पवरून. हे म्हणाले, "तू जा उद्या. मला तर वाचनालयाचा विरह नको वाटू लागला."

"येत्या शनिवारी जाऊ की दोघंपण. नाहीतरी तो आला तरी घरात नसतोच. रिझल्ट, ॲडमिशन...."

हे गप्प. अजून पाचसहा पुस्तके वाचून होतील. या हिशेबाने आणि पावसाळी हवा, अर्ध्या बसेस रिकाम्याच असतात अशात दोघांनीच प्रवास करायचा म्हणजे... (मी काही म्हातारी होत नाही!) मी खूश. नाहीतरी हा वीस वर्षांचा झालेला बाळ आल्या आल्या बॅगा टाकणार, त्याचे वासाचे मोजे, बूट इकडे तिकडे पडणार. घरभर कपड्यांचा कुबट वास. मागच्या वेळी नगरच्या मित्राला घेऊन आलेला. तो ह्याच्यापेक्षा धिप्पाड. दहा बाय पंधराचा हॉल. दोघांच्या सामानांनीच भरून गेला. बर आणखी. "मस्तपैकी जेवायला कर, किती दिवसांत घरचे जेवलो नाही!" असं म्हणत टी.व्ही. समोरच्या दिवाणवर लोळणार. नाहीतर कॉम्प्यूटर गेम खेळणार. वाटलं आवरू दे त्याचं त्याला. कधी कधी एखाद्या इंग्रजी शब्दाचा अर्थ सांग म्हटलं तर म्हणतो, 'डिक्शनरी बघायची सवय लाव.' आता म्हणावं वाटतं, लागू दे सगळ्यांनाच स्वतःचं स्वतः करायची सवय. स्वतःच तसा तो म्हणालेला फोनवर,' निवांत राहा गं. काही काळजी करू नकोस. कुणी नसतं कुणाचं" हे काय नवीन ! हा काय आध्यात्मिक शिबिराला गेला होता की काय? बरंय म्हटलं. मी घट्ट राहिले.

दाट झोप होती डोळ्यांवर. मोबाईल वाजत होता. पण उठवेना ह्यांना ही जाग येईना. दुसऱ्यांदा वाजला मग उठलेच.

"हॅलोऽ"

"आई पोटात दुखतंय." पटकन काही डोक्यातच शिरेना.

"काय?"

"पोटात खूप दुखतंय. काय करू? सांग की, मी काय करू?" त्याचा आवाज रडवेला. थोडं थोडं उमजायला लागलं.

"किती वाजलेत" मी विचारले

"साडेचार" ओंकार म्हणाला. म्हणजे डॉक्टरकडे जाणं कठीणच आता मात्र झोप उडालीच.

"ओंकार खूप त्रास होतोय का? हे बघ कोरा चहा करून लिंबू पिळून घे."

"आईऽ त्याने लूजमोशन थांबतं. माझ्या पोटात दुखतंय."

"मग नुसताच कोरा चहा घे. लिंबू नको पिळू."

एकदा माझ्या आईला लग्नावरून घरी आल्यानंतर असंच रात्रीचं खूप पोट दुखू लागलेले तेव्हा शहरातल्या शिकलेल्या भावाने सांगितलेला प्रथमोपचार चांगलाच लक्षात राहिला. (तेव्हा माझ्या भावजयांनी काळजीने केलेली धावपळ बघून आई म्हणालेली, लेकीपेक्षा माझ्या सुनाच मायाळू हाईत.) तर अशा ह्या प्रथमोपचाराचा प्रयोगही बऱ्याचदा केलेला. एकदा शेजारणीने नवरा रात्रपाळीला गेलेला. रात्रीच पोटात दुखू लागलं. अगदी राहवेनाच. मग दोन अडीचला उठवलेलं तेव्हाही तिला कोरा चहा करून दिला. ओवा खायला दिला. तिला बरं वाटलेलं. एकदा आम्ही गावाकडे गेलेलो. तिथे चुलतदीर अजिबात चहा प्यायचे नाहीत. त्यांच्या वडिलांनी सांगितलेलं 'चहा म्हणजे विष आहे.' मग ते कधीच एक घोटसुद्धा चहा घ्यायचे नाहीत. मी चहा पिताना त्यांना म्हणायचे, "पप्पूदादा आम्ही विष पितोय, घेणार का थोडं?" तर त्याचं लूजमोशन सुरू झालेलं. त्यांना समजावून सांगितलं, 'दवाखान्यात जाईपर्यंत डॉक्टरांचं औषध पोटात जाईपर्यंत प्रथमोपचार म्हणून तरी घ्या कोरा चहा. विषसुद्धा औषध म्हणून घेतात.' त्याने मग ते ब्लॅक टी विथ लेमन घेतलं. डॉक्टरांकडे गेलाच नाही.

उलट. पुन्हा विष मागितलं. पाळीच्या वेळी माझ्याही पोटात दुखायचे ओंकार झाला न् पोटदुखी कायमचीच बरी झाली.

ओंकारला बाहेर अरबट चरबट चरायची सवय आहे. आता तर आई नाही मग... काळजी वाटत होती पण किती काय काय आठवलं. अर्ध्यातासाने ओंकारला फोन केला. तेव्हा म्हणाला, "कमी आलंय." नसेल आलं. नसेलच आलं! आवाज सांगत होता. खरं काय ते. आमच्या तिघांच्यात कुणी फारसं भावुक बोलत नाही. आवाजावरून भावना पोचतात एकमेकांना. ओंकाराचा आवाज कळला. त्याला एवढ्या पहाटे आईला फोन केला हेच चूक वाटत असेल.

"कुणाला फोन केला एवढ्या पहाटे." ह्यांना आता जाग आली.

"ओंकारच्या पोटात दुखतंय."

"तुला कालच जा म्हणालेलो." या वाक्यात कितीतरी भाव होते. काय बाई आहे... नवराच पाहिजे एवढं वय झालंय तरी... एकुलता एक मुलगा नको. घर, काम नको. असं कितीतरी काय काय सरकून गेलं. त्यांच्या डोक्यातून. ते मला डोळ्यांवरून जाणवलंय. मी तिथं असते तर नसतं का दुखलं पोटात? मी काय डॉक्टर आहे का? मानसिक आधाराची गरज माणसाला किती वर्षांपर्यंत असते?

सकाळी सात वाजता मी पुण्याच्या गाडीत बसले. वाटलं अगदीच निरुपयोगी नाही आपलं आयुष्य. अजून आहे उपयोग. आपला उपयोग आहे असं वाटलं की जगावसं वाटतं का? बहुधा तसंच असावं. चिमण्या-कावळ्यांना किंवा सृष्टीतल्या प्राणीमात्रांना जीवनाचं प्रयोजन काय हा प्रश्न पडत असेल? तरी ते छान जगतात. मी घरी पोहोचले तेव्हा ओंकार एनसीसीच्या परेडच्या प्रॅक्टिसला गेलेला.

✦ ✦ ✦

# पर्जन्यछाया

राधिका आणि हर्षदा लंचब्रेकमध्ये डबा खात बसलेल्या. राधिकाच्या चेहऱ्यावर तणाव होता. हर्षदा तिला म्हणाली, ''काय गं, जेवणात लक्ष नाहीय ते?''

''अगं आमची कन्या श्रेया तिच्या मेडिकल्‌च्या ॲडमिशनचं चाललंय ना. मिळेपर्यंत घास गोड लागणार नाही.'' राधिका.

''प्लेग्रुपासून हे टेन्शन. सहजासहजी काही होतच नाही. काहीही कारणं सांगतात नकाराची. अगं माझ्या भाच्याने सी.डी.एस.ची एक्झाम देण्यासाठी बी.ए. नंतर गॅप घेतला. वर्षभर अभ्यास केला, पास झाला. पहिल्याच प्रयत्नात. आर्मीत लेफ्नंट व्हायचं त्याचं स्वप्न असं समोर आलं.

भोपाळला एस.एस.ई.बी. च्या परिक्षा असतात तिथं बोलावून घेतलं. तिथे पायरी पायरीने सात परीक्षा असतात. एक एक पास होत गेल्याचं कळलं की इकडे आम्हांला आनंद, अभिमान वाटायचा. पहिल्याच प्रयत्नात त्याला यश मिळत होतं. दादा म्हणाला, "पोरानं गॅप घेतला पण सार्थक केलं. एवढंच नाही त्याला दहावीला पंच्याऐंशी टक्के मार्क्स मिळूनसुद्धा तो आर्टस्‌कडे गेला. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास चांगला होतो म्हणून. तेव्हा नातेवाईकांच्या भुवया उंचवायच्या 'बी.ए. करतोय?" असं. टी.वाय.ला असतानाच दादा म्हणाला, 'परीक्षा दे.' तर म्हणाला, 'अभ्यास नाही तर नापास होण्यासाठी कशाला बसू? आम्ही म्हणालो, 'अरे अनुभव येईल, भीती कमी होईल. वगैरे, पण नाही ऐकलं. बी.ए. झाल्यावर एम.ए. चं ॲडमिशन न घेता सी.डी.एस. चा अभ्यास केला. पास झाला भोपाळला गेला. भोपाळवरून रोज आनंदाची बातमी कळत होती. अन् शेवटची पायरी इंटरव्ह्यूची तिथे रिजेक्ट झाला. असले फालतू प्रश्न विचारलेले. फार डिप्रेशन आलेलं. एकदम वरवर नेलं न् ढकलून दिलं. आता बघ एम.ए.ला एंट्रन्स दिली: तर गॅप घेतला म्हणून ॲडमिशनच देईनात. एन्ट्रन्सचे मार्क्स पण सांगेनात.

"बाप रेऽ शिक्षणाचं काय चाललंय कळत नाही."

"एवढं शिकून ते आयुष्यात किती उपयोगी पडतं?"

"होना! शिकायची इच्छा आहे त्याला ह्या अडचणी. सगळीकडेच जगणंच अवघड झालंय."

"डोनेशन उकळायची ही संधी असते ना म्हणून अडवणूक करतात झालं. मिळेल गं श्रेयाला ॲडमिशन. नाही मिळालं तर कितीतरी कोर्सेस आहेत. बी.एस्सी. करायची."

"दुसऱ्यांना सांगणं बरं असतं गं."

"सॉरी. राग आला का तुला?"

"तसं नव्हे गं. एकदा मेडिकलची लाइन मिळाली की बाकीची टेन्शन महत्त्वाची नाहीत. सेटल झाल्याची भावना असते ना !"

"सोहम तर म्हणतोय बिझनेस करायचा. प्रामाणिकपणे कष्ट करायचं चीज होतं. अनुभवाचा फायदा मिळतो."

"मंदीमुळे ते तरी क्षेत्र भरवशाचं कुठं राहिलंय?"

"भरवसा तर कशाचाच देता येत नाही. पण हे शिक्षण, मग नोकरीचा शोध किती उमेदीची वर्षं खर्च होतात. आपणच ठराविक गोष्टींचं महत्त्व वाढवून ठेवतो. शिक्षणाचं महत्त्व कमी नाही गं. पण सगळ्यांनी तेच करायचं. वेगळं, नवं करण्याचं धाडसच नसतं आपल्यात."

"कोण तरी आलंय बघ वेगळं. नवं, स्क्रिप्ट घेऊन." राधिका दरवाज्याकडे तोंड करून बसल्यामुळं तिला आले-गेले दिसत होते.

"नवीन काम लागलं." हर्षदा तिच्या कॉम्प्यूटरसमोर येऊन बसली. तेवढ्यात तिला प्रकाशकांनी बोलावून घेतले. तिच्याकडे स्क्रिप्ट देत नव्या लेखकाची ओळख करून दिली. म्हणाले, "हे श्याम सावळे. लवकर पुस्तक तयार व्हायला पाहिजे म्हणतात. हर्षदाने नमस्कार केला. सावळे चांगलाच गोरापान होता. त्याच्या काळ्याभोर दाढीमिशातून त्याचं गोरंपण उठून दिसत होते आणि ते भेदक डोळे चुंबकासारखे नजर खेचून घेत होते. तळापर्यंत ओढली जात होती नजर. हर्षदा पडता पडता सावरली. आजूबाजूच्या वातावरणानं तिला भानावर आणलं. ती प्रकाशकांना म्हणाली, "करीन लवकर होईल तितक्या लवकर. हर्षदाने ते बाड उचलले न् निघाली. तेवढ्यात गोऱ्यापान सावळेंनी विचारलं." हे पाहा मी नवीन काय सुचलं तर सांगत जाईन चालेल ना? तेवढा मजकूर ॲड करणं जमेल ना? "हो, जमेल की त्यात काय..." तिनं ते जाडजूड बाड नेलं. हा आणखीन काय सुचवणार. हे पुस्तकही महिन्यात तयार होऊन पाहिजे. तरी मजकूरच

फायनल नाही... नावही नंतर सांगतो म्हणाला. तिनं बाजूलाच ठेवून दिलं. ती त्याचाच विचार करू लागली. खूप दिवसांनी असे तरंग उठलेले. तळापर्यंत खडा जाऊन रूतला. तिला अस्वस्थ वाटू लागले. राधिकालाही सांगावसं वाटेना. आतल्या आत उकळणं चाललेलं... बेचैन, अधीरं, "काय गं? झालं सुरू काम." राधिका म्हणाली.

"उद्यापासून करीन."

"कायेय, कादंबरी?"

"हो. अजून नावही नाही ठरवलं. बहुतेक आपल्यालाच तेही काम करावं लागेल. नाहीतर अनामिका." हर्षदा उगाचच पानं चालू लागली. "कमालेय ना. बॉसच्या जवळचा दिसतोय..."

"हूं" हर्षदा वाचनात गुंतू लागली. लेखन पकड घेणारे होते. ती मग सुट्टी होईपर्यंत वाचत राहिली. अर्ध अधिक वाचून झालं. उरलेलं घरी नेता आलं असतं तर उद्या लगेच टाइपिंगला सुरुवात करता आली असती. तिनं तसं प्रकाशकाला विचारलं. ते म्हणाले, "नको. तशी गरज नाही. त्या पठ्ठ्याने विनाकारण दोनशे रुपये कशाला वाया घालवायचे म्हणून झेरॉक्सही काढल्या नाहीत." हर्षदा हिरमुसली. पण वाचलेलं चांगलंच डोक्यात बसलं होतं. नवं वाचल्याचं समाधान, वेगळं असल्यामुळे अस्वस्थता.

दोन दिवसांनी सावळे एक पान घेऊन आला न् म्हणाला, "हा मजकूर सत्ताविसाव्या पानाच्या मधल्या पॅराग्राफमध्ये टाकायचा. हर्षदा थक्क झाली; ह्याला काय पाठ आहे की काय कादंबरी... तिनं सहज त्याच्यावर नजर टाकली. तिथे कांगावा हा शब्द वाचला. ती म्हणाली, "मी एक सुचवू का?" "काय?" त्याचे गूढ, गहिरे डोळे तिच्या डोळ्यांत भिडवत तो म्हणाला.

"ह्या कांगावा शब्दापेक्षा कांगारावळा शब्द टाकला तर कसं? खेड्यात तसाच वापरतात. राजन खानांच्या कथेत पण मी कांगारावळा

असाच शब्द वाचलाय.'' तिनं त्याच्याकडे बघितले. त्याच्या डोक्यात चमक दिसली.

''दॅटस गुड. व्हेरी नाइस.'' तो म्हणाला.

''मराठीत बोला हो. तुम्ही मराठी लेखक ना!''

''या सजेशन बद्दल आपला आभारी आहे.'' त्याने हात जोडले.

''सजेशन म्हणजे काय?'' हर्षदा मिस्कीलपणे म्हणाली.

''चुकलो. मॅडम. म्हणजे आपल्याला ताई, वहिनी, काकू काय म्हटलेलं आवडेल.''

''माझं नाव हर्षदा आहे. मला हर्षदाच म्हटलेलं आवडतं.''

''पण मी लहान आहे ना आपल्यापेक्षा.''

''तरी आवडेल.'' तिनं त्याच्या डोळ्यांत खोल रोखून पाहिलं.

''हर्षदा ऽ'' त्याच्या आवाजात मार्दव आलं. ''छानंय हर्षभरीत केलंत मला तुम्ही आज...''

''तुम्ही नाही तू...'' तिनं हुकूमच केला त्याला.

''हर्षदा. ओ.के.? आय मीन ठीक? हर्षदा.'' तो जरा अडखळला पण म्हणाला, ''तू वाचलंस स्क्रिप्ट म्हण्जो ते हस्तलिखित. बापरे.'' हर्षदा हसू लागली. म्हणाली, ''हो वाचलं आणि आवडलं सुद्धा.'' तिचं टायपिंग चाललेय. श्याम सावळे खूश झाला. म्हणाला,

''माझी पहिलीच कादंबरी ही. खूपच टेन्शन येतंय त्यामुळे नाव ही सुचेना. तुम्हांला... सॉरी, चुकलो तुला. तुला सुचतेय काही?''

''मला? छे हो. मी नाही विचार केला. सुचलं तर नक्की सांगेन.'' तिनं कंट्रोल एस प्रेस करून दुसरं पानं घेतलं.

''लवकर सांग नाहीतर अनामिकाच राहील.''

''अनामिका वा ऽ गुड, मस्तच. खूप छान.''

"मी नाव कुठं सांगितलं?" हा काय वेडा आहे का? अशा दृष्टीने तिनं त्याच्याकडे पाहिलं.

"हेच नाव ठेवायचं ठरलं." श्याम सावळे उठून गेला. हर्षदाला गंमतच वाटली.

हर्षदा घरीच होती. सोहम कॉलेजवरून आलेला. त्याच्यासाठी काहीतरी खाणं बनवत होती. तेवढ्यात श्याम सावळे आला. म्हणाला, "ऑफीसमध्ये गेलो होतो. आज सुट्टी का?"

"तब्येत बरी नव्हती. अन् तुझं टायपिंग पूर्ण केलंय."

"तिथं पत्ता मिळाला. फोनही लागत नव्हता. मग आलो घरीच."

"ये. ना. सोहमशी ओळख करून देते. हा माझा मुलगा..." ओळख बिळख झाल्यानंतर हर्षदाने खाण्याच्या डिश आणल्या.

"अरे, हे तयारच होतं?"

"करत होते. संपण्याआधी आलास. ज्याचा त्याचा शेर, ज्याच्या त्याच्या पोटात. काय विशेष, नवीन?"

"मुखपृष्ठाविषयी बोलायचं होतं."

"मला काय कळतं त्यातलं?"

"खूप कळतं." त्यानं अधिकारवाणीनं सांगितल. "मीं फोटो आणलेयत ते बघ न् मत सांग."

"अंकल, मी सांगू का?"

"सोहम. माझं नाव घनश्याम आहे खरं तर. सुटसुटीतपणा आणण्यासाठी मी फक्त श्याम ठेवलं. तू मात्र घना म्हण म्हणजे पूर्ण नावाची आठवण राहील."

"घना. सही. ये रे घना, ये रे घना ऽ" सोहम चालीत म्हणाला.

"खरंच घना छान वाटतंय. मी पण तेच म्हणेन."

"घना, तू आता रोज यायचंस. कॅरम खेळायला. आपण कॅरम क्लबची स्थापना करू."

"इकडे मोठी तिकडे छोटा मी मधलाच." त्याने असे काही हातवारे केले की सोहम खदखदून हसला. हर्षदाला खूप बरं वाटलं.

"नाव काय द्यायचं क्लबला."

"नावं ठेवणं आपल्याला नाही बुवा जमत."

"सोहंघना" हर्षदा म्हणाली.

"तुझं नावही हवं" घना म्हणाला.

"हं आहे ना."

"हं ऽ तू म्हणजे महान आहेस." घना तिच्याकडे कौतुकाने पाहात म्हणाला.

"अरे ते मुखपृष्ठाचे फोटो दाखव ना."

"अरे हो ऽ विसरलोच की." तिघांनी भरपूर चर्चा करत टीका टिप्पणी करत फोटो बघितले.

"घना, टाक रे कुठला पण आणि कॅरम खेळू चल. आता." सोहम सोंगट्या एकावर एक रचू लागला.

"साधंसा टाक. गिचमिड नको." हर्षदा.

"सोहम आज खूप उशीर होतोय. उद्या खेळू या."

"असं रे काय." सोहमं हिरमुसला. "इथंच जेव ना. आईचा स्वयंपाक होईपर्यंत खेळ."

"माझा नावात जेवढा अंश तेवढाही खेळण्यात नसेल."

हर्षदा डिश गोळा करून घेऊन गेली. घना तिला म्हणाला, "ज़ेवणाचं राहू दे, खेळू चल." हर्षदा खूश झाली. तिघं कॅरम खेळू लागले.

हर्षदा बसली होती. एकटीच. सोहमची सहल गेलेली. आई म्हणाली सोबतीला येऊ का. पण तिनं स्पष्ट नकार दिला. म्हणाली, "तू घेऊन येणार तुझ्या नातवडांना. ते सोहमचा कॉम्प्यूटर वापरणार तो आल्यावर शिमगा करतो. त्यापेक्षा नकोच."

"तू फार तुटक, परक्यासारखी वागायला लागलीस."

"ह्यात काय परक्यासारखं. तू एकटी ये."

"अगं गोटूला काय वाटेल?"

"मग नकोच येऊ." हर्षदाने फोन ठेवला. तिला आठवलं आपण इथं राहायला आलो तेव्हा, साऱ्या दिशा कोसळलेल्या. सगळं उद्ध्वस्त झालेलं. सगळं भणंग वाटू लागलेलं. तेव्हा आईला म्हटलं राहा माझ्याजवळ. तर ती म्हणाली, "पोरं लहानयेत उषाची फार गडबड होते. मी येऊन जाऊन करीन." मग यायची पोरांना सुटी असली की त्यांना घेऊनच. त्यांची उठाठेव करण्यातच वेळ जायचा. नंतर हर्षदाने डी.टी.पी.चा कोर्स केला न् प्रकाशन संस्थेत नोकरी मिळवली. आईची नातवंड मोठी झालीयेत. तिची गरज संपल्यासारखी लेकी-सुनेची वागणूक. तिला वाटतं लेकीकडे मन मोकळं करावं. पण हर्षदा आताशा अशी अलिप्त झालेली. सगेसोयरे यांच्यापेक्षा तिला नोकरी बरी वाटायची. पुस्तकांचा सहवास आवडू लागलेला. आई दुखावली... तिला यायचंच आहे तर तिनं जिच्यासाठी यावं सोबत म्हणून उपकार करायला नको. या विचारासरशी हर्षदाला बरं वाटलं. आपण काय तिचा तिरस्कार नाही करत. तर तिच्या या भावना आहेत आधार देण्याच्या, सहानुभूतीच्या नावाखाली स्वतःची टिमकी वाजवण्याच्या, याचा तिटकारा वाटतो. आपल्याला जपण्यापेक्षा वॉच ठेवण्याकडे जास्त कल. ह्या माहेरच्या लोकांचा सासरच्यांचा तर संबंधच संपला; संपवला. आता शांतपणे जगावं. या उलथापालथीतून जीव थकलाय. आताशा

सुरेशच्या आठवणीही येत नाहीत. पाच वर्षं... पाच वर्षं झाली... जगलोच की आपण. उलट नीट, मनासारखं, ठाम, काहीसं दुराग्रही म्हणून तर आई म्हणते, 'कुणाचीच फिकीर नाही तिला. आपली येडी माया...' तिची माया की बंधन? फालतू काय नको वाटतात आता. लग्न म्हणजे मोठा काच. सासरच्या लोकांना वॉच. त्यांच्याच कलाने केलेले सुरेशने प्रेम. त्याहीपेक्षा राग आपला न् लोभ त्यांचाच जास्त. आधी त्यांचा विचार... आपला तर कधी केला फारसं आठवतच नाही. गोड आठवणीच नाहीत की, आपल्याला चांगलं आठवतच नाही? स्वतःचा तरी कुठे केला त्यांनी विचार? दुसऱ्यासाठीच जगला. सुरेश दुःख याचंच रे होतं. एवढं सुंदर आयुष्य पण भरभरून नाहीच जगलो आपण, आपल्यासाठी सतत अपुरेपण जाणवायचं तुझ्या सहवासात. गावाकडचे लोक आले की कसा फुलून यायचास. पण तेव्हा मी तुझ्यात कुठेच नसायची. त्या सर्वांची मी सेवेकरी असायची. तसंच असावं असं वाटायचं तुला. त्यांना काही उणं पडू नये म्हणून तुझी धडपड. ते खूश राहावेत म्हणून तुझी तडफड. खूप प्रेम करायचास ना? मी तर परकीच होती रे... पण सोहम तरी तुझा, तुझ्या रक्ताचा, तुझ्या वंशाचा ना? तुझी माणसं विसरली रे. सोहमला सुद्धा विसरली ! तुला कळत असेल? कुठे असशील तू तिथे तुला हे जाणवत असेल... आता मला एकटीलाच जगायचंय, लढायचंय, सोहमूला उभा करायचाय. आपण कोण त्याला उभा करणारे... त्याचं तोच सगळं जाणतोय, जगातोय, ठरवतोय. आपण फक्त एकटेच आता... तिनं दीर्घ उसासा सोडला. आताशा गळ्याशी हुंदका दाटत नाही, डोळे ओलावत नाहीत. तिला आठवलं, शेवटचं गावाकडचं जाणं न् येणंही. सुरेशचे वर्षश्राद्ध होतं. सगळे पाहुणे गेल्यावर अंगणात सगळे बसलेले. सुरेशच्या आठवणी निघत होत्या. सासूबाई एकदम उमाळ्याने म्हणाल्या, 'कसा

एकाकी गेला ऽ कुणा रांडामेल्याने काय केलं ऽ माझ्या लेकराला...' धाकटा दीर आपल्याजवळच होता, वहिनी वहिनी करायचा. तेव्हा. तो कडवटपणे म्हणाला, 'अगं, इस्टेटीसाठी बाईची जात काहीपण करते. कैकयीनं कसं मारलं दशरथांला.' हर्षदानं चमकून बघितलं. भडकला होता तो. म्हणाला, ''हिनं मारलं, ह्या कैदाशीनीनं मारलं माझ्या दादाला. गावाकडची भरती करतोय म्हणून. हिनंच मारलं.'' तो धाय मोकलून रडू लागला. हर्षदा उठली तिनं त्याच्या कानशिलात लावली. त्याच्या बायकोने हर्षदाचे केस ओढले न् तिला पाडली जमिनीवर. तिच्या छाताडावर बसून तिला बुक्क्या मारू लागली, 'तूच मारलंस दादांना, तुला नव्हत ना आवडत दादांचं वागणं' असं बरंच काही बरळत होती. हर्षदाला थोबाडत होती. हर्षदाची आई आली. तिनं तिला सोडवलं सोहम् पाचवीत होता. रडत होता. धाकटीला ढकलत होता. हर्षदा उठली. तिनं आईला न् सोहमला घेतलं न् निघाली. मिळेल त्या गाडीनं तालुक्याला आली. तिथून आपल्या घरी तेव्हापासून गावाकडची माणसं, जमीन काही चौकशी केली नाही. त्यांनीही केली नाही. सोहमचीसुद्धा दखल घेऊ नये? आधी संताप यायचा पण आता कीव वाटते. माणसं अशी कशी वागू शकतात... हा फ्लॅट घेतला पुण्यात. आई-भाऊ-वहिनी शेजारी. सगळंच गावाकडे पळत होतं. थोडी तरी गुंतवणूक असावी म्हणून परोपरीनं समजावलं, पटवून दिलं. तेव्हा भावाने मदत केली. एवढ्या लवकर, अशा परिस्थितीत बहीण येईल असं त्यालाही वाटलं नसेल. जबाबदारीच पडली. तोही जरा फटकूनच वागू लागला. तो जेवढ्यास तेवढं वागतो तर आपलं तरी काय चुकलं? हर्षदाला विषण्ण वाटू लागलं. सुरेशच्या आठवणीनं ती व्याकूळ झाली...

घना आला. हर्षदा म्हणाली, 'मी पण आताच आलेय, बस, चहा करते. ती फ्रेश होऊन स्वयंपाकघरात गेली. तिथूनच बोलत होती. घनाला

नीटसं कळत नव्हतं. मग तोही गेला स्वयंपाकघरात. सैलसर घातलेल्या गाऊनमुळे ती लहानखुरी वाटत होती, गोड.

"मी करू का मदत? दमली असशील ना?"

"हो ना. हल्ली जास्त दमायला होतं. चहा घेतला की बरं वाटेल. खरं तर काहीतरी खायला करावंसं वाटतंय. भूक लागलीय."

"थांब नको करूस मी सामोसे आणतो. तुझा चहा होईपर्यंत, अभिरुचीतनं."

"छान. बरेच दिवस खाल्लं नाही अभिरुचीतलं काही." दोघांनी मग सामोसे, ढोकळा, पालकशेववर ताव मारला. असे क्षण सुरेशच्या सहवासात कधीच आले नाहीत... तिला त्या गुलाबी क्षणात काटे टोचून गेलेच. आहे तो क्षण जगू या... भूतकाळ विसरून. तिनं स्वतःच्या मनाला खडसावलं. त्याच्या लेखनावर तो बोलत होता ते ऐकू लागली; अंधार पडला. हर्षदाने लाईट लावला. "निघतो आता." घना म्हणाला न् उठला. ती त्याच्याजवळ जात म्हणाली "खूप बरं वाटलं रे घना ऽ खूप जगल्यासारखं." तिनं त्याला आवेगाने मिठी मारली. "थँक्यू ऽ आय लव यू ऽ" ती पुटपुटली. "मराठीत म्हण." त्याने तिला सामोरी धरत म्हटलं. तिनं त्याला सोफ्यावर बसवलं त्याचा चेहरा ओंजळीत घेत अन् डोळ्यांत खोल बघत म्हणाली, "मी तुझ्यावर जीव टाकलाय रे" तिनं त्याच्या गालांवर ओठ टेकले. त्याने आवेगाने तिला मिठीत घेतलं तिथंच सोफ्यावर आडवं करून चुंबन घेतलं.

ती सावरून बसली. त्याच्या खांद्यावर मान टेकवत म्हणाली,

"भूतकाळ विसरून जगायचंय रे घना ऽ मला. मनाजोगतं."

"हर्षदा, मी तर केव्हाचा वेडा झालोय."

"आता हे कोंडलेपण मोकळे करू, मोकळा श्वास घेऊ," घना तिथेच राहिला. सकाळी गेला.

रविवार होता. घना आणि सोहम कॅरम खेळत होते. तेवढ्यात हर्षदाची आई नातीला घेऊन आली. ती हॉलमध्ये थांबली नाही. घनाला पाहून सरळ आत आली. म्हणाली, "हा सारखा का गं येतो?"

"सोहमबरोबर छान जमतं म्हणून येतो. काय गं चहा घेणार ना?"

"कर ना विचारतेस काय न स्वयंपाक पण वाढव आम्ही दोघी आलोय."

"स्वयंपाक झालाय आताच सगळं आवरून कॅरम खेळायला बसणार होते. सुट्टीत तेवढी तरी मजा."

"कमाल बाई. असं कसं बोलवतं तुला?"

"खरं तेच सांगितलं. तू भेटायला येतेस की जेवायला? जवळ तर घर आहे ना तुझ्या लेकाचं? चहा घेऊन जा जेवायला परत. चल कॅरम खेळू सगळेच." हर्षदाने रस्सा ढवळला न् झाकून ठेवला. कपबशा धुऊ लागली. तिची आई हॉलमध्ये जाऊन बसली. घनाला तिनं विचारलं, "राहायला कुठं असता?" तो सोंगटीचा नेम धरून म्हणाला, 'कॅम्पात.'

"बायको, मुलं वगैरे? "

"बायको गेलीय माहेरी बाळंतपणाला."हर्षदाने कान टवकारले. "अरे वा कितवं?"

"पहिलंच." हर्षदा कोसळत राहिली. तिनं नळाला घट्ट धरलं. डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहू लागल्या. तिला बाहेर जायचं धाडस होईना. तीनं मग आईसाठी स्वयंपाक करू लागली. सोहम तिला हाक मारत होता. ती कांदा कापता कापता बाहेर आली न् म्हणाली, "अरे, तुम्ही खेळा. माझा स्वयंपाक होतोय." घनाकडे न पाहाता ती आत आली. तिला स्वतःचाच खूप राग आला. ती जोराजोरात कणीक तिंबू लागली.

✦ ✦ ✦

# हिमनगाचं टोक

"उन्हाळ्याचे दिवस. पहाटेची वेळ. हवेत सुखद गारवा होता. कोरेगावच्या रिकाम्या रेल्वेस्टेशनात रेल्वे धडधडत आली. शांत, सुनसान स्टेशनातलं कुत्रं धडपडून उठलं. अंधाराला जास्त गडद करणारी ट्यूबलाइट भगभगत होती. तिथं गार्ड हातात हिरवा झेंडा घेऊन उभा राहिलेला. हळूहळू गाडी उभी राहिली. गाडीतून एकच प्रवासी उतरलेला पाहून गार्डने कुतूहलाने चौकशी केली.

"कुठल्या गांवचं पावणं." फौजी गणवेश, मोठमोठे जाडजूड बूट, पाठीवर किट, सहाफूट उंचीचा धिप्पाड गडी. म्हणाला, "रुईचा हाय."

"आता उजाडंस्तवर थांबा, वेटिंग रूममधी. तांबडं फुटलं की एखादं वाहन मिळेलच. मग जावा." दोन दिवस प्रवासात बसून अंगाला मुंग्या

आलेल्या आता. दोन तास बसणंही युगायुगासारखे वाटले. त्याला रात्री, बेरात्री, पाऊस, ऊन, थंडी, वारा अगदी बर्फाच्या वादळातून अनोळखी वाटा पाडत जावं लागतं.

दऱ्याखोऱ्यातून हिंडावं लागतं. इथं तर आपल्याच गावची वाट. चांगली रूळलेली. राजरस्ता झालेली. पायांनासुद्धा ओढ लागलीय या वाटेची. कशाला हवं वाहन. सामान थोडं जास्त आहे खरं. तो म्हणाला, "जातो जुन्या स्टॅण्डपर्यंत पायतरी मोकळे होतील." असं म्हणत त्याने किटमधली टॉर्च काढली. किट पाठीवर टाकले. दोन हातात दोन बॅगा घेऊन खाड्खाड् मजबूत बुटांच्या दमदार चालीत रस्त्याला लागलासुद्धा. शहराच्या बाहेर रेल्वेस्टेशन तिथून दोन अडीच किलोमीटरवर जुने एस.टी. स्टॅण्ड. आजूबाजूला शेती, नुकतीच सुगी झाल्यामुळे मोकळी, नांगरलेली होती. रस्त्याकडेने आंबा, वड-पिंपळाची झाडे. रस्त्याच्यामधूनच तो झपझप घराच्या ओढीनं निघाला. मावळतीला निघालेल्या चंद्राच्या प्रकाशात आता बरंच दिसू लागलेलं. डोळे त्या उजेडाला सरावले. त्याला घर, घरातली माणसं दिसू, आठवू लागली. जाताना गदूळलेले आर्त डोळे हसवायचे होते. टाटा केलेले चिमुकले हात गळ्यात अडकवायचे होते. सुरकुतलेल्या मायेच्या आभाळाखाली विसावायचे होते. सगळंच एकदम खूप खूप काही करायचं ऐकायचं, बघायचं होतं. चार महिन्यानंतरचा विरह विसरून जायचं होतं. किती वर्षं झाली. मिलट्रीत भरती होऊन पण दर वेळी अशीच ओढ वाटते. लग्न झाल्यावर ह्या ओढीत दाट गहिरे पण आले. तेवढेच नवेपण वाटते. इतक्या दिवसांच्या भेटीत. जणू पहिलीच रात्र वाटते. तो भरभर निघाला. रिक्षातळापर्यंत घामाघूम झाला. वॉटरबॅगेतलं थंड पाणी पिऊन थोडा दम खाल्ला. एक, दोन रिक्षा उभ्या होत्या. रिक्षावाल्याला जागं करीत म्हणाला, "रिक्षावाले उठा."

"ये ऽ गप्प रे ऽ झोपू दे." रिक्षावाला खेकसला.

"अहो, साहेब, आधी घरी सोडा मला. मग झोपा."

रातचं कोण तडमडलं, म्हणून त्याने जरा नीट डोळे उघडून बघितले. तर मिलट्रीवाला उभा होता. तो एवढ्या अंधारात आलेला पाहून रिक्षावाल्याला जाग आली. रिक्षावाल्याला माहित होतं हे जवान लोक घरी जाण्यासाठी किती आतुरलेले असतात. त्याने चादरीची घडी घातली. आपल्या सीटवर टाकली. म्हणाला, ''बसा. अंधारात चालत आला. इच्चू काट्याचं भ्या न्हाय का वाटत?'' रिक्षा चालू करीत रिक्षावाल्याचं काहीतरी बोलायचं म्हणून बडबड चाललेली. फौजी हसला, मनात म्हणाला, शत्रुला ठेचून काढणारे आम्ही, साप विंचवाला कसे घाबरू? तो रिक्षात सामान ठेवून बसला. ''कुठं जायचं साहेब?''

''रुईला चला की. दामू पाटलाच्या घरी.''

''त्यांच्या नातीच्या लग्नाला आला वाटतं?''

''होय. पुतणीच माझी.''

''आस व्हय. आमच्या पावण्यापैकीच जागा हाय.''

''कशीय जागा? मुलगा?''

''एक नंबर हाय मुलगा बी चांगलाय.'' असं बोलत ते पहाटवाऱ्यात निघाले. अजित घरी पोहोचला तेव्हा सगळेच अजून झोपेत होते. त्याने टॉर्चने कोण कुठे झोपलंय ते बघितले. साक्षी आणि ऋषिकेश वाकडेतिकडे झोपलेले. तिथेच उषा झोपलेली.

ही आत झोपली असती तर... आता उठवायची कशी हिला... त्याने बुटाचा पाय तिच्या पायावर किंचित दाबला. दुखल्यामुळे तिने डोळे उघडले. ... अजितला बघतच राहिली. त्याने किट तिथेच ठेवून जोत्यावर बसून बूट काढू लागला. ती हळूच उठून बसली. अजून उजाडायचं होतं. सगळे झोपेत होते. तिने पोरांना नीट झोपवून अंगावर पांघरूण घातलं. हळूच उठून दरवाजाकडे गेली. किती सावकाश दार उघडले तरी करकरलेच दार. मुंबईच्या मावशीला पहाटे उठायची सवय. डबा करून देते काकांला.

इथे आल्यावर संडासची सोय नव्हती. मग हे महत्त्वाचे काम उजाडायच्या आधी ती पार पाडायची. त्यामुळे जराशा चाहुलीनं तिला जाग आली. ती अंथरुणात उठून बसली. खरं तर जाग बापूंना, भाऊंनाही आलेली. बापूंना तर चार वाजल्यापासून झोप यायची नाही. बैलाकडनं, गुरांकडनं चक्कर मारायची. तंबाखू खात पडायचे. रिक्षाच्या आवाज त्यांनी ऐकलेला म्हणूनच ते तोंडावर पांघरूण घेऊन झोपलेले. उषा न् अजितनं संकोचू नये म्हणून.... भाऊंनी मुस्कटून घेतलं. पण मावशीला कुठली एवढी पोच. ती उठली. तिला अजित दिसला पण फौजी कपड्यामुळे नीट ओळखू आला नाही. तिनं दरडावूनच विचारलं,

"कोण ते?"

"मीचय मावशी." अजितचा विरस झाला.

"अजित, तू रं कधी आलास?" मग ती नीटच जागी झाली. म्हणाली, "उषा, मला उठवायचं न्हाय का गं आज उशीर झाला. त्याला चहा करणार असशील तर मला पण कर.." मावशी उठलीच. तिनं तिवईवर बंब ठेवला. खाली जाळी लावली.

"उषा, रॉकेलचा दिवा न् काडेपेटी दे गं." उषानं मग ते सगळं त्यांना नेऊन दिलं. अजित चरफडत आत गेला. आता मावशीनं बंब पेटवला. बंबात पाणी ओतून ती डबडं भरून निघाली. जाताना म्हणाली, "अजित आता पाणी गरम होईल बघ. तोंड धू." सगळेच जागे झाले. मग तो कपडे बदलून साक्षी न् ऋषिकेश जवळची जागा रिकामी झालेली. तिथं जाऊन झोपला. त्याने साक्षीला जवळ घेतले. तिनं डोळं किलेकिले करून बघितलं. अजितने तिच्या डोळ्यातले चिपडे काढले. ती आनंदातिशयाने ओरडली, "आयव ऽ तात्या कवा आला?" "आताच." त्यानं तिला आणखी जवळ घेत तिची पापी घेतली.

"तात्या, बघा की ऋषी मला आंयजवळ झोपू देत न्हाय."

"आता माझ्याजवळ झोप."

"आताय ना मी पण त्याला तुमच्याजवळ झोपू देणार न्हाय." ती त्याच्या कुशीत शिरत म्हणाली.

"काय खुसखुस करतीस गं? झोपू दी की त्याला."

हौसाबाईला लेकाची माया आली. आता एकेक जण उठून बसत होते. जोत्याजवळचं किट बघून कळत होतं. अजित आल्याचं. कुणी वाकळंच्या घड्या घालीत होती. कुणी डबडं शोधून पळत होती. एखादं पोरं शेरडीच्या नाकासमोर गवताची काडी धरून तिला उठवत होतं. हौसाबाईनं नेहमीच्या सवयीनं कोंबड्या सोडल्या. रोज अंथरुण लवकर निघायची. आज अजितमुळे एक अंथरूण तसंच राहिलेलं. क्वॉक, क्वॉक करीत शिटा टाकीत कोंबड्या इकडं तिकडं पळू लागल्या. "ह्यान्ला पिलीक आला. जा की तकडं. उठा रे, कोंबड्या वाकळंत शिटल्याल्या." कोंबड्याच्या गोंधळात ती अजित आल्याचे विसरली.

"आगं ऽ ऽ वाइच दम नव्हता का तुला? तात्याला झोपू दी की." बापू तंबाखू मळत खाटेवरच बसून होते. हौसाबाई मडक्यात ज्वारी घेऊन गोठ्याकडे निघाली. "या, या, प्पा ऽ प्पा" असं कोंबड्यांना बोलावू लागली. कोंबड्या तिकडेच पळाल्या. अजितचा थोरला भाऊ रणजीत उठला. त्यांच्या तिथंच गप्पा सुरू झाल्या. ऋषिकेश उठला. त्यांच्या गालावर चापटी मारताच त्याने भोकाड पसरले. उषानं त्याला उचलून घेतल्यावर तो शांत झाला. बापाकडे टुकूटुकू बघू लागला. अजितने त्याला "ये, ये" करत दोन हात पुढे केले. पण तो आईच्या खांद्यावर डोकं घुसळत रडू लागला. चार महिन्यांनी आल्यावर आपलंच लेकरू आपल्याला ओळखेनासं होतंय. त्याला पोटात कालवल्यासारखं झालं. मुंबईच्या मावशी त्याला उषाच्या कडेवरनं घेत म्हणाल्या, "आरं तात्या, हाय तात्या. बघ चॉकलेट आणलंय." त्याने मावशीच्या खांद्यावर डोकं ठेवून चोरट्या

नजरेनं अजितला बघू लागला. बापाला निरखू लागला. उषा मोकळी होताच घरात गेली. एका बाजूला गॅसची शेगडी होती. गॅसवर फक्त चहापाणी व्हायचा. बाकी स्वयंपाक चुलीवरच. तिनं राख, केर भरून चूल झाडून घेतली. ऊसाच्या वाळलेल्या बुडक्याखाली कागद ठेवला न् चूल पेटवून त्यावर चहाचं पातेलं चढवलं. पहिला चहा चुलीवरच व्हायचा. इकडं तिकडं काम करताना चूल विझायची. गॅसवर मात्र चहा आटून जायचा. कधी कधी पातेलं करपायचं. चूलच बरी वाटायची तिला सकाळच्या गडबडीत. आता पाहुण्यांनी घर भरलेलं. मोठं पातेलं भरून तिनं चहा ठेवला. चुलीतल्या आगीकडे बघत ती कितीतरी वेळ बसून राहिली. ऋषी काटकीनं खेळत होता. त्याने पेटती काटकी नाचवली तरी उषाचे लक्ष नव्हतं. हौसाबाई आली. तिनं खसकन् काटकी काढून घेतली त्यांच्या हातातून. तो रडू लागल्यावर उषानं त्याला जवळ घेतलं.

अजितने किट उघडून एक एक वस्तू बाहेर काढू लागला.

"बापू तुम्हांला जर्सी घ्या."

"आता का थंडी हाय व्हय?" कौतुकानं जर्सी घेत बापू म्हणाले.

"जुनी फाटलीय. आता पावसाळा सुरू होईल. पावसाळ्यात पण घालत जा." दोन कांबळी काढून त्याने आईकडे दिली सगळी पोरं भोवतीनं गोळा झालेली. त्यांना मिठाई, आग्र्याचा पेठा वाटण्यासाठी आईजवळ बॉक्स दिला.

"दे सगळ्यांना."

"अजून तोंड तरी खंगाळलीत का? जा तोंड धुवा खायला देती." हौसाबाईनं पोरांना तिथनं हाकललं.

"साक्षी, हे बघ तुला." डोळ्यांची उघडझाप करणारी सोनेरी केसांची बाहुली पाहून साक्षी हरखली.

"टाकचील मोडून, आयजवळ दी." हौसाबाई नातीवर करवादली.

"बघू, बघू" ऋषी, इतर पोरं साक्षीकडं पळाली.

"लय वढावढी करू नका." हौसाबाई पोरांच्यावर ओरडली.

"लालचुटूक स्वेटर काढून त्याने आईजवळ देत म्हणाला, "ऋषीला." आपल्याच पोरांचे तेवढं लाड बघून हौसाबाई नाराज झाली. मग त्याने साबण, सुगंधी तेलं, चहाची पावडर असं बरंच मिलट्री कँटीनमध्ये स्वस्त मिळणारं सामान आईकडं दिल्यावर जरा तिला बरं वाटलं." खूश होऊन तिनं विचारलं, "नवरीला काय आणलंस?" एका कातडी पाऊचमधून पैशाचं पुडकं काढून सुजाताच्या हातात देत, "घ्या नवरीबाई तुम्हांला." बापूला आनंद झाला. भाऊंचं टेन्शन कमी झालं. त्याला आल्यापासून विचारायचं होते, किती पैसं आणलं? पण त्याने दुसरंच काढून देऊ लागल्यावर त्याला राग येऊलागलेला. आपण ह्याची बायकापोरं सांभाळतो, शेती, आईवडील सगळंच बघावं लागतं. ह्यानं लग्नासाठी तरी पैसे नको का द्यायला? आणतो म्हणालेला. आणील असं वाटलेलं. पण तरी कितीसं आणलं, ह्याचं टेन्शन असतंच की. सुजातानं पैसे बापूजवळ दिलं. बापूनं भाऊजवळ दिलं, म्हटलं, "आगे, त्याला च्या कवा देणार? का नुसतं कांबळं पांघरूण बसतीस. नाष्ट्याला कर कायतरी."

"च्या ठेवलाय की. कडायला तरी नकू का?"

"आगं पोरी, हिच्या मायला हिला कळत न्हाय. त्याला चांगला दुधाचा च्या कर इतक्या लांबून आलंय पोरगं त्याला खळबूट देतीस का?" उषानं मग गॅसवर कपभरच चहा केला. पाणी कमी, साखर कमी, दूध पावडर जास्त. त्याला आवडेल असा चहा केला. अजित कळकट कपबशीत चहा घ्यायचा नाही. त्याला पेल्यातच चहा प्यायला आवडायचे. स्वच्छ घासलेल्या स्टीलच्या पेल्यातून त्याला चहा नेऊन दिला. तेवढ्या वेळात बोटांना झालेल्या स्पर्शाने तिच्या अंगभर वीजेचा लोळ फिरला.

"वहिनी तुम्हांला घ्या मोकळं पोतं." दोघं भानावर आली.

“तुम्ही सगळ्यांनी मोकळं केलंय, पण जाताना मलाच भरून द्यायला पाहिजे.” उषानं मोकळ्या किटची घडी करून नीट ठेवली. चुलीवरच्या चहाला उसळी आलेली. तिचं लक्षच नव्हतं. हौसाबाईनं तिची घालमेल ओळखली. तिनंच मग चहात दूध ओतलं.

“पाणी तापलं आसल तर द्या आंघोळीला.” उषाला बाहेर काढायची संधीच अजित शोधत होता. उषा बाहेर आली तर नर्मदानं, तिच्या जावेन बादलीत पाणी सोडून ती बंबात पाणी ओतत होती. लगीनघरात तिथंच रेंगाळणं बरं दिसणार नाही म्हणून ती अजितकडे गेली. त्याला म्हणाली, “अंडरपँट, बन्यान हाय ना.” तिनं बॅगेत बघितलं तर तिला तळाशी तोंडाला लावायचं क्रिम दिसलं. तिनं त्याच्याकडे बघितलं. हळूच मुठीत डबी पकडली. वर कपडे धरून ती बाहेर गेली. ती डबी कशी लपवावी या विवंचनेत ती होती. नर्मदाने आंघोळीच्या फरशीजवळ बादली ठेवली न् उषाला म्हणाली, “आण कपडे ती न् जा पटदिशी शिरा कर.” उषाला नर्मदाच्या या लुडबुडीचा राग आला. तिनं स्वतःच कपडे दोरीवर ठेवले. ती क्रिमची डबी दिसणार नाही याची काळजी घेत. अजित आंघोळीसाठी मांडलेल्या फरशीवर कपडे काढून बसला. ती तो आला की पाठीला साबण लावून द्यायची. पण आता जिकडं तिकडं माणसंच. ती चोरट्या नजरंनं बघत तशीच उभी राहिली. त्याच्या पीळदार, घोटीव शरीराकडे बघायचं नाही असं ठरवलं. तरी नजर वळतच होती. नर्मदाही तिथून जाईना. नर्मदानं दगड शोधला न् म्हणाली, “तात्यासाब बघा तिकडं. पाठान घासून देती.” मग नर्मदानेच त्याच्या पाठीला साबण लावला, दगडाने घासून दिली. उषा हिरमुसली आत येऊ लागली. तिच्या कानावर मावशीचे बोल पडले.

“दीर भावजयचं किती प्रेम बघा. थोरली भावजय आईप्रमाणंच असती. आईचं नाही पण भावजयचं किती लक्ष.” उषाच्या मस्तकाची शीर तडतडत होती. ह्या मावशीला सदा नर्मदाचंच कौतुक. सकाळी

तिच्यामुळे ताटातूट झाली. आता जाऊ मध्ये कडमडली. तिची सासू अडाणी वाटली तरी तिला समजत होतं. पण नर्मदाला, मावशीला कसं कायच समजंना? उषाला दोघींचा राग आला.

हौसाबाईनं मळ्यातनं वांगी, कोथिंबीर, काकड्या, टोमॅटो आणले. उषाकडे देत म्हणाली, "नीट कर ध्यान देऊन." ती लसूण सोलायला लागली. तिनं पाहुणीला शेंगा फोडायला बसवलं. चुलीत कांदे भाजत टाकले. बाहेर विस्तव ओढून त्यावर खोबरं भाजलं, उषाने तेल सुटेपर्यंत पाट्यावर मसाला वाटला. नर्मदाने वांगी चिरून घेतली. न् उषाला म्हणाली, "मी बघती स्वयंपाकाचं." तिचं बोलणं ऐकून हौसाबाईनं रागातच नर्मदाकडे बघितलं. पण तिची काही बोलायची हिंमत नव्हती. मग तीच उठली "चल" म्हणाली, "दोघी पण जाऊ." दोघींनी दोन बादल्या भरल्या न् धुणं धुवायला गेल्या. जेवायच्या वेळेपर्यंत आल्या. धुणं धुऊन हौसाबाईनं बादली ठेवली. उषा म्हणाली, "आत्या राहू द्या मी घालती वाळत. उकडलेल्या शेंगा काढा न् भातवड्या पण भाजा." उषाला हे स्वतः काढायचं धाडस नसायचं. लग्नाच्या राज्यात संपतील म्हणून नर्मदा काढणार नाही. नुसतं पुढं पुढं करून प्रेमळपणा दाखविणं तिला जमतं. भाऊंनी कैऱ्या आणलेल्या. त्याला हळदमीठ लावलं. हौसाबाईनं पापड, भातवड्या काढल्या. पंगत बसली. हौसाबाईनं अजितच्या भांड्यात तुपाची धार जास्तच वाढली. घरच्या शेतातल्या तांदळाच्या मऊ भातावर साय घातली. अजितला किती खाऊ न् किती नको असं झालेलं. पोटाला तडस लागली तरी हौसाबाईनं शेवयाचा भात ताटलीत वाढून आणला.

"आता काही नको. पोट गच्च भरलंय." अजित म्हणाला.

"खा घासभर."

"आमाला न्हाय व्हय शेवयाचा भात." बापू म्हणाले,

"तुमाला काय कवा मिळत न्हाय का. केला मंजी म्हणायचं ग्वाड नकू. अंडी-मटणाशिवाय तुमचं प्वॉट कुठं भरतं?"

"आगं दात हालत्यात. वाईच मऊ खावंस वाटतंय."

"शेंगा, पापूड खाताना बरं दात हालत न्हाईत." वाटीत शेवया आणून त्यांना देत हौसाबाई म्हणाली, "हं, गिळा."

"बघ आता मला एकट्यालाच व्हय."

"सगळ्यांला केलं तर वरसाचं बोटवं संपत्याल. कणगुलं मोकळं हुईल. खायचं आसलं तर खा मुकाट्याने. उद्या करू सगळ्यांला. धाईस लिटर दूध आणून द्या. मऊ साय-भात, बोटव्याचा भात सगळं खाऊ घालती." हौसाबाई तणतणली. उषा खरकटी भांडी घेऊन बाहेर गेली. अंगणात घासत बसली. अजित जाताना दिसल्यावर त्याला नजरेनंच म्हणाली, 'कुठं निघालात?'

"झापड आलीय डोळ्यावर. आंब्याखाली जाऊन पडतो. जेवल्यावर ये तिकडं."

"लगीनघर हाय म्हनलं... तुमीच नका जाऊ. घरातच झोपा."

"लगीनघर हाय म्हणलं... घरात झोप लागलं का?"

"डोळ्यांसमूर आपलं माणूस नुसतं आसलं तरी बरं वाटतं."

"आता हाय दोन महिने डोळ्यांसमोरच." तो निघाला. नर्मदा आतून म्हणाली, "उषा कुणासंग बोलतीया. ये इकडं भाकरी कमी पडल्यात. बस भाकरीला." मग अजित न रेंगाळता गेला. सकाळी नर्मदाने भाकरी टाकलेल्या. कशाला जास्ती करेल. कमी पडल्या तर हायची आपून. उषाला खूप राग आला पण भूक लागलेली. आता भाकरी थापल्याशिवाय जेवायला कुठलं मिळणार. शिळं होतं ते खाऊन हौसाबाई गेली रानात. मावशीला भूक निघत नाही. ती पहिली भाकरी झाली की जेवून घेती. नर्मदाला चहा न् मिश्रीनं भूकच लागत नाही. उषाच्या अंगावर ऋषीकेष पितो. कामानं तर पिट्ट्या पडतो पण खाण्यापिण्याची अशी वाणवा. कुणाला खरं वाटायचं नाही, अशी उपासमार होते. कधी सुजाता बरोबर

खाल्लं तर आठवडाभर नर्मदा काढत रहाते ती जेवली, तिला खायला लागतं, तिला भूक निघत नाही... मग तिला खायचीच इच्छा राहायची नाही. तर आता भाकरी टाकण्याशिवाय पर्याय नव्हता.

दुपारी भांडी घासून होतात न् होतात तोवर भावकीतल्या बायका आल्याच त्यांना रवा, तांदूळ, चाळणी, सुपं, घमेली, पराती काढून दिल्या.

"काय गं उषा अप्रयाचा पेटा लय झालाय वाटत."

"बघितला सुद्धा न्हाय." उषा म्हणाली.

"तिच्यासाठी पेशल आणला आसल. तो काय दिवसा देत्यात व्हय?"

"आमाला नको सांगूस."

"तुमाला का सांगायचं, माझ्यासाठी आणलेलं."

"आसं वं काय वैनी सांगा की." बिनलग्नाची पोरगी.

"तुला न्हाय आताच कळायचं."

उषा गप्पागोष्टीत सुखावत होती तेवढ्यात नर्मदा म्हणाली, "बोलत काय बसलीस. मिश्री दे सगळ्यांला न् च्या ठेव." असं म्हणत ती तिथं बसली. उषाला म्हणाली मला एक ताट आणून दे. चरफडत उषाने तिला ताट दिलं. बायकांना मिश्री दिली न् चहा ठेवायला चुलीकडं गेली.

लग्न दोन दिवसावर आलेलं. उशीरापर्यंत कामं चालायची. उद्या तर सगळीच पाहुणेमंडळी येणार. बऱ्याच उशीरा सगळे झोपले तरी नर्मदाचं काही तरी झाकपाक, खुडबुड चाललेलं. उषा इकडं तिकडं करत वेळ घालवत होती. आतल्या खाटेवर अजित ताटकळत होता. नर्मदाचं लवकर उरकत नव्हतं. उषा दमलेली. ती मग ऋषिजवळ जरा आडवी झाली. पटकन तिचा डोळा लागला. नर्मदाच काम झालं की तिनं सासूला हाक मारत उठवलं म्हणाली, "आत्या वायच उठून बसा मला बाहेर जायचंय."

"तुला गोळा उठला. इतक्या रातची बरी लागली." असं म्हणत

हौसाबाई उठली. नर्मदा जाऊन आली. पुन्हा ती घरात गेली. मग अंथरुणावर येऊन झोपली. येताना तिनं नेहमीच्या सवयीनं खाडकन दार लावून घेतलं. तेवढ्यानेच उषा जागी झाली. तिनं चाहूल घेतली. सगळीकडे सामसूम वाटलं. ती हळूच उठून बसली. ऋषीच्या पुढं उशी सरकवून त्याला नीट पांघरुण घालून सावकाश उठून ती अजितकडे निघाली. आता उठून कुणी काय म्हटलं असतं तरी ती थांबली नसती. तिनं दार उघडून आत गेली. पटकन कडी लावून अजितच्या कुशीत शिरली.

पहाटेच मुंबईवरून मावशीचा मुलगा आला. तो न् अजित बरोबरीचे. लग्न आणि अजितला भेटणं दोन्ही होतं. त्याचा चहा वगैरे करायला मावशी उठली. ती त्याला म्हणाली, "तू पण आतच झोप. इथला मोकळा वारा सोसायचा नाही."

"झोप इथंच मी झोपतो बाहेर. मला इथं उकडतंय. तू झोप. आता तर उजाडायलाच आलंय. झोप इथंच." मग तो तिथंच झोपला. अजितने सतरंजी चादर घेऊन अंगणात पसरली. गार हवेत तो गाढ झोपला. उषा तर प्रचंड दमलेली. तिला पहाटे कोण आलं गेलं कशाचीच चाहूल नव्हती. उशीराच जागी झाली. तोंडावर ऊन आलेलं. हौसाबाई अंथरुणातच मिश्री लावत बसली. तिला जागी झालेली पाहून म्हणाली, "उठा की आता. किती झोपायचं." तिला तिची दमणूक कळत होती. आवाजात माया होती. उषा पटकन उठून आत गेली. तिनं अजित अंगणात झोपलेला बघितलेला आत गेल्यावर खाटेवर कोणतरी होतं. तिला कळेना इथं तर अजित झोपलेला.... उकडतंय म्हणून झोपला असेल बाहेर. पण बाहेर कधी झोपला?

तिनं जवळ जाऊन बघितलं तर तिचा मावसदीर. अजितसारखाच दिसणारा. हा कसा इथं? आपण तर रात्री इथे आलो होतो... गुपचूप... येणार होता, मग आपली झोप लागल्यावर आला की काय? मग आपण

ह्याच्याजवळच...?? तिला प्रचंड मानसिक धक्का बसला. हा कधी आला न् आपण इथे किती वाजता झोपलो? याचा काहीच ताळमेळ बसेना. ती सुन्न झाली. कुणाशीच बोलेना. नुसतीच बसून राहू लागली. अजित जवळ आला की त्याच्यापासून दूर जायची. तोंड लपवून बसायची. ऋषीला तेवढं पाजायची. बाकी तिचं कशातच लक्ष लागेना. साक्षी बापाभोवतीच असायची. ऋषीही कुठेतरी खेळत रहायचा. उषा सुम्म झालेली. तिचं कामात लक्ष नसल्यामुळं कामं नीट होत नव्हती. नर्मदाला तिच्या नरडीचा घोट घ्यावा वाटू लागला. सगळ्या कामाचा बोजवारा उडत होता. नर्मदा बायकांजवळ बडबडत होती. लग्नात नवऱ्यानं पैसा दिला न एवढा म्हणून ती आसं करतीया... तिला वायलं रहायचंय... तिला वाटतंय आपली हौस मौज हुईना तर एकात कशाला राहायचं? असं बरंच काही ती बोलायची, कुजबुजायची.

हौसाबाईला सुनंचं काही कळेना. तिला काळजी वाटू लागली. पण लग्नाच्या घाई-गडबडीत फुरसत मिळेना तिच्याशी बोलायची.

उषा आतल्या आत स्वतःच्या मनाला कुरतडत राहिली. असं कसं झालं? का झालं? ती अजितपासून लांब लांब राहू लागली. अजित दुचित झाला. ही अचानक तुसड्यासारखी का वागायला लागली? घुमी का झाली? तिच्या वागण्याचे, मौनाचे हिमनगाप्रमाणे फक्त टोक दिसत होते, एक अष्टमांश ! पाण्यात बुडालेला खंड कुणालाच कळत नव्हता. न दिसणाऱ्या गोष्टींनीच उषाचं सगळं ध्यान डुचमळत होतं... चित्त थाऱ्यावर नव्हतं तिचं... लोक बघत होते फक्त हिमनगाचं टोक. तिच्या मेंदूतल्या प्रश्नांच मोहळ तिच्या मनाला, त्या मोहळातल्या माशा नांग्या मारत होत्या...

✦ ✦ ✦

|| वाचकमित्रांना प्रिय आवाहन ||

आमच्या प्रकाशनाची पुस्तकं आपण
आवडीनं वाचता ही आमच्या प्रकाशनाच्या
दृष्टीनं केवळ आनंदाचीच बाब नव्हे
तर धन्यतेची गोष्ट आहे !
आपण वाचनाचा आनंद अनुभवला
ते पुस्तक कसं वाटलं, का आवडलं
याविषयीचा तुमचा एक पानी संक्षिप्त अभिप्राय
आमच्या पत्त्यावर जरुर कळवा.
उत्कृष्ट ठरलेल्या निवडक अभिप्रायासाठी
संबंधित वाचकमित्रांना आम्ही
पुस्तकरूपात भेट पाठविणार आहोत.
ही निवड प्रतिमाह राहील.

किंमत २००/-

गंधर्व
पब्लिकेशन्स

गोष्टीतली बाई
सावित्री जगदाळे
100372
ajab 50 AJAB 200